# वऱ्हाडसमाचार.

**BERAR SAMACHAR**

वर्ष ४२ ] आकोला वऱ्हाडसमाचार सोमवार तारीख १ माहे जून सन १९०८ इ० [ अंक २०

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हा. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशिचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन आळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः-- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक

ह्या बँकेत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागे राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिलक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिलक रकमेस व्याज नाहीं नियमाच्या प्रती बँकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } G. A Phillips एजंट

नं ७३

### नोटीस

बेशमी भवानदिन वल्लद महानंद परदेशी कनोजा ब्राह्मण रा. कसबे दहिहांडा तालुके आकोट व रा. मामन तालूके दर्यापूर यासः—

खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं मौजे वडद तालुके आकोला येथील शेत सर्वे नंबर ३१ पैकी सर्वे नं. ४९ सालीम हीं दोन्हीं शेतें व कसबे दहिहांडा येथील रहातें घर व इतर सर्व जिनगी माझे नवऱ्यानें आपले हयातींत कमावलेली आहे माझे नवऱ्या पासून तुह्मी पुष्कळ वर्षापासून विभक्त आहां तुमचा सदर्हु जिंदगी वर अगदीं संबंध नाहीं व हक्क नाहीं. याजबद्दल दिवाणी कोर्टांतून पुर्वींच निकाल झालेला आहे. व सदर्हु सर्व जिनगी माझेच ताब्यांत आहे. मी असें ऐकतें कीं मजला न कळतां व माझे संमतीवांचून सदर्हु माझे जिनगी संबंधी तुह्मी कांहीं तरी लेख करुन ठेविलेला आहे. परंतु तुह्मी पक्कें समजावें कीं कांहीं खरोखरच जर तुह्मी असें केलें असेल तर त्या पासून माझें किंवा माझें मुलीचें नुकसान न होता उलट तुह्मांसच घातक होईल. तसेंच सर्व लोकांस कळावें कीं माझ्या सदर्हु जिंदगी संबधानें सदर्हु भगवानदिन किंवा इतर कोणाशीं कांहीं व्यवहार लेखी किंवा तोंडी काराल तर तें सर्व रद्द व पोकळ समजलें जातील. कळावें तारीख २७- ५- १९०८ दस्तुर विष्णू प्रभुराम पेन्शनर हाय कोर्ट पिटिशन रायटर आकोला.

सही

सहीची निशाणी राधाबाई जवजे गंगादिन परदेशी कनोजी ब्राह्मण रा. पोस्ट दहिहांडा इचे हातची बांगडी असे

नं. ग. ११

### नोटीस

बनेखा अमनखा मुसलमान दुकान अडुळा ता. दर्यापूर यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी मजपासून तारीख ४-३-१९०७ रोजीं १२०० रुपयाचें तावेगहाणखत लिहून घेतलें त्यांत तुह्मी दगाबाजीनें माझा दीर भिवसन याचें नांव ऋणकोंत घातलें व सदर्हू दस्तैवजाचे भरण्यांत किसनसिंग रजपूत दर्यापूर यांचे गहाणखतावरून ६०० रुपये देणें निघत होतें त्याचा हवाला घेतला व बाकीचे रुपये नगदी दिले असें लिहिलें परंतु सदर्हू किसन याचें मला मुळींच देणें नसून मी त्याचा हवालाही दिला नाहीं. मला शिवबक्ष जयनारायण मारवाडी दुकान अडुळा याचें देणें होतें व त्या करितांच मी तुमचें कर्ज काढून तुह्मांस तावेगहाणखत लिहून दिलें पण तुह्मी व माझा दीर उभयतांनीं मिळून मला बुडविण्याच्या उद्देशानेंच वरील हवाल्याचें दगाबाजीचें कृत्य केलें आहे तरी ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत सदर्हू रुपये ६०० मला देऊन माझी पावती घ्यावी. नाहींपेक्षां सदर्हूबद्दल तुमचे वर योग्य कोर्टांत या नोटिशीचे खर्चासहीत दावा करावा लागेल. कळावें ता. २० माहे मे सन १९०८ इसवी

सही

कपुरी मर्द जानुमहार रा. नांदरुण ता. दर्यापूर इच्या हातची निशाणी बांगडी

नं. ग. १२

### नोटीस

ती. राजश्री नागुलेली भूमया रंगय्या कायमरचर्ट राहणार उमरावती यांसः—

विनंती विशेष आपण आकोला वऱ्हाडसमाचारचे तारीख १८ मे १९०८ चे पत्रांत आपल्या सहीची "( सर्व लोकांस नोटीस" ) या मथळ्याखालीं नोटीस छापविली व त्या पत्राची एक प्रत रजिस्टर करून मला पाठविली ती मला पोहचली त्यांतील मजकूर अगदीं खोटा व आपमतलबीपणाचा उघडपणें दिसत आहे. एकंदरीत आपला कावेबाजपणा मला दिसून येऊं लागला आहे. मालक हयात होते तोंपर्यंत तुमचे पासून त्यांना पैची सुद्धां प्राप्ती नव्हती उलट मालकाकडूनच तुमचें पोषण झालेलें आहे. त्यानींच तुह्मास चरितार्थास लाविलें आहे. तुमचे श्रमाचा कांहींच त्याना फायदा मिळाला नाहीं. वडिलार्जित कोणतेही प्रकारची इस्टेट मालकाजवळ नव्हती, किंवा आपणही दिलेली नाहीं. मालकांनीं निवळ आपल्या श्रमानें व स्वतःच्या कर्तबगारीनें चार पैसे मिळविले व माझे दुर्दैवानें त्यांचा आकस्मीत अंत झाला. तर त्याची जिंदगी घेण्याचा तुह्मास लोभ होऊन त्याला अनुसरून तुह्मी कपटाचें आचरण चालविलेलें दिसत आहे. मालकाचे उपकार स्मरून कृतज्ञता बुद्धीनें तुह्मी माझें हीत कराल व माझा पैसा व्यवस्थित रीतीनें खर्च करून सांभाळाल अशी मला उमेद होती, परंतु पूर्वींचे उपकार विसरून तुह्मी पैशाचे लोभामुळें मालकाचे जिनगीवर आपला हक्क दाखवूं पहातां. महत्वाचे कागदपत्र भरवशानें मी आपले जवळ राहूं दिले तेही आपण दाबून बसलां. एकंदरींत तुह्मी मला व माझे मुलाला बुडविणार व स्वतःचा फायदा करून घेण्याचे खटपटींत आहा असें आपल्या अनेक प्रकारचे वर्तनावरून दिसून येऊन माझी पक्की खात्री झाली आहे. हें सर्व तुमचें करणें गैर आहे. ईश्वराला भिवून व न्याय्य बुद्धीस जागृत ठेऊन इमानास जर जागलांत तर माझे ह्मणण्याची सत्यता तुमचे मनांत तात्काळ उभी राहील. परंतु असा सुप्रसंग घडून येईलसें दिसत नाहीं. असो. मी बायको मनुष्य आहे माझा कोणावर ही भरवंसा नाहीं, बाप किंवा भाऊ हेही माझे विश्वासांतील नाहींत. पैशासाठीं लोभ सर्वांनाच सुटतो, ह्या सर्व गोष्टी मी समजून आहे. मालकाचें नांव चालावावयाचें असल्यास व ईश्वराचे मनांत मालकानें संपादन केलेली जी थोडी बहुत जिनगी मजजवळ राहणें योग्य आहे ती त्याचा त्याचे पश्चात जन्मलेला पुत्र याचे कारणीं लावण्याची ताकद ईश्वर मला देवो व तुमचे सारख्यांचा विश्वास घातकी प्रयत्नांतून मी सुरक्षितपणें पार पडो. येवढेंच देवाजवळ माझें मागणें आहे. पूर्वीं तुह्मी मला १९ रुपये व ९ मिळून २० रुपयाच्या मनीआर्डरी मला आपण पाठविल्या होत्या त्या मी भोळेपणानें तुमचे कपट न समजतां घेतल्या परंतु अलिकडे तुह्मी पुनः १० रुपयाची मनीआर्डर पाठविली ती मी नाकारली. आपण मुद्दाम असा लेखी पुरावा करूं इच्छितां असें दिसतें कीं तुह्मी मालकाचे साक्षात बंधु एकत्र राहून तुह्मी माझें संगोपन करीत आहात. वस्तु स्थिति अगदीं निराळी असतां असला मानभावी कावा मला आपल्या आचरणावरून दिसून आला. अर्थात आपण शिकले सवरलेले आहात. त्यामुळें कोर्टांत तुमचे वर्तानें पुरावा रचण्यासाठीं ही रीत तुह्मी आरंभिली आहे. सबब मी आपणास स्पष्ट कळवितें कीं आपण मजला रुपये पाठविण्याचें कारणही नाहीं व आपण मजबद्दल काळजी घेण्याचें प्रयोजन नाहीं. ईश्वरावर हवाला ठेवून माझे तान्हे मुलास दीर्घायुष्य राहो व त्याची सुश्रुषा करण्याकडे माझें मन कायम राहून मालकाची जिनगी सुरक्षीतपणें करून त्याचे कारणी लावण्याची बुद्धी मजमध्यें राहो इतकींच रात्रंदिवस देवाजवळ माझें मागणें आहे. याशिवाय जास्त लिहिण्याचें कारण नाहीं. कळावें ता. २४-५-१९०९ इसवी

सही

निलुबाई इच्या हातचा आंगठा निशाणी खुद

नं. ग. १३

### जाहिरात

सर्वत्र सावकार व इतर लो[illegible]
खालीं सहीं करणार [illegible]
असें कळविलें जातें कीं. [illegible]
सोनाजी व धनु वल्लद चिणकाजी हे कोणयाही रीतीने माझे वारसदार नसून माझी इस्टेट ते विकणार, गहाण, बक्षीस अगर पट्यानें देणार असल्याचें समजतें. ह्मणून या जाहिरातीनें सर्वास असें कळविलें जातें कीं हे माझे बिलकूल वारस नाहींत. त्यांचा आमचा ३– ४ पिढ्या पासून संबध तुटला आहे. व ते मला फसवण्या करितां जिनगी गहाण खरेदी बक्षीस अगर पट्टानें देणार आहेत. तर त्यांचे पासून कोणी माझी इस्टेट गहाण, खरेदी बक्षित अगर पट्यानें घेऊं नये घेतल्यास त्याबद्दल माझी इस्टेट जबाबदार नाहीं इतक्या उपर जर कोणी माझ्या इस्टेटी संबंधी व्यवहार करील तर तो बातल समजला जाईल व त्याबद्दलचे जबाबदार व्यवहार करणारेच राहतील कोणी बहूं नये ह्मणून मुद्दाम कळविलें आहे कळावें. तारीख २८- ५- १९०८

सही

पुंजी मर्द तुकाराम राहणार असलगांव निशाणी खुःद

नं. ग. १४

ता. २७ रात्रीं ८ वाजण्याच्या सुमारास धरमतोळा महल्ल्यांत प्रचंड आवाज झाल्यामुळें एकच गडबड उडाली. एक विजेची ट्रॅमगाडी दलहौसी स्केअरमधून चालली असतां एकदम स्फोट होऊन आवाज झाला. ट्रॅममधील मंडळींत एडनगार्डन्समधून बऱ्याच युवति घरीं परत येत होत्या. भयानें त्यांची पांचावर धारण बसून कित्येक स्त्रिया मूर्च्छित झाल्या. पोलिस तावडतोब त्या ठिकाणीं येऊन दाखल झाले. लोकांची खूप गर्दी झाल्यामुळें कशाचा आवाज झाला, याचा पोलिसास पत्ता लागेना. बॉम्ब फुटल्यामुळेंच आवाज झाला असावा अशी समजूत होती, परंतु ट्रमच्या रस्त्यावर कोणी खोडसाळ मुलांनीं रेल्वेचा "फॉग सिग्नल" ठेवल्याचें बाहेर आलें.

"युगांतर" पत्रांवरील खटल्याचा निकाल होऊन सदरहू पत्राचे प्रिंटर बाबू फणींद्रनाथ मित्र यांना चीफ प्रेसिडन्सी मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं तेवीस महिन्याची सक्त मजुरी व एक हजार रुपये दंड अशी शिक्षा केली.

जोहन्सबर्ग येथें हिंदी लोकांच्या चळवळीस पुनः प्रारंभ झाला आहे. गेल्या जानेवारींतील ट्रान्सवाल सरकार व ट्रान्सवालांतील हिंदी लोक यांच्या दरम्यान झालेल्या कराराप्रमाणें ट्रान्सवाल सरकारानें नांवनोंदणीचा आक्ट रद्द केला नाहीं असें बॅरिस्टर गांधी यांनीं ट्रान्सवाल सरकारास लिहिलें असून, आपण आपखुषीनें नांव नोंदण्यासंबंधानें केलेला अर्ज त्यांनीं सरकारापासून परत मागितला आहे. सदरहू आक्ट रद्द करण्याची आपण कबुली केली नव्हती, असें ट्रान्सवाल सरकार ह्मणत आहे.

---

## सुरूं होणार! सुरूं होणार!!

राष्ट्रीय पक्षाचें "स्वावलंबन" या नांवाचें वर्तमानपत्र आकोला वऱ्हाड येथें तारीख १२-६-०८ इ० पासून सुरूं होणार आहे. वार्षीक वर्गणी १ रुपया टपाल हशील ०|३ पत्र व्यवहार म्यानेजर "वतनदार" या पत्यावर करावा.

व्यवस्थापक
स्वावलंबन

---

# वऱ्हाडसमाचार

जेष्ट शुद्ध २ शके १८३०

## साम्राज्यवाद

अलीकडच्या कित्येक उदाहरणांवरून असें दिसतें कीं ब्रिटिश राष्ट्रांतील लोकांच्या अंगच्या उदारबुद्धीचा लोप होऊन सबंद राष्ट्र पक्कें साम्राज्यवादी बनत चाललें आहे. साम्राज्यवादी या शद्बावरून ब्रिटिश लोकांच्या संबंधानें थोडासा विशेष प्रकारचा अर्थ घ्यावयाचा आहे. आपलें साम्राज्य सर्व जगावर व्हावें, तसें करावयास कोणतेंही कृत्य करावें लागलें तरी बेहत्तर अशी अतिरेकाची महत्वाकांक्षा दिवसेंदिवस ब्रिटिश सम्राजांत बलवत्तर होत चालली आहे. या त्यांच्या दुर्गुणामुळें त्यांच्यांतील शहाणेमुर्ते ह्मणविणाऱ्यांना मुद्दां कसें धरसोडीचें वर्तन करावें लागतें याचा चांगला प्रत्यय ट्रान्सव्हालांतील हिंदी लोकांचे संबंधाच्या प्रश्नांत येतो. या संबंधांत लॉर्ड अम्प्थिल यांनीं नुकताच पार्लमेंटांत एका सूचनेवरून वादविवाद उपस्थित केला होता. या प्रसंगीं लॉर्ड स्टालहिन यांनीं साफ असें सांगितलें कीं हिंदी लोकांचें आपल्याशीं एकाच साम्राज्यांतील प्रजा ह्मणून बंधुत्वाचें नातें आहे आणि त्यांना न्यायानें वागवावयास पाहिजे, हें सर्व खरें असलें तरी त्यांना ब्रिटिश किंवा डच लोकांच्या वर्गांतले ह्मणून मानतां येणार नाहीं. येथें साम्राज्यवादी मंडळींचें अंतरंग अगदीं स्पष्ट झालें आहे. आह्मा हिंदी लोकांना अन्यायानें तर वागवावयाचें नाहीं, पण हलक्या जातींचे ह्मणून मानून ब्रिटिश किंवा डच यांच्या बरोबर आमची योग्यता समजावयाची नाहीं असा त्यांचा निश्चय उघड दिसतो आह्मा हिंदुस्थानांतील प्रजेचा इंग्लंडशीं जो संबंध आहे त्याला हें तत्व अगदीं बाधक आहे. त्याचप्रमाणें राणी सरकारच्या जाहिरनाम्यांतील आश्वासनाशीं तें विरुद्ध आहे. 'आमच्या सजातीय प्रजेसंबंधानें आह्मी आमचें कर्तव्य ज्याप्रमाणें मानतों त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील आमच्या प्रजेविषयींही तेंच कर्तव्य आह्मी मानूं आणि ईश्वराच्या कृपेनें तें पुर्ण करूं' असें आश्वासन जाहिरनाम्यांत दिलेलें आहे. ह्मणजे आह्मी हिंदी प्रजाजन पृथ्वीवर कोठेंही असलों तरी ब्रिटिश प्रजेचे जे हक्क तेच आह्मालाहि उपभोगावयास मिळतील अशी आह्माला खात्री दिलेली आहे. आश्चर्य हें कीं खुद्द राजवचन असें असतां लॉर्ड स्टालहिन यांनीं पार्लमेंटांत काढलेल्या उद्गारांना चापून उत्तर देणारा कोणी सांपडला नाहीं. राणीच्या जाहिरनाम्याचें वास्तवीक स्वरुपाचें वर्णन हिंदुस्थानांतील कायदेकौन्सिलांत मोठ्या आस्थेनें करणारे दोन माजी व्हाइसरॉय तेथें होते. लॉर्ड रिपन व लॉर्ड लॅन्सडौन यांनीं केलेलें जाहिरनाम्याचें स्तोत्र त्यांच्या स्वतःच्या स्मृतींतून नाहींसें झालेलें असलें तरी हिंदुस्थानांतील लोक तें विसरलें नाहींत. लॉर्ड रिपन आतां अगदीं वृद्ध झाले आहेत तेव्हां त्यांनीं या संबंधांत पुरस्कार घेतला नाहीं तथापि ते एकवेळ क्षम्य मानतां येईल. पण 'जाहिरनामा हिंदुस्थान सरकारला शिरसावंद्य आहे' असें जाहिर करणारे लॉर्ड लॅन्सडौन युनियानिस्टपक्षाचे हौउस ऑफ लॉर्डसमधील प्रमुख प्रतिनिधि ह्मणून मिरवत आहेत. पण त्यांचें तोंड या समयीं बिलकुल उघडलें नाहीं. हिंदुस्थानचे कट्टे दोस्त लॉर्ड कर्झन यांना तर हिंदुस्थानाचा उपयोग साम्राज्याच्या हितासाठीं कसकसा करून घ्यावा या बद्दलचें नुसतें वेडच लागलें आहे. ब्रिटिश साम्राज्याचा डोलारा केवळ हिंदुस्थानाच्या आधारावर आहे ही गोष्ट आतां जगप्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणें अलिकडे साम्राज्यांतील निरनिराळ्या वसाहती आपआपल्या पाया पुरतें पाहून साम्राज्याच्या इतर मार्गाविषयीं बेफिकिर राहूं लागले आहेत. ही स्थिति साम्राज्याच्या संरक्षणास अत्यंत धोक्याची आहे हें लक्षांत घेऊन साम्राज्यवादीशिरोमणी लॉर्ड कर्झन यांनीं आकुंचित दृष्टी न ठेवतां सर्वांनीं मिळून हिंदुस्थानचें संरक्षण करण्याविषयी विनंति केली आहे. आज नाहीं उद्यां आस्ट्रेलिया व कानडा इंग्लंडला शेवटचा रामराम ठोकणार आणि त्यांच्या मागें दाक्षिण आफ्रिकेंतील ब्रिटिशांच्या वसाहती देखील सहा हजार कोसावरील ब्रिटिश सार्वभौम सत्तेला कितीकशी जुमानणार तें दिसतेंच आहे. अशा रितीनें बडा घर पोकळ वासा झाल्यावर चारुदत्ताच्या घरांत ठेव ह्मणून असलेल्या वसंतसेनेच्या अलंकाराप्रमाणें ब्रिटनच्या गळ्यांत अडकून असलेलें हिंदुस्थान संभाळतां संभाळतां नाकी नव येणार! हीं पुढचीं सर्व चिन्हें ओळखून लोर्ड कर्झन यांनीं आतांपासूनच आपल्या दर्शीतल्या भाऊबंदांस हात जोडून विनंति चालविली आहे. वडिलोपार्जित संचय निदान गोत्र मर्यादेच्या आंत असावा ही आह्मां पौर्वात्यांची समजूत पाश्चात्यांना हास्यास्पद वाटते खरी पण स्वतःवर आली ह्मणजे त्यांच्या मनांत काय येतें हें या उदाहरणावरून सहज समजून येईल. हिंदुस्थान ही ब्रिटिश समाजाला आयती दानत बाढविण्याची एक शाळा आहे, वगैरे जी लॉर्ड कर्झन यांची चर्पट पंजरी आहे तिचा अर्थ करून त्याचा कीस काढीत बसल्यास तो उभयपक्षी अनर्थकारक असल्यामुळें सोडून देणें भाग आहे.

## ते दिवस गेले.

लॉर्ड कर्झन यांची चर्पटपंजरी चालविण्याची खोड दिवसें दिवस वाढत चालली आहे. हिंदुस्थानांतील सर्व लोकांना खोटे बोलणारे ह्मणून ह्मणतांना ते आपणाला हिंदुस्थानचे जसे मित्र व हितचिंतक ह्मणवून घेत होते तसेंच ते अद्यापिही ह्मणवून घेण्यांत कसूर करीत नाहींत. हिंदुस्थानांतील युनिव्हर्सिट्यांच्या पयांत खोडा अडकवून आणि बंगाली समाजाची दुफळी करून ते स्वतःला हिंदुस्थानच्या प्रगतीचे जसे पुरस्कर्ते ह्मणवून घेत असत तसेच आजही ह्मणवून घेण्याला ते कचरत नाहींत. अलाहाबाद येथील ऑक्सफर्ड अँड केंब्रिज हॉटेलच्या व्यवस्थापकास नुकतेंच त्यांनीं एका पत्रांत असें लिहिलें आहे कीं, हिंदुस्थानांत नवीन कल्पनांचा मुळमुळाट होते आहे, अशा वेळीं आपल्या हॉटेलसारखी उपयुक्त संस्था दुसरी सांपडावयाची नाहीं. हिंदुस्थानांतील लोकांचें शील, बुद्धि आणि एकंदर उन्नति यांचा उत्कर्ष होण्याच्या कार्याखेरीज जास्त उदात्त असें कार्य इंग्लिश लोकांना कचितच आढळून येईल. हिंदुस्थानांत ज्या नव्या कल्पनांचा सुळसुळाट झाला आहे त्या लॉर्ड साहेबांच्या हिंदुस्थानांतील कारकीर्दींतच जन्मास आल्या किंवा त्यांनीं निजधाम गांठल्यावर त्यांचा उगम झाला या विषयीं त्यांचें काय मत आहे तें कळत नाहीं. या कल्पना त्यांना रुचत नाहींत असें त्यांचें ह्मणणें आहे. जर त्या त्यांच्या मुखत्यारीच्या मुदतींत हिंदुस्थानांत प्रकट झाल्या असें त्यांचें ह्मणणें असेल तर त्यांना योग्य वळण लावण्याचा जो उपदेश ते आतां इतरांना करीत आहेत त्या बरहुकूम त्यांनीं स्वतः वर्तन केलें होतें काय आणि तें कसें, हा प्रश्न आहे. बरें तसें नसेल तर त्या कल्पना ह्मणजे लॉर्ड यांच्या स्वतःच्या विध्वंसक आणि मुस्कटदाबीच्या कारकीर्दीचें प्रत्यक्ष फ़ळ होत, असें ह्मणावयास काय हरकत आहे, हिंदुस्थानांतील लोकांच्या शीलाचें, बुद्धीचें व एकंदर उन्नतीचें पाऊल पुढें पडावें असें ते ह्मणतात, पण त्या तीन शद्बांचा उपयोग ते कशा अर्थानें करतात या विषयीं निदान हिंदुस्थानांतील मनुष्य शंका घेतल्यावांचून रहाणार नाहीं. हिंदुस्थानांतील लोकांच्या बुद्धीचा विकास अधिकारी वर्गाच्या मुठींत असलेल्या शिक्षणपद्धतीनें व्हावयाचा, हिंदुस्थानांतील लोकांकडून कल्पकतेचीं सर्व कामें हिसकावून घेऊन त्यांना नुसते मजूर बनविल्यामुळें त्यांच्या शीलाची शुद्धि व्हावयाची आणि जगाच्या अंतापर्यंत हिंदुस्थानानें इंग्लंडचा ताबेदार होऊन राहिल्यानें त्याची उन्नति व प्रगती व्हावयाची असा प्रकार आहे. तेव्हां लॉर्ड यांच्या व त्यांच्यासारख्या इतर लोकांच्या मोहक दिसणाऱ्या मुक्ताफळांनीं देखील हिंदुस्थानांतील लोक बिलकूल फसणार नाहींत.

## लँकेशायर वाल्यांची कान उघाडणी.

मि. केर हार्डी यांनीं नुकतेंच लँकेशायर परगण्यांतील नेल्सन नांवाच्या गांवीं एक भाषण केलें. त्यांत त्यांनीं हिंदुस्थानांतील कपाशीचा धंदा आणि गिरण्यांतील मजुरांची स्थिति यासंबंधानें बरेंच विवेचन केलें. मि. हार्डी यांनीं असें सांगितलें कीं थोड्याच काळांत हिंदुस्थान लँकेशायरशीं चढाओढ करूं लागेल. कारखान्यांत व गिरण्यांत लागणारे इंजिनीअर व व्यवस्थापक हिंदुस्थानांत तयार होऊं लागले आहेत. भांडवलही देशांतीलच जमा होऊं शकतें. अशा प्रकारें पूर्ण स्वावलंबी रीतीनें हा धंदा हिंदुस्थानांतील लोकांनीं चालविला आहे. तलम सूत काढण्याचें हिंदुस्थानांत होत नाहीं ह्मणून परदेशी लोकांनी मोठी खात्री वाटत होती, परंतु ही त्यांची खात्री केव्हां ढासळेल याचा आतां नेम उरला नाहीं. सध्यांच ६०, ६२, ७० नंबर पर्यंत सूत काढण्याच्या पयत्नांना यश आलें असून सिंध वगैरे ठिकाणीं लांब धाग्याच्या इजिप्शियन कापूस लावण्याचा प्रयत्न सफल झाला आहे. या गोष्टीमुळें तलम सुताच्या बाबतींत हिंदुस्थानाला कोणत्याही देशाशीं टक्कर मारतां येईल. हिंदुस्थानांतील कारखान्यांतील मजुरांची स्थिति अतिशय वाईट आहे अशी खोटीच ओरड लँकेशायर वाल्यांनीं केली होती. तिला अनुलक्षून मि. हार्डी यांनीं असें सांगितलें कीं जितकी वाईट स्थिति आहे ह्मणून सांगण्यांत येतें तसा मुळींच प्रकार नाहीं. मुलांच्या स्थितींत सुधारणा होणें जरूर आहे, पण हिंदुस्थानांतील मजूर मुलांची स्थिति इंग्लंडांतील मजुर मुलांपेक्षां खात्रीनें वाईट नाहीं. त्यांनीं असें निक्षून सांगितलें

कीं हिंदुस्थानांत कामाचे तास जास्त दिसतात, त्यामुळें गैरसमज उत्पन्न होतो. मजुरांना कामाची तसदी त्या मानानें जास्त मुळींच पडत नाहीं. काम घेण्याच्या व्यवस्थेंत इतकी ढिलाई किंवा सवलत असते कीं तशा स्वतंत्रतेनें लँकेशायरचे मजुर आपल्या कारखान्यांत वागूं लागले तर तिमे लोक कामावर ठिकावयाचे नाहींत. लँकेशायरच्या कडक नियमान्वयें बाकीच्या निम्मे लोकांना तावडतोब रुकसत मिळेल. लँकेशायर वाल्यांच्या व त्यांच्या मुंबईतील री ओढणारांच्या उपद्व्यापामुळें उपस्थित झालेल्या प्रश्नाची शहानिशा करण्यासाठीं जें कमिशन नेमण्यांत आलें त्या समोर मुंबईच्या देशी गिरणीवाल्यांनीं ही स्थिति सप्रमाण मांडली आहे. कामाची तयारी नसल्यामुळें वेळेचा निर्बंध घालण्याची हिंदुस्थानांत आवश्यकता नाहीं हें त्यांनीं कमिशनरच्या नजरेस आणून दिलेलें आहेच. मि० केरहार्डी सारख्या इंग्लंडांतील मजूर पक्षाच्या चाणाक्ष गृहस्थाच्या नजरेस ही स्थिति प्रत्यक्ष दिसली आणि तिचें वर्णन त्यांनीं वर सांगितलेल्या प्रमाणें अक्षरशः यथार्थ असें केलेलें आहे, ती लँकेशायरवाल्यांचे ध्यानांत न आली तरी पर्वा नाहीं; परंतु फॅक्टरी कमिशननें मात्र लँकेशायर वाल्यांचे तर्फेनें पुढें आलेल्या भ्रामक पुराव्याबरोबर मि० केरहार्डी यांची साक्ष ताडून पाहिली पाहिजे. तसें झालें तर हिंदुस्थानांतील कारखान्याचे विनाकारण हातपाय आवळून त्यांच्या अभिवृद्धीला आडथळा आणण्याचा लँकेशायरवाल्यांचा प्रयत्न किती आतल्या काळजाचा होता, हें दिसून येईल.

## एका मिशनरीची साक्ष.

परकी राज्यसत्तेविषयीं आणि राज्यकर्त्यांच्या कारभाराविषयीं प्रजेचें मन कसें काय आहे हें सरकारी अंमलदारांपेक्षां मिशनरी लोकां सारख्यांना जास्त यथार्थ सांगतां येईल; आणि त्याला कारणेंही अनेक आहेत. ते लोक प्रजाजनांत जास्त मोकळेपणानें मिळून मिसळून वागण्याचा प्रयत्न करीत असतात आणि लोकही सरकारी अंमलदारांपेक्षां यांचेपाशीं जास्त मन मोकळें करून बोलतात. या मिशनरी मंडळीला सरकारी अधिकाऱ्यांप्रमाणें 'हुकमावरून तयार केलेलीं' अशीं लोकांचीं मतें कळत नाहींत हें खरें असल्यामुळें त्यासंबंधानें त्यांचा अभिप्राय खरा असण्याचा बराच संभव असतो. पुण्याच्या युनायटेड फ्रीचर्च मिशनचे रे. मि. मॅक्निकल यांनी विलायतेच्या स्पेक्टेटर पत्राचे द्वारें आपल्या देशबंधूंना हिंदुस्थानांतील सध्यांच्या आणिबाणीच्या वेळाचें महत्व जाणून त्याकडे दुर्लक्ष न होऊं देण्याविषयीं विनंती केली आहे. त्यांनीं सुरतेचे प्रसंगावरून आमच्यांतील दोन प्रसिद्ध व सर्वमान्य पुढाऱ्यांच्या वजनाच्या तुलनेचा जो आव घातला आहे त्यांत जरी विशेषसा अर्थ नसला तरी एवढें खरें कीं मि. मॅकनिकल हे मोठे सूक्ष्मदृष्टी आहेत. लोकपक्षाकडे लोकांचा सध्यां जास्त ओढा दिसत आहे ही गोष्ट त्यांनीं आपल्या पत्रीं नमूद केली आहे. अर्थात् ती खोडून काढणें कोणालाही दुर्घटच आहे. या जगाची रहाटीच अशी आहे कीं सर्वांना संमत अशा रीतीनें तें कधीं चालावयाचें नाहीं. आणि कांहीं कांहीं गोष्टी तर अशा घडून येतात कीं त्यांच्याकडे दुर्लक्ष करून भागतच नाहीं. कांहीं तरी कार्य करणारांचें हें जग आहे, नुसत्या प्रामाणिक मतधारकांचें नव्हे. मग तें कार्य करणारे मोठाले रणधुरंधर वीर असोत कीं बाँब गोळे करणारे असोत. आपल्याला नापसंत अशा कित्येक गोष्टी जगांत प्रत्यहीं घडत असतात, त्यांजबद्दल आपण हवी तितकी नापसंती प्रदर्शित करावी, पण त्यांच्या पलीकडे जानां येईलच असें नाहीं. प्रसिद्ध राजनीतिवेत्ता कार्लाइल यानें असें ह्मटलें आहे, 'आराजक अत्याचार या जगांत कोणी कोणास करूं देत नाहीं. पण ईश्वराचें घरीं ते अपराधच ठरतात आणि त्याबद्दल सर्वथा मनाई आहे.' नुकताच झालेल्या बाँब प्रकरणांतील एका आरोपीनें असें सांगितलें कीं आपण केलें तशा प्रकारचें साहसी कृत्य व्हावें अशी समाजाची इच्छा आपल्याला दिसून आल्यावरून आपण तें केलें. एरव्हीं एखाद्या दुसऱ्या बाँब गोळ्यानें ब्रिटिश राज्य उलथून पडेल असा अर्थ नाहीं. कार्लाइलचा नियम येथें अक्षरशः खरा ठरत आहे. ब्रिटिश सत्ता जावी असा आजच्या लोकांचा आशय नाहीं पण त्या घडलेल्या प्रकारावरून राज्यकर्ते व प्रजा यांच्यामध्यें केवढी तेढ उत्पन्न झाली आहे हें दिसून येतें. रे. मॅकनिकल यांनीं यावर कांहीं उपाय सुचाविलेला नाहीं, पण त्यांनीं केलेलें निदान अगदीं बरोबर आहे. हिंदुस्थानांतील लोकांच्या जुन्या पुढाऱ्यांकडून प्रकट झालेल्या हिंदी लोकांच्या रास्त आकांक्षा पूर्ण झाल्या असतां सध्यांचे प्रकार थांबतील असें बहुजन समाजाचें मत त्यांनीं सांगितलें आहे, तेंही अक्षरशः खरें आहे. अर्थात लोकांच्या आकांक्षा पूर्ण करून प्रजेला संतुष्ट करणें हें कोणत्याही एका पक्षाच्या मुरवतीस्तव किंवा त्यांच्यावर उपकारांचें ओझें लादण्याकरितां ह्मणून इष्ट होणार नाहीं. जनतेचें खरोखरच प्रिय व्हावें व त्यांनीं संतुष्ट असावें अशा सदिच्छेनेंच झालें तर हें काम व्हावयास पाहिजे.

## साहित्य परिषदेचा अहवाल.

चिटणिसांनीं वाचला. त्यावरून असें दिसतें कीं स. १९०६ मध्यें प्रथम ही परिषद स्थापन झाली. त्यावर्षी तिचे ७० सभासद होते. पुढील वर्षी ते ९० झाले. दोन्ही सालीं मिळून परिषदेच्या खर्चापुरती रु. ९४ वर्गणी वसूल झाली. या शिवाय रा. राजवाडे यांनीं संग्रहित केलेल्या ऐतिहासिक कागदपत्रांच्या प्रकाशनासाठीं ह्मणून आतांपर्यंत सुमारें रु. २९ जमा झाले आहेत. वर्गणीच्या रकमेंतून राहिलेली रु. १९ व ही रक्कम यांतून रा. राजवाडे यांनीं त्यांच्या कागदपत्रांच्या तयारीचे कामीं खर्चास रक्कम दिली आहे. स. १९०७—०८ सालांत मराठी भाषेंतील नवीं पुस्तकें परिषदेकडे परीक्षणार्थ येतील त्यांचें योग्य विद्वानांकडून परीक्षण करविण्याचें काम परिषदेकडे सोंपविण्यांत आलें होतें. पण योग्य ग्रंथांच्या अभावी हें काम होऊं शकलें नाहीं. (शास्त्रीय परिभाषेचा कोश तयार करण्याचें दुसरें काम परिषदेकडे दिलें होतें. बऱ्याच वाटाघाटीनंतर अर्थशास्त्र, गणित, रसायनशास्त्र व ज्योतिष या चार विषयांतील पारिभाषिक शद्बांना समानार्थक मराठी शद्ब देण्याचें काम अनुक्रमें रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनी एम्. ए., प्रो. नारायण बळवंत पेंडसे एम्. ए. एल् एल्. बी., प्रो. लक्ष्मण गणेश साठे एम्. ए. व रा. कृष्णाजी शंकर दिक्षित बी. ए, या चार विद्वानांनीं आपलेंकडे घेतलें आहे.) या शिवाय मागाहून तत्वज्ञान व भूगोल या शाखांचें कामही रा. हरी गणेश गोडबोले बी. ए. व रा रामचंद्र जनार्दन गोखले बी. ए. यांचेकडे देण्यांत आलें. चार शाखांचें काम आतांपर्यंत पुरें झालें असून बाकीच्या दोन्ही शाखांचें कामही लवकरच पुरें होईल. तिसरें काम रा० राजवाडे यांनीं संगृहित केलेल्या महत्वाच्या ऐतिहासिक कागदपत्रांचें प्रकाशन हें होय. या कामासाठीं पाहिजे होती तिच्या चतुर्थांश रकमही जमा होईना तेव्हां सदरपत्रें छापून बाहेर पडल्यावर लोकाश्रय मिळण्यास अडचण पडणार नाहीं असें दिसून आल्यावरून एकदम पत्रें छापण्यास चिटणीसांनीं सुरुवात केली आहे. या ग्रंथाचीं सुमारें ६०० पृष्ठें होतील. यांत श्री० थोरले माधवराव, नारायणराव व सवाई माधवराव या तीन पेशव्यांच्या कारकीर्दीतील अस्सल पत्रें असल्यामुळें इतिहासाची अभिरुची बाळगणारांस हा ग्रंथ विनमोल वाटेल यांत शंका नाहीं. साहित्य परिषदेच्या कामांत ज्या सद्गृहस्थांनीं प्रत्यक्ष मदत केली आणि ज्यांनीं टीका व सूचनांच्या द्वारें सहाय्य केलें त्या सर्वांचे आभार अहवालाचे शेवटीं मानले आहेत. संमेलनाला येणाऱ्या ग्रंथकारांनीं आपापल्या ग्रंथाची एक प्रत व आपल्या चारित्रांचें टांचणें परिषदेच्या चिटणीसांकडे द्यावीं अशी सूचना गतवर्षीचे अध्यक्षांनीं केली होती त्याप्रमाणें ज्या दोन चार ग्रंहस्थांनीं आपआपलीं पुस्तकें दिलीं त्यांचे आभार मानून व ग्रंथकारांचें लक्ष या सूचनेकडे लवकरच जाईल अशी आशा प्रदर्शित करून अहवाल समाप्त केला आहे.

## स्वागतपर भाषण.

संमेलनास आलेल्या मराठी भाषासेवकांचें व अभिमानी गृहस्थांचें साहित्य परिषदेच्या वतीनें तिच्या चिटणिसांपैकी एक रा. वासुदेव गोविंद आपटे यांनीं स्वागत केलें. ते ह्मणाले देशकाल यांच्या परिस्थितिप्रमाणें मनुष्यांचे व्यवहार बदलत असतात पूर्वींचे विशेष धर्मश्रद्धावान लोक नानाविध अपेक्षा सोडून तीर्थयात्रा करीत. आतांच्या नव्या श्रद्धेच्या काळीं देशाची सर्वांगिक उन्नति होण्यासाठीं प्रथम सर्वांचीं मनें प्रमाश्रूनें बद्ध झालीं पाहिजेत. अशा श्रद्धेनें निरनिराळ्या सभा, परिषदा स्थापित होऊन लोक त्यांच्या यात्रा करूं लागले आहेत. या श्रद्धेचा परिणाम राजकिय, सामजिक वगैरे बाबींत क्रमाक्रमानें दिसून येऊन आतां राष्ट्रजीवनाचा जिवंत झरा जें वाङ्मय त्यांतही त्याचें प्रतिबिंब स्पष्ट उमटूं लागलें आहे. येथें जमलेल्या मंडळींत निरनिराळ्या राजकीय धार्मिक, सामाजिक मतांचे लोक असतील पण त्या सर्वांना एका सूत्रांत गोवून सर्वांच्या अंतःकरणांचें आकर्षण एका केंद्रांत करणारी अशी प्रचंड शक्ति आहे. ती साहित्यपरिषद ही होय. महाराष्ट्रवाङ्मय हा नवजीवनाचा उत्कृष्ट झरा आहे. या प्रवाहाच्या अंगच्या प्रचंड शक्तीचा उपयोग मात्र सर्वांनीं करून घेतला पाहिजे. हें वाङ्मय राष्ट्रदेहाच्या सगळ्या अंगांत संचार करणारें प्राणतत्व आहे, तेव्हां इतर अंगाच्या मागून कां होईना, पण या मुख्य तत्वाकडे आपलें लक्ष जात आहे ही साधनाची गोष्ट आहे. राष्ट्रीय जीवनाची पूर्णता करणें हा सर्व वाङ्मयाचा प्रधान उद्देश असतो. हा उद्देश महाराष्ट्रवाङ्मयानें १७-१८च्या शतकापर्यंत बऱ्याच चांगल्या रीतीनें साधला. ज्या काळाला जशा प्रकारचें वाङ्मय अवश्यक त्यावेळीं तशा प्रकारचें वाङ्मय परमेश्वर कृपेनें मराठी भाषेंत निर्माण होत आलें. तेंच काम पुढें चालविण्याची मोठी जबाबदारी महाराष्ट्र भाषा सेवकांवर आहे. हल्लींच्या मराठी वाङ्मयांतील उणीवा विविधज्ञानविस्तारांत एका लेखकानें नमूद केल्याप्रमाणें अशा आहेत; 'मराठी भाषेच्या उत्कर्षासाठीं आज शेंकडो विद्वानांचे प्रयत्न चालू असून तिच्यांत अद्याप निश्चितपणा आलेला नाहीं; मराठी व्याकरणाचें चांगलें संशोधन झालेलें नाहीं. शुद्धलेखनाचा घोंटाळा कायमच आहे. वृत्तदर्पणांत अनेक नव्या वृत्तांचा समावेश व्हावयास पाहिजे. शास्त्रीय परिभाषा ठरावयाची आहे. समानार्थक शद्बांतले सूक्ष्म अर्थभेद दाखविणारा ग्रंथ पाहिजे. मराठी वाङ्मयाचा सांगोपांग इतिहास लिहिला गेला नाहीं. इतिहासाची सामुग्री जुळविण्यास आतां कोठें सुरुवांत झाली आहे. व्युत्पत्तिशास्त्र बहुतेक मावळलें आहे. एन्सायक्लोपिडिया सारखा विश्व कोश महाराष्ट्रीयांच्या दृष्टीच्या टप्प्यांत सुद्धां नाहीं. जुन्या व नव्या सर्वमान्य पुस्तकांच्या स्वल्प किंमतीच्या आवृत्ति निघाल्या पाहिजेत. तुलनात्मक भाषा शास्त्राची कसोटी अजून मराठीला कोणी लावलेली नाहीं. मुलांसाठीं व मुलींसाठीं सोपीं, उपयुक्त व तेजस्वी पुस्तकें व्हावयास पाहिजेत. या शिवाय भौतिक शास्त्र, राजनीति, इतिहासशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र वगैरे शास्त्रीय विषयांवरील पुस्तकें आणि त्याचप्रमाणें स. १८५७ सालापासून तों आजपर्यंतचा आपला राजकीय, सामाजिक, धार्मिक, औद्योगिक वगैरे गोष्टींचा सविस्तर इतिहास, सद्यस्थितिदर्शक पुस्तकें, अनेककला व उद्योग यांची खरी माहिती देणारीं पुस्तकें वगैरे व्हावयास पाहिजेत, या व दुसऱ्या गरजा सद्यस्थितींत कशा भागवितां येतील याचा विचार आपल्यांतल्या प्रमुख विद्वानांनीं नाहीं तर कोणी करावयाचा?

अशा विद्वानांनीं साहित्य विषयक प्रश्नांचा विचार एक जुटीनें करावा ह्मणून प्रथम त्यांच्यांत स्नेहभावाची अभिवृद्धि करणें अवश्य आहे. हें स्नेहबंधन उत्पन्न करणें हा या संमेलनाचा प्रधान उद्देश आहे. लोकांना चकित करून सोडण्यासारखी कांहीं कामगिरी साहित्य परिषदेच्या किंवा संमेलनाच्या हातून झाली नाहीं अशी टीका कित्येक सहित्यप्रेमी गृहस्थांनीं केली आहे. पण त्यांनीं संमेलनाचा वर सांगितलेला उद्देश व त्या उद्देशाला प्रधानत्व देण्यास कारण असलेली आपली परिस्थिति यांचा विचार केला ह्मणजे त्यांच्या टीकेची तीव्रता कमी करण्याची बुद्धि त्यांना होईल अशी मला खात्री आहे. बोलावें थोडें आणि करावें फार या तत्वावर अशा संस्थांचीं कामें व्हावयास पाहिजेत. तरच त्यांच्या हातून कांहीं खरी कामगिरी होईल. साहित्य सभेनें अशाच रीतीनें काम करावें अशी माझी इच्छा आहे. ती कितपत सफळ होईल तें मला सांगतां येत नाहीं. लोक काय ह्मणतील ते ह्मणोत, पण मी तरी या बाबतींत पूर्ण आशा वादी आहे. लावी पक्षिण व आणि तिचीं पिलें या घड्यांतलें तात्पर्य लक्षांत ठेवून आपल्या मेंदूंत आणि स्नायूंत जेवढी शक्ति असेल तेवढी साहित्यसेवेंत खर्चण्यास तयार झाले पाहिजे. जेवढी साहित्याची सेवा अशा स्थितींत आपले हातून घडेल तेवढें पुण्य पदरीं बांधलें गेलें अशा समजुतीनेंच सतत काम करीत राहिलें पाहिजे. अगोदर पूजा मग प्रसाद हाच क्रम कोणत्याही देवतेच्या भक्तांना योग्य; मग तो सरस्वती देवीच्या भक्तांना कां योग्य ह्मणूं नये?

येणें प्रमाणें भाषण केल्यावर रा० आपटे यांनीं गत सालांत परलोकवासी झालेल्या महाराष्ट्र भाषा सेवकांच्या मृत्यूमुळें झालेल्या हानीचा उल्लेख करून शेवटीं यंदांच्या संमेलनाचें अध्यक्ष स्थान रा० ब० चिंतामण राव वैद्य यांनीं स्वीकारावें अशी सूचना केली. या सूचनेला पुष्टी मिळाल्यानंतर अध्यक्ष स्थानापन्न झालें.

## वऱ्हाडवृत्त.

हवामान—यंदा उन्हाळ्याचें मान प्रखर आहे. पारा ११४—११९ पर्यंत जातो. दिवसा उन्हाची तीव्रता विशेष असते पण रात्रौ हवेंत थंडपणा लवकरच येतो. हल्लीं वारा फार सोसाट्याचा सुटतो आणि त्या वाऱ्याची दिशा व इषद् शितलता हीं आगामी पर्जन्याचीं पूर्व चिन्हें होत. रोगराई विशेष ह्मणण्यासारखी नाहीं.

रा. रा. एफ. एल. क्राफर्ड असिस्टंट कमिशनर ह्यास रजेवरून आल्यावर आकोले येथें आफि. डेप्युटी. कमिशनर नेमलें.

रा. रा. क्राफर्ड ह्यांनीं आपल्या जागेचा चार्ज घेतला ह्मणजे रा. रा. जे. ए. ब्यायर्स्ट आय. सी. एस डेप्युटीकमिशनर यांस त्याच कामावर नागपूर येथें बदललें.

रा. रा. जे. आर एडवर्डस् सबॉर्डिनेट जज्ज ह्यास रजेवरून आल्यावर उमरावती येथें स्मालकॉज कोर्टाचे जज्ज नेमण्यांत आलें.

रा. रा. सदाशिव माधव परांडे सबॉर्डीनेट जज्ज मध्यप्रांत यांस उमरावती येथें बदललें.

रा० रा० निळकंठ गोविंद देशपांडे तहशिलदार ह्यांस रजेवरून परत आल्यावर मोर्शी येथें बदललें. व त्यांनीं आपल्या कामाचा चार्ज घेतला ह्मणजे तेथील आफि० तहशिलदार रा० रा० बाळकृष्ण भाईजी दुर्गे हे अकोला येथें डे० क० च्या कचेरींत डेपुटी क्लार्कच्या जागीं वापस जातील.

सर्कस— वऱ्हाडांत लोकप्रिय झालेली आर्यन सर्कस कंपनी अकोलें येथें लवकरच येऊन आपले लोकप्रिय खेळ ता० ७ जून पासून सुरूं करणार आहे.

व्याख्यान:— काल सायंकाळीं रा. रा. व्यंकटेश कृष्ण देसाई यांचें येथील श्रीहरीहर राम थिएटरांत **बॉंब गोळ्याचे उत्पादक कोण ?** या विषयांवर सुरस व मनोवेधक व्याख्यान झालें. श्रोतृसमुदाय ७०० ८०० वर जमला होता. यावरून आकोलेकरांचा उत्साह सहज दिसून येतो.

मुष्टीफंड—ता. २४-५-०८ रोजीं मागण्यांत आलेल्या मुष्टी फंडांत मिळालेल्या धान्याचे आकडे मागील अठवडीं छापण्यांत आले आहेतच. त्याची किं. २६८≡॥।२ आली व मागिल शिल्लक मिळून २५-८-०८ पावेतों २९३॥=।२ जमा आली. काल रोजीं मागण्यांत आलेल्या मुष्टीफंडास खालींल प्रमाणें मदत मिळाली.

| | | |
|---|---|---|
| जवारी | १७१ | शेर |
| गहुं | १७ | |
| तांदुळ | ७॥ | |
| डाळ | १॥ | |
| आटा | १३ | |
| रोख | २०॥०।२ | |

दिवसे दिवस वाढणाऱ्या मदतीवरून हा फंडा किती लोकप्रिय होत आहे हें दिसून येतें.

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | १००।= |
| सोनें | | २४॥ |
| चांदी | | ७० |
| जवस | | १३९ |
| जवारी | | ९० |
| गहूं काठे | ७ | १४० |
| बनशी | ७॥। | १४५ |
| तेल | | ७॥। |
| सरकी | | ११॥। |
| तुप | | ११॥। |
| कापूस | | ४७ |

## वर्तमानसार

संध्या पत्राचे मुद्रक व प्रकाशक लाल बिहारी सेन यांजवर सरकारांनें भलतेंच नांव नोंदविल्याबद्दल खटला चालविला होता. अखेरीं कोर्टें पुन्हां न करण्याबद्दल इशारा देऊन व पूर्ण नांव नोंदण्याचा हुकुम फर्मावून मि. थार्नहिल यांनीं त्यांस सोडून दिलें.

घरामध्यें १२८० काडतुसांनीं भरलेली पेटी व पिस्तुलें सांपडल्याबद्दल ज्ञानेंद्रनाथ सरकार यांस कांहीं दिवसांपूर्वी पकडण्यांत आलें होतें. सांपडलेली पेटी आपली नाहीं, युगांतरशीं संबंध असलेले तारानाथ चौधरी यांनीं ती पेटी आपल्या घरांत आणून ठेविली, त्यामध्यें टाईप छापण्याचे इतर सामान आहे अशी माझी समजूत झाली, अशा प्रकारची हकीकत ज्ञानेंद्रनाथ सरकार यांनीं पोलिस कमिशनरास सांगतली. ज्ञानेंद्रनाथ सरकार यांचे विरुद्ध दुसरा कांहीं पुरावा न मिळाल्यामुळें पोलिस कमिशनरनीं त्यांस सोडून देण्याचा हुकुम केला. तारानाथ यांजवर खटला चालूं झाला असतां ज्ञानेंद्रनाथ यानें साक्ष देण्यास पुढें यावें ह्मणून त्यांच्याकडून जातमुचलका मात्र घेतला आहे.

मद्रासच्या पालमकोडा मैदानांत 'स्वदेशी' या विषयावर ता. २६ रोजीं पुण्याचे रा. गोविंद राव दाते यांचें व्याख्यान व्हावयाचें होतें. व तशा अर्थाच्या जाहिरातीही फडकल्या होत्या बरेच लोक व्याख्यान ऐकण्यासाठीं ह्मणून जमा झाले. परंतु जिल्हा मॅजिस्ट्रेटच्या हुकमावरून त्या सर्वांस हाकालून देण्यांत आलें. बळी तो कान पीळी.

मुंबईंतील एक ख्रिस्ती देऊळ प्रार्थनेसाठीं लोक जमले असतां उघडून देण्याच्या लाठीं कट झाला आहे अशी बातमी नांव न कळवितां कोणी कलकत्त्याहून पाठविली. जबाबदार अधिकाऱ्यांनीं चर्चेसच्या मालकांना व लष्करी अधिकाऱ्यांना वर्दी दिली. अफगाण मेमोरियल चर्च व थॉमस कॅथेड्रल ह्या दोन देवळांभोंवती लष्करी व साधे पोलिस काल पहारा करीत होते परंतु कांहीं घडून न आल्यामुळें कोणी तरी चेष्टा करण्याकरतां ही बातमी पाठविली असावी असें दिसून आलें.

शरण येण्यासंबंधानें जनरल विल्कॉक्स यांजकडून कळविण्यांत आलेल्या शर्ती मान्य करण्याचें दावाझाई व उत्मानझाई यांनीं ता. २३ रोजीं नाकारल्यावरून जनरल विल्कॉक्स हे ता. २७ रोजीं याखदाडकडे चाल करून गेले. व शत्रूवर चाल करून जाणार इतक्यांतच त्या दोनही जमातीचे जिरगे शरण आले. सबब जनरल विल्कॉक्स हे नाहक्कीकडे परत फिरले. तेथें फेजी जातीचे लोकही शरण आले. मुफि जातीच्या लोकांनीं दंडाची रक्कम भरली असून मुसाखेलांनींहि आपल्या हिश्शाची दंडाची अर्धी रक्कम दिली आहे. बैझाई जमातीनेंच फक्त आपला हट्ट सोडला नाहीं तथापि ती जमात लवकरच वठणीवर येईल व जनरल विल्कॉक्स यांचा कार्यभाग उरकेल असा संभव आहे.

### नोटीस

कि. दिवाणी दावा नंबर १८ सन १९०८

अज्ञानाचें पालन करण्याचा आणि त्याचें मालमतेचें संरक्षण करण्याचा कायदा आक्ट नं. ८ सन १८९० यांतील कलम ११ अन्वयें नोटीस

विद्यमान डिस्ट्रिक्ट आणि सेशन जज्ज साहेब पश्चिम वऱ्हाड

आकोलें यांचे कोर्टांत

अज्ञान

संपत वल्द गणपत जात हडगर रा. लाखनवाडा खुर्द ता. खामगांव जिल्हा बुलडाणा अर्ज अज्ञानाचें पालन करण्याबद्दल अगर त्याचे मालमत्तेचें संरक्षण करण्याबद्दल अर्जदार रखमाबाई मर्द नारायण हडगर रा. लाखनवाडा ता. खामगांव जि. बुलडाणा यानें असा अर्ज दिला आहे कीं मला अज्ञानाचें पालन करण्याचे अगर त्याचे माल मिळकतीचें संरक्षण करण्याकरितां दाखला मिळवा ह्मणून अर्ज केल्यावरून त्या अर्जाची चौकशीची तारीख २० माहे जुलै सन १९०८ इसवी रोजीं आकोलें ठिकाणीं नेमिली आहे तर या नोटिशीनें सर्वांस असें कळविण्यांत येतें कीं अर्जदाराशिवाय जे इतर नातलग, मित्र, आप्त, अथवा ज्यांना अज्ञानाचें बरें व्हावें अशी इच्छा असेल त्यांनीं सदरी अज्ञानाचें पालन अगर त्याचे मालमत्तेचें संरक्षण करण्याकरितां दाखला आपणास मिळवा असें इच्छित असतील त्यांनीं आमचे समोर सदरीं तारखेस येऊन हजर व्हावें आणि आपल्यास कां नेमावें असेबद्दल जे कांहीं दाखले अगर दस्तऐवज अगर जो पुरावा असेल तो आपणास दाखला मिळण्याकारितां हजर करावा.

आज तारीख २० माहे मे सन १९०८ इसवीं रोजीं आमचे सहीनिशीं व कोर्टाचे शिक्यानिशीं ही नोटीस दिली आहे.

A. D. C. Barr
डि. आणि सेशन जज्ज
पश्चिम वऱ्हाड

नं. ग. १५

### नोटीस

**विद्यमान डिस्ट्रिक्ट जज्ज साहेब बहादुर**

पश्चिम वऱ्हाड

डिस्ट्रिक्ट आकोले यांचे कोर्टांत

किरकोळ मु. नं. १६ सन १९०८

अर्जदार

सीताबाई जवजे मानाजी पुराड राहणार आकोले.

सर्व लोकांस

कळविण्यांत येतें कीं वरील किरकोळ मुकदम्यांत अर्जदार यानें मैत राजाराम मानाजी पुराड याचे इस्टेटीचें प्रोबेट अगर वाहिवाट करण्याचें सर्टिफिकीट मिळण्याचा अर्ज केला आहे व त्या अर्जाचे चौकशीची तारीख २० माहे जुलै सन १९०८ रोजीं १० वाजतां नेमली आहे कारितां तुमच्या कांहीं हरकती असल्यास त्या दिवशीं स्वतः अगर वकील मार्फत हजर होऊन दाखल कराव्यात नाहीं पेक्षां कायद्याप्रमाणें अर्जाचा निकाल केला जाईल.

आमचे सहीनिशीं व कोर्टाचे शिक्यानिशी दिले तारीख ३० माहे ५ सन १९०८

A. D. C. Barr
डिस्ट्रिक्ट आणि
सेशन्स जज्ज
आकोला

नं. ग. १६

आमचें पेटंट यंत्र लोकांना पसंत आहे.



मे. किर्लोस्कर बंधू बेळगांव यांस— स. न. वि. वि. तुह्मी कृपाकरून पाठविलेलें कडबा कापण्यपाचें यंत्र सुरक्षित पोंचलें त्यानें कडबा फारच चांगला कापला जातो. सदरहु यंत्र इकडील लोकांना फा रच पसंत पडलें आहे, व त्या बद्दल बऱ्यांच मागण्या आपणाकडे येतील. त्या मानानें किंमत ( रु. १०४१० ) ही फारच कमी ठेवलेली आहे. कळावें ही विनंती ता. ४-२-०८

सही

जहागीरदार सीप रीया काल ( ग्वालेर ) } श्रीमंत नानसाहेब फाळके दफ्तरदार

नं. क. ३२

नहि सत्यात् परोधर्म

# येवल्याचे पितांबर व पैठण्या

आह्मी येवले येथें तयार होणारे पितांबर पैठण्या व खण वगैरे माल बाहेरगांवी पा ठवित असतो. माल खात्रीबंद माफक दरानें व योग्य अडतीनें पाठऊं. माल रेलोनें अ गर व्ही. पी. नें पाठविला जाईल. माल स्वस्त, सुबक व बक्षशीर पाठविल्या ब द्दल शेंकडों पत्रें आली आहेत.

पत्ताः—

श्रीनिवास बाळकृष्ण होळे जरूर

नं. ७२ मर्चंट व कमिशन एजंट. येवले.

## जोगळेकर आणि मंडळी लिमिटेड.

सरकारच्या सन १८८२ च्या सहाव्या आक्टाप्रमाणें रजिस्टर केली आहे.

स्थापना सन १९०७

भांडवल एक लक्ष रुपये.

प्रत्येक भाग २५ रुपयाचा याप्रमाणें एकंदर भाग ४०००.

भागीदारानें भाग मिळण्या करितां अर्ज करते वेळीं दरएक भागाबदल अर्जासोबत रुपये १० व अर्ज मंजूर झाल्यावर रु. ९ व बाकीची रक्कम प्रत्येक महिन्याला रु. ९ प्रमाणें पुरी करून दिली पाहिजे.

सदर्हू कंपनीचें मेमोरंडम् व आर्टिकल्स ऑफ आसोशिएशन आकोला येथें सदर कंपनीचें आफिसांत पाहण्यास मिळेल. प्रास्पेक्टसच्या प्रती सदर्हू आफिसांत अर्ज केला असतां मिळतील.


बोर्डाच्या हुकूमावरून

पी. सी. जोगळेकर आणि कंपनी म्या. एजंटस्

नं. १३

दोन घडयाळें एकदम बोलाविणान्यास पोस्ट खर्च माफ.

गजकर्णाच्या २४ शिइया बोलाविणान्यास रा. सिस्टम घडयाळ बक्षीस सखळी मुधां दर शिशीस ।.



रासकोप सिस्टम किं. रु. ३। स्वदेशी पेटेंट वाच किं. रु. ५। सहा हिरे वाली रु. ४। आठ दिवसाच्या कीलीचे खिशातील घडयाळ रु. १४ सेलजर वाच मजबुत रु. ५। स्वदेशी सेकंड वाली रु. ६ पोस्टखर्च ।-

के. नुरा. आणि कं.

मुंबई पोस्ट न. ९

नं. ४७

त्वरा करा ! त्वरा करा !

## बायसिकल टीचर

आमचेकडे सायकल फार थोड्यां वेळांत आणि उत्तम रीतिनें शिकविले जाईल दर माफक असून वक्तशिर काम केलें जाईल आजवर ५०० शे माणसावेक्षां जास्त लोकांस सायकली शिकविल्या आहेत. बाहेर गांवच्या लोकांकडून रेल्वेभाडे व जेवण खर्च घेतला जाईल. सायकली ही दुरुस्त केल्या जातील. नवीन सायकली विकत मिळतील.

जेकब. सायकल टीचर.

पत्ताः----

अहमद अली कासमजी बोहरा

नं ४८ इं. ७ आकोला ( शहर )

## देशी दवाखाना

( वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर यांचा

आह्मी आमचा दवाखाना पुन्हा चालू केला आहे. शास्त्रोक्त रीतीनें औषधें तयार केलेलीं असतात. चिकित्साहि काळजी पूर्वक होत असते हें सर्व श्रुतच आहे. रजू लोकांनीं अनुभव घेऊन पाहावा. भस्म, मात्रा, पाक, गुटिका, वगैरे विक्रिस तयार आहेत. गरमी, उपदंश, प्रदर, धुपणी, बाळंतरोग, पंडु इत्यादि कष्टसाध्य रोग फार लवकर दूर होतात.

पत्ता— वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर आकोला येथें शहरांत मुलीचे शाळे जवळ

चैत्रशुध प्रतिपदा शके१८३० आकोला

नं० ख० १


## नोटीस

कि. दिवाणी दावा नंबर १२ सन १९०८

अज्ञानाचें पालन करण्याचा आणि त्याचें मालमत्तेचें संरक्षण करण्याचा कायदा आक्ट नं. ८ सन १८९० यांतील कलम ११ अन्वयें नोटीस

वियमान डिस्ट्रिक्ट आणि सेशन जज्य साहेब पश्चिम वऱ्हाड

आकोलें यांचे कोर्टांत

अज्ञान

पंढरी वल्लद बाबूजी कुणबी राहणार भाडगणी ता. मलकापूर जि. बुलढाणें अर्ज अज्ञानाचें पालन करण्याबद्दल अगर त्याचे मालमत्तेचें संरक्षण करण्याबद्दल अर्जदार बहिणाजी राघोजी पाटील रा. भाडगणी ता. मलकापूर जिल्हा बुलडाणा यानें असा अर्ज दिला आहे कीं मला अज्ञानाचें पालन करण्याचे अगर त्याचे माल मिळकतीचें संरक्षण करण्याकरितां दाखला मिळवा ह्मणून अर्ज केल्यावरून त्या अर्जाची चौकशीची तारीख २९ माहे जून सन १९०८ इसवी रोजीं आकोलें ठिकाणीं नेमिली आहे तर या नोटिशीनें सर्वांस असें कळविण्यांत येतें कीं अर्जदाराशिवाय जे इतर नातलग, मित्र, आप्त, अथवा ज्यांना अज्ञानाचें बरें व्हावें अशी इच्छा असेल त्यांनीं सदरी अज्ञानाचें पालन अगर त्याचे मालमत्तेचें [illegible] आपणास [illegible] आणि [illegible] काहीं दाखले अगर दस्तऐवज [illegible] पुरावा असेल तो आपणास दाखला मिळण्याकारितां हजर करावा.

आज तारीख २० माहे मे सन १९०८ इसवीं रोजीं आमचे सहीनिशीं व कोर्टाचे शिक्यानिशीं ही नोटीस दिली आहे.

A. D. C. Barr

डि. आणि सेशन जज्ज पश्चिम वऱ्हाड

नं. ख. १००

## नोटीस

कि. दिवाणी दावा नंबर १३ सन १९०८

अज्ञानाचें पालन करण्याचा आणि त्याचें मालमत्तेचें संरक्षण करण्याचा कायदा आक्ट नं. ८ सन १९०८ यांतील कलम ११ अन्वयें नोटीस

वियमान डिस्ट्रिक्ट आणि सेशन जज्य साहेब पश्चिम वऱ्हाड

आकोलें यांचें कोर्टांत

अज्ञान

काशी मर्द सरदारसिंग रजपुत रा. हिंगणें ता. आकोला.

अर्ज अज्ञानाचें पालन करण्याबद्दल अगर त्याचे मालमत्तेचें संरक्षण करण्याबद्दल अर्जदार धनसिंग भिताराम रजपूत रा. हिवरी ता. यवतमाळ जि. उमरावती यानें असा अर्ज दिला आहे कीं मला अज्ञानाचें पालन करण्याचे अगर त्याचे माल मिळकतीचे संरक्षण करण्याकरितां दाखला मिळवा ह्मणून अर्ज केल्यावरून त्या [illegible] जून सन १९०८ इसवी [illegible] ठिकाणीं नेमिली आहे तर या नोटिशीनें सर्वांस कळविण्यांत येतें कीं अर्जदाराशिवाय जे इतर नातलग, मित्र, आप्त, अथवा ज्यांना अज्ञानाचें बरें व्हावें अशी इच्छा असेल त्यांनीं सदरी अज्ञानाचें पालन अगर त्याचें मालमत्तेचें संरक्षण करण्याकरितां दाखला आपणास मिळावा असें इच्छित असतील त्यांनीं आमचे समोर सदरी तारखेस येऊन हजर व्हावें आणि आपल्यास कां नेमावें असेबद्दल जे कांहीं दाखले अगर दस्तऐवज अगर जो पुरावा असेल तो आपणास दाखला मिळण्याकरितां हजर करावा.

आज तारीख २० माहे मे सन १९०८ इसवीं रोजीं आमचे सहीनिशीं व कोर्टाचे शिक्यानिशीं ही नोटीस दिली आहे.

A. D. C. Barr

डिस्ट्रिक्ट आणि सेशन जज्ज वेस्टबरार

नं. ग. १

## नोटीस

बायजी मर्द सखाराम माळी गोडळे राहणार लोहरी बुजरुक प्रगणे अडगांव तालुके आकोट पोष्ट आकोट ईसः—

खालीं सही करणार ईजकडून नोटीस [illegible] तारीख २७-४-०८ [illegible] तारण गहाणखत [illegible] व्यंकटेश कुळकर्णी आकोटकर यांस पोकळ लिहून देऊन नोंदून दिलें. तुझा गंधर्व विवाह तोडल्याबद्दल तुझे नवऱ्यांनीं तुला फारकत लिहून दिल्यास वीस वर्षें होत आलीं व ती तुझे स्वाधीनही केली. अशाबद्दल तुझा जेष्टदीर भगवान माळी गोडळे याचा व माधवजी व गणु यांचे आकोट तहशिलींत जबाब झाले आहेत त्यावरून उघड सिद्ध आहे. त्यामुळेंच माझे नवऱ्याची जमीन माझे नांवें लागण्याचा आकोट तहशिलींत ठराव झाला व तो परत चौकशींत कायम न ठेवतां तुझें नांवें खातें करण्याचा हुकूम झाला त्यामुळें तूं आपाजीचे पुत्रांत शिरून त्यांना पोकळ गहाणखत लिहून दिलें परंतु ज्या अर्थी वीस वर्षांपासून तुझा कबजाच नाहीं. व तूं नवऱ्याजवळ वीस वर्षांपासून कधीं राहिली नाहीं त्या अर्थी नवऱ्याची मिळकत तुला गहाण लिहून देण्याचाच अधिकार नाहीं. याकरितां तू निरर्थक पोकळ गाहाण लिहून दिलें हे उघड सिद्ध आहे हें खुप समजावें यास लागलेला खर्च तुजपासून घेतला जाईल. कळावें तारीख २३-५-१९०८ इ. दस्तूर हनमंत रामराव संमत देशमुख आकोटकर.

सही

रुखमी मर्द सखाराम माळी गोडले आकोट नि. खुद हातची बांगडी

नं. ग. २

## आर्यवनौषधालय मुर्डी

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांजकडील आनररी असिस्टंट सर्जन मामी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोले यांनी आमचीं औषधें बरकाईनें हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत यांहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट आह्मास दिलें आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देउनही त्याचें आरोग्यार्थ आणखी एखादे औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देउं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजविनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्य स्तंभक,
रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जी धातू ती शुद्ध असेल तरच शरीर निरोगी राहुन सर्व सौख्य प्राप्त होते ती दोषी असेल तर शरीरांत नाना प्रकारचे रोगरुपी शत्रु उत्पन्न होऊन शारिरीक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ट होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी पाहिजे त्या दिवसांत एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात उन्हाळे इंद्रियशिथलता, कडकी. गर्मीसंबंधी मुरलेले विकार मुत्रसंकोच; धातुचा पातळपणा, स्त्रियाची धुपणी, छातींतील रोग, हात पाय मुत्रमार्ग. व नेत्र याचा दाह, क्षय, पंडूरोग, मुदतीचा ज्वर, जीर्णज्वर, आग्नमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश पित्तविकार. बाळंतरोग, मधूमेह जुनाट परमा, मुष्टीमैथूनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरें होऊन शरीर निरोगी मजबुत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त याची शुद्धी वृद्धि वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न पचू लागते त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत. करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळाली आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष मुलें, यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितीही घेणारास टपाल खर्च माफ आहे ४ रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनुपान खर्डा सोबत किंवा व्ही. पीनें खालील पत्यावर मिळतील.

दरः–एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु. ११५ गो ३ रु १६५ गो. ४ रु. २७५ गो० ६ रु. ५५० गो० रु.

२ अपूर्व नेत्रांजनः–यानें वडस, साहर, फुल, खुपऱ्या, बिंदु, कांच इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरित बरें होउन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु.

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः---कोणताही नवा जुना परमा व उजन्य दहा तिडीक मुताची लाली, संकोच पुपस्राव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नसता सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ ॥ भार बाटलीस रु. २

३ दंतबलवर्धक पूडः–दंतसंबंधी सर्व विकार उत्तम बरे होतात.

५ विंचूचें विषः–औषध लावतांच उतरतें मुळी १ तो. ८ आणे

६ गजकर्णः–खरूज, नायटे वगैरे सर्व विकार २ दिवसांत जातात ड. ६ आणे

७ सर्व हिमज्वरः–औषध घेताच कशाही प्रकारचें ज्वर असले तरी तें औषध घेताच जाऊन पुनः उलटत नाहींत. १२ पुड्या १ रु.

८ प्लेगावर रामबाण औषधः–आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरें झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रह तापावर गोळ्या गाठीस मलम, वात चढू नये ह्मणून वातावर मात्रा याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं. २ आणे ख. सो.

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपाय-कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगावर अनेक औषधें ग्रंथोक्त रसायने भस्म धातु. गुटिका, आसव, तेलें, सुगंधी अत्तर, माफक दरानें मिळतात. अनुपान खर्डा सोबत टपाल खर्च वेगळा पडेल लेखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतीचें मन कळविल्यास रोगाची निदान चिकीत्सा कळवूं.

## अत्यंत आगत्यची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधाच्या अनेक जाहिराती सुरूं असुन प्रत्येक आपला समाज निरुद्योगी व आळशी बनल्यामळें एका जो धंदा सुरूं केला त्याचेच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजें त्यानें करावें आमचे जाहिरातीस कोकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजिलें वगैरे गावांतून तो पर्णावस्थेंत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरूं होत आहेत. अशा जाहिराती किंवा तें लोक याची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याचा तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हेंच कीं ज्यांच्य कारखाना आज सतत १५।२० वर्षे अव्याहत सुरूं असून ज्यांच्या औषधास घोले डाक्टरांनी सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधींनें कित्यावधी ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचीच औषध नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करतां अशाच रितीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याणकारीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेंस आणण्याची खटपट करूं. आज-पर्यंत आमचे खटपटीनें यशहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्य बंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तीच सर्वांनीं वापरवा, एकवार अनुभवानें खात्री होईल इतर जाहिरातींशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषध मागणें तीं खालील पत्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरी गुणकारक औषधें मिळून हटकुण व त्वरित आरोग्य येईल. नं. १

**कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य**

**पत्ताः—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.**

---

## Oriental Government Security Life Assursnce Company Limited

*Established* 1874.

*HEAD OFFICE*—**BOMAY**

Chief Agency for C. P. Berar and Khandesh

*Head—Quarters—Nagpar C. P.*

## FUNDS EXCEED TWO CORRES AND SEVENTY FIVE LAKHS

Claims paid for over two Crores

**IMMEDIATE SETTEL MENT OF CLAIMS**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. *This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating heir clients with the utmost liberality*

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's funds amou a givensum, but it is essential to know how such Funds are invested— if in miscellaneous and risky investments or how secured

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay n terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising hroh decease of assured lives, and endowment policies matu

*Government Officers, Professional men, Tradesmen and others,*b empoying a portion of their annual income or profits in effecting life po once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he die early, before he hs had time to save much, his wife and amily may be in distress. Life Assurance is a means by which this danger is not over. Life being so uncertain, the sooner a man makes is hupmind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay There are numerous instances in the records of the "Oriental" where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to—

M. De SOUZA.
CHIEF AEGNT
Nagpur.

N. 2

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

त्या अर्जाची चौकशीची तारीख २९ माहे जून सन १९०८ इसवी रोजीं आकोलें ठिकाणीं नेमिली आहे तर या नोटिशीनें सर्वांस कळविण्यांत येतें कीं अर्जदाराशेबाय जे इतर नातलग, मित्र, आप्त, अथवा ज्यांना अज्ञानाचें वरें व्हावें अशी इच्छा असेल त्यांनीं सदरी अज्ञानाचें पालन अगर त्याचें मालमत्तेचें संरक्षण करण्याकरितां दाखला आपणास मिळावा असें इच्छित असतील त्यांनीं आमचे समोर सदरी तारखेस येऊन हजर व्हावें आणि आपल्यास कां नेमावें असेबद्दल जे कांहीं दाखले अगर दस्तऐवज अगर जो पुरावा असेल तो आपणास दाखला मिळण्याकरितां हजर करावा.

आज तारीख २० माहे मे सन १९०८ इसवी रोजीं आमचे सहीनिशीं व कोर्टाचे शिक्यानिशीं ही नोटीस दिली आहे.

A. D. C. Barr
डिस्ट्रिक्ट आणि सेशन
जज्ज वेस्टवर्‍हाड

नं. ग. ६

## नोटीस

बानी माधो वल्द अर्जुन पाटील टाकळी विरो पो. जळंब यांस:--

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मी तुह्माला सर्वे नंबर ९८ एकर गुंठे ३८२ रुपये ६॥ यांतील तिसरा हिस्सा गहाण लिहून घेऊन त्याजानी अशी शर्त केली कीं शेताचें पीक व्याजामध्यें घ्यावें व रकम ५ वर्षांत फेडून द्यावी. ह्मणून मी रकम घेऊन आलो असतां तुह्मी रुपये घेऊन गहाण खत परत देत नाहीं. तर नोटिशीनें असें कळविण्यात येतें कीं तुमच्या गहाणाची रकम नगदेव वा निंबाजी काळे कुणबी राहणार टाकळी विरो याजकडे धरवर ठेवली आहे ती ही नोटिस पावलेपासून आठ दिवसाचे आंत घेऊन जाऊन शेतवरील ताबा सोडून द्यावा. मी तें शेत नथु उर्फ किटकुल वा नारायण पाटील राहणार [illegible] विकलें आहे. तेव्हां [illegible] मुदतींत घेऊन जाऊन [illegible]र मुदतींत झालें नाहीं [illegible]तला हा तुमची ताबा देण्याला संमतीच आहे असें समजून मी त्यास ताबा देईन. मग जर त्यांचे वखर किंवा पेरणी अटकवाल तर त्यचे बद्दल नुकसानी तुह्मास सोसावी लागेल व तुह्मावर फौजदारीही करण्यांत येईल कळावें. ता. २८-५-०८ इ.

सही
सदु वा खुशाल पाटील
राहणार टाकळी विरो
नि. खु.

नं. ग. ७

## नोटीस

भिवसन वल्द नटवा महार नांदरुण तालुका दर्यापूर यांस:-

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मझा नवरा मरण पावल्या नंतर माझ्या शेती वाडीचें काम पहाण्यास मी तुह्मांस नोकर ठेविले होते माझ्या नवऱ्याच्या हातचें शिवबक्ष जयनरायण मारवाडी अडुळा यांचें कर्ज देणें होतें तें फेडण्या करितां व इतर लोकांचें कर्ज देण्यांकरितां मी बनेखा वल्द अमीनखा राहणार अडुळा यांचें १२०० रुपये कर्ज काढून त्यास मी आपली जमीन ताबेगहाण लिहून दिली आहे परंतु सदई ताबेगहाणांत मला बुडविण्याच्या हेतून तुह्मी दगाबाजीनें आपलें नांव ऋणकोत घातलें आहे असें करण्यांत तुमचा असा उद्देश दिसतो कीं गहाण दिलेल्या जमिनींत आपला निम्मेचा हिस्सा शाबीत व्हावा पण हें तुमचें करणें लबाडीचें आहे गहाण दिलेली जमीन माझ्या मालकीची असून तींत तुमचा कांहीं एक संबंध नाहीं व अशा लबाडीच्या कृत्यानें तुमचा हक्क चालणार नाहीं. कळावें तारीख २० माहे मे सन १९०८ इसवी

सही
कपुरी मर्द जानू महार राहणार
नांदरूण इच्या हातची निशाणी बांगडी असे

नं. ग. ८

## हंगामाचे दिवस

कांहीं ठिकाणीं पाऊस झाला आहे व कांहीं ठिकाणीं लवकरच पडण्याचा संभव आहे. पाऊस पडतांच सर्वांना एकदम चांगल्या नांगरांची जरूरी लागते. त्या करीतां आह्मी सुधारलेले लोखंडी नांगर तयार केले आहेत यास थोडे बैल लागून जमीन ज्यास्त खोल नांगरतां येते. हरळी साफ नाहीशीं होते आंतील माती उलथून पडते व उन्हानें कसदार बनून उत्तम प्रकारचें पीक येतें.

**जास्त माहिती करीतां हस्त पत्रक मागवा. किर्लोस्कर बंधु बेळगांव**

नं. ग. ९

## नोटीस

नोटीस बेशमी त्रिंबकदास मोहनचंद गुजराथी दुकान पेठ बाळापूर ता. म. जि. आकोला यांस:—

मी खालीं सही करणार याज कडून नोटीस देण्यांत येते कीं आज सरासरी तीन महिने झाले माझें शेत १००० हजार रुपयावर ताबेगहाण खत करून घेतलें आहे तेव्हांपासून मी पांच सहादां रकम मागण्यास आली असतां तुह्मी मला रकम दिली नाहीं. तुमची बेमारी दिवसेंदिवस जास्त दिसल्यामुळें पुढें तक्रार न व्हावी कारतां मला नोटीस देणें भाग पडले तरी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत माझी रकम जर चुकती न कराल तर सदरहु दस्तऐवज रद्द असे कळावें. ता० २२।५।०८

सही
रुपचंद दुलीचंद गुजराथी बाळापूर
दस्तुर खुद्द

नं. ग. १०

## जाहिरात

सर्वत्र लोकांस या नोटिशीनें जाहिर करण्यांत येतें कीं बायजी मर्द सखाराम माळी गोडले ही लोहरी बुजरुक येथें राहत असून तिनें २५०० रुपयाचे पोकळ गहाणखत आपाजी उर्फ विठ्ठल व्यंकटेश कुळकर्णी आकोटकर यांस ता. २७-५-०८ रोजीं लिहून दिलें आहे. यापुढें कोणी कोणत्याही प्रकारे तिजपासून लिहून घेऊं नये घेतल्यास तें पोकळ आहे असें समजलें जाईल. कारण ती नवऱ्याजवळ वीस वर्षापासून नसून तिचा नवऱ्याचे मिळकतीवर ह्मणजे घर व शेतीवर एक द्वितीआंशाचा हक्क नाहीं व कबजा नाहीं तिचे नांवे नसुते शेताचें खातें झालें ह्मणून ती मालक होत नाहीं व माझा कबजा तिला मिळणें नाहीं. कळावें तारीख २२-५-१९०८ इ० दस्तूर हनमंत रामराव संमत देशमुख आकोटकर.

सही
रुखमी मर्द सखाराम माळी
गोडले राहणार आकोट
निशाणी बांगडी

नं. ग. ३

---

## नोटीस

बेशर्मी सदू वल्लद सोनाजी व धनु वल्लद चिणकाजी राहणार मौजे असलगांव ता. जळगांव जि. बुलडाणा

यांसः--

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझे ऐकण्यांत असें आलें आहे कीं तुह्मी माझी इस्टेट अफरातफर करण्यास लागला अहां. कोणास गहाण देऊं करतां, कोणास पट्ट्यानें देतो ह्मणतां कोणास विकत घ्या असें ह्मणतां तेव्हां मला असें वाटतें कीं तुह्मी माझी इस्टेट लबाडीनें कोणास देणार आहां. तर या नोटीशीनें तुह्मास असें कळविलें जातें कीं तुह्मी आमचे वारस नाहीं. तुमचा आमचा संबंध चार पीढ्यापासून तुटला आहे. इतकें जरी आहे तरी मी एकटी बाई पाहून तुह्मी मला फसवूं पाहतां तर तसें करणें गैरकायदा आहे. तुह्मी कोणास माझी जिनगी गहाण, खरेदी, पट्टानें बक्षिस देऊं नये या उपर जर तुह्मी ती जिनगी गहाण वगैरे दिल्यास त्याची जबाबदारी माझ्या इस्टेटीवर नाहीं त्या बद्दलची जबाबदारी देणारावर व घेणारावरच राहील. व त्या बद्दल मला विश्वासघाताची फिर्याद करणें पडेल व मग त्यास लागणारा सर्व खर्च या नोटीशीच्या खर्चा सुद्धां भरून घेऊं कोणी फसूं नये व कोणाचे नुकसान होऊं नये ह्मणून मुद्दाम तुह्मास नोटीस देणें भाग पडेल कळावें ता. २८-५-०८ इ.

सही
पुंजी मर्द तुकाराम राहणार
असलगांव नि. खु.

नं. ग. ४

---

## नोटीस

कि. दिवाणी दावा नंबर १७ सन १९

अज्ञानाचें पालन करण्याचा आणि त्याचें मालमतेचें संरक्षण करण्याचा कायदा आक्ट नं. ८ सन १८९० यांतील कलम अन्वयें नोटीस

विद्यमान डिस्ट्रिक्ट आणि सेशन ज साहेब पश्चिम वऱ्हाड

आकोलें यांचे कोर्ट

अज्ञान

विठोबा वल्लद पुंजाजी कुणबी राहणार बऱ्हाणपूरी ता. मेहकर जि बुलढाणा

अर्ज अज्ञानाचें पालन करण्याबद्दल अगर त्याचे मालमत्तेचें संरक्षण करण्याबद्दल अर्जदार मारुती वल्लद कुकाजी कुणबी रा. शेंदर ता. मेहकर जिल्हा बुलडाणा यानें असा अर्ज दिला आहे कीं मला अज्ञानाचें पालन करण्याचे अगर त्याचे माल मिळकतीचें संरक्षण करण्याकरितां दाखला मिळव ह्मणून अर्ज केल्यावरून त्या अर्जाची चौकशीची तारीख २० माहे जुलै सन १९०८ इसवी रोजीं आकोलें ठिकाणीं नेमिली आहे तर या नोटिशीनें सर्वांस असें कळविण्यांत येतें कीं अर्जदाराशिवाय जे इतर नातलग, मित्र, आप्त, अथवा ज्यांना अज्ञानाचें बरें व्हावें अशी इच्छा असेल त्यांनीं सदरी अज्ञानाचें पालन अगर त्याचे मालमत्तेचें संरक्षण करण्याकरितां दाखला आपणास मिळावा असें इच्छित असतील त्यांनीं आमचे समोर सदरीं तारखेस येऊन हजर व्हावें आणि आपल्यास कां नेमावें असेबद्दल जे कांहीं दाखले अगर दस्तऐवज अगर जो पुरावा असेल तो आपणास दाखला मिळण्याकरितां हजर करावा.

आज तारीख २० माहे मे सन १९०८ इसवीं रोजीं आमचे सहीनिशीं व कोर्टाचे शिक्यानिशीं ही नोटीस दिली आहे.

A. D. C. Barr
डि. आणि सेशन जज्ज
पश्चिम वऱ्हाड

नं. ग. ५

---

## नोटीस

कि. दिवाणी दावा नंबर १४ सन १९०८

अज्ञानाचें पालन करण्याचा आणि त्याचें मालमत्तेचें संरक्षण करण्याचा कायदा आक्ट नं. ८ सन १८९० यांतील कलम ११, अन्वयें नोटीस

विद्यमान डिस्ट्रिक्ट आणि सेशन जज्ज साहेब पश्चिम वऱ्हाड

आकोलें यांचें कोर्टांत

अज्ञान

दरू मर्द पंढरी कुणबी रा. बेलखेड ता. आकोट जि. आकोला.

अर्ज अज्ञानाचें पालन करण्याबद्दल अगर त्याचे मालमत्तेचें संरक्षण करण्याबद्दल अर्जदार पंढरी माधोजी कुणबी रा. बेलखेड ता. आकोट जि. आकोला यानें असा अर्ज दिला आहे कीं मला अज्ञानाचें पालन करण्याचे अगर त्याचे माल मिळकतीचे संरक्षण करण्याकरितां दाखला मिळवा ह्मणून अर्ज केल्यावरून

# वऱ्हाडसमाचार.

**BERAR SAMACHAR**

वर्ष ४२ ] आकोला वऱ्हाडसमाचार सोमवार तारीख ८ माहे जून सन १९०८ इ० [ अंक २१


## वर्गणीचे दर

**आकोल्यांतील लोकांस........२ रुपया**
**बाहेरगांवीं ट. ह. ........ २ रुपये**
**वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.**

## नोटिशिचें दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन आळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.


### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग व्यांक

ह्या बँकेत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागे राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमाच्या प्रती बँकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } G. A Phillips एजंट

नं ७३

### हंगामाचे दिवस


कांहीं ठिकाणीं पाऊस झाला आहे व कांहीं ठिकाणीं लवकरच पडण्याचा संभव आहे. पाऊस पडतांच सर्वांना एकदम चांगल्या नांगरांची जरूरी लागेल त्या करीतां आह्मी सुधारलेले लोखंडी नांगर तयार केले आहेत यास थोडे बैल ला. गून जमीन ज्यास्त खोल नांगरतां येते. हरळी साफ नाहींशीं होते आंतील माती उलथून पडते व उन्हानें कसदार बनून उत्तम प्रकारचें पीक येतें.

**जास्त माहिती करीतां हस्त पत्रक मागवा. किर्लोस्कर बंधु बेळगांव**

नं. ग. ९

दोन घड्याळें एकदम बोलाविणाऱ्यास पोस्ट खर्च माफ.

गजकर्णाच्या २४ शिश्या बोलविणाऱ्यास रा. सिस्टम घड्याळ बक्षीस सखळी मुधां दर शिशीस ।.



रासकोप सिस्टम किं. रु. ३। स्वदेशी पेटेंट वाच किं. रु. ५। सहा हिरे वाली रु. ४। आठ दिवसाच्या कील्लीचे खिशातील घड्याळ रु. १४ सोलजर वाच मगजुत रु. ५। स्वदेशी सेकंड वाली रु. ६ पोस्टखर्च ।-

कं. नुरा. आणि कं.
मुंबई पोस्ट न. ९
नं. ४७

त्वरा करा ! त्वरा करा?

### बायसिकल टीचर

आमचेकडे सायकल फार थोड्यां वेळांत आणि उत्तम रीतिनें शिकविले जाईल दर माफक असून वक्तशिर काम केलें जाईल आजवर ५०० शे माणसापेक्षां जास्त लोकांस सायकली शिकविल्या आहेत. बाहेर गांवच्या लोकांकडून रेल्वेभाडे व जेवण खर्च घेतला जाईल. सायकली ही दुरस्त केल्या जातील. नवीन सायकली विकत मिळतील.

जेकब.
सायकल टीचर.

पत्ताः----
अहमद अल्ली कासमजी बोहरा
नं ४८ इं. ७ आकोला ( शहर )

### देशी दवाखाना

**( वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर यांचा**

आह्मी आमचा दवाखाना पुन्हा चालू केला आहे. शास्त्रोक्त रीतीनें औषधें तयार केलेलीं असतात. चिकीत्साहि काळजी पूर्वक होत असते हें सर्व श्रुतच आहे. गरजूं लोकांनीं अनुभव घेऊन पाहावा. भस्म, मात्रा, पाक, गुटिका, वगैरे विक्रिस तयार आहेत. गरमी, उपदंश, प्रदर, धुरणी, बाळंतरोग, पंडु इत्यादि कष्टसाध्य रोग फार लवकर दूर होतात.

पत्ता— वैद्य शिवचरणगीरे रामगीर कुरणखेडकर आकोल येथें शहरांत मुलीचे शाळें जवळ
चैत्रशुध प्रतिपदा शके१८३० अकोला

नं० ख० १

### आमचें पेटंट यंत्र लोकांना पसंत आहे.



मे. किर्लोस्कर बंधू बेळगांव यांस— सा. न. वि. वि. तुह्मी कृपाकरून पाठविलेलें कडबा कापण्ययाचें यंत्र सूरक्षित पोंचलें त्यानें कडबा फारच चांगला कापला जातो. सदरहु यंत्र इकडील लोकांना फारच पसंत पडलें आहे, व त्या बद्दल बऱ्यांच मागण्या आपणाकडे येतील. त्यामानाने किंमत ( रु. १०।१० ) ही फारच कमी ठेवलेली आहे. कळावें ही विनंती ता. ४-२-०८

सही
जहागीरदार सीप रीया काल ( ग्वालेर ) } श्रीमंत नानसाहेब फाळके दफ्तरदार

नं. क. ३२

नहि सत्यात् परोधर्म

## येवल्याचे पितांबर व पैठण्या

आह्मी येवले येथें तयार होणारे पितांबर पैठण्या व खण वगैरे माल बाहेरगांवी पा ठवित असतो. माल खात्रीचा माफक दरानें व योग्य अटींनें पाठऊं. माल रेल्वेनें अगर व्ही. पी. नें पाठविला जाईल. माल स्वस्त, सुबक व वक्तशीर पाठविल्या बद्दल आह्मास शेंकडों पत्रें आलीं आहेत.

पत्ताः—
श्रीनिवास बाळकृष्ण होले जल
नं. ७२ मर्चंट व कमिशन एजंट.
येवले.

## जोगळेकर आणि मंडळी लिमिटेड.

**सरकारच्या सन १८८२ च्या सहाव्या आक्टाप्रमाणें रजिस्टर केली आहे.**

स्थापना सन १९०७
**भांडवल एक लक्ष रुपये.**
**प्रत्येक भाग २५ रुपयाचा**
**याप्रमाणें एकंदर भाग ४०००.**

भागीदारानें भाग मिळण्या करितां अर्ज करते वेळीं दरएक भागाबद्दल अर्जासोबत रुपये १० व अर्ज मंजूर झाल्यावर रु. ५ व बाकीची रकम प्रत्येक महिन्यांला रु. ५ प्रमाणें पुरी करून दिली पाहिजे.

सदर्हू कंपनीचें मेमोरँडम् व आर्टिकल्स ऑफ आसोशिएशन आकोला येथें सदर कंपनीचे आफिसांत पाहण्यास मिळेल. प्रास्पेक्टसच्या प्रती सदर्हू आफिसांत अर्ज केला असतां मिळतील.

बोर्डाच्या हुकूमावरून

**पी. सी. जोगळेकर आणि कंपनी म्या. एजंटस्**

नं. १३


### नोटीस

नोटीस बेशमी शेखकरीम वल्लद शेख गुलाब मुसलमान राहणार कवठखुर्द प्र० व ता० आकोट

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मला तुह्मी ता. २२-४-०८ इ. रोजीं मौजे सावर येथील सर्वे नंबर ५६ यांतील सहाव्या हिश्याचे व मौजे रंभापूर येथील सर्वे नंबर २८ यांतील नवव्या हिश्याचें बटाई खत करून दिलें तेव्हांपासून तुह्मी जमिनीची किस्तकारी केली नाहीं, करितां नोटीस पावल्यापासून चार दिवसाचे आत किस्तकारी करावी. नाहीं पेक्षां मी शेत वाहत नाहीं. असें कळवावें ह्मणजे मी बटाई रद आहे असें समजून शेतांची लागवड दुसरे इसमास करीन कारण हल्लीं पेरणीचे दिवस आले आहेत. या पुढें तुमच्या होणाऱ्या नुकसानीचा जबाबदार मी नाहीं. माझी होणारी नुकसानी तुमचेपासून कोर्ट मार्फत भरून घेईन. व्यर्थ त्रास दिला सबब नोटीशीचा खर्च तुमचेपासून घेतला जाईल कळावें ता. २४-५-०८ इ.

सही
माधोजी वा कर्काजी टाकरे
राहणार मंचनपूर नि. खु.

नं. ग. १७

## नोटीस

नोटीस बेशमी— कपुरी मर्द आकाजी खेडकर रहाणार कालखेडे ता० अकोले व भुलाई मर्द बापुजी खेडकर रा० बाभळी हल्लीं वस्ती आकाशी पाटलाचे जवळ ता० अकोले यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे सांगळुद येथील सर्वे नंबर ७४ व ८४ पैकीं व ८९ पैकीं यांचें खातें माझा बाप आकाजी वल्द पैकाजीचें नांवें असून तो मयत झाला तेव्हां मी जमिनीचें खातें मी आपले खुषीनें कपुरी इचें नांवें करून दिलें. परंतु जमीनीचा ताबा माझाच आहे. तुम्ही उभयता सर्वत्र सुना एकमत करून माझें नुकसान व्हावें या इरादानें माझे नकळत सांगळुद येथें येऊन माझे पश्चात जमिनीची लागवण करितां असें मजला समजल्यावरून नोटीशीनें कळवितों कीं तुह्मी उभयतांही फक्त अन्न वस्त्राच्या अधिकारणी आहात. तुमचा शेतीवर कांहीं संबंध नाहीं. तरी जमिनीची लागवण तुह्मी करूं नये केल्यास मी जबाबदार होणार नाहीं. जमिनीचा ताबा मी करीन. कळावें. तारीख २९।१।०८ इ०

दस्तुर गंगाधर विष्णु चितळे रा. दर्यापूर.

सही

नारायण वल्द आकाजी खेडकर रहाणार बाभळी यांची नि. खु. असे.

नं. ग. १८

## नोटीस

बेशमी भागाई मर्द अंबरसिंग बढे कुणबी रहाणार कळमखेड ता. जळगांव पोष्ट तामगांव ईसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं आमची भावजय आहेस. तुझा नवरा मरून आज ११–१२ वर्षे झालीं आपण सर्व जण १९०४ साल पर्यंत एकत्रच होतो. पुढें तुला खाण्यास मीच देत होतो. सर्व जीनगी वडीलोपार्जित आहे. तुला मुलगा नाहीं. त्यार्थी तुझा इस्टेटीवर फक्त अन्नवस्त्राचाच हक आहे व तो मी तुला देतही आहे. पण मला आतां असें समजतें कीं तूं आतां इस्टेट विकण्यास काढली आहेस. तर तुला या नोटिशीनें असें कळवितों कीं तुला कोणतीही इस्टेट स्थवर अगर जंगम विकण्याचा अधिकार नाहीं इतक्या उपर जर तूं इस्टेट विकशील, बक्षिस देशील, गहाण देशील अगर पट्यानें देशील त्याबद्दल इस्टेट जबाबदार नाहीं तर त्यांची जबाबदारी तुझ्यावर व तुझ्याशीं व्यवहार करील त्यावरच राहील. तुला पोटगीला लागेल तो खर्च मी देण्यास तयार आहे. आजपर्यंत तुझ्यावर कांहीं कर्ज नाहीं व यापुढें जर घेतलेंस तर तें लबाडीनें मला बुडविण्यास घेतलें असें समजून पोकळ आहे असें समजलें जाईल. कोणाचें नुकसान होऊं नये ह्मणून अगाऊ सुचना आहे. तर कोणी फसूं नये. कळावें. तारीख २७- ५- ०८

सही

नारायण वल्द गंभीरजी बढे कुणबी राहणार कळमखेड ता. जळ-

नं. ग. १९ गांव निशाणी खुद

## जाहिरात

सर्वत्र लोकांस व शेट सावकारास या जाहिर नोटीशीनें कळविले जाते कीं भागाई मर्द अंबरसिंग कुणबी अडनांव बढे ही माझी सखी भावजय आहे व आह्मी सर्वत्र समाईक कुटुंबांतील आहोंत. माझा भाऊ मरण्यास १०–११ वर्षे झालीं पण भागाई ही नुकतीच भांडण करून १९०४ सालापासून वेगळी राहिली आहे पण तिला अन्न वस्त्र मीच पुरवत आहे. इतके असून ती लोकांच्या फंद फीतुरानें इस्टेट विकण्यास काढीत आहे. ह्मणून सर्वत्रास या जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं भागाई ईचा फक्त इस्टेटीवर खाण्यापीण्याचा हक्क आहे. व मी तो देण्यास तयार आहे तीला आतां कोणी वारस पुत्र नाहीं. ह्मणून कोणी तीज जवळून इस्टेट स्थावर अगर जंगम गहाण, खरेदी, बक्षीस अगर पट्यानें घेऊ नये घेतल्यास त्याचा जबाबदार मी व माझी इस्टेट नाहीं. तर त्याची जबाबदारी ज्याची त्याजवरच राहील. तिला आज पर्यंत कोणाचें कर्ज नाहीं. व या पुढें तिला कोणी कर्जही देऊं नये. दिल्यास त्यांत लबाडी आहे असें समजून तें पोकळ आहे असें समजलें जाईल. ह्मणून कोणी माझी इस्टेट स्थावर अगर जंगम भागाई आमची भावजई इजजवळून गहाण खरेदी बक्षीस अगर पट्यानें घेऊन फसूं नये व जबाबदारी आपल्यावर घेऊ नये ह्मणून सर्वत्रास हा जाहीरातीनें मुदाम कळवत आहे. तर सावध असावे कळावे.

ता. २७- ५- ०८

सही

नारायण वल्द गंभीरजी बढे कुणबी राहणार कमळखेड ता. जळ-

नं. ग. २० गांव नि. खुद

## जाहिर नोटीस

रा. रा. भाई जुहारमल हीरालाल दुकान परभणी यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी स्वतः आश्विनमासी परभणीस येऊन इसारी माल, जवारी, कापुस, करडी, सरकी, रुई, वर्से, जवस, तुमचे आडतींत खरेदी केली व विकली त्याबद्दल पूर्वी तुह्मांस तारीख २९-१-०८ ई. रोजीं टपाल मार्गानें नोटीस दिली. त्यांत आमचा सर्व हिशेब व माल विकला घेतला त्याची नोंद पाठविण्याबद्दल लिहीलें होतें व रक्कमही पाठविण्यांबद्दल लिहीलें होतें व त्यामागाहुन चार पांच पत्रेंही टपाल मार्गानें आपणास पाठविलीं परंतु आजपावेतों आपणाकडून जबाब नाहीं. तर आतां सदहु या नोटिशीनें पुनः आपणास कळविण्यांत येतें कीं आपण आमचे हिशेब व त्याबद्दल रकम आपणाकडे आमची बरीच घेणें नीघत आहे. ती रकम ही नोटीस पावल्या दिवसापासून पंधरा दिवसांचे आंत पाठवावी किंवा समक्ष येऊन नक्की हिशेब करावा व रक्कम आमची हिशोबानें तुमचेकडे नीघेल ती द्यावी. तसें न केल्यास रीतीप्रमाणें तजवीज केली जाईल व खर्च आपणास द्यावे लागेल कळावें. ही नोटीस दिली तारीख २७ माहे मे सन १९०८ ई.

सही

बेगराज रामगोपाल मारवाडी दुकान पेठ देउळगांवराजा तालुके चिखली जिल्हा

नं. ग. २१ बुलडाणा

## नोटीस

नोटीस आनंदी मर्द एकनाथ कृष्णपक्षी रा. मौजे पंचाळ ता० वाशिम जि० आकोला इसः–

खालीं सही करणाराकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे पंचाळ येथील शेत सर्वे नंबर ३६ एकर ३१८२ अकार रु० ३३ चे शेतांत आमचा निम्मे हिस्सा असून तुमचा निम्मे हिस्सा असलेला विहिरी झाडें वगैरे मुध्यां तुह्मी आह्मास रुपये २६० अडीचशे रुपयास खरेदी देऊन यापैकी रुपये २६ इसारादाखल आमचे पासून तुह्मी घेऊन कबजा आह्मास दिला आहे बाकीची रकम तुह्मी आह्मांस खरेदीखत लिहून देतेवेळीं देण्याचे ठरले आहे. या कराराप्रमाणें आह्मी तुह्मांस खरेदीखत लिहून मागीतलें असतां देतो देतो ह्मणून आतां लोकांचे फंदफितुरानें तुह्मी आह्मांस लिहून देत नाहीं. या करितां नोटीस देण्यांत येते कीं, नोटिसी पासून एक महिन्याचे आंत सदरील मिळकतीचें खरेदीखत आह्मास लिहून देऊन नोंदून द्यावें व खरेदीची बाकीची रकम रुपये २२६ ही रा० श्रीकृष्ण परशराम उर्फ आबासाहेब बाबने वाशिमकर यांज पासून द्यावी या प्रमाणें तुमचें कडून न घडल्यास रीतीप्रमाणें व्यवस्था करण्यांत येईल व खर्चाबद्दल तुह्मांस जबाबदार धरलें जाईल. कळावें ता. २७-६-०८ इ.

सही

देवराव बव्याबा बाबने वाशिमकर राहणार पुसद द. खु.

नं. ग. २२

## नोटीस

आपाजी उर्फ विठल व्यंकटेश कुळकर्णी आकोटकर हल्लीं राहणार आकोला अगर क्षिसांग तालुके आकोला

यांसः—

खालीं सही करणारीण इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी तारीख २७-४-०८ ईसवी रोजीं बायजी मर्द सखाराम माळी गोडले राहणार लोहारी इजपासून २६०० दोन हजार पांचशे रुपयांचें तारण गहाण खत लिहून घेऊन नोंदुन घेतलें तें पोकळ आहे. बायजी इचा माझे नवऱ्यानीं तिचा विवहा तोडल्याबद्दलची फारकत लिहून दिल्यास वीस वर्षे होत आलीं. त्यामुळें तिच्या नवऱ्याचे मिळकतीवर मुळींच हक्क राहिला नाहीं. फारकत लिहून तिचे स्वाधीन केल्याबद्दल आकोट तहशिलींत मुलकी कोर्टापुढें माझा नेटदीर भगवान माळी गोडले याचा व माझेजी वल्द गणु यांचे जबाब झाल्यावरून फारकत दिली हें उघड सिद्ध आहे. सखाराम हा मैत झाल्यावर वारसाची चौकशी झाल्या बर प्रथम शेताचें खातें माझें नांवें करण्याचा ठराव होऊन परत चौकशींत व बायजीचें नांवें खातें करण्याचा त्याच कोर्टानें ठराव केला. त्यावरून तुह्मी बायजीस अनुकुळ होऊन तिजपासून एक द्वितीआंश हिस्याची मिळकत घर व शेती आपण ग्रहण करावी हा काय तो मुख्य तुमचा हेतु व तो सिद्धिस जावा करितां पोकळ गहाण लिहून घेतलें हें सप्रमाणीत आहे बायजी ही वीस वर्षांपासून मैत सखाराम याजपाशीं नसून गहाण लिहून दिलेले मिळकतीवर मुळींच तिचा कबजा नाहीं. त्यामुळें गहाण लिहुन देण्याचाच अधीकार तीला पोहचत नाहीं कळावें तारिख २२-५-१९०८ इ. दस्तुर हनमंत रामराव संपत देशमुख आकोट

सही

रुखमी मर्द सखाराम माळी गोडले राहणार आकोट नि. खुद हातची बांगडी

नं. ख. २३

## नोटीस

नोटीस बेशमी— शेखकरीम वल्द शेख गुलाब मुसलमान रहाणार कवठ खुर्द प्र० व तालुके अकोट यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मी माझे शेत मंचनपूर येथील सर्वे नंबर ८ यांतील निमे हिशाची जमीन तुह्मांस बटाईनें दिली आहे. व ता० २१।४।०८ इ० रोजीं बटाईखतही झालें आहे. त्याची किस्तकारी अद्याप पावेतों केली नाहीं व तुमचे मनांत शेत वाहूं नये असें दिसतें. कारण हल्लींचा आंब्याचा बार तुह्मी नेला असून निमे आंबे आह्मांस आमचे हिशाचे मिळाले नाहींत. व हल्लींचे शेतीपेरणी चें दिवस आले आहेत. करितां नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं ही नोटीस पावल्यापासून चार दिवसांचे आंत शेताची किस्तकारी करावी नाहींपेक्षां मी शेत वाहत नाहीं असा खुलासा द्यावा. ह्मणजे बटाई खत तुमचें रद्द आहे असें समजून मी शेताची लागवण दुसरे इसमास करीन मग पुढें तुमची कोणत्याच प्रकारें नुकसानीची तक्रार ऐकली जाणार नाहीं. माझी रीतीप्रमाणें होणारी नुकसानी तुमचे पासून कोर्टे मार्फत भरून घेईन. लोकांचे सांगोसांगी ऐकून मला नोटीस देणें भाग पाडले सबब नोटीशीस लागणारा खर्च देऊन आमची पावती घ्यावी. कळावें. ता० २४।५।०८ इ०

सही

सज्यान मर्द सूर्यभान काळे राहणार सावर नि० खुद

नं. ग. २४ हातची बांगडी असे.

## नोटीस

बेशमी— (१) सुंदरलाल भवानीराम भाला (२) हेमराज इश्वरदास (३) रामप्रताप रामचंद्र खडेरवाल (४) मोतीलाल आगरवाला मुसारी (५) गणेशदास भय्या सर्व जण राहणार आकोला ताजनापेठ यास.

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुह्मास १८ माहे जुलै स. १९०४ रोजीं मी माझी इस्टेट सर्व श्रीसंस्थान बालाजी यास देऊन त्यावर तुह्मास पंच नेमले व तुह्मी असा करार केला कीं आह्मी सर्व देवळाची देखरेख करूं, पुढील इमारत बांधूं व तुह्मास खण्यापिण्यास व कपडालत्ता देऊं. या रीतिची सर्व व्यवस्था तुह्मी ३–४ महिने केली व पुढें तुह्मी तेथें येईनासे झाला. ह्मणून या नोटिशीनें तुह्मांस असें कळकळवितों कीं ज्या अर्थी कराराप्रमाणें तुह्मी वागला नाहीं, त्या अर्थी मी या पुढें तुह्मास पंच ह्मणून समजत नाहीं व तुह्मास दिलेलें मृत्युपत्र रद्द असें. तुमचा आता या संस्थानशीं कांहींच कोणत्याही प्रकारचा संबध राहिला नाहीं. आज तारखेपासून तुह्मी या संस्थानचे पंच नाहीं. तुह्मास रद्द केले आहे.

सही
रघुनाथदास गरू गीरधारीदासजी
नं. ग. २९ दस्तुर खू.द आकोला

---

## जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यात येतें की आमचा चुलता नामे ठालू वल्लद हरी हा मयत झाला आहे त्याजला अवल हक्कदार वारस मी आहे. मयताची सर्व स्थावर जंगम इस्टेट माझ्या ताब्यांत आहे. तरी मयताचे नावानें पूर्वी असलेल्या जनिगीसंबंधानें कोणास कांहीं लागवण वगैरे घेणें असल्यास त्यानें आमचेपासून ती करून घ्यावी. मयताची स्त्री अहेली मर्द ठालू इजपासून मयताची इस्टेट तिला या अंकाच्या नोटीशींत दिल्या प्रमाणें कोणी तिजपासून गहाण बक्षीस खरेदी अगर पट्यानें वगैरे कोणी घेऊं नये व तिजला कर्जही देऊं नये. जर कोणी तिच्याशीं देवघेव केल्यास त्याबद्दल मयताची इस्टेट हल्लीं माझे नावानें असलेली मी किंवा जबाबदार होणार नाहीं व त्याजबद्दलची सर्व प्रकारची जोखीम ज्याची त्याजवर राहील. कळावें ता० ४-६-०८ इ.

सही
सोनाजी वल्लद बुधाजी धनगर
रा० पुनोती जहागीर नि०
खुद्द हातची असे.
नं. ग. २९

---

# वर्तमानसार

विश्वसनीय माहितीवरून असें समजतें कीं, नवा प्रेस ॲक्ट करण्यासंबंधानें सध्यां कांहीं एक वाटाघाट चालू नाहीं. गेल्या उन्हाळ्यांत नव्या प्रेस ॲक्टाविषयींच्या प्रश्नाचा पुष्कळ खल होऊन एक खलिता स्टेट सेक्रेटरीकडे पाठविण्यांत आला. परंतु त्याचें काय झालें तें अद्याप समजत नाहीं.

मोतीलाल नांवाचा एक इसम आपल्या बिऱ्हाडी गाढ निजला असतां, त्यास गेल्या २६ तारखेस पोलिसनीं पकडलें. हा मनुष्य पूर्वी अग्रीकल्चरकॉलेजमध्यें विद्यार्थी होता. परदेशांतून प्रवास आटोपून तो एका आठवड्यापूर्वींच आग्रा येथें येऊन दाखल झाला होता. कलकत्ता येथील बॉम्बच्या कटाशीं यांचा संबंध असल्याच्या वहिमावरून पोलिसनीं त्यास पकडलें.

कलकत्ता येथील रिपन स्ट्रीटमध्यें राहणाऱ्या मि. फ्रेडली नांवाच्या एका युरोपियन गृहस्थाच्या बंगाली नोकरानें साहेबबहादूरांचीच तरवार घेऊन भररस्त्यांत पट्टा खेळण्याचा उपक्रम सुरू केला व त्याच्या टप्प्यांत आलेल्या सात इसमास त्यानें जखमीही केलें; त्यामुळें तेथील लोकांची फारच त्रेधा उडून गेली. अखेरीस एका युरोपियन गृहस्थाच्या मदतीनें एका पोलिसच्या शिपायानें त्यास पकडलें व त्याच्या जवळील तरवार हिसकून घेण्यांत आली. सदर मनुष्यास परीक्षेसाठीं डॉक्टरकडे पाठविण्यांत आलें आहे.

कोरिया देशाचा वयोवृद्ध बादशहा गेल्या वर्षी पदभ्रष्ट होऊन, कोरिया देशाचा राज्यकारभार जपानी लोकांच्या तंत्रानें चालूं लागला तरी जपानी लोकाविषयीं कोरियनांच्या अतःकरणांत धुमसत असलेला वैराग्नि अजून शांत झाला नाहीं. गेल्या मे महिन्यांत जपानी व कोरियन यांच्यामध्यें ९३ झटापटी झाल्या आणि त्यांत ५०० कोरियन व ३० जपानी मारले गेले. जपानी राजपुत्रानें कोरियास भेट दिली व कोरियन युवराजही शिक्षणाकरितां टोकिओ येथें जाऊन राहिला आहे.

माणिकतोला गार्डनमधील बॉंब तयार करण्याच्या कारखान्यांत सामील असल्याच्या आरोपावरून पकडण्यांत आलेल्या आरोपीपैकीं शचींद्रनाथ चतर्जी, इंदुभुषण बोस व फणी उर्यमली या त्रिवर्गास ता. १ रोजीं पोलिस कामिशनरपुढें उभें करण्यांत आलें होतें. या तिघांसही माणिक तोळा गार्डनमध्यें पकडण्यांत आले होतें; परंतु त्यांच्या विरुद्ध विशेष पुरावा नसल्यामुळें त्या प्रत्यकापासून जातमुचलका घेऊन त्याची मुक्तता करण्यांत आली.

इंग्लंडांतील ज्वालाग्राही पदार्थीसंबंधाचा कायदा आर्डिनन्सच्या स्वरूपांत अंमलांत न आणतां त्या कायद्याच्या धोरणावर एक स्वतंत्र कायदा करण्याचा सरकारचा विचार आहे. ज्वालाग्राही पदार्थाचा गैर उपयोग होऊं गये ह्मणून कांहीं निर्बंध करणें जरूर आहे ऐवढी गोष्ट स्टेटसेक्रेटरींनीं कबूल केली आहे. परंतु या कायद्याला कशा प्रकारचें स्वरूप द्यावयाचें हें अद्याप निश्चित ठरलेलें नाहीं.

खुलना स्टेशनचवळ आगगाडी उलथून पाडण्याचा धाडसी प्रयत्न झाल्याचें आढळतें अजून रेल्वे पोलिस त्या संबंधाचा तपास करीत आहे. ता. २३ रोजीं पर्मनंट वे इन्स्पेक्टर रस्त्यांची तपासणी करीत असतां त्यांस रेल्वेच्या रूळावर गाडी उलथून पडेल अशा रीतीनें एक मोठी लोखंडी कांब ठेवलेली आढळली. हा प्रयत्न ज्या ठिकाणीं झाला ती जागा रेल्वे स्टेशनपासून मैलांवर आहे. या संबंधाचा तात्डतोब वर्दी पोलिसला देण्यांत आली.

ता. ३ रोजीं शहराच्या अत्यंत गजबजलेल्या भागांत भर दिवसां एक अतिशय भयंकर असा खून झाला. बारा माणसें एका भुसारमालाच्या दुकानांत शिरलीं व त्यांनीं तेथील किशोरीलाल नांवाच्या मनुष्यास सुऱ्यांनीं भोसकून व लाठ्यांनीं मरून ठार केलें. शेजारच्या लोकांची किशोरीलालच्या मदतीस जाण्याची छाती झाली नाहीं. पोलीस गुन्हेगारांचा तपास करीत आहे.

सोमवारीं एक्सक्लोजिव्ह बिल किंवा जो दुसरा कोणताही कायदा होईल त्या संबंधानें बंगाली लोक व पुढारी उदासीन आहेत. राणीचा जाहीरनामा हा आमचा मॅग्ना चार्टा उर्फ स्वातंत्र्याची सनद आहे व ह्या जाहीर नाम्याप्रमाणें सरकारास वागावयाचें असल्यास मग दडपशाहीच्या उपायांची जरूर नाहीं, असें ‘बंगाली’ पत्र ह्मणतें.

“युगांतर” पत्र नेहमीं शनिवारीं निघतें. ह्या पत्राच्या हजारों प्रती निघूं नयेत ह्मणून पोलिसांनीं गेल्या आठवड्यांत प्रयत्न केला होता. अकस्मात वीज जशी येऊन आदळते त्याप्रमाणें “युगांतर” पत्र एकाएकीं आज प्रसिद्ध झालें व पोलिसांना तोंडघशीं पडल्यासारखें झालें! रक्त, मेघगर्जना, भडिमार, लढाई वगैरे शद्ब वापरून मार्जा. तोंडीं राक्षसांचा कालिमातेपुढें बळी दिला पाहिजे, ह्याप्रमाणें “युगांतर” फुत्कार टाकीत आहे. आजच्या दिवसांत पोलिस पुनः “युगांतर” आफिसचा झाडा घेतील, असें वाटतें.

‘हिंद स्वराज्य’ पत्राच्या संपादकावरील खटला गेल्या शनिवारीं एम्प्लनेड पोलिस कोर्टांत चीफ प्रेसिडन्सी म्याजिस्त्रेट मि. आस्टन यांजपुढें चालला. या खटल्याचें काम पुरें झाल्यानंतर कोर्टांत जमलेल्या लोकांनी कोर्टांत व कोर्टाच्या बाहेर वंदेमातरंचा घोष करून गडबड केली. तेव्हां गडबड करणाऱ्या लोकांस पकडल्याबद्दल चीफ प्रेसिडन्सी म्याजिस्ट्रेट साहेबांनीं हुकूम केल्यावरून आठ आसामीस पकडण्यांत आले होते.

पुणें बुधवार चौक, दारूवाल्याचा पूल व शनिवार पेठेंतील दारूचा गुता ह्या ठिकाणीं बुधवारीं रात्रीं ज्वालाग्राही पदार्थांचे तीन स्फोट झाले. कोणास दुखापत झाली नाहीं. बुधवार पेठेंत टांग्याच्या चाकाचा स्पर्श झाल्यामुळें ज्वालाग्राही पदार्थांचा भडका होऊन मोठा आवाज झाला. दारूवाल्याच्या पुलावर एका खटार गाडीच्या चाकाच्या धक्क्यामुळें व शनिवार पेठेंतल्या दारूच्या गुत्याजवळ एका इसमाचा पाय लागल्यामुळें ज्वालाग्राही पदार्थ उडाले कोणास कांहीं इजा झाली नाहीं. पोलिसचा तपास सुरू आहे.

कलकत्त्याच्या अनार्किस्टांशीं दळणवळण असल्याच्या संशयावरून तिनिवेल्लीच्या ज्या तरुण ब्राह्मणास पोलिसनें पकडलें. त्याला क्रिमिनल इन्व्हेस्टिगेशन खात्यानें कलकत्त्यास पाठविलें आहे. या ब्राह्मणाविरुद्ध काय पुरावा आहे, तें अद्याप बाहेर आलें नाहीं.

गेल्या सोमवारीं दुपारीं सुरतेहून मुंबईस यावयास निघालेल्या फास्ट पॅसेंजर गाडींतील एका हिंदु उतारुचें पागोटें डहाणू स्टेशनापासून एक मैलाच्या अंतरावर गाडींतून खालीं पडलें. त्यासरशी त्यानें चालत्या गाडींतून खालीं उडी मारण्याचा प्रयत्न केला. या कंपार्टमेंटमधील दोघां तिघा उतारूंनीं त्याला आवरून धरण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांना हिसका मारून अखेरीस त्यानें गाडींतून उडी टाकली, डाहाणू स्टेशनावर गाडी येतांच ही हकीकत रेल्वेगार्डास कळविण्यांत आली. तेव्हां तेथून लाइट पाठवून त्या मनुष्यास आणण्यांत आलें. त्याच्या तोंडास व शरीराच्या इतर भागास बरीच दुखापत झाली आहे. त्याच स्थितींत ब्रेकमध्यें घालून त्यास मुंबईस नेण्यात आलें.

इंग्लिशमन पत्राच्या संपादकाला नुकतेंच एक पत्र पाठविण्यांत आलें होतें त्याचा आशय असा होता कीं तुह्मां इंग्लीश लोकांचें दिवस आतां संपत आले आहेत बरेंद्र सांपडल्याबरोबर राजद्रोहात्मक गुप्त चळवळीचा नायनाट झाला. असें तुह्मांला वाटत असेल तर ती तुमची चूक आहे. मी माझ्या खात्रीलायक बातमी वरून असें सांगतों कीं आमच्या बंडाच्या प्रयत्नाचा शतांशही छडा अजूनपर्यंत तुह्मांला लागला नाहीं. यापुढें हिंदुस्थानांतील प्रत्येक इंग्लिश मनुष्य, बायको, पोर या सर्वांची कत्तल करण्यांत येणार आहे. आमच्या देशांत शिरून तुह्मी आमचा नाहक छळ करीत आहां, आणि अशा स्थीतींत त्याचा सूड उगविला तर त्यांत अन्याय कोठून होणार? एकदोन व्यक्तीचा खून पाडल्यानें राष्ट्राला स्वतंत्रता मिळते असें आमचें मत नाहीं. पण जोपर्यंत उघड तुमच्याविरुद्ध बंड करण्याची आमचा तयारी झाली नाहीं. तोपर्यंत आह्मी असाच क्रम पुढें चालूं ठेवणार! असले व्यक्तीचे खून एका विवक्षित दृष्टीनें दोषार्ह असले तरी त्या योगानें राष्ट्राच्या बंडाच्या तयारीबद्दल एकंदर जनसमूहामध्यें विश्वास पटूं लागतो. हिंदुस्थानच्या नापीक जमिनींत तुमच्या रक्ताचा पाऊस पडल्यावांचून, त्या ठिकाणीं स्वतंत्रतेचें बीज खास रुजणार नाहीं. अशा तऱ्हेनें राष्ट्रीय कार्य करण्याची आमची दिशा ठरलेली आहे. त्याला घातुक असे जर लेख आपण आपल्या पत्रांत प्रसिद्ध कराल तर, आपल्याला थोडक्याच दिवसांत हें जग सोडून जाणें भाग पडेल.

# वऱ्हाडसमाचार

जेष्ट शुद्ध ९ शके १८३०


## मराठी भाषेचा उत्सव

मराठी साहित्याचा चवथा महोत्सव गेल्या आठवड्यांत मराठी भाषेचें आगर जें पुणें शहर, तेथें मोठ्या आनंददायक रीतीनें पार पडला हें पाहून मराठी भाषेच्या प्रत्येक भक्तास आल्हाद वाटल्यावांचून राहाणार नाहीं. साहित्याची अभिवृद्धि करण्याचे जे ग्रंथरचना, ग्रंथपरीक्षण इत्यादि सर्वमान्य मार्ग आहेत त्यांतीलच ग्रंथकारांची व साहित्यप्रेमी गृहस्थांची परस्पर ओळखभेट व मोकळ्या मनानें साहित्यसंबंधी विषयांची चर्चा हाही एक प्रकार आहे, हेंही आतां पूर्णपणें स्थापित झालें आहे. चार वर्षांपूर्वी मराठी लेखकांच्या संमेलनाचें प्रथम अधिवेशन झालें तेव्हां कांहीं सूज्ञ लोकमुद्रां संमेलनाला नाकें मुरडण्यास तयार झाले होते. काव्यशास्त्रविनोदेन किंचित् कालक्षेप करण्यापलीकडे यांत कांहीं तात्पर्य नाहीं अशी टिका करणाऱ्यांना संमेलनाचें महत्व चांगलें कळून आलें आहे हें त्यांनीं आतां प्रत्यक्ष कृतीनें जाहिर केलें आहे. या संमेलनापासून विनाकारण जास्त कार्याची सध्यांच अपेक्षा करूं नका अशी प्रास्ताविक भाषणांत रा. आपटे यांनीं विनंति केली ती या वरील प्रकारच्या विचारांनींच प्रेरित झालेली होती असें दिसून येतें. विचार, विनिमय व संघटन या दोन कार्यांची किंमत खात्रीनें कमी नाहीं. या पायारूप कामाची उत्क्रांति होत होत सुंदर महाप्रसाद तयार करून दाखविण्याची साहित्य परिषदेच्या चालकांस उमेद आहे आणि बोलावें थोडें आणि करावें जास्त हा नियम त्यांनीं आपल्या कार्यक्रमांत ग्राह्य धरला असल्यामुळें त्यांचा मनोरथ खास सिद्धीस जाईल असें आह्मांस वाटतें. यंदाच्या संमेलनाला अध्यक्षांची जोडही उत्तम रीतींची लाभली होती. पूर्वपरंपरेला भूषविणारी ही निवड या पुढच्या प्रसंगीं ही परंपरा अशीच उच्च ठेवण्यास साधक होईल. रा. ब. वैद्य यांचा मराठी भाषेवरील व्यासंग सुप्रसिद्धच होता. त्यांतही त्यांनीं अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणानें फार चांगली भर पडली आहे. मराठी भाषेचा उगम, तिचें मूळस्वरूप तिची व्याप्ति व तिच्या निरानराळ्या काळच्या स्थिति या विषयींचे रा. ब. वैद्य यांनी केलेलें विवेचन त्यांची विद्वता व शोधकबुद्धि यांची चांगलीच साक्ष देत आहे. महाभारताची जी प्रत अशोक राजाच्या किंचित् पूर्वी तयार झाली तींत दिलेल्या हिंदुस्थानांतील लोकांच्या यादींत महाराष्ट्रीयांचा प्रथम उगम सांपडतो. तेथें सांगितलेले पांडुराष्ट्र, गोपराष्ट्र व मल्लराष्ट्र हेच लोक मराठे होत. प्रतिष्ठान किंवा पैठण ही महाराष्ट्राची जुनी राजधानी प्रसिद्धच आहे. हें पैठण शहर महाराष्ट्राचा मध्यबिंदु असल्यामुळें तेथें त्रिज्या घेतली ह्मणजे तेथून पुर्वेस असलेल्या नागपुरापासून सुरतेपर्यंत व पुनः नागपुरापासून नैरुत्येस गोव्यापर्यंत अशी महाराष्ट्राची व्याप्ति आतां आहे तशीच ती पूर्व कालींही होती. महाराष्ट्रीयांची भाषानिपुणत्वाबद्दल ख्याति आहे. अशा या अत्यंत विस्तृत व श्रेष्ठ पूर्वपरंपरेच्या भाषेचे आजचे आपण दास आहों, असें अध्यक्षांनीं साधारसिद्ध करून दाखविलें. इ. स. ६० या वर्षी हाल राजानें महाराष्ट्र भाषेंत सप्तशती हा ग्रंथ लिहिला. या वरून मराठी भषेचें प्राचीनत्वाहि सिद्ध होतें. सध्यांची मराठी भाषा ही पूर्वी महाष्ट्रांत चालू असलेल्या महाराष्ट्री भाषेवरून महराष्ट्रीप्राकृत या भाषेप्रमाणें अपभ्रंशानें झालेली आहे असें इकडील प्राकृत वैय्याकरणांचें मत आहे. पाश्चात्य पंडितांनीं तिचें जनकत्व शौरसेनी भाषेकडे देण्याचा निष्फळ प्रयत्न केलेला आहे. मराठी भाषेचें सध्यांचें स्वरूप तिला इ. स. च्या पांचव्या शेतकांत येण्यास आरंभ झाला व नवव्या शतकांत मराठी वाङमयास आरंभ झाला. ज्ञानेश्वराचे ग्रंथ मुक्तेश्वराचे ग्रंथ, नामदेवाचे ग्रंथ हे मराठी वाङमयाचे पायाभूत आहेत. एकुणविसाव्या शेतकापर्यंत मराठी वाङमयाची अधिष्टात्री देवता भगवदभक्ति असून त्या नंतरच्या वाङमयाची देवता स्वदेशभक्ति आहे असें ह्मणून अध्यक्षांनीं आधुनिक मराठी वाङमयावर शिक्का मारला. हा भेद सर्वांना पटण्यासारखा नाहीं, अपवादरूपाचीं कांहीं खुसपटें काढतां येण्यासारखीं नाहींत असें नाहीं तथापि या बाबतींत वस्तुस्थितिपेक्षां अध्यक्षांच्या उत्कट ईच्छेला जास्त मान देणें योग्य होईल. गेल्या वर्षांत मराठी भाषेंत झालेल्या पुस्तकांचें पर्यालोचन अध्यक्षांकडून करविण्याची योजना प्रशंसनीय आहे. साहित्य परिषदेकरवी होणारें परीक्षणाचें काम अध्यक्षांचे मुखानेंच होणें जास्त श्रेयस्कर आहे, हें खरें. पण यंदाच्या रीतींत सुधारणा हाणें आवश्यक आहे. यंदाच्या अध्यक्षांनीं केलेलें ग्रंथपरीक्षण ज्यांनीं ऐकलें असेल त्यांना त्यांत पक्षपातीपणाचा भास होण्याचा संभव निःसंशय आहे. दासगणूकृत भक्तलीलामृत व कीचकवध या ग्रथांचें जसें विस्तृत परीक्षण झालें तसें होण्याची नानांचा अधिकारयोग, जिजाबादादांचें चरित्र व अशाच बाकींच्या ग्रथांची योग्यता नव्हती असा अध्यक्षांचा समज संमेलनास हजर असलेल्याच्या ध्यांनांत येणें साहाजिक आहे. करितां परीक्षण पद्धतींत यंदांच्या अनुभवानें कळून आलेल्या व निरूपायानें घडलेल्या चुका पुढील वर्षी दुरस्त होतील अशी आशा आहे. यंदा वाचण्यांत आलेल्या निबंधांत अग्रमान रा. लक्ष्मणशास्त्री लेले यांच्या मराठी क्रमिक पुस्तकांवरील विवेचनांस दिला होता. तें अगदीं योग्य झालें असें ह्मटलें पाहीजे क्रमिक पुस्तकांच्या तयारीचे पूर्वी, तयारी होत असतांना व तदनंतर तत्संबंधीं ज्या कित्येक हकीगती बाहेर आल्या त्या मुळें लोकांचें थोडेसे लक्ष तिकडें वेधलें. एका टीकाकारानें पुस्तकांवर प्रत्यक्ष टीका केली या पलीकडे या नवीन मालेवर लोकमत काय आहे तें प्रसिद्ध झालें नव्हतें. तें संकलित रीतीनें व अत्यंत प्रशंसनीय अशा निःपक्षपाती दृष्टीनें रा. लेले यांनीं केलें. त्यांच्या विवेचनावरून असें दिसून येतें कीं या मालेच्या रचनेंत विषयांची विविधता, स्वदेश, स्वसमाज स्वजनांचा इतिहास यांची ओळख इत्यादि अनुकूल बाबतींचा जसा समावेश केला आहे तसाच शालजोडीला घोंगडीचें ठिगळ लावण्यासारख्या प्रसंगांची रेलचेल केली आहे. शुद्धलेखनासंबंधांनें सानेहतवळेजोशी या त्रयीनें उपस्थित केलेला अशास्त्र मार्ग या मालेंत स्पष्टपणें स्विकारलेला नाहीं. तथापि व्याकरणाच्या व व्युत्पतीच्या कसोटीला हीं पुस्तकें ऊतरण्याचीं वानवाच आहे. या विषयावर झालेला वादाविवाद रा. लेले यांच्या मतांना पोषक असाच होता. त्या नंतर मिरजेचे रा. गोगटे यांनीं मोडी लिपी संबंधानें वाचलेला निबंधही त्यांची शोधकबुद्धी उत्तम प्रकारें दर्शविणारा होता मोडी ही लिपी कोणाच्या ह्मणण्या प्रमाणें मौर्य लिपीपासून निघालेली नसून ती जशीच्या तशीच हेमाडपंतानें लंकेहून आणली नाहीं. तिकडील कल्पनेवरून इकडे तयार करण्यांत आली असावी हें रा. गोगटे यांचें ह्मणणें संयुक्तिक दिसतें. ही लिपी सध्यांहि बालबोधीपेक्षां जास्त प्रमाणानें प्रचारांत असल्यामुळें शुद्धशुद्धतेकरतां तिच्यांत आवश्य ते फेरफार करावे हें रा. गोगटे यांनीं सांगीतलें. रा. आत्रे यांच्या सूचनेशी या सूचनेचें तादात्म्य असून ही सूचना सर्वांना मान्य होण्यासारखी आहे. महाराष्ट्र भाषेंत जर कोणत्या विषयाची विशेष हेळसांड झाली असेल तर ती शास्त्रीय विषयांची होय. त्याची ओळख देऊन यापुढें हा दोष धुवून काढण्याविषयीं रा. सहस्त्रबुद्धे यांनीं आपल्या निबंधाचे द्वारें विनंती केली पण तिचा परिणाम कल्पनेच्या बाहेर झाला. शास्त्रीय विषयाची गोडी असलेले व त्यांत युनिव्हर्सिटीची पदवी ग्रहण केलेले रा. भावे यांना रा. सहस्त्रबुद्धे यांची विनंती अनाठायीं वाटली. शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार व्हावा एवढीच इच्छा मुळच्या विनंतींत होती. पण पैशाच्या लोभाखेरीज लोक शास्त्रीय ज्ञानाकडे वळावयाचे नाहींत. मुलतत्वाचें ज्ञान त्यांना नको आहे. एखाद्या व्यापारोपयोगी जिन्नसाची कृती समजून घेण्याकडे त्यांचें जास्त लक्ष लागेल अशा प्रकारचें शास्त्रीयज्ञानलवदुर्विदग्ध पुरुषाप्रमाणें रा. भावे यांनीं प्रतीपादन केलें पण त्यांना उत्तर देण्यास रा. सहस्त्रबुद्धे यांना मोकळीक नव्हती. तथापी रा. ब. जोशी यांनीं आपल्या समारोपाच्या भाषणांत त्यांना खासें ऊतर दिलें. मुलतत्वाचें ज्ञान करून घावयाचें सोडून परकीयांच्या जून्यापान्या व खोट्यानाट्या वर्कशॉपरिसीप्सवर भिस्त ठेवावी असे रा. भावे यांच्यासारखे शास्त्रज्ञ ह्मणविणारे हिंदुस्थानांत जों पर्यंत आहेत तों पर्यंत हिंदुस्थानच्या औद्योगिक उत्कर्षाची आशा करावयास नको. यानंतर रा. राजवाडे यांनीं दोन तिन निबंध वाचून दाखविले त्यात पुर्वेतिहासाचें ज्ञान झाल्याखेरीज सध्यांच्या काळीं किंवा पुढें होईल तें सांगता येत नाहीं. तेव्हां पूर्वीच्या इतिहासाचें संशोधन केल्यावर जें कांहीं नीत प्रसिद्ध करावयाचें त्याला सहाय्य करण्याविषयीं रा. राजवाडे यांनीं एका निबधांत विनंती केली. तिच्या समर्थनार्थ रा. मोडक यांनीं केलेलें भाषण खरोखरच हृदयद्रावक होतें. सोलापूरच्या एका उदार गृहस्थानीं गेल्या शतकाचा इतिहास लिहिण्याकारितां एक हजार रुपयाचें बक्षिस लावलें असल्याबद्दल यावेळीं जाहिर करण्यांत आलें. तिला प्रत्युत्तर ह्मणून रा. राजवाडे यांनीं केलेलें भाषण एका तत्वाच्या आधारावर यथार्थ असलें तरी शिष्टसांप्रदायास अनुसरून होतें असें ह्मणवत नाहीं. संमेलनांत शेवटचा निबंध रा. पांगारकर यांचेकडून वाचला जावयाचा होता. ज्ञानेश्वरीच्या जीर्णोद्धारासंबंधानें कांहीं तरी अपूर्व असें ऐकावयास मिळेल अशी लोकांची फार अपेक्षा होती. पण सफळ करण्याचें श्रेय रा. पांगारकर यांना घेववलें नाहीं. ग्रंथसंख्या किंवा तपसीलच एखादी किरकोळ बाब घेण्यांत महत्व नाहीं, अशा ग्रंथांच्या अंतरंगासंबंधानें उहापोह व्हावयास पाहिजे असतो हें खुद त्यांस मान्य असूनहि त्यांनीं महाराष्ट्र भाषेच्या या महत्वाच्या समारंभांत विनाकारण त्यांनीं कालक्षेप केला असें ह्मणणें भाग पडतें. त्यांतहि स्वतः कांहीं श्रवणीय असें न सांगतां रा. राजवाडे इत्यादिकांवर त्यांच्या प्रामाणिक मतांबद्दल श्रद्धेला हरेस घालून जें वाकताडन केलें तेंहि अप्रासंगिक होतें. रा. पांगारकर यांनीं कसल्याच विषयाचें विवेचन केलेलें नसल्यामळें त्यांच्या भाषणानंतर त्यांच्या तोंडी कोणी लागले नाहीं, यावरून प्रेक्षकसमूहानें त्यांच्या भाषणाची योग्य संभवना केली असें कोणी ह्मणणार नाहीं. रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी हे या समारंभांत बोलणार आहेत असें अगाऊ प्रसिद्ध झालें असल्यामुळें त्यांचीं हितवचनें ऐकण्यास प्रेक्षकगण उत्सुक होऊन राहिला होता. रावबहादुरनीं आपल्या प्रेमळ व रसाळ वाणीनें सुमारे एक तासपर्यंत श्रोत्यांस तल्लीन करून सोडलें यांत शंका नाहीं. या पुढचें वाङमय देशभक्तीच्या अधिष्टानावर तयार हाणार आहे हें त्यांनीं मान्य केलें आणि तें कसें व्हावें यांची दिशा त्यांनीं विशदपणें दाखवून दिली. ज्या कामांत त्यांची दृष्टी रा. भावे यांच्या सारख्या तरुण पदवीधरांपेक्षां पुष्कळच जास्त विस्तृत होती. प्रत्येक शास्त्राचा, इतिहासाचा आणी बौद्धिक, नैतिक व धार्मिक प्रगतिपर अशा विषयांचा या नव्या राष्ट्रीय वाङमयांत समावेश होतो असें त्यांनीं श्रोत्यांच्या मनांत बिंबविलें. कित्येक विषय आजच्या घटकेस कोणास उपयुक्त वाटणार नाहींत, आणि रा. भावे यांच्या सारख्या शास्त्रपारांगतास आगपेट्यांच्या तयारीच्या माहिती खेरीज इतर सर्व शास्त्रीय विवेचन तुच्छच वाटेल हें साहजिक आहे, तथापि त्याचा उपयोग कांहीं कालानें कोणी तरी करून घेईल करितां सर्व विषयांवर ज्याची जिकडे बुद्धि चालेल त्या मार्गानें परिश्रम करून ग्रंथ निर्माण व्हावयास पाहिजे आहेत हें रा. ब. जोशी यांचें सांगणें होतें. रा. ब. जोशी यांच्या कडून समारोपादाखल सर्वांगसुंदर भाषण झा-

त्यामुळें अध्यक्षांचें काम बहुतेक उरकलेंच होतें. पुढील सालचें संमेलन भरविण्याचें काम मुंबईकरांनीं आपलेकडे घेतलें आहे. सोईच्या दृष्टीनें मुंबईपेक्षां पुणें अधिक योग्य हें कोणालाहि कबूल होईल. तथापि हौसेच्या आड येण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें पाहून पुण्याचें मंडळींनीं मुंबईकरांच्या विनंतीस मान दिला हें योग्यच झालें. साहित्य परिषदेच्या गतवर्षीच्या चिटणीसांनीं केलेलें काम संमेलनास पसंत झाल्याचें निदर्शकच ह्मणून कीं काय त्यांचीच पुन्हा यंदाही नेमणूक करण्यांत आली आहे. यंदा अर्धवट राहिलेलीं कामें, आणि तीं बरीच महत्वाचीं आहेत, तीं पुरीं करण्यास जुने माहितगार सेक्रेटरीच हवे होते. तेव्हां सेक्रेटरींच्या नेमणुकींत गुणज्ञता दर्शविल्याबद्दल यंदाच्या संमेलनाचे सभासद अभिनंदनास पात्र आहेत.

---

## ✓राजवैद्यांची चिकित्सा.

हिंदुस्थानच्या पैशावर येथेच्छ पुष्ट झालेले आणि हिंदुस्थानांत अनियंत्रित सत्ता गाजवून निजधामास गेलेले कित्येक अँग्लोइंडिन माजी अधिकारी आतां जागे झाले आहेत. त्यांनीं सद्यःस्थितीच्या प्रतिकारार्थ कोणते उपाय योजावेत अशाविषयीं बरीच चर्पटपंजरी चालविली आहे. येथें ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, ज्या स्थितीवर ते उपाय सुचवित आहेत ती त्यांच्याच करणीचीं फळें आहेत. ह्मणजे हिंदुस्थानांतील लोकमताच्या न्यायासनासमोर त्यांची गुन्हेगार ह्मणून चौकशी होत आहे. अर्थात् त्यांची या प्रकरणांतील जबानी निःपक्षपातीपणानें होणें शक्य नाहीं. बंगालचे माजी लें. गव्हर्नर हे अशा रीतीनें आपल्या मतांचें घोडें पुढें ढकलणाऱ्यांत प्रमुख आहेत. सर चार्लस यांनीं हिंदुस्थानांत असतांना कशी स्थिर वृत्ति ठेवली होती आणि आपल्या हातच्या सत्तेचा उपयोग कसा अनियंत्रित रीतीनें चालविला होता हें बंगाल प्रांतास पूर्णपणें आणि इतर प्रांतासही अंशतः माहित आहे. लोकमताची पायमल्ली करणाऱ्या ज्या कित्येक गोष्टी यांनीं केल्या त्यांतील स्थानिक स्वराज्याचें मुसकें आवळण्याविषयींचें बिल ही एक आहे. बंगालच्या सुदैवानें तेव्हांचे उदार व्हाइसरॉय लॉर्ड रिपन यांच्या शिफारसीवरून स्टेट सेक्रेटरी यांनीं सर चार्लस यांच्या बिलांतील मुख्य भाग नामंजूर केला. अशा कीर्तीचे हे गृहस्थ आतांच्या आणीबाणीच्या प्रसंगीं हिंदुस्थानसरकारास सल्ला देण्यास पुढें आलेले आहेत. त्यांना सध्यांच्या स्थितीची कांहीं माहिती नाहीं; त्यांच्या कारकीर्दींत अशा स्थितीचा विचार करण्याचा प्रसंग त्यांचेवर मुळींच कधीं आलेला नव्हता. सर चार्लस यांनीं हिंदुस्थानांतील अस्वस्थतेला आळा घालण्याला ह्मणून जीं हत्यारें पुढें केलीं आहेत तीं जुनीं, गंजलेली आहेत. बर्क साहेबांचे ह्मणण्याप्रमाणें जुलमी अधिकाऱ्यांच्या हातीं निरनिराळ्या काळीं तींच तीं आयुधें भिन्न भिन्न स्वरूपांत दिसत असतात. हिंदुस्थानांतील अनियंत्रित सत्ताधीशांस वर्तमानपत्रांच्या मुस्कुटदाबीच्या कायद्याइतकें दुसरें कोणतेंही शस्त्र पसंत वाटत नाहीं. तीस वर्षांपूर्वी सर चार्लस यांच्या सुपीक मेंदूंतून हेंच शस्त्र जन्मपावली होती आणि आज घटकेला तर हें त्यांना केवळ महामृत्युंजयच्या मात्रेप्रमाणें वाटत आहे. तीस वर्षांपूर्वी हा अनुभव घेऊन पहाण्यांत आली तेव्हां त्याची निरर्थकता कशी तावडतोब प्रत्ययास आली हें सुप्रसिद्धच आहे. त्यापि त्याच जुन्या शस्त्राला साफसूफ करून सर चार्लस व त्यांच्याच सारखा विचारांचे त्यांचे व्यवसायबंधु यांनीं पुढें केलें आहे. युरोपियनांवर नेटिव्ह लोकांकडून वारंवार होणाऱ्या हल्याविषयीं जास्त दक्षता ठेवली पाहिजे, या सुचनेवर सर चार्लस यांचा विशेष कटाक्ष दिसतो कारण युरोपियनांत मारहाण करणारे बहुतेक लोक सुटून जातात असें त्यांना वाटत आहे. चोरांच्या उलट्या ओरडीनें उदाहरण यापेक्षां दुसरें कोठें सांपडणार ? अलिकडच्या हकीगतीतर राहूंद्याच पण खुद्द सर चार्लस यांच्या बंगाल्यांतील कारकीर्दींत हिंदी लोकांना मारहाण करणाऱ्या युरोपियनांचीं किती थोडक्यांवर मुक्तता होत असे या विषयाची यादी बाबू राम गोपाळ सन्याल यांनीं त्याचवेळीं प्रसिद्ध केली होती ती सर चार्लस यांच्या स्मरणांतून गेलीशीं दिसते. गुन्हेगार पक्षापासून' विभक्त होण्याविषयीं सर चार्लस यांनीं राष्ट्रीय सभेच्या पुरस्कर्त्यांस गोफत सल्ला दिली आहे. या सूचनेंतील दुष्टपणा कोणाच्याही लक्षांत आल्यावांचून रहावयाचा नाहीं. सर चार्लस यांनीं आपल्या सर्व चर्पटपंजरींत एक गोष्ट मात्र खरी सांगितली आहे. बंगाली लोकांच्या पोंचटपणाविषयींची कल्पना बदलून टाकावयास पाहिजे ही ती गोष्ट होय. हें अनुभवाचें ज्ञान सर चार्लस यांच्यापेक्षां बंगाल्यांतील युरोपियनांना जास्त असेल.

---

## इंग्लिशमन व० डा० घोस

✓परमपूज्य दादाभाई नैरोजी यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेच्या प्रसंगीं प्रतिनिधींचें स्वागत करतांना डॉ. राश बिहारी घोस यांनीं केलेल्या सर्वांगसुंदर भाषणांतील एका भागावर इंग्लिशमन पत्राची वक्रदृष्टी अलिकडे वळली आहे. त्यावेळीं डॉ. घोस यांनीं, अधिकाऱ्यांस उद्देशून असे उद्गार काढले होते, 'तुमच्यापुढें पसंती करितां आतां दोन मार्ग आहेत. साम्राज्याचा अभिमान बाळगणारें असें हिंदी राष्ट्र पसंत करावयाचें किंवा आयर्लंड अथवा रशिया यांच्यासारखी स्थिति पतकरावयाची. मी उगाच धाक घालीत नाहीं, किंवा निरर्थक कांहीं बोलत नाहीं, कारण मला सध्यांच्या तरुण पिढींच्या मनोवृत्तींची कांहीं थोडीशी माहिती आहे." डॉ. घोस यांच्या भाषणांतील वर केलेल्या भागापैकीं शेवटच्या वाक्याचा अर्थ काय आहे तो स्पष्ट करण्याविषयीं इंग्लिशमनमध्यें एका लेखकानें त्यास आव्हान केलें आहे. या लेखकानें असें ध्वनित केलें आहे कीं बंगाली तरुण लोक गुप्त कट करून बाँब तयार करीत असल्याची माहिती डॉ. घोस यांस होती. गुन्ह्याची तयारी अशा रीतीनें चालूं असल्याचें माहित असतां त्याबद्दलची खबर डॉ. घोस यांच्या सारख्या हिंदुस्थानांतील प्रमुख कायदेपंडितानें दिली नाहीं ! अर्थात आपली जबाबदारी ओळखूनच ते वागले असले पाहिजेत !! पण त्यांनीं आतां आपल्या वर्तणुकीचा झाडा इंग्लिशमन पत्रास दिलाच पाहिजे !! बंगालच्या विभागणीमुळें बंगाली राष्ट्रांत जी अत्यंतिक खळबळ उत्पन्न झाली तिच्या तेजाकडे डोळे उघडे ठेवून पहाणारास बंगाल्याची समजूत लवकर घातली नाहीं तर हिंदुस्थानांत आयर्लंड दिसून येईल हें सांगावयास कोणा पंचाक्षऱ्याची जरूर आहे असें डा० घोस यांस वाटलें नाहीं. ही त्याची मोठी चूक झाली असें ह्मटलें पाहिजे! या अपराधाबद्दल इंग्लिशमन सारख्या बड्या न्यायाधीशासमोर त्यांना उभें राहिलें पाहिजे खरें. पण वर सांगितलेल्या भागाखेरीज आणखी एक भाग इंग्लिशमनचे लेखक विसरले आहेतसें दिसतें. सभा प्रतिबंधाच्या जुलमी कायद्याविरुद्ध सिमला येथें कायदे कौन्सिलांत भाषण करतांना डा० घोस यांनीं अशाच अर्थाचे उद्गार काढले होते. तेथें खुद्द व्हाइसराय साहेब, सेनापती, न्याय खात्याचे मेंबर अशीं बडीबडी धेंडें हजर असून त्यांना डा० घोस यांच्या उद्गारांत कांहीं अवास्तविक दिसून आलें नाहीं हें आश्चर्य ह्मणावयाचें! अथवा आश्चर्य कसचें! व्हाइसराय किंवा त्यांचे कौन्सिलर यांचेपेक्षां अँग्लोइंडियन फड्यां वर्तमानपत्र कर्त्यांची जास्त चतुरस्रता आणि सुतीक्ष्ण बुद्धि जगप्रसिद्धीच आहे!!

---

## जपानच्या यशांतील रहस्य.

रुसो जपानी युद्धानंतर 'सर्वे गुणाःकांचनं आश्रयंते' हें वचन बदलून 'सर्वे गुणःसाहसा आश्रयंते' असें करावें लागलें आहे. जपानी लोकांचें शौर्य अनुपम, त्यांची युद्धसामग्री उत्तम, त्यांची शरीरप्रकृति सर्वांत चांगली, त्यांचा श्रेष्ट, त्यांची बुद्धि तीव्र त्यांची समाजरचना निर्दोष, सारांश जपानी लोकांचें सर्व कांहीं चांगलें अशी युरोपच्या लोकांची देखील पक्की समजूत झाली होती. जपानी लोकांचें व त्यांचेठायीं आरोपित झालेल्या गुणांचें इतकें कांहीं स्तोत्र युरोपांत होऊं लागलें कीं युरोपियन लोकांच्या या खुळेपणाबद्दल हसण्याला आशियांतील राष्ट्रच तेवढीं शिल्लक राहिलीं होतीं. जसें बीं लावावें तसें झाड होतें हा न्याय सर्वमान्य असल्यामुळें कित्येकांना या सर्व यशाचा मुख्य वांटा जपानच्या शिक्षणपद्धतीकडे देणें योग्य वाटलें. पण खुळचटपणाच्या लहरींत तारतम्याशीं फारकत होऊन सध्यां जपानी सरकाराकडून अमलांत येत असलेल्या शिक्षणपद्धतींतील हें अलौकिक रहस्य उमजून घ्यावें अशा हेतूनें लंडन युनिव्हर्सिटीनें जपान सरकाराकडे एका तज्ञ गृहस्थाला पाठवून देण्याविषयीं विनंती केली. श्रोत्यांच्या दुदैवानें या जपानी पंडितांजवळ विशेष असें कांहीं सांगावयास नव्हतें. वस्तुतः जपानांत सध्यां सुरू असलेल्या पद्धतींत पुष्कळसे अगदीं ठळक दोष आहेत असें जपानी शिक्षणपद्धतीचा पुरता शोध केलेल्या गृहस्थांचें मत आहे. तेव्हां जपाननें मिळविलेल्या जयाचे बाबतींत तेथें सुरू असलेल्या उत्तम शिक्षण पद्धतीचें स्तोत्र असणें इष्ट नसून अशा प्रतिकूल स्थितींत सुद्धां जपाननें कसें यश संपादलें याचें कौतुक करावयास पाहिजे. जपानच्या शिक्षणपद्धतींतले दोष कोणते आहेत याचा आज येथें थोडासा विचार करावयाचा आहे. या निरीक्षणांत अर्थात ज्ञान संपादनाचा हेतु आहे हें सांगावयास नकोच. या शिक्षणपद्धतींतील मोठा प्रतिकूल भाग ह्मणजे परकीयांच्या कडून आणलेली विद्येची शिदोरी होय. खुद्द जपानचें असें या पद्धतींत फारच थोडें आढळून येतें. मध्यमप्रतीच्या शिक्षणाच्या शाळांची रचना अमेरिकेंतील मॅसाचुसेटस परगण्यांतलि पद्धतीवरून केलेला आहे. पण घोकंपट्टी आणि रात्रथोडी व सोंगें फार अशा प्रकारची विषयांची थोड्याशा काळांत कोंबणी हे दोन ठळक दोष अद्याप जपानी पद्धतींत कायमच आहेत. शेक्सपीयरच्या नाटकांतील अर्थाचा लवलेशही न समजतां त्यांचे प्रयोग जपानी विद्यार्थ्यांकडून केले जातात. सैन्य व आरमार यांचेवर सरकारच्या उत्पन्नाचा बहुतेक भाग खर्च होत असल्यामुळें शिक्षणाला बहुतेक अर्धपोटींच रहावें लागतें. वीस कोटी येन लष्करी तयारीवर खर्च होत असून शिक्षणाला पुरते चार कोटीही मिळूं शकत नाहींत. उच्च प्रतीच्या शिक्षणसंस्थांची संख्याही अपुरी आहे. एकंदर १७ संस्था मिळून प्रवेशपरीक्षा पास झालेल्यापैकीं शें. २० चाही समावेश होत नाहीं. हजारो तरुण आणि महत्वाकांक्षी विद्यार्थ्यांस उच्च प्रतीच्या शिक्षणाच्या लालसेला दाबून टाकावें लागतें. प्रतिवर्षी जास्त जास्त वाढत जाणाऱ्या चिनी विद्यार्थ्यांच्या संख्येमुळें जपानी विद्यार्थ्यांची ही दुःस्थिति अधिकाधिक निकृष्ट होत आहे. खाजगी रीतीनें चालविलेल्या शिक्षणसंस्थांत राष्ट्रीय शिक्षणाचें धोरण व त्याची योग्यता कायम राखली जाणार नाहीं अशा भीतीनें अशा संस्थांनापूर्वीपासूनच उत्तेजन यथायथाच मिळत आलेलें आहे. 'सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः' तथापि जन्म दारिद्र्यामुळें जपानी शिक्षणखात्याचे पाय अगदींच मोडलेले आहेत. शिक्षणाखेरीज इतर कोणतीही बाब असो, तिच्यावर खर्चावयास पैसे मिळतील, पण शिक्षणाचें नांव काढतां उपयोगी नाहीं अशी स्थिति आहे. जपानी तात्या पंतोजींची सांपत्तिक स्थिति हिंदुस्थानांतल्या गुरुजींच्यापेक्षां मुळींच चांगली नाहीं. दरमहा पंधरारुपयांवर ह्मणजे सामान्य मजुरांना मिळणाऱ्या मजुरीपेक्षांहि कमी प्रतीवर संतुष्ट राहून नव्या पिढीला राष्ट्रीय जबाबदारी शिरावर घेण्यासाठीं तयार करण्याचें काम करीत रहावें लागतें. मध्यमप्रतीच्या शिक्षणावरल्या शिक्षकांस देखील ऐंशी नवद रुपयांखेरीज जास्त पगार मिळत नाहीं. आधुनिक शिक्षणपद्धतींत पसंत केलेल्या तत्वांच्या दृष्टीनें जपानी शालागृहें अगदींच गैरसोईचीं व टाकाऊ अशीं असतात. नैतिक शिक्षणाचे बाबतींत सुद्धां ज्या गृहस्थाचे विचार वर दिलेले आहेत त्यांचेकडून जपानला स्तुतीचा लाभ होऊं शकत नाहीं. आपली नीतिमत्ता फार मोठी आहे असा जपानी लोकांना मोठा अभिमान असतो. तथापि सद्यःस्थितीचें अवलोकन करणाऱ्या कोणालाहि जपानी समाजाचा हा अभिमान यथार्थ वाटणार

नाहीं, जपानांत सुरू असलेल्या राष्ट्रीय शिक्षणपद्धतीमुळें नैतिक बाबतींत एवढा मोठा उणेंपणा आढळून येत आहे कीं त्याचे संबंधानें तिकडील समाजांत फार मोठी ओरड चालू आहे. शिक्षण संस्थांत नैतिक शिक्षणाची अयोग्य व्यवस्था असल्यामुळें जपानी समाज नैतिक बाबतींत बिघडत चालला आहे असा सर्वसाधारण समज आहे.

तरमग जपानला मिळालेल्या जयाचें मूळ कोठें शोधावयाचें, हा प्रश्न रहातो. शिक्षणाच्या सहाय्यावांचून ह्मणजे एका अत्यंत आवश्यक अशा घटकावांचून त्यांनीं येवढें पराक्रमी सैन्य कसें तयार केलें? या प्रश्नाचें उत्तर अमळ सूक्ष्म आहे. जपानांत शिक्षणपद्धतीला एवढा मान नाहीं. सर्व मान त्याचेमुळाशीं असलेल्या उदात्त कल्पनांना असतो. या उदात्त कल्पनांचा प्रवाह जपानी समजामध्यें अत्यंत गैरसोईच्या अशा पद्धतीच्या द्वारेंसुद्धां मोठ्या जोमानें इतस्ततः पसरत असतो. ह्मणजे जपानांत चालू असलेलें सर्व शिक्षण सशास्त्ररीतीच्या आधारावर उभारलेलें नसून केवळ स्वदेशभक्तीच्या पायावर उभारलेलें आहे. जपानांत बादशहाला अत्यंत मोठा मान आहे. शिक्षणांत सुद्धां या राजभक्तीचा समावेश प्रामुख्यानें झालेला आहे. राजभक्ति व स्वदेशभाक्ति हीं भिन्न मानण्याचें जपानी लोकांना मुळींच कारण नसल्यामुळें देशाचा, राजाचा व संस्थापित सत्तेचा आदर व तिजविषयीं अभिमान या गोष्टी सर्व समाजाच्या अंगीं कसल्याहि प्रतिकूल परिस्थिति अगदीं सुरक्षितपणें पारपडण्यास जपानी समाज समर्थ झालेला आहे. या उदाहरणा वरून हिंदुस्थानांतील लोकांनी एक धडा घेण्यासारखा आहे. हाच कीं समजामध्यें स्वदेशभिमानाची ज्योत पेटविली ह्मणजे सर्व काम तडीस जातें.

## √ दोन नवीन हत्यारें

बंगाल्यांतील बँब प्रकरण बरेंच स्वरूपास आलेलें पाहून कांहीं अँग्लोइंडियन पत्रांच्या द्वारें ज्वालाग्राही पदार्थासंबंधानें कडक निर्बंध करण्याचा कायदा करण्याविषयीं सूचना आल्या असून आज सिमला येथें भरणाऱ्या कौन्सिलांत या संबंधाचा कांहीं उल्लेख होईल असा अजमास आहे. बँब प्रकरणाचा सूक्ष्म रीतीनें विचार केल्यावरून मनांत कांहीं शंका उत्पन्न झाल्या होत्या त्या अलीकडच्या हकीगतीवरून दृढ झाल्या आहेत. त्या इतक्यांतच प्रकट करण्यांत कांहीं हशील नाहीं. तूर्त या प्रकरणाच्या खुसपटाला पुढें करून जे अनेक मुस्कटदाबीचे प्रकार चालूं व्हावयाचे आहेत त्यांच्या विषयींच तूर्त विचार कर्तव्य आहे. या नव्या प्रकारांच्या पुरस्कर्त्यींना दंडेफराशी खेरीज इतर मार्गच दिसेनासे झाले आहेत. अर्थात राजनीतीच्या श्रेष्ट आणि सुधारलेल्या तत्वांना ते पारखें झाले आहेत. आजपर्यंतच्या पद्धतीनें लोकमताचें वास्तवीक स्वरूप प्रकट झाल्यानंतर पुनः त्याचेंच उद्दीपन होण्याच्या धोरणाचें अवलंबन करणें केवळ समाजाचीं दुःखें द्विगुणित करणें होय. क्षुब्ध लोकमताचें सांत्वन करून समाजाची सर्व बाजूंनीं प्रगति होईल असें धोरण अशा वेळीं अवश्य स्वीकारण्यांत यावयास पाहिजे होतें. पण या शहाणपणाच्या मार्गाच्या अगदीं उलट मार्ग दाखविण्याला अँग्लोइंडियन पत्रें हजरच आहेत. जाहिरसभांतून भाषणें करणारे व वर्तमानपत्रांतील लेखक यांच्या भाषणांमुळें अगर लेखांमुळें लोकांत अस्वस्थता उत्पन्न होते, तिचा बीमोड करण्यासाठीं सध्यां अस्तित्वांत असलेल्यापेक्षां जास्त कडक कायदे पाहिजेत असें त्यांनीं सुचविले आहे. असे कायदे झाल्यास त्याची अंमल बजावणी युरोपियन व नेटिव्ह यांचेवर सारखीच होईल किंवा कसें हा प्रश्न आहे. गतकालीन अनुभवावरून असा प्रश्न निघावयास जागा झालेली आहे. सिव्हिल मिलिटरी गॅझेट नांवाच्या एका अँग्लो इंडियन पत्राचें उदाहरण या वेळीं आह्मांला आठवतें. ज्या अपराधाकरतां ह्मणून 'पंजाबी' पत्राचे मालक व संपादक यांना तुरुंगवास सांगावा लागला तशाच प्रकारचा अपराध सिव्हिल मिलिटरी गॅझेटवर शाबीत होण्यासारखा आहे असें लाहोरच्या इंडियन असोसिएशननें तेव्हांचे लेफ्टनंट गव्हरनर सर डेंझिल इबटसन यांच्या नजरेस आणले होते. परंतु हिंदुस्थानांतील इंग्रजी न्यायाचा महिमा असा, कीं सिव्हिल लिमिटरी गॅझेटचे लेख हरकत घेतां येण्याजोगे आहेत असें मान्य करूनही पंजाब सरकारोंन त्या पत्रावर आपल्या कृपेचें पांघरून घातलें न्यायच करण्याची बुद्धि असेल तेथें आतांचा कायदा ह्मणजे अपूरा आहे असा भाग नाहीं; मग नवीन कायद्याची काय जरूर आहे?

## अस्वस्थतेचें मूळ.

हिंदुस्थानांतील अस्वस्थतेचें निदान करण्याला नुकतेच बर्मिंगहॅमचे बिशाम उद्युक्त झाले होते. या भटजी बोवांनीं तुटपुंज्या माहितीवरून तयार केलेलें आपलें मत बेधडक ठोकून दिलें हें पाहून इंग्लिशांच्या अंगच्या साहसाचें कौतुक करावें तेवढें थोडेंच. हे बिशम नुकतेच एकेठिकाणीं ह्मणाले 'हिंदुस्थानांतील अस्वस्थता ब्रिटिश सत्तेमुळें उत्पन्न झालेली नसून कांहीं इंग्लिश लोकांना हिंदुस्थानांतील लोकांचे रीतीरिवाज न पटल्यामुळें त्यांच्याकडून कधीं कधीं जो बारीकसारीक बाबतींत जुलूम होतो, त्याचें फळ आहे.' कांहीं गोऱ्या बाळांच्या लीला एकंदर अस्वस्थतेंत आगींत तेलाप्रमाणें कृति करतात हें अगदीं खरें आहे. सती वीरनवालीचें उदाहरण ताजेंच आहे. पण या पेक्षां पुष्कळच सौम्य असे प्रकार घडून आले असते तरी मुख्य खळबळीच्या अभावी त्यांच्यामुळें इतका परिणाम झाला असतां हें कबूल करतां येत नाहीं. ह्मणजे साधारण प्रतीचे जुलूम व अस्वस्थता यांच्यांत कार्यकारणभावाचा संबंध नसून दोन्हीही एका सामान्य कृतीचे परिणाम आहेत. ग्रेट ब्रिटनमध्यें ज्या राजकीयसंस्था अस्तित्वांत आहेत त्यांच्यांतील मूळ हेतूशीं अगदीं विरुद्ध अशा तत्वांवर हिंदुस्थानांतील सर्व राज्यपद्धति रचलेली असल्यामुळें सध्यांच्या स्थितींचे खापर ब्रिटनमधील राजकीय संस्थांचे शिरीं फोडतां येत नाहीं हें खरें; किंबहुना त्या संस्थांची स्थापना हिंदुस्थानांत होत नाहीं ह्मणूनच सर्व अस्वस्थता उत्पन्न झालेली आहे.

# वऱ्हाडवृत्त.

हवामान—उन्हाचें मान उतरत चाललें आहे. पारा ११०—१११ वर असतो. वारा फार सोसाट्याचा आहे. आकाशांत मधून मधून अभ्रेंही वारंवार येतत. या सर्व चिन्हावरून यंदा पावसाळा लवकर सुरू होईल असा अंदाज आहे. जमीन तयार करण्याचीं कामें सपाट्यानें सुरू आहेत. रोगराई विशेष नाहीं.

आग— आकोट फाईलांत मगील सोमवारीं रात्रौ बाराच्या सुमारास आग लागून ७०-८० कुटुंबें निराश्रित झालीं. निराश्रित कुटुंबास मुष्टीफंडांतून ९० रुपयाची मदत देण्यांत आली. यावरून अतां लोकांस या फंडाची उपयुक्तता चांगली दिसून येईल.

रा. रा. रघुनाथ बळवंत घारपुरे मुनसफ वाशिम यांस तेथील काम आटपलें ह्मणजे मलकापूर येथें बदण्यांत आले.

व्याख्यान— रा. रा. रामकृष्ण बाळाजी ओक वकील यांचें काल सायंकाळीं श्रीहरीहर राम थिएटरांत राष्ट्रीय शिक्षण या विषयांवर सुरस व्याख्यान झालें.

मुष्टीफंड— ह्या आठवड्यांत मागण्यांत आलेल्या मुष्टीफंडास खालील प्रमाणें मदत मिळाली

| | शेर |
|---|---|
| जवारी | १९० |
| गहु. | २७ |
| तांदुळ. | ६ |
| डाळ. | १॥. |
| पीठ. | ११ |
| रोख रु. | १०।≡।॥. |

मागिल शिल्लक रु. ३२८।॥≡ होती त्यापैकीं ९० रु. आकोट फायलांतील झोपड्या जळालेल्या निराश्रित लोकांस मदत ह्मणून दिले ते जाऊन बाकी २३९।॥≡ शिल्लक आहेत.

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | १००।= |
| सोनें | | २४॥ |
| चांदी | | ७० |
| जवस | | १३९ |
| जवारी | | ९४ |
| महूं काठे | ७ | १४० |
| बनशी | ७॥ | १९० |
| तेल | | ७॥ |
| सरकी | | ११॥ |
| तुप | | ११।= |
| कापूस | | ४७ |

## नोटीस

नोटीस बेशमी— अहीली मर्द ठालुजी धनगर रहाणार मौजे पुनोती जहागीर ता० अकोले यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचा नवरा ठालु वल्लद हरी हा अजमास ९।६ महिन्यापूर्वी मयत झाला आहे. त्याजला अवल हक्कदार वारस मी असून नंतर पुंजाई व तुह्मी अशा दोन्ही मयताच्या गंधर्वाच्या त्रिया असल्यावरून अहात. मयताची सर्व स्थावर जंगम इस्टेट आमचे एकत्रपणांतच कमावलेली आहे. व मयताचे नावानें असलेली सर्व स्थावर इस्टेट वाडिलोपार्जीत आहे. अशाबद्दल एकंदर मयताचे वारसाचे चौकशींत निर्णय होऊन मयताचे नावानें असलेल्या जमिनीचें खाते माझे नावानें लागलें आहे. अर्थात मयताचे सर्व स्थावर जंगम इस्टेटीचा मी खरा कायदेशीर मालक आहे. वरून मयताच्या सर्व स्थावर जंगम इस्टेटीची व्यवस्था आज पर्यंत मयताचे समक्ष व मयताचे मरणानंतरही मीच करीत आहे. तरी सालमजकुरी मी सर्व जमीन पेरणी करितां सर्व किस्तकारी करून तयार केली असतां तुह्मी लोकांचे फंदफितुर ऐकून मयताचे नंबर हल्लीं माझे नावांनीं लागलेले मौजे पुनोती जहागीर येथील सर्वे नंबर ६०-७२-८२-९९ पैकी व मौजे मंगरूळ येथील सर्वे नंबर ४७ अशी जमीन साल मजकुरी कांहीं स्वतः करितां घरी टेऊन कांहीं जमीन लोकांस पट्यानें लावून काढली आहे तरी तुह्मास या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं वरील एकंदर मयताची स्थावर इस्टेट तुह्मास मताचे हातचें देणें मुळींच नसल्यामुळें कोणत्याही सबबीवर ती जमीन गहाण खरेदी अगर लागवण वगैरे अन्य तऱ्हेनें तिचा उपयोग घेण्याचा हक्क नाहीं फक्त अन्नवस्त्राची मालकी आहे या शिवाय तुह्मास दुसरा कांहीं हक्क नाहीं. तरी तुह्मी दरसाल अन्नवस्त्राची रकम आपणा उभयताच्या मतानें ठरवून ती दरसाल मजपासून घेत जावी अगर माझे संतोषानें अन्नवस्त्राऐवजी तुह्मास एखादा नंबर वगैरे तुह्मी आमचे कुळांत आहा तोंपर्यंत वाहण्याची इच्छा असल्यास त्याप्रमाणें आह्मास समक्ष भेटून त्याजबद्दल निकाल ही नोटीस पावल्यापासून १२ दिवसाचे आंत करावा. नाहीं तर तुमचे अन्न वस्त्राबद्दल रकम रुपये ७९ सावकारी दुकानावर धरवर ठेवून एकंदर जमिनीची वहिवाट माझे मर्जीस येईल त्याप्रमाणें करीन पुढें जमीन तुह्मास घरीं वाहण्यास लागत होती अशाबद्दल तुमची तक्रार ऐकली जाणार नाहीं. व ही जमीन तुह्मी कोणास गहाण खरेदी अगर लागवणी वगैरे माझे संमतीशिवाय देऊं नये दिल्यास त्याजबद्दल एकंदर खर्चाबद्दल अगर अन्य तऱ्हेचे नुकसानीबद्दल जबाबदारी तुमच्यावर आहे. ही नोटीस दिली सही ता० ४-६-०८ इ०

सही

सोनाजी वा बुधाजी धनगर रा०
पुनोति जहागीर याचे
नं. ग. २७ हातची निशाणी. खु.

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस खालीं सह्या करणार याज कडून कळविण्यांत येतें कीं आमचा साक्षांत बधु नामे रमुलखां वल्दद अमनखा बैद राहणार ताजनापेठ आकोला याचे मनांतुन आमची वडीलोपार्जित ताजनापेठ जिल्हे आकोला येथील घर आणि मौजे हातरुण प्रगणें बाळापूर जिल्हा आकोला येथील शेत सर्वे नंबर ८७ अशा मीळकतीची अफरातफर करावयाची आहे त्या सदर्हु घरावर व शेतावर आमचा पुर्णपणें हक्क आहे तरी कळवितों कीं सदर्हु शेत व घर कोणी गहाण खरेदी वगैरे घेऊं नये घेतल्यास त्याची जबाबदारी ज्याची त्याचेवर राहून रद्द समजलें जाईल कळावें. ता. २-६- सन १९०८ ई.

सही

ईमाखां व घासीखां वल्दद अमनखां
अ. पा. बहीण सकाबी मर्द आमदखां
नि. खु:द दस्तुर शेरखां दगीखां
नं. ग. २८ मुनशी आकोला

## नोटीस

नोटीस बेसमी— पांडु वल्दद मारुती ह्याली रहाणार सेलेगांव ता० मेहेकर जि० बुलठाणें यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून तुजला रक्तपिती झाली आहे. व तुझ्यानें माझें पोट भरवत नाहीं व मी हल्लीं पांच वर्षे झालीं मी बाभुळगांव जाहगीर ता० अकोले येथें मी मोल मजुरी करुन राहत आहे व तूं माझें पोषण सुद्धां करीत नाहींस. याज कारितां आज पावेतों मजला अन्नवस्त्राबद्दल दरमहा रुपये पांच प्रमाणें पांच वर्षाचे रुपये ३०० असे मजला पाठवून द्यावे व पुढें माझी व्यवस्था करावी असें जर तुमच्यानें होणार नाहीं तर मजला फारकती द्यावी तुह्मी आठ दिवसांत माझे खर्चाबद्दल रुपये पाठविल्यास व फारकती न दिल्यास हीच फारकती समजून मी पाट लावणार असें तुह्मी समजावे व सदर्हू नोटीस पावल्या पासून ८ दिवसांत सदर्हू नोटिशीचा जबाब द्यावा. न दिल्यास नोटिशीचा खर्च तुला द्यावा लगिल व पोट खर्चाबद्दल मज ला कोर्टात फिर्याद करुन कोर्ट खर्चासुद्धां सर्व खर्च तुह्मांस द्यावा लागेल. कळावें. ता० २-६-०८ इ०

सही

तानी मर्द पांडु ह्याली रहाणार
बाभुळगांव ता० अकोले
नं. ग. २९ नि० खुद्द बांगडी.

## जाहिर नोटीस

तारीख २१-५-१९०८ इसवीं रोजीं भरलेल्या शेगांव म्युनिसिपाल कमेटीचे तहकुब राहिलेले स्पेशल सभेंतील ठराव नंबर २ अन्वयें सर्व लोकांचे माहितीकरितां प्रसिद्ध केले जात आहे कीं हैदराबाद रेसिडन्सी आरडर नोटिफिकेशन नंबर ४८ तारीख १४-३-१८९८ यांत प्रसिद्ध केलेल्या नियमा ऐवजीं सन १८८६ च्या वऱ्हाड म्युनिसीपल कायद्याचें कलम ४१ पोट कलम (१) (अ) (क) अन्वयें म्युनिसिपालिटीचे हद्दींत राखलेल्या सर्व तऱ्हेच्या गाड्यावर, त्याचप्रमाणें बसावयाच्या किंवा ओझीं वाहण्याचे गाड्यास जोडण्याकरितां किंवा ओझीं वाहून नेण्याकरितां ज्या जनावरांचा उपयोग करतात त्या जनावरांवर आणि कुत्र्यावर खालील कर बसविला जाण्याविषयीं शेगांव म्युनिसीपल कमेटीचा इरादा आहे.

१ सदर्हू कर खालील दिलेल्या वार्षिक दरा प्रमाणें बसविला जाईल.

वार्षिक दर.
रु. आ. पै.

(१) प्रत्येक चार चाकी गाडीवर—२–०–०
(२) प्रत्येक दोन चाकी गाडीवर—१–०–०
(३) प्रत्येक हत्ती किंवा उंठ यांजवर—१–०–०
(४) प्रत्येक घोडा, तट्टू, बैल अगर हेला यांजवर.... ....—०–८–०
(५) प्रत्येक गाढवावर.... ....—०–४–०
(६) प्रत्येक कुत्र्यावर.... ....—०–८–०

गाडी या व्याख्येंत बायसिकल व मोटार गाड्यांचाही समावेश होतो.

तारीख १ एप्रिल रोजीं ज्याचें वय सहा महिन्यांचे आंत असेल अशा पिलांवर कर बसविला जाणार नाहीं.

२ हा कर गाडीच्या किंवा जनावराच्या मालका पासून किंवा त्याचे गैर हजरींत ती गाडी अगर जनावर ज्याचे ताब्यांत असेल त्याचेपासून मालकाकारितां ह्मणून घेतला जाईल.

३ ज्या इसमाजवळ तारीख १ एप्रिल रोजीं अगर नंतर जो इसम गाडी अगर जनावर यांचा मालक आहे किंवा होईल त्याला तारीख ३१ मार्च रोजीं संपणारे संबंध वर्षाबद्दल कर द्यावा लागेल, आणि प्रत्येक इसम तारीख १ एप्रिल नंतर गाडी किंवा जनावर ज्याचेबद्दल त्यानें कर भरलेला आहे त्याजवरची त्याची मालकी जरी बंद झाली व पुन्हा त्याच वर्षांत मालकीचो गाडी किंवा जनावर त्यानें ठेविल्यास त्याबद्दल त्यास पुन्हा कर द्यावा लागणार नाहीं, मात्र त्यानें ज्या गाडी किंवा जनावराबद्दल कर दिलेला आहे त्याच्यापेक्षां जास्त गाड्या किंवा जनावरें नसावीत. जर एखादा इसम ज्याचे म्युनिसीपालिटीचे हद्दींत घर नसून तो त्याच वर्षांत तीन महिन्यापेक्षां कमी दिवस राहणारा आहे त्याजवर त्या वर्षाकरितां कर बसविला जाणार नाहीं.

३ (१) म्युनिसीपालिटीचे सेक्रेटरी किंवा कमेटीनें त्या कामाकारितां अधिकार दिला आहे. अशा इसमानें म्युनिसीपालिटीचे हद्दींत राहणारे प्रत्येक इसमास त्याचे जवळ असणाऱ्या गाड्या आणि जनावरें ज्याच्याबद्दल कर द्यावा लागतो अशा गाड्यांच्या व जनावरांच्या संख्येची खरी माहिती व तपशिल विचारल्यास दिला पाहिजे.

[२] या नियमाचें उल्लंघन करणारा इसम ५० रुपये पावेतों दंड केला जाण्यास पात्र होईल.

४. हा कर दरसाल तारीख १५ एप्रिलचे आंत अगर त्या दिवशीं अगाऊ वसूल देण्याचा आहे.

५. ज्यावर कर बसविण्याचा आहे अशा इसमांचीं नांवें व त्याज जवळ असलेल्या गाड्या आणि जनावरें यांची संख्या व तपशिल आणि त्यांचेवर बसविण्याच्या कराचे रकमेचे पत्रक असा तपशील ज्यांत आहे अशा प्रकारचें कराचें रजिष्टर दरसाल एप्रिल महिन्यांत म्युनिसीपल कमेटीचे सेक्रेटरी अगर कमेटीनें ज्यांस या बाबतींत अधिकार दिला आहे असें इसम तयार करतील व सदर्हू पत्रक कमेटीपुढें मंजुरातीकरितां ठेविलें जाऊन मंजूर झालेले कराचें पत्रक तारीख १ एप्रिल पासून अंमलांत आणलें जाईल.

६. सदर्हू रजिष्टर तयार झाल्यानंतर म्युनिसीपल कमेटीचे आफिसांत आफिसचे वेळांत लोकांचे पाहण्याकरितां ठेविलें जाईल आणि पट्टी विरुद्ध हरकती अर्ज वर्षांतून कोणतेही वेळेस दाखल केले जावेत अशा बद्दल कमेटी जाहीर नोटिशीनें कळवील. आलेल्या हरकती अर्जाचा निकाल कमेटी अगर या कामाकरितां नेमलेली सबकमेटी त्यांचा निकाल करील.

७. एखादे इसमाचें नांव रजिष्टरांत घालणें राहिले असल्यास किंवा रजिष्टर तयार झाल्यानंतर ज्यावर कर बसविला जातो अशा गाड्या आणि जनावरें एखाद्याचे ताब्यांत असल्यास त्यांची नोंद कोणतेही वेळीं रजिष्टरांत केली जाईल.

वर केलेले नियमाविरुद्ध शेगांवचे रहिवाशांपैकीं कोणाची तक्रार असल्यास त्यानें या नोटिशीचे प्रसिद्धीचे तारखेपासून ३० दिवसाचे आंत आपली हरहरकत कमेटीस लेखी कळवावी. दिलेल्या मुदती नंतर मुसदा केलेल्या नियमांचा विचार केला जाईल.

D. M. Deshpande

शेगांव
ता. २६ मे
सन १९०८
सेक्रेटरी
म्युनिसीपल कमेटी
शेगांव.
नं. ग. ३०

## NOTICE

Vide Resolution No 2 of an adjourned special meeting of the Shegaon Municipal Committee of the 21st May 1908 it is hereby published for the general information of the public that in supercession of the rules published under Hyderabad Residency orders Notification No 48 dated the 14th March 1898 on the subject the Municipal Committee at shegaon proposes to make the following rules for the levy of a tax under Section 41 sub section I [ A ] [ C ] of the Berar Municipal Law of 1886 on all vehicles and animals used for riding draught or burden and dogs kept within the limits of the Shegaon Municipality subject to the following rules.

1. The tax shall be levid at the following yearly rates:—

| | Rs. | As. | ps. |
|---|---|---|---|
| ( 1 ) on every four wheeled vehicle | 2 | 0 | 0 |
| [ 2 ] on every two wheeled vehicle | I | 0 | 0 |
| [ 3 ] On every elephant or camel | I | 0 | 0 |
| [ 4 ] on every Horse, pony, bullock or buffalo | 0 | 8 | 0 |
| [ 5 ] on every donkey | 0 | 4 | 0 |
| ( 6 ) on every dog | 0 | 8 | 0 |

The term "vehicle" includes a bicyle and a motor-car, Pups, which on the 1st April are under six months old, shall be exempt from the tax.

2. The tax shall be paid by the owner of the vehicle or animal, or in his absence by the person in charge or possession therof on his behalf.

3 Every person who after the 1st April is or becomes the owner of vehicle or animal shall be liable to pay the full tax for the year ending on the following 31st March. And every person who after the 1st April ceases to own any vehicle or animal, for which he has paid, the tax shall not be liable in the same year to any further tax for any vehicle or animal of which he may subsequently become the owner. Provided that the number for which he has paid the tax is not exceeded. No tax shall be charged for the year if a person who is not a householder is a resident in the Municipality for more than three months in that year.

3 ( 1 ) Every person living within the limits of the Municipality and owing or possessing a vehicle or animal liable to the tax shall be bound to give true information regarding the number and description of such vehicles and animals kept by him, when called upon to do so by the Secretary to the Committee or by any parson authorised in this behalf by the Committee.

3 ( 2 ) Any person Committing a breach of this bye--law shall be punishable with a fine which may extend to rupees fifty.

4. The tax shall be payable in advance on or before the 15th April in each year.

5. The Secretary to the Municipal Committee, or any other person authorised in this behalf by the Committee, shall prepare, in the month of April every year, on assessment register containing the names of persons liable to the tax, particulars of the number and description of vehicles and animals, and a statement of the amonnt for which they are liable. The assessment register shall be placed before the Committee for sanction, and the sanctioned assessment shall come into force with effect from the 1st April each year.

6. On the completion of the Assessment Register the Committee shall give public notice that the Register is open to inspection during office hours at the Municipal office and that objections against the assessment may be filed at any time throughout the year. The objections shall be disposed of by the Committee or by sub—Committee authorised in this behalf by the Committee.

7. The name of any person omitted from the Register, or of any person coming into possession of a taxable vehicle or animal subsequent to its preparation, may at any time be included in it.

Any inhabitant of the town of Shegaon objecting to the proposed rules should submit his objections to the Committee in writing within 30 days form the date of the publication of this Notice after which date the proposed rules will be taken into consideration.

Dated Shegaon the 26 May 1908
D. M. Deshpande Secretary Municipal Committee Shegaon.

N. G. 31

## आर्यवनौषधालय मुंडा

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांजकडील आनररी असिस्टंट सर्जन मा॰ अ. स. डॉ. विश्राम रामजी घोलें यांनी आमचीं औषधें वरकड ईर्ने हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत याहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट आह्मास दिले आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देउनही त्याचें आरोग्यार्थ आणखी एखादे औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देउं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजविनी

धातुवर्धक. अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्य स्तंभक,
रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सूवर्ण माक्षीक
मौक्तिक करतुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शारीरांतील मुख्य राजा जी धातू ती शुद्ध असेल तरच शरीर निरोगी राहुन सर्व सौख्य प्राप्त होते ती दोषी असेल तर शरीरांत नाना प्रकारचे रोगरुपी शत्रु उत्पन्न होऊन शारिरीक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ठ होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी पाहिजे त्या दिवसांत एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेववें याच्या सेवनाने नपुसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात उन्हाळे इंद्रियशिथलता, कडकी. गर्मीसंबंधी मुरलेले विकार मुत्रसंकोच; धातुचा पातळपणा, स्त्रियाची धुपणी, छातींतील रोग, हात पाय मुत्रमार्ग. व नेत्र याचा दाह, क्षय, पंडूरोग, मुखाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश पित्तविकार. बाळंतरोग, मधुमेह जुनाट परमा, मुष्ठीमैथून ने आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरें होऊन शरीर निरोगी मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त याची शुद्धी वृद्धि वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न पचणे लागते त्यांत उपयुक्त वनस्पतांचें मिश्रण गुणकारक आहेत. करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळाली आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नमून स्त्रिया, पुरुष मुलें, यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर किंतीही घेणारास टपाल खर्च माफ आहे ४ रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनुपान खर्डी सोबत किंवा व्ही. पीनें खालील पत्यावर मिळतील.

दरः-एकदम ३५ गो॰ १ रु॰ ७५ गो॰ २ रु. ११५ गो ३ रु १६५ गो. ४ रु. २७५ गो॰ ६ रु. ५५० गो॰ रु.

२ अपूर्व नेत्रांजनः-यानें पडळ, साहर, फुल, खुपऱ्या, बिंदु, कांच इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरीत बरें होउन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु.

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः---कोणताही नवा जुना परमा व उजन्य दहा तिडीक मुताची लाली, संकोच पुपस्त्राव, रक्तस्त्राव, इत्यादि विकार पथ्य नसता सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा॰ किं॰ १ १। भार बाटलीस रु. २

३ दंतबलवर्धक पूडः-दंतसंबंधी सर्व विकार उत्तम बरे होतात.

५ विंचूचें विषः-औषध लावतांच उतरतें मुळीं २ तो. ८ आणे

६ गजकर्णः-खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात ड. ६ आणे

७ सर्व हिमज्वरः-औषध घेताच कशाहि प्रकारचें ज्वर असले तरी तें औषध घेताच जाऊन पुनः उलटत नाहीत. १२ पुड्या १ रु.

८ प्लेगावर रामबाण औषधः-आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरें झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रह तापावर गोळ्या गाठीस मलम, यात चढू नये म्हणून वातावर मात्रा याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं. २ आणे ह. सो.

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपाय-कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगावर अनेक औषधें ग्रंथोक्त रसायने भस्मे धातु. गुटिका, आसव, तेलें, सूगंधी अत्तर, माफक दरानें मिळतात. अनुपान खर्डी सोबत टपाल खर्च वेगळा पडेल रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतीचें मन कळविल्यास रोगाची निदान चिकीत्सा कळवूं.

## अत्यंत आगत्यची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधाच्या अनेक जाहिराती सुरूं असुन प्रत्येक आपला समाज निरुद्योगी व आळशी बनल्यामळें एका जो धंदा सरू केला त्याचेच अनुकरण हुबेहुब नकल करून पाहिजें त्यानें करावें आमचें जाहिरातीस कोकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजिर्लें वगैरे गावांतून तो पर्वस्थेत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरूं होत आहेत. अशा जाहिराती किंवा तें लोक याची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याचा तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हेच कीं ज्यांच्या कारखाना आज सतत १५।२० वर्षें अव्याहत सुरूं असून ज्यांच्या औषधास बडे डाक्टरांनी सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधींनें कित्यावधी ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचीच औषध नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करतां अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याण करीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेंस आणण्याची खटपट करूं. आज-पर्यंत आमचे खटपटीनें यशाहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्य बंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचीच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तीच सर्वांनीं वापरवा, एकवार अनुभवानें खात्री होईल इतर जाहिरातीशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषध मागणें तीं खालील पत्यावर बिनचूक मागवावी म्हणजे खरी गुणकारक औषधें मिळून हटकुण व त्वरित आरोग्य येईल. नं. १

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य

पत्ताः—मुर्डी ता. दापोली जि॰ रत्नागिरी.

---

## ORIENTAL GOVERNMENT LIFE ASSURENCE COMPANY LIMITED

*Established 1874.*

*HEAD OFFICE*—**BOMAY**

Chief Agency for C. P. Berar and Khandesh

*Head—Quarters—Nagpur C. P.*

## FUNDS EXCEED THREE CRORES AND TEN LAKHS

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

**IMMEDIATE SETTELEMENT OF CLAIMS**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. *This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating their clients with the utmost liberality*

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's funds amount ot a givensum, but it is essential to know how such Funds are invested— if in miscellaneous and risky investments or how secured

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured

*Government Officers, Professional men, Tradesmen and others,* by employing a portion of their annual income or profits in effecting life policies at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he dies early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes upqismind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay There are numerous instances in the records of the "Oriental" where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to—

M. De SOUZA,
CHIEF AEGNT
Nagpur.

N. 2

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

# वऱ्हाडसमाचार.

**BERAR SAMACHAR**

वर्ष ४२] आकोला:— वऱ्हाडसमाचार, सोमवार तारीख १५ माहे जून सन १९०८ इसवी. [अंक २ २



## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हा. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशिचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.



### जाहिरात

मुंबई ब्यांकिची सेव्हिंग ब्यांक

ह्या बँकेत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यांपैकीं मयताचे मागे राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमाच्या प्रती बँकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।१।०१ } G. A Phillips एजंट

नं ७२


### नोटीस जाहिर खबर

नोटीस बेशमी कुकाई मर्द रामु पेटकार माळी रा. शेगांव ईस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते माझा भाऊ नामे रामु भवानी पेटकार हा मरून अंदाजा ६-७ वर्षे झालीं. तू माझी सखी भावजई असून तुला एक मुलगी नामे सखी ही होती. तुझ्या जवळ माझे भावाची इस्टेट वडिलोपार्जित कजबे शेगांव येथील स्थावर आणि जंगम इस्टेट आणि घर धाव्यांचें आमचे वडिलोपार्जित असून तू ती इस्टेट आम्हाला न विचारतां तूं आपले मुलीचे नांवांनीं करून दिली होती. हल्लीं ती मुलगी वारल्यामुळें तूं तिच्या नवऱ्याच्या नादानें लागून इस्टेटीची विल्हेवाट वाईट रीतीनें करीत आहेस. हें बरोबर नाहीं हिंदू धर्माप्रमाणें तुझ्या अंत काळच्या क्रियाकर्मीचा अधिकार माझा असल्यामुळें मी इस्टेटीचा मालक पूर्ण आहे. तूं फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहेस तुला मी अन्नवस्त्र देण्यास तयार असून तूं ऐकत नाहीं म्हणून तुला ह्या नोटिशीनें कळवितों तूं इस्टेट कोणाजवळ गहाण खरेदी किंवा बक्षीस देऊं नये दिल्यास रद्द समजली जाईल. हें तुला आणि सर्व साहुकार यांस कळावें. तसेंच कोणी इस्टेटीवर कर्ज वगैरे दिल्यास त्याजबद्दल आम्ही जबाबदार नाहीं. तसेंच पूर्वीं माझे भावाचें हातचें मुद्दां कर्ज नव्हतें पुढें काढल्यास माझे संमती शिवाय काढल्यास मला कबूल नाहीं. हें जाहिर होय ता. १०-६-१९०१ इ.

सही
रामु वल्लद भवानी पेटकार
माळी शेगांव द. खुद्द

नं. ग. ४५

### नोटीस

मी खालीं सही करणार सर्वत्र लोकांस म्हणजे जे लोक श्री संस्थान बालाजी आकोट जाहागीरदार मौजे औरंगाबाद ता. आकोट जिल्हे आकोला याची शेती कौलपट्यांनीं वाहतात त्या सर्व लोकांस या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं तुझा जवळ जे कौलपट्टे खास मालक श्रीहर नामदासजी यांचे स्वदस्तूरी सहीचे असतील ते सर्व मला मंजूर आहेत; किंवा त्यांचेजवळ मंगलदास गुरु सेवादास याचे सहीचे असतील ते सर्व रद्द आहेत; कारण मंगलदास हा वरील संस्थानचा सध्या मालक नाहीं, किंवा वरील मालकीचा मुखत्यार वगैरे कांहीं नसून मालकाचे परवानगीवांचून आपल्या स्वतःचे मतानें केले आहे, अशा प्रकारचीं सर्व कामें वरील संस्थानाचें नुकसान कारक आहेत, सबब आम्ही अशा प्रकारचीं सर्व शेतें सध्यां आपल्या वहिवाटींत घेतो; व ज्याचे जवळ सदर्हू संस्थानचे खास मालक श्रीहर नामदासजी महंत यांचे स्वदस्तूरी सहीचे कौलपट्टे असतील त्यांनीं नोटीस पोहोंचल्या पासून आठ दिवसांचे आंत ते आम्हांस समक्ष दाखवून आपसांत खुलासा करून घ्यावा. व त्याचप्रमाणें मंगलदास गुरु सेवकदास यानें केलेलें गहाणखत व खरिदखत वगैरे सर्व कामें रद्द मानलीं जातील. या करितां ही जाहिर नोटीस देण्यांत आली आहे. कळावें ता. ४-६-१९०८ इ.

सही
सितलदास गुरु हरनाम दासजी
कुल मुखत्यार तर्फे हरनामदासजी श्री संस्थान बालाजी
जाहागिरदार अवरंगाबाद
संस्थान आकोट.

नं. ग. ४६

### नोटीस

गणपत वल्लद भीवाजी ढोले मौजे रोहणें तालुके खामगांव

यांसः—

खालीं सही करणार ईजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून लग्न होण्यास आज ११ वर्षें झालीं आहेत परंतु तूं संसार करण्यास लायक नसल्याबरून आज तीन ३ वर्षे झालीं मी माझे आई बापाचे घरीं आहे. माझा कांहीं तरी निकाल करण्याविषयीं माझे भाऊ वगैरे आप्तमंडळी मिळून ३।४ वेळां तुझ्याकडे आली असतां तूं अद्याप पावेतो माझा कांहींच निवाडा केला नाहीं. माझे आईबाप गरीब असल्यावरून माझी खाण्याची वगैरे फार धाण होत आहे तरी आज मीती पावेतो मला ३०० तिनशे रुपये कर्ज झालें आहे सावकार आता पैसे देउं शकत नाहीं. याकरितां सावकाराचे ३०० रुपेय देऊन व मनंला वं माझे आप्त मंडळीला संसारास लायक आहे अशी खात्री पटवून घेऊन जाणें मी नांदण्यास तयार आहे परंतु वरील रकम रुपये व तुंही संसारास लायक आहा अशा संबधाची खात्री किन्हीं मुकामीं देऊन मजला तावडतोब घेऊन जावें. सदरील काम एका आठवड्यांत न झाल्यास मग मी नवरा करीन मग तुझा कोणतेच प्रकारचा हक्क मजवर राहणार नाहीं. ही नोटीस पावल्यापासुन एका आठवड्यांत माझा निवाडा न झाला तर मी नवरा करीन कळावें तारीख माहे जून सन १९०८

सही
सावित्री मर्द गणपत ढोलें जात
जिरेमाळी हल्लीं मुक्काम किन्ही
ता. खामगांव निशाणी

नं. ग. ४७ खु. हातची बांगडी

### नोटीस

राधाबाई जवजे माधोजी पाटील रहाणार मौजे वडशिंगी ता० जळगांव इजकडून सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं माझा भ्रतार माधोजी वल्लद कृष्णाजी पाटील हा जिंदगीची वाटणी घेऊन सुमारे तीस वर्षें वेगळा राहात होता. तो मयत होण्यास अजमास दोन वर्षे झालीं. त्याचा योग्यवारीस मी असल्यानें सर्व स्थावर जंगम जिंदगी माझे ताब्यांत आहे. माझे पश्चात जिनगीचा वारसा माझ्या तीन मुली यांचेकडे जाणार. याप्रमाणें न होता माझे नवऱ्याचे जिंदगीचा कीं ज्याची मालकी मजकडेस आली तिचा अपहार आपल्यास व्हावा किंवा दुसरे दुष्ट हेतुनें मला त्रास व्हावा म्हणून माझे चुलत पुतणे नामें भोनु वल्लद सखाराम. तुकाराम वल्लद सखाराम गणपत वल्लद बालु असे इसम सदर्हु गांवची माझी शेती नंबर ६९ यांतील हिस्सा आठ आणे नंबर ६७ यांतील हिस्सा आठ आणे. नंबर ९३ यातलि ८९८४. नंबर ८४ यांतील हिस्सा बारा आणे शिवाय वाडा व गढींतील जागा पेव वगैरे याप्रमाणें सर्व किंवा कांही सदर्हु इसम मला भुलविण्यासाठीं कोणास गहाण खरेदी व पट्यानीं देण्याचे विचारांत असून माझे भ्रतारास कर्ज वगैरे नसतां तें आहे व त्याची व्यवस्था आपण लाविली. हें खोटें रीतीनें दिसले जाण्याकरितां कोणाचे नांवें गहाण खरेदीचा व कजूच्या सह्या करून देणें असाही क्रम चालविणार असें ऐकण्यांत आहे. करितां त्या देणार सर्वांस कळविण्यांत येतें कीं वरील जिंदगीशीं कोणी कोणतेंच रीतीचा संबंध न ठेवतां मयत माधोजी याचे कर्जाबद्दल वरील इसमापासून कोणताच लेख घेऊं नये या विरुद्ध झाल्यास त्याची जोखीम त्यांस सोसावी लागेल कळावें ता० ११-६-०८ इ०

सही
निशाणी राधाबाई भ्रतार माधोजी

नं. ग. ४८ इचे हातची खुद्द बांगडी.

## वर्तमानसार

तुतिकोरिन येथील दंग्याच्या खटल्याचा निकाल होऊन एंकदर २६ आरोपींपैकीं २० जणांस एक वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा फर्माविण्यांत आली आहे व त्याप्रत्येकापासून शिक्षेची मुदत संपल्या दिवसापासू तीन वर्षेंपर्यंत चांगल्या वर्तणुकीबद्दल जामीन घेण्याचा हुकुम झाला आहे. बाकीच्या आरोपींपैकीं पांचजणांस एक वर्षापेक्षां कमी मुदतिच्या शिक्षा देण्यांत आल्या. सहावा आरोपी लहान असंमुळें त्यास ८ फटक्यांची शिक्षा सांगितली व ती तावडतोब अंमालतही आली.

ता. १२ रोजीं दुपारीं चौ. प्रे. मॅजिस्ट्रेट मि. ॲस्टन यांजपुढें काळकर्ते रा. परांजपे यांस ऊभे करण्यांत आले होते. ता० १९ मे १९०८ च्या काळपत्राच्या अंकाच्या दुसऱ्या पानावरील ४, ९, आणि ६ व तिसऱ्या पानावरील १ व २ या रकान्यांतील मजकुराबद्दल खटला करण्यांत आला आहे. (बॉम्ब प्रकरणांतील आरोपीचा शोध लावणाऱ्या पोलिसांच्या हुशारीबद्दल वाटण्यांत आलेलीं बक्षीसें व मुझफरपूरच्या अत्याचाराचे निषेद प्रदर्शन या संबंधाच्या मजकुरावर वरील रकान्यांत टीका आहे.) लेखांचीं भाषांतरें कोर्टपुढें दाखल झालीं. आहेत हायकोर्ट वकील मि. दीक्षित रा. परांजपे यांच्या तर्फे काम चालविण्यास हजर होते. त्यांनीं त्यांची सुटका करावी असा कोर्टास अर्ज केला, परंतु तो नामंजूर करण्यांत आला.

—१८५७ सालच्या समराचें संस्मरणार्थ लंडन येथें जो उत्सव झाला त्याची समग्र हकीकत आतां प्रसिद्ध झाली आहे. उत्सवाकरितां केंब्रीज, ऑक्सफर्ड सायरन्सेस्ट, येथील हिंदी लोक आले असून कित्येक विद्यार्थी या समारंभास हजर होत्या. दे. राणा बी. ए. बार ऍट लॉ, हे अध्यक्षस्थान सुशोभित करण्याकरितां पारिसहून ( फ्रान्स ) आले होते. सभेचा दिवाणखाना पुष्पवेलींनीं शृंगारला असून उदबत्त्यांचा घमघमाट सुटला होता. गर्दी इतकी झाली होता कीं, कित्येकांना बाहेर उभे रहावे लागले. राष्ट्रगीताचें गायन, दे० आयर बी. ए यांची राष्ट्रप्रार्थना, दे. बदशहा बहादुरशहा व श्री नानासाहेब पेशवे झाशीची राणी यांच्या गौरवास्तव दे. सावरकर यांचें भाषण; दे. दास, दे. खान, दे मास्तर ( पारशी ) दे. रायपेन ( ख्रिस्ती ) यांचीं भाषणें, वगैरे गोष्टी झाल्या. ५७ सालच्या समरीं शौर्य दाखविलेल्या वीरांच्या गुणांचें वर्णन चाललें असतां सर्व लोक उभे राहिले व त्या वीरांच्या नांवांचा जयजयकार करण्यांत आला. वन्देमातरं असा प्रचंड ध्वनि वारंवार ऐकूं येत होता. ५७ च्या वीरांच्य संस्मरणार्थ महिनाभर 'देशाभिमानाचा' रोजा करण्याचें कित्यकांना ठरविले असून एक महिना नाटकाला जावयाचें नाहीं, मद्याला स्पर्श करावयाचा नाहीं, धूम्रपान वर्ज करावयाचें, असें ठरविलें आहे; कांहींजण एक महिनाभर उपास करणार आहेत! अशा रीतीनें काटकसर करून जो पैसा शिल्लक राहिले त्याचा विनियोग ५७ सालच्या वीरांचे फंडाकडे होणार आहे. प्रसादासाठीं 'चपात्या' वाटण्यांत आल्या. त्यांचे मध्यभागीं १८५७ हीं अक्षरें गुलाबी साखरेनें काढलीं होतीं. बॅ राणा यांनीं वरील फंडास मे महिन्याची आपली सर्व प्राप्ति दिली असून कानाबाईनीं ७५ रु. दिलें आहेत.

कांहीं दिवसापूर्वी क्षत्रिय जातीची एक स्त्री वजीराबाद जंकशनवर येऊन तिकीट काढण्यासाठीं उभी राहिली. इतक्यांत एक पोलीस कांहीं दुष्ट हेतू मनांत धरून तेथें आला व तिला तो तिकीट काढू देईना. ती गोष्ट त्या बाईनें जवळच्या एका माणसाला सांगितली. त्यानें त्या पोलिसची चांगली कानउघाडणी करून त्याचे अनाथ अबलासंबंधानें काय कर्तव्य आहे तें सांगितलें. व त्याबरोबर त्याजवर हस्त प्रयोगही करण्यांत आला. त्यामुळें त्याचें डोके ही फुटलें. या प्रकरणाची स्टेशन मास्तर व युरोपियन पोलीस ऑफिसर यांना बातमी देण्यांत आली, पण त्याचा कांहीं उ...! झाल्याचें अजून दिसत नाहीं.

'हिंदुस्थान' स्टीम प्रेसमध्यें कित्येक दर्शीं पत्रें छापलीं जातात त्या प्रेसच्या मुद्रकावर लोहारच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटापुढें खटला चालू आहे. आर्यगॅझिट पत्राच्या एका अलिकडच्या अंकावर 'बेयॅम येथें प्रसिद्ध केलें' ऐवढें शब्द छापण्यांत आले नाहींत ऐवढाच काय तो आरोपीचा गुन्हा आहे. आरोपीवर चार्ज ठेविण्यापर्यंत मजल येऊन ठेपली आहे. या खटल्यासंबंधानें 'हिंदुस्थान' पत्रांत पुढील आशयाची टीका आली आहे.—पुर्वी अशा चुकांबद्दल मुद्रकास नुसता इशारा देणें बस्स आहे असें सरकारास वाटत असें. असले नियम दररोज धाब्यावर बसविणाऱ्या अँग्लो–इंडियन पत्राच्या वाटेस मात्र सरकार जात नाहीं.

ता० ११ सकळीं ९॥ वाजतां पांच सहा युरोपियन अधिकारी व शंभर पोलिस हे काळ आफिसमध्यें गेले. पोलिस खालींच उभे होते. अधिकाऱ्यांनी काळकर्त्यीचें आफिस, घर व छापखाना यांच्या झडतीचें वॉरंट त्यांना दाखवून विशेषेंकरून काळआफिसची झडती सुमारें तीन तासपर्यंत घेतली. झडतींत वर्गणीदारांचें रजिष्टर, इतर कांहीं कागदपत्र, खाजगी पत्रव्यवहार, मागील कांहीं फायलीं, मनीऑडरीचीं कुपनें इत्यादि जप्त करून नेमण्यांत आलीं. काल रोजीं सकाळीं ११–४० च्या गाडीनें प्रो. परांजपे यांना मुंबईस नेमण्यांत आलें. आज रोजीं त्यांचेवर इ. पी. कोड १२४ (अ) व १५३ (अ) या कलमान्वयें खटला करण्यांत येणार आहे. काळांतील कोणत्या लेखाबद्दल त्यांचेवर हा खटला होणार आहे हें अद्याप नक्की समजलें नाहीं.

ता. ७ च्या अंकांत 'बंगाली' पत्रानें पोष्टखात्याच्या मुख्य अधिकाऱ्यांवर एक मोठा आरोप ठेवला आहे. हरिसन रोडवर नंबर ७५–१ च्या घरांत प्रेसिडेन्सी कॉलेजचे मुख्य अधिकारी मि. चंद्रभूषण हें राहतात. मेसर्स चतर्जी व मित्र यांचा दवाखानाही या घरांत आहे. ता. २४ मे पासून ता. ४ जूनपर्यंतच्या अवधींत मेसर्स चतर्जी व मित्र यांच्यापैकीं एका गृहस्थाचीं पत्रें टपाल ऑफिसांतून मिळाली नाहींत. य संबंधाचा तपास करण्याविषयीं त्यांनीं विचार केला. पण इतक्यांत निरनिराळ्या तारखांचीं २६ पत्रें ता. ९ रोजीं त्यांना मिळालीं. ही सर्व पत्रें फोडण्यांत आलीं होतीं. बंगाली पत्रानें या संबंधानें योग्य त्या वरीष्ट अधिकाऱ्याकडे खुलासा मागितला आहे.

त्रिवेंद्रम येथें ता. ८ रोजीं एक मोठा दंगा झाला. या दंग्याची हकीकत अशी आहे कीं, एक हेड कॉन्स्टेबलनें राजवाड्यासमोर एका गाडीवाल्यास बराच मार दिला. मार देण्याचें कारण गाडीवाल्यानें कॉन्स्टेबलास बक्षीस देण्याचें नाकारिलें हें होय. हेड कॉन्स्टेबल यांच्या या वर्तनामुळें लोक त्या ठिकाणी गोळा झाले व संतापून राजवाड्यानजीक असलेल्या सेंट्रल पोलिस स्टेशनास त्यांनीं आग लावली. ब्रिटिश रेसिडेंट व असिस्टंट रेसिडेंट मि. बर्नस हे दंग्याच्या जागीं येऊन दाखल झाले व त्यांनीं दंगा मिटविला. तथापि त्रिवेंद्रम शहरांत मोठी गडबड उडाली असून मोठ्या रस्त्यावरून बंदोबस्ताकरितां लष्करी शिपायांचा पाहरा ठेवण्यांत आला आहे. राजवाड्याच्या दरवाजाशींही एक पाहरा ठेवण्यांत आला आहे. ११० लोकांस पकडले आहे. पकडलेल्या लोकांत बहुतेक मुसलमान लोक आहेत. त्रावणकोर सारख्या संस्थानांत असा दंगा पूर्वी झाला नव्हता असें ह्मणतात. मारहाण केलेला गाडीवाला अत्यवस्थ आहे पोलीस चौक्या व हेड कार्टर्स येथें बंदोबस्ताकरितां पाहरे ठेवण्यांत आले आहेत.

## साहित्य समालोचन

### ऐतिहासिक थोतांड

सरस्वति मंदिर मासिकाच्या ताज्या अंकांत रा. पारसनिस यांनीं ऐतिहासिक माहिती या सदराखालीं शिवाजी महाराजांचें ह्मणून एक पत्र प्रसिद्ध केलें आहे. या पत्राचे लेखकानें जजिया नांवाचा कर बसविल्याबद्दल औरंगझेब बादशहाची कान उघाडणी केली आहे. राजस्तान कर्ते कर्नल टोड यांना असें एक पत्र मिळालें असून तें मेवाडचा राणा राजसिंग यानें लिहिलें असा त्यांचा समज होता. तो समज खरा नसून हें पत्र शिवाजीमहाराजांनीच लिहिलेलें असावें असा सिद्ध करण्याचा रा. पारसनीस यांनीं प्रयत्न केला आहे, पण तो निष्फल होय असें आह्मास वाटतें. कर्नल टोड यांना मिळालेली शिवाजीमहाराजांनीं लिहिलेल्या पत्राची नक्कल आहे असें ग. पारसनीस यांचें ह्मणणें आहे. पण तें संयुक्तिक दिसत नाहीं. उलट आतां प्रसिद्ध झालेलें पत्रच सारांशरूपानें नक्कल आहे असें, हीं दोन्ही पत्रें एकमेकांशीं ताडून पाहातां दिसून येतें. या पत्रांत औरंगझेबांचे तीन पूर्वज शहाजहान, जहांगीर व अकबर यांनीं हिंदूमुसलमानांस समदृष्टीनें वागविल्याबद्दल कृतज्ञतापूर्वक त्यांची स्तुति केलेली आहे. ही स्तुति औरंगझेबाचे मामेमावसे झालेल्या रजपुताखेरीज इतर कोणा बाणेदार हिंदूंच्या मुखांतून निघाली असती असें ह्मणवत नाहीं. मग शिवाजीमहाराजांसारख्या यवनांशीं पूर्ण द्वैत धरलेल्या स्वधर्माभिमानी पुरुषांकडून असला हांजीहांजीचा प्रकार होणें मुळीं अशक्यच आहे. हिंदुपदपादशाईची इमारत बांधण्यास आरंभ करणाऱ्या वीरांनीं मुसलमान 'बादशहाची दृष्टी लोकांचे कल्याणांत होती' हें कबूल करणें संभवत नाहीं. त्याचप्रमाणें पादशाईंतील 'कित्येक किल्ले व मुलूख गेले व बाकी राहिले तेही जातात,' ह्मणून हळहळणें शिवाजीमहाराजांचे तरी माथीं मारतां येणें शक्य नाहीं. ज्यांची सत्ता धुळीस मिळविण्याविषयीं महाराजांची सर्व खटाटोप त्यांचेच 'राज्य चालवें कसें!' हीं चिंता खुद्द शिवाजीमहाराजांनाच करावयास लावणें ह्मणजे निव्वळ जुलूम होय. रा. पारसनीस यांनीं प्रसिद्ध केलेलें भाषांतर समग्र देण्यास सवड नाहीं. तथापि वर दिलेल्या उदाहरणावरून या पत्रांतील एकंदर विचारसरणीचा अजमास होणार आहे. जजिया कर बसविल्याबद्दल या पत्रांत असलेला निषेध स्पष्ट आहे यांत शंकाच नाहीं. तरी तो करणार मोंगल सत्तेशीं टक्कर देण्यास दंड थोपटून तयार झालेला वीर खात्रीनें नसून पादशाहीशीं मित्रत्वाचें नात्यानें वागणाराच कोणीतरी असला पाहिजे, असें उघड दिसत आहे. शिवाजीमहाराजांनीं दिल्लीकडून परत आल्यानंतर हें पत्र लिहिलें आहे असें रा. पारसनीस ह्मणतात. पण औरंगझेबाच्या दरबारी शिवाजीमहाराजांचा जो मानमरातब झाला त्याचा उपभोग घेतलेला कोणीही बाणेदार पुरुष असलें खुळेपणाचें कृत्य करण्यास उपयुक्त होईल असें रा. पारसनीस यांच्या सारख्या इतिहासज्ञास वाटलें कसें, याचेंच आह्मांस आश्चर्य वाटतें. आपला कार्यक्रम आणि आपले हेतु जगजाहीर झालेले असतांही बादशहास असा मोफत सल्ला देणाऱ्या इसमाची चोंबडेपणांत कमाल झालेली असली पाहिजे. हा आरोप शिवाजीमहाराजांवर करण्यास कोणीही इतिहास वाचक तयार होणार नाहीं. हें पत्र खुद्द शिवाजीमहाराजांच्या हातचें असल्याबद्दल रा. पारसनीस यांनीं अलिकडे प्रसिद्ध केलेल्या एका ऐतिहासिक पुस्तकांतील नायक मि. मॅकेर यांचा हवाला दिला आहे. 'औरंगझेबाबद्दल नुसतें वैमस्यच नव्हे तर त्यांच्या सत्तेबद्दल अत्यंत तिरस्कार' शिवाजीमहाराजांस वाटत असे व तो त्यांचा त्या बादशहाशीं जो पत्रव्यवहार झालेला आहे त्यांत स्पष्टपणें दिसून येत असल्याबद्दल मि. मॅलेर यांची साक्ष याच ठिकाणीं देण्यांत आली आहे. असें असतां वर सांगितलेल्या प्रकारचें पत्र शिवाजीमहाराजांकडून लिहिलें जाण्याचा कितीकसा संभव आहे याचा मि. मॅलेर किंवा त्यांच्या वचनाला वेदवाक्य मानणार इतिहासकार यांनीं विचार न केला तरी तो इतिहास वाचकांनीं करावयास पाहिजे.

### स्त्रीशिक्षणाची टर

प्रसिद्ध नाटककार रा. खाडिलकर यांनीं लिहिलेल्या 'बायकांचें बंड' नांवाच्या नाटकावर टीका करतांना सरस्वतिमंदिरांत एका पदवीधर लेखकानें येणें प्रमाणें उद्गार काढले आहेत. 'सद्यःपायेच्या व प्रमिलेच्या भाषणांत स्त्री स्वातंत्र्याचे व स्त्री शिक्षणाचे जे अचरट व फाजील विचार घातले आहेत ते सुधारकवर्गाचे आहेत अशी कल्पना करून अशा विचारांचे काय वाईट परिणाम होतात हे दाखवून, पर्यायानें स्त्रीशिक्षणाच्या पुरस्कर्त्यांची व एकंदर सुधारक वर्गाची टर उडविण्याचा प्रयत्न केला आहे, असें दिसतें. परंतु आह्मास दिलगिरी वाटतें कीं हा त्यांचा प्रयत्न मुळींच सिद्धिस गेला नाहीं. .... पात्रांच्या तोंडीं घातलेलें स्त्रीशिक्षण व स्त्रीस्वातंत्र्य यांवरचे विचार सुधारकांचे होते किंवा आहेत हें रा. खाडिलकरांस कोणी सांगितलें कोणास ठाऊक? आह्माला तर हे विचार केवळ त्यांच्या डोक्यांतील असून त्यांनीं ते सुधारकवर्गावर लादलेलें आहेत असें दिसतें. इंग्लंड व अमेरिका या देशांमध्यें स्त्रियांच्या हक्कासंबंधानें लोकांचे विचार फार वाढवलें व त्यामुळें दोन्ही देशांतील समाजावर फार अनिष्ट परिणाम झाले, ही गोष्ट पुष्कळ विचारी लोकांच्या लक्षांत येऊन त्यांनीं वेळींच स्वसमाजांतलि लोकांन सावध करण्याचे पुष्कळ प्रयत्न केले व याच हेतूनें टेनिसन यानें प्रिन्सेस काव्य लिहिलें. महाराष्ट्रांत स्त्रीशिक्षणाची चळवळ होऊन आज कमींत कमी २५ वर्षें झालीं. इतक्या अवधित कोणीही जबाबदार सुधारकानें स्त्रीस्वातंत्र्याचे अशा प्रकारचे चमत्कारिक व चुकीचे विचार समाजापुढें मांडले आहेत असें आह्मांस वाटत नाहीं.' प्रस्तुत नाटकासंबंधानें सविस्तर लिहिण्याचा आमचा मानस आहे, त्या वेळीं त्यांतील इतर गुणदोषांचें विवेचन आह्मी करणार आहों तूर्त त्यांतील एका भागासंबंधानें आदरणीय असे विचार आढळले ते वर दिले आहेत.

## सोमवल्ली

वैदिक वाङ्मयांत सोमवल्लीचें स्तोत्र गाइलेलें फार आढळून येतें. या वल्लीच्या रसाच्या प्राशनानें मनुष्य अजरामर होतें असें दिव्य वर्णन आढळतें. सोमयाग, सोमयागी इत्यादि शब्द इचा महिमा सूचित करतात. अशा या अमृतोमय वल्लीसंबंधानें निरनिराळ्या सकृस्त ग्रथांतील माहीती 'सरस्वती' नामक हिंदी भाषेंत निघणाऱ्या मासिकाच्या ताज्या अकांत प्रसिद्ध झालेली आहे. महाराष्ट्रांत सुमारें दहाबारावर्षांपूर्वि या विषयावरुन एक वाद झालेला होता. त्या वेळीं ही बहुतेक माहिती बाहेर आलेली होती. वेदकालीन सोमवल्ली सध्यांच्या कालीं अनुपलब्ध आहे असाच त्या वेळींही निर्णय झाला होता. आणि आतां 'सरस्वती' मासिकांतील लेखकानींहि तिच्या प्राप्तीचा मार्ग, सुगावा लावून दिलेला नाहीं. चतुर्विषतिविघ सोमवल्लीच्या अमृतमय रसाचें पान करण्याची साठदिवसपर्यंत चालूं रहाणारी पद्धति अनुपान आणि तदनुषांगिक विधि यांसकट या लेखांत दिलेली आहे. विधिपूर्वक सोमरसाचेंपान करणाराचें शरीर दशसहस्त्र वर्षें पर्यंत धडधाकड टिकणार अशी शास्त्राची प्रतीज्ञा आहे. मारुय, अर्बुद, सह्याद्री, महेंद्र, मलयाचल, श्रीपर्वत, देवगिरी, देवसद, पादियात्र, विंध्याचल आदिकरुन पर्वतावर सोमवल्लीची उत्पत्ति असे असें ग्रंथांतरी ह्मटलेलें आहे. पण अधर्मी कृतघ्न ब्राह्मणद्वेषी व औषधीद्वेषी पुरुषांस तिचें दर्शन घडणें अशक्य आहे या दिव्य औषधीच्या सेवनानें कायाकल्प करण्याविषयींच्या क्रियेचें विवेचन सुश्रुतांत आहे. पण या रीतीचा अनुभव घेऊन पाहिलेल्या कोणा महात्म्याचा त्यांत उल्लेख नाहीं. वैदिक काळांत तर या वल्लीचें माहात्म्य फारच होतें. ऋग्वेदाच्या नवव्या मंडळांत व यजुर्वेदांत एकुणविसाव्या अध्यायांत सौत्रामाणि यज्ञाचा विषय आहे तेथें या वल्लीची भरपूर स्तुति आढळून येतें. तेथें या वल्लीच्या अंगच्या मादकपणाचीही स्तुति गाइलेली आहे. एकंदर वर्णनावरून नुसता रस व मादकता करविलेला रस अशा दोन प्रकारानें या वल्लीचे सेवन वेदकालीं करीतें असें दिसून येतें. वैदिक कालीं मादकपणाकरितां सोमरसांत तांदुळ, त्रिफला, सुंठ, अश्वगंधी, पिंपळी इत्यादि पदार्थ घालण्याची वहिवाट असे. पण अशा प्रकारचे मिश्रण सुश्रुतांत सांगितलेले नाहीं. सोमवल्लीच्या स्वरुपाचें व गुणांचें जें वर्णन ग्रंथातून दिलेलें आहे त्याचे आधारानें ही वल्ली शोधून काढण्याचा प्रयत्न कित्येक शोधकांनीं अलिकडे केला आहे. बहुतेकांनीं गुळवेलीलाच कलीयुगांतील सोमवल्ली ह्मणून पुढें केली आहे. कोणी ब्राह्मीला सोमवल्ली ह्मणून दाखवितात. 'इंडियन फ्लोरा' नामक हिंदुस्थानांतील वनस्पतीवरील सर्वमान्य ग्रंथ लिहणारे डॉ. राक्सबर्ग हेही सोमवल्लीचा पत्ता लावण्याला पुढें सरसावले परंतु अखेरीस त्यांनीं दाखवून दिलेली वल्ली सोमवल्ली नव्हे असें ठरलें.

---

# वऱ्हाडसमाचार

जेष्ट वद्य १ शके १८३०

---

## कर्तव्य सोडावयाचें नाहीं.

हिंदुस्थानच्या स्थितींत अलिकडे प्रत्यहीं पालट होत चालला. आलेला प्रत्येक दिवस मागच्या दिवसांस बरें ह्मणवीत आहे. वर्तमानपत्रांच्या गळ्याला वात लावण्याचा कायदा झाल्यामुळें एकंदर राजकीय परिस्थितींत विलक्षण स्थित्यंतर घडून आलेलें आहे. ही आणीबाणीची वेळ आणण्याला विशेषें करुन कोण कारण झाले आहे याचा उहापोह सर्वत्र होतच आहे आणि निदान हिंदी समाजांत तरि त्यासंबंधानें दुमत नाहीं हें अगदीं स्पष्ट आहे. येऊं नये ती वेळ बळेंच अंगावर ओढून आणल्यानतरही सरकारनें अशा प्रसंगीं कसें धोरण ठेवावयास पाहिजे अशाविषयीं हिंदी समजांतील सर्व बाजूनीं एकाच प्रकारची सल्ला सरकारास मिळालेली आहे. देशांत शांतता पाहिजे, कायद्याचें उल्लंघन होतां कामा नये, त्याचप्रमाणें या दोन्ही प्रकारांशीं विपरित अशा रीतीनें वर्तन करणारांस शासन होऊन न्यायाचा जय झाला पाहिजे; आणि त्यांतही न्यायांतरगत सदसाद्विचार बुद्दीला अगदीं योग्य दिसेल तितकी रहेम दाखविण्यांत आली पाहिजे या विषयीं कोठेंही मतभेद नाहीं. समजाचें स्वास्थ्य कायम राखण्याची महत्वाची जबाबदारी सरकारावर आहे, तें त्यांचें कर्तव्य कर्म आहे आणि तेंही, समाजाच्या प्रगतीच्या अत्यंत श्रेष्ट अशा जबाबदारीच्या संपादणुकीसाठीं बजावलें गेलें पाहिजे. समाजाची प्रगति हाच सरकारच्या सत्तेंतील मुख्य हेतु आहे; याच एका कारणाखातर त्या सत्तेचें अस्तित्व न्याय आहे आणि स्वास्थ्य हें प्रगतीला पोषाक आहे; स्वास्थ्यावांचून प्रगति होणें अशक्य आहे. स्वास्थ्य कायम राखलें गेलें पाहिजे अशा विषयीं सर्व हिंदी समाजाचा सारखाच आग्रह आहे. परंतु त्या बरोबरच दुसरीही एक, त्या पेक्षांही जास्त महत्वाची अशी त्यांची आग्रहाची विनंती आहे. नुसतें दाबदडपीचें पोलिस शिपायाचें काम झालें ह्मणजे सरकारच्या सत्तेचा हेतु सिद्धीस गेला असें नाहीं, समाजाला ज्या कांहीं जखमा झालेल्या, त्यांचे ह्रदयांत जीं कांहीं शल्यें सलत आहेत, त्यांच्या हातापायांना जीं कांहीं दुर्भेद्य बंधनें झालीं आहेत आणि ज्या आशा आणि आकांक्षा त्यांचें जीवितसर्वस्व झालेल्या त्यांची दाद घेऊन राष्ट्रांत उत्पन्न झालेल्या नव्या चैतन्याला समाजाच्या चिरकालित्वाला पोषाक अशा रीतीचें वळण लावण्याचें मुत्सद्याचें कामही सरकारानें करणें अवश्य आहे. हें कार्य करून सर्व राष्ट्राचें हित साधण्याची, त्यांची दुवा संपादण्याची आतांच्या सारखी दुसरी संधी येणें कठीण आहे. ही संधी सरकार साधणार किंवा कसें तें भावी काळांत कळून येणारें आहे. सरकार कांहीं करो, त्यावर अवलंबून असल्याव्यतिरिक्त अशी मोठी जबाबदारी लोकांच्या शिरावर आहे. स्थापित सत्तेशीं विरोध नव्हे, तर आपल्या आशेचें व आकांक्षेचें समर्थन हें लोकांचें मुख्य धोरण आहे. आमच्या नामशेष होऊं लागलेल्या राष्ट्राचे अंगीं पुनः चैतन्य आणण्याचें कामीं सरकाराकडून कांहीं मदत होणारी असेल तर ती त्याज्य आहे असें नाहीं. तथापि अद्यापि आमच्या पवित्र कार्याच्या आड सत्ताधीश येऊं लागले किंवा त्यांना आमचें कार्य रुचलें नाहीं तथापि स्वतंत्रपणें आपल्या स्वतःच्याच हिंमतीवर तें घडवून आणलें पाहिजे. सरकार आपलें धोरण कसेंही ठेवो, आमचें ऐको, न ऐको समाजानें एकदां अंगिकारलेलें कायदेशीर चळवळीचें कार्य नेटानें चालूं ठेवणें आमचें कर्तव्य आहे. अशा कार्यांत स्वदेशी चळवळीला अग्रस्थान दिलें पाहिजे. आपल्या देशांतील उद्योग धंद्यांच्या उन्नतिकरितां, आपल्या असंख्य देशसबांधवांचे चरितार्थ चालण्याकरितां आणि परदेशी मालाच्या रुपानें देशांतून जाणाऱ्या प्रचंड द्रव्योघाला आळा घालण्यासाठीं विदेशी वस्तू वापरण्याचें सोडून देऊन, त्यांवर बहिष्कार घालून स्वदेशी वस्तू वापरण्याचा आणि तसें करण्याविषयीं इतरांना उपदेश किंवा प्रार्थना करण्याचा उद्योग अखंडित चालूं ठेवाला पाहिजे. बहिष्कार हा शद्ब पुष्कळांना बिचकविणारा आहे हें आह्मी जाणून आहो. तथापि स्वदेश प्रेमाचें अत्यंत सोज्वळ असें स्वरूप जी स्वदेशी चळवळ तीच आमची उपास्य देवता आहे. प्रेम अत्यंत उदात्त आणि तेजोवान् आहे, द्वेष, गौण आणि मनाची दुर्बलता दर्शविणारा आहे. स्वदेशीचें अधिष्टान द्वेष नसून प्रेम आहे. अशा दैवी गुणांवर उभारल्या खेरीज ती चळवळ फलद्रुप व्हावयाची नाहीं. स्वदेशी चळवळ अव्याहत चालूं ठेवण्यास सर्व समाज वचनानें बद्ध झालेला आहे. आणि सरकार कोणत्याही धोरणानें चाललें तरी त्या चळवळीला उपयुक्त अशा प्रकारच्या संघटनात्मक कार्याची परंपरा आह्माला कायदेशीर मार्गानें चालूं ठेवणें प्राप्त आहे. स्वदेशी चळवळीचीं हीं दोन अंगें सुप्रसिद्धच आहेत. समाजांत स्वदेशीविषयीं प्रेम आणि आस्था उत्पन्न करण्याचे प्रयत्न अहर्निश चालूं राहिले पाहिजेतच. परंतु त्याबरोबरच तें प्रेम फलद्रुप होण्यासाठीं समजाच्या गरजा भागविण्याचे प्रयत्न तितक्याच मेहनतीनें आणि इर्षेनें चालूं असेल पाहिजेत, तरच समाजांत स्वदेशीविषयींची आस्था उत्पन्न होईल व ती चिरकाल टिकेल, जणूं काय कोठे बाँबगोळा उडाला नाहीं अशा रीतीनें हें कार्य अबाधित चालूं राहिलें पाहिजे. सध्यां पसरलेल्या अस्वस्थतेमुळें हें कार्य मागें पडेल तर राष्ट्राचा बेभरंवसा केल्याप्रमाणें होईल आणि एक महत्वाचें राष्ट्रीय कर्तव्य न बजावल्याचें पातक माथीं बसलें. संकटाच्या आणि अडचणीच्या वेळीं मनाची शांतता राखणें मुत्सद्यांना, त्याचप्रमाणें राष्ट्रोद्धारकानांही अवश्य आहे. सत्तावन सालच्या अस्वस्थतेच्या काळांत विश्वविद्यालयें स्थापण्याचा आपला हेतु लॉर्ड कॅनिंग यांनी सोडून दिला नाहीं. अशा प्रकारची ही स्वकर्तव्याविषयींची जागृति आपणांमध्यें आहे असे प्रत्यक्ष आचरणानें दाखवून तिला पारखे होऊं पहाणाऱ्या अधिकारी वर्गास आपण लाजवावयास पाहिजे. संकटें हीं व्यक्तींची त्याचप्रमाणें राष्ट्राची कसोटी पहात असतात. खरोखर अशा संकटांचे काळ हीच कार्यदक्षता दाखविण्याची मोठी संधि असते. अशी सुसंधि आलेली असतां तिचा योग्य उपयोग करून घेऊन एकदां इश्वराला साक्षी ठेवून अंगिकारलेल्या स्वदेशी व्रताचें पालन इकडे तिकडे लक्ष न बहकूं देतां आस्थापूर्वक आणि निश्चयानें करावयास पाहिजे आहे. मोठा गहजब कोसळला तर किंचित् मान वांकविणें भाग पडेल परंतु शिरीं घेतलेल्या राष्ट्रीय कर्तव्याची मात्र क्षणभर सुद्धां विस्मृति पडतां उपयोगी नाहीं.

---

## हें खरें कारण आहे.

सद्यास्थितीसंबंधानें 'इंडियन वर्ल्ड मासिक पुस्तकाचे विद्वान संपादक बाबू पृथ्वीशचंद्रराय यांचे विचार अगदीं सत्य आहेत. ते ह्मणतात,'सध्यांच्या राज्यपद्धतीला जास्त सहानुभूतिपर व न्यायी स्वरूप देऊन, तिच्यांतील अनिष्ट प्रकार काढून टाकून लोकांना ती हावीशीं करण्याचें आमचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले हें सध्यांच्या अस्वस्थतेचें व असमाधानाचें मुख्य कारण आहे. तुमची राज्यपद्धति मोठी चांगली असेल, पण तेवढ्यानें भागत नाहीं. ती तशी आहे असें आह्माला वाटेल असा तुह्मी प्रयत्न केला पाहिजे. राजनिष्ठेचें बीजच यांत आहे. ही नाहीं तर ती सुधारणा घडवून आणावी ह्मणून प्रयत्न करण्यांत, राज्यपद्धतींतील कांहीं हुकमांचा निषेध करण्यांत, राज्यव्यवस्थेंतील अत्यंत घातुक अशा जागा दाखवून देण्यांत हिंदुस्थानांतील अत्यंत श्रेष्ट पुरुषांनीं गेलीं वीस वर्षें घालविलीं. परंतु सर्व अरण्यरुदन झालें. ज्या गोष्टी अगदीं जरूर व्हावयास पाहिजेत त्या घडवून आणण्याची चालढकल करण्यांत येत आहे. ज्या सुधारणा व्हाव्यांत ह्मणून अतिशय ओरड आहे त्यांच्याकडे मुळींच दुर्लक्ष होत आहे. ज्या कायद्यांबद्दल अत्यंत तिव्रतेनें निषेध झाला ते झपाट्यासरसे पास करण्यांत आलेले आहेत. या पिढींत जबरदस्त ह्मणून महत्वाचे सार्वजनिक प्रश्न उपस्थित झाले होत त्या सर्वांच्या निकालाचे वेळीं लोकमताला सर्वस्वी धाब्यावर बसविण्यांत आलें होतें, आणि लोकांना नकोत अशा रीतीनें अशाच हजारों गोष्टी झाल्या आहेत. इतकें सर्व झाल्यावर सत्ताद्रोहाचें बीज रुजलें तर त्यांत आश्चर्य तें कसचें! आधींच उत्पन्न झालेली अस्वस्थता कित्येक निरकुंश लेखांनीं प्रज्वलित झाली यांत शंका नाहीं; पण त्या बरोबर हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे कीं राज्यकर्त्यांच्या उद्धटपणामुळें, हलकटपणामुळें आणि हिंदी समाजाविषयींच्या अनास्थेमुळें ही ज्वाला तितक्याच प्रमाणाने प्रज्वलित झालेली आहे.' डोळ्यांत बोट घालून वर कां रडतोस ह्मणून विचारणारास कोणत्या कोटींत घालावयाचा?

## दोन नवीं हत्यारें.

गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारच्या शिलेखान्यांत दोन नवीन हत्यारांची भर पडली. पूर्वीचीं हत्यारें अगदीं टाकाऊ होतीं किंवा तीं वापरणारांना त्यांचा दुरुपयोग करतां येत नव्हता असें जरी नाहीं तथापि बुद्धिभ्रंश झालेल्या मनुष्यास नव्या नव्या साधनांखेरीज अवसानच उरत नाहीं. खून किंवा तशाच प्रकारचा विशेष अडदांडपणाचा प्रकार घडून येण्याला उत्तेजन मिळेल अशा प्रकारचे लेख लिहिणाऱ्या पत्रकर्त्यांच्या मानेभोंवतीं तात बसविण्याची तयारी सिमल्यास गेल्या आठवड्यांत झालेल्या कायदेकौन्सिलच्या बैठकींत करण्यांत आली. त्याचप्रमाणें ज्वालाग्राही पदार्थांच्या उपयोगावर सक्त नजर ठेवण्यासाठीं जबरदस्त प्रायश्चित्ताची द्वाहीद्वी फिरविण्यांत आली. अशा प्रकारचे कायदे पाश्चिमात्य देशांत अनार्किस्टन व निहिलिस्ट लोकांसाठीं करण्यांत येतात. हिंदुस्थानांत या पंथाचा शिरकाव खात्रीनें झाला आहे असें जरी लोकपक्ष कबूल करीत नाहीं तरी सरकारी अधिकाऱ्यांचें मत त्याचें विरुद्ध आहे; मात्र या पथांचा प्रवेश पाश्चिमात्य देशांतून हिंदुस्थानांत झालेला आहे असें ते म्हणत आहेत. वास्तविक आमच्या समाजाच्या मनाची स्थिति अगदीं पूर्वीपासून अशा प्रकारची आहे कीं येथें अशा प्रकारच्या कल्पनांचें बीजच रुजूं नये. असें असतां हिंदुस्थानांत या कल्पनांना थारा मिळाला यांस निःसंशय कांहीं विशेष कारण झालेलें असलें पाहिजे, आणी तें नामदार व्हाइसराय यांनीं उघड बोलून दाखविलेलेंही आहे. गेल्या आठवड्यांत पूर्व बंगालचे माजी ले० गव्हर्नर सर बॅंफ्लीड फुल्लर यांनीं लंडन टाइम्समध्यें लिहिलेल्या पत्रांतील विधानें व लंडन टाइम्सनें केलेलें त्यांचें समर्थन हीं प्रत्यक्ष नांव न घेतां व्हाइसराय साहेबांनीं खोडून काढलीं. या वेळीं त्यांनीं जे उद्गार काढले त्यांतील आशय असा होता कीं सर फुलर यांच्या सारखे अदूरदृष्टी अंमलदार व त्यांचे समर्थन करणारे लंडन टाइम्स सारख्यांचे लेख हेच अनार्किस्टांची पश्चात्य कल्पना हिंदुस्थानांत पसरविण्यास कारण झाले आहेत. प्रजेची गाऱ्हाणीं ऐकावयाचीं नाहींत, आणी लोकमताला धाब्यावर बसवून मनास वाटतील तसे अरेरावीचे प्रकार चालू ठेवण्यांत सर फुलर यांच्या सारख्या शाहिस्तेखानी अधिकाऱ्यांस व लंडन टाइम्स सारख्या पत्रकर्त्यांस मोठी धन्यता वाटत होती. अशा धोरणानें वागून सर फुलर यांनीं आपल्या औट घटकांच्या कारकीर्दींत लोकांच्या विचारांत इतकी खळबळ उडवून दिली कीं शेवटीं त्यांचेकडून राजीनामा घेण्याची व्हाइसराय साहेबांस देखील आवश्यकता दिसून आली. लार्ड मिंटो यांच्या त्या वळच्या धोरणाला भेकडपणा म्हणण्यास सर फुल्लर हे आतां कां पुढें सरसावले आहेत व लंडन टाइम्सनेंही या वेळीं त्यांना इतकें उचलून कां धरलें आहे हें समजणें आतां मोठेंसें कठीण नाहीं. राज्यव्यवस्थेंत सुधारणा करण्यासंबंधाचे जे कांहीं प्रकार स्टेट सेक्रेटरी व व्हाइसरॉय यांच्याकडून व्हावयाचे आहेत त्यांना हाणून पाडण्याची ही लंडन टाइम्सची व त्यांच्या पक्षाची सारी खटपट आहे. गेल्या सोमवारीं सिमल्यास दोन नव्या कायद्यांची वाटाघाट होत असतां आपल्या पक्षाचें स्वरूप बेमुमार फुगवून सांगून राज्यव्यवस्थेंतील सुधारणा मागें ढकळण्यासाठीं हा प्रयत्न खात्रीनें करण्यांत आला असला पाहिजे. पण व्हाइसरॉय साहेब व सर हार्वे अडामसन यांनीं हा डाव ओळखून खरपूस असें उत्तर दिलें. हिंदुस्थानांत जें कांहीं माथेफिरू लोक उत्पन्न झाले त्यांचेबद्दलचे सर्व खापर सर फुलर व त्यांचे भोपे लंडन टाइम्स यांच्या माथीं फुटत आहे हें वर सांगितलेंच आहे. पण नुसत्या खापर फुटण्यानें हिंदुस्थानांतील लोकांच्या मागचा ससेमिरा मात्र चुकला नाहीं. कारण कोणीही झालेला असो, परिणाम हिंदुस्थानांतील लोकांनाच भोगावा लागणार आहे. चोराला सोडून संन्याशाला फांशी अशा प्रकारचा न्याय येथें उघड उघड होत आहे. चार दोन माथेफिरू लेखकांसाठीं, —त्यांना या शिवाय दुसरें विशेषण देणें कधींही वाजवी होणार नाहीं— सर्व पत्रकर्त्यांच्या डोक्यावर केसाला तरवार अडकावून ठेवावयाची ही सुधारलेली पद्धति आहे असें कोणी म्हणत असेल तर खुशाल म्हणो, आम्हाला तर यांत निखालस खुनशीपणाचा आणि रानटी कवडेपणाचा भाग आढळून येत आहे. लिटनशाहींतील प्रेस आक्ट सध्यांच्या कायद्याला शतपटीनें बरा खात्रीनें म्हणवील. आतांच्या कायद्यानें विचारी पत्रकर्त्यांना भीति बाळगण्याचें कारण नाहीं असें केवढेंही भरभक्कम आश्वासन देण्यांत येत असलें, तरी मनुष्य स्वभावांत जोपर्यंत अगदीं जमीनअस्माना इतका पालट झालेला नाहीं, तोपर्यंत इतक्या भयंकर स्वरूपाचें कायदेरूपी शस्त्र सरकारी अधिकाऱ्यांना हवें तेव्हां वापरण्यास मोकळें ठेवणें अत्यंत गैर आहे असेंच म्हटलें पाहिजे. अनर्किस्टांच्या मतांचा प्रवेश कसा झाला याबद्दल व्हाईसरॉय साहेबांचा तर्क जितका बरोबर आहे तितकाच त्या मतांच्या प्रसारासंबंधाचा तर्क चुकलेला आहे असें आम्ही सांगू शकतों. पास झालेल्या कायद्याचें स्वरूप पाहून एखाद्या अगदीं त्रयस्थास असें वाटेल कीं हिंदुस्थानांतील पत्रकर्ते सरसकट खुनाला आणि मारहाणीला प्रत्यही उत्तेजन देत आहेत. वास्तविक प्रकार याच्या अगदीं उलट आहे, इतकेंच नव्हे तर सरकारी कृतींवर निर्भिडपणें टीका करून लोकपक्षाचा पाठराखी करणाऱ्या बहुतेक वजनदार पत्रांनीं परवांच्या दोन युरोपियन बायांच्या खुनाबद्दल दुःख प्रदर्शित केलें आहे. असें असतां पास झालेल्या कायद्याची जरूर सरकारास वाटली हें निखालस उद्वेगजनक आहे. कायद्यांतील मूलभूत असलेल्या तत्वांचा तितक्या बारकाईनें विचार केला तर सध्यां पास झालेल्या कायद्या इतका हास्यास्पद कायदा कोणत्याही कायदे पंडितांनीं यापूर्वीं केला नसेल असें वाटतें. खून किंवा मारहाण अशा प्रकारांस उत्तेजन देणाऱ्या पत्राचा छापखाना सरकार जमा करविण्याची व्यवस्था करतांना हिंदुस्थान सरकारच्या कायदे पंडित सल्लागारांच्या दृष्टीपुढें कोणता प्रकार असला पाहिजे हें अगदीं स्पष्ट आहे. पण चार नेटाच्या माथफिरूंसाठीं सरकारला नवीन कायदा एका बैठकींत घाईघाईनें पास करून घ्यावा लागला ही समजूत होणें सरकारच्या इभ्रतीस वृद्धिंगत करणारी खास नाहीं. अलिकडे व्हॉइसराय व त्यांचे सल्लागार यांनीं देशी वर्तमानपत्रांचें वाचन फार बारकाईनें ठेवल्याचें दिसून येत आहे. त्यांतहि एका प्रांतांतील पत्रांकडे वाजवी पेक्षां जास्त नजर राहिलेली दिसते. पण बंगाल म्हणजे सर्व हिंदुस्थान नाहीं किंवा आतांपर्यंत युगांतर पत्राला कोणी जोडीदार निघाला नाहीं, या महत्वाच्या गोष्टींचें भान व्हॉईसराय साहेबांस व त्यांच्या सल्लागारांस कसें राहिलें नाहीं, नकळे! छापखाना जप्त करण्याविषयीं नवा कायदा करण्याचा अट्टाहास केवळ कलकत्ता हायकोर्टावर सूड उगविण्यासाठीं झालेला दिसतो. न्यायाच्या दृष्टीनें गुन्ह्याला साधन झाल्याबद्दल म्हणून छापखाना जप्त करतां येत नाहीं असा कलकत्ता हायकोर्टानें ठराव केला असतां, कायद्याच्या, सरकारी अधिकाऱ्यांच्या हुकमाच्या आधारांवर तेंच इच्छित कार्य घडवून आणण्याची ही व्यवस्था पाहून इंग्रजीराज्यांत न्याय व कायदा यांची फारखत झाली आहे अशी समजूत लोकांनीं करून घ्याक्याची कीं काय? आतांच्या या कायद्यानें सर्वसामान्य अशा वर्तमानपत्रांची मुस्कटदाबी करणारा कायदा करण्यास प्रत्यवाय येऊं शकावयाचा नाहीं अशी व्हॉईसराय साहेबांना सूचना दिली आहे. हा दुसरा कायदा केव्हां होणार याची वाट पहात पत्रकर्ते बसतीलच पण तो होण्यापूर्वीं सध्यां बाहेर आलेल्या कायद्यानें कोणकोणावर कसकशी घोरपड येते हेंच पहावयाचें आहे.

## राष्ट्रीय सभेचें पुनरुज्जीवन

अलाहाबाद येथील कॉन्व्हेन्शनच्या बैठकीनंतर राष्ट्रीय सभेच्या कामाचें पुनरुज्जीवन करण्याचें कार्य बहुतेक भिजतच पडलें आहे. बंगाल व वायव्य प्रांत येथील प्रांतिक परिषदा कान्व्हेन्शनच्या बैठकीच्या पूर्वी होऊन गेल्या. तथापि त्यांतहि कांहीं निश्चित असा कार्यक्रम आंखला गेला नाहीं. सुरतेच्या राष्ट्रीय सभेच्या बखेड्यांतील सर्व श्रेय ज्यांचेकडे येतें असें मुंबई इलाख्यांतील जहालपक्षीय पुढारी देखील राष्ट्रीय सभेच्या पुनर्रचनेसंबंधानें हताश झाल्यासारखेच दिसत आहेत. गेल्या महिन्यांत उन्हाळ्याचे सुटीनिमित्त ठिकठिकाणचे वजनदार लोक पुण्यास आले असतां उभयपक्षांत समेट करण्यासंबंधानें कांहीं वाटाघाट झाली, पण तिचें वास्तविक स्वरूप अद्याप बाहेर आलेलें नाहीं. मुंबई इलाख्याच्या प्रांतिक सभेची तर यंदा नुसती कुतरओढच झाली. धुळ्याच्या स्वागत मंडळींत दिलेलें वचन पाळण्याचा थोरपणा दिसून न आल्यामुळें उभयपक्षांची संयुक्त परिषद अशक्य झाली. धुळ्यास भरलेल्या परिषदेला जहाल परिषदेला जहाल परिषद हें यथार्थ नांव मिळालें; पण त्या परिषदेपासून आपलीं तोंडें लपवून घरीं बसलेल्या नेमस्त पक्षीय मंडळींनीं आपल्या मताप्रमाणें देखलि प्रांतिकपरिषद भरविण्याची तसदी कां घेतली नाहीं तें कळत नाहीं. आमच्या मध्य प्रांतांत तर परिषदेची कल्पना देखील लुप्तप्राय झाल्यासारखी दिसते. कॉन्व्हेन्शन कमिटीच्या ठरावाप्रमाणें वर्तणें सोइस्कर व्हावें म्हणून गेल्या इस्टरचे सुटींत भरणारी परिषद् पुढें ढकलण्यांत आली परंतु कॉन्व्हेन्शनची बैठक होऊन दोन अडिच महिने होऊन गेले तरी प्रांतिक परिषदेचें नांव मध्यप्रांतात कोणी काढित नाहीं. इतर प्रांतांपेक्षां मद्रास इलाख्यांत मतभेदाचा तीव्रपणा कमी आहेसें दिसतें ही आनंदाची गोष्ट आहे. मद्रासच्या महाजन सभेंत कॅन्व्हेन्शन कमिटीनें ठरविलेल्या तत्वांच्या धोरणावर आपलाहि कार्यक्रम ठरविला असून त्यांचा स्वीकार निरनिराळ्या जिल्हापरिषदांतून होऊं लागला आहे. नुकतीच तंजावर जिल्हापरिषदेची बैठक झाली. तींत अध्यक्ष या नात्यानें मि. जी सुब्रह्मण्यम् अय्यर यांनीं केलेलें भाषण उभयपक्षांतील हटवाद्यांस सर्वस्वी रुचलें नाहीं तरी परिस्थितीचा विचार करून कोणाही कार्यक्षम देशभक्तानें जसें भाषण केलें असतें तसेंच तें आहे असें आम्हास वाटतें. कॉन्व्हेन्शन कमिटीनें ठरविलेल्या नियमांत कोणालाही तक्रार करण्यास जागा उरलेली नाहीं, असें त्यांनीं प्रांजलपणें कबूल केलें आहे. उद्दिष्ट आणि अंतिम यांच्यासंबंधाचा वाद तूर्त बाजुला ठेवून सध्यां जेथवर मजल मारतां येणें सर्वांना शक्य व अवश्य वाटत आहे तेथपर्यंत चालून जाणें सुद्धां बरेंच कठीण काम आहे करितां आतां तो शुष्कवाद सोडून सर्वांनीं पुनः एकमेकांच्या मदतीनें राष्ट्रकार्य हातीं घ्यावें आणि आपआपल्याला योग्य दिसेल त्या मार्गा विषयीं कृतीनें दुसऱ्याची खात्री पटवून द्यावी असा मि. अय्यर यांच्या सांगण्याचा आशय होता. मि. सुब्रह्मण्यम अय्यर हे नवीन पक्षांतले एक प्रमुख आहेत पण त्यांनीं विचारास रजा दिलेली नाहीं. अशीं विनंत्याविषयीं नव्यापक्षांतील भिन्नभिन्न पुढाऱ्यांत बरेंच मतवैचित्र असल्याचे दाखले मिळालेले आहेत. तेव्हां आपल्याच पक्षांत ज्याचे संबधानें एक वाक्यता नाहीं त्याचें लोढणें दुसऱ्या पक्षाच्या गळ्यांत अडकवूं पहाणें किती वेडेपणाचें आहे हें सांगावयास नकोच. असली धरसोडीची खुसपुटें पुढें करून राष्ट्रीय सभेच्या कामाची हेळसांड यापुढें होऊं नये अशा आमची सूचना आहे.

## वऱ्हाडवृत्त.

हवामान— पावसाळ्याला सुरवात तर बहारीची झाली. आकाश आभ्राच्छादित असतें. उष्मा फार होतो. पावसामुळें हवेंत शितलाई आली आहे. हीं सर्व भावी पर्जन्याचीं सुचिन्हें होत. रोगराई विशेष नाहीं.

व्याख्यान—रामकृष्ण बाळाजी ओक वकील यांचें काल सायंकाळीं श्रीराम थिएटरांत राष्ट्रीय शिक्षण या विषयांवर दुसरें सुरस व्याख्यान झालें. राष्ट्रीय शिक्षणासारखा विषय एकाच आठवड्यांत सांगण्यासारखा नसल्यामुळें तो दुसऱ्यांदा विस्तृतपणें सांगण्यास लोकांनीं त्यास भर सभेयच्यें विनंती केली होती त्या विनंतीस मान देऊन त्यांनीं आज व्याख्यान दिलें याबद्दल त्याचे आभार प्रत्यकानें मानावें.

कळविण्यास फार दुःख वाटतें कीं रावसाहेब विष्णु सदाशिव बापट यास ता. ७ रोजीं दुपारीं १ वाजतां मधुमेहाच्या आजारानें देवाज्ञा झाली. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

## नोटीस

नोटीस बेशमी गणेश परशराम पळसोकर मुक्काम लाईत यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मौजे लाईत येथील सर्वे नंबर ३९ व ३३ व मौजे खरब येथील सरव्हे नंबर ९, ६ व ११ या नंबरचें खाते माझे नांवें आहे. तुम्ही माझे सख्खे चुलते आहतां वरील पांची शेतें माझे हिश्यांत आलीं या शेतांवर तुमचा बिलकूल हक्क नेमून तुमची शेती या शिवाय लाईत येथें निराळी आहे. तुझी वरील माझे हिश्यांत आलेली शेती गाहाण ठेवणार असें माझे ऐकिण्यांत आल्यामुळें नुकसान या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं वरील माझे हिश्यांत व माझे कबज्यांत असलेलें शेतीवर तुमचा बिलकुल हक्क नाहीं. वरून तुम्हास माझी शेती कोणापाशीं गाहाण वगैरे कोणत्या रितीनें ठेवण्यास अधिकार नाहीं कळावें. ता. ८-६-०८ इ.

सही

जनार्दन सदाशिव पळसोकर रा.
न. ग. ३२ मुर्तिजापूर. द. खु.

## जाहिरात

खालीं सही करणार यांजकडून जाहिर करण्यांत येतें कीं वरील शेती माझी आहे ती माझा चुलता गणपतराव पळसोकर हे गहाण ठेवणार असल्यामुळें सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं या शेतीवर गणपतराव याचा बिलकूल हक्क नाहीं व ही शेती गहाण ठेवण्यास गणपतराव यास अधिकार नाहीं. तरी ही शेती कोणी गहाण ठेऊं नये गहाण ठेवल्यास अगर खरीदी घेतल्यास त्या रकमेचा जबाबदार मी नाहीं. कळावें. तारीख ८-६-०८

सही

जनार्धन सदाशिव पळसोकर राहणार
नं. ग. ३३ मुर्तिजापूर.

## नोटीस

नोटीस बेशमी घनःशाम वलद गणपत कुणबी राहणार चंडेकापूर तालुके आकोट यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही माझे भ्रतार आहां परंतु मला माझे बापाकडची इस्टेट मिळाल्यापासून मी आपले बापाचे घरीं राहत आहे व माझे बापानें माझे करितां चेडकपुर येथें घर बाधून दिलें आहे. व हल्लीं त्यांत तुम्ही राहत आहां हल्लीं मला असें समजलें आहे कीं तुम्ही माझे बापानें मजकरितां बांधून दिलेल्या मकानाची व मला दिलेलें शेतीचा विल्हेवाट करणार आहां तर तुम्हांस विल्हेवाट करण्याचा कांहीं हक्क नाहीं. त्या इस्टेटीची मी मालकीण आहे करिता या नोटिशीनें तुम्हांस जाहीर करण्यांत येतें कीं तुम्ही घराची व शेतीचीं विल्हेवाट करूं नये अगर कोणास गाहाण किंवा खरेदी वगैरे देऊं नये. दिल्यास मी जबाबदार नाहीं ही नोटीस दिली. कळावें तारीख ३-६-०८

सही

तानी मर्द घनःशाम कुणबी
रा. चेडकापूर इची बांगडी
नं. ग. ३४

## नोटीस

बेशमी संपतराव गोपाळराव देशमुख राहणार बोरगांवमंजू तालुके आकोला यांसः—

माधवराव अचलितराव देशमुख राहणार पारध तालुके मुर्तिजापूर जि० आकोला यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं बोरगांव मंजू तालुके आकोला येथील तुमचे मालकीचा जागा त्यांस असलेल्या जोत्यामुद्दां व शिकस्त भिंती मुद्दां यांस चतुःसिमा पूर्वेस साधारण रस्ता व पल्किडे सयद महेबुब यांचें घर पश्चिमेस सयद महबूब यांचें घर उत्तरेस सयद महबुब याचें घर व दक्षिणेस शिवराम कवडाजीचें घर सदर्हू स्थावरमाल तुम्ही आम्हास किंमत रुपये २०० दोनशे यांस पंचासमक्ष विक्रत दिलें आहे. सबरजिस्टर कचेरींत सदर्हू संबधानें खरीदीखत लिहून देऊन रुपये घ्यावे असें ठरलें आहे. ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत खरीदीखत [illegible]न करून दिल्यास कोर्टीत दावा करून खरेदीखत व ताबा घ्यावा लागेल व सर्व नुकसान तुम्हास द्यावी लागेल. इतर लोकांनीं सदर्हू जागा विक्रत घेतल्यास ती विक्री रद्द समजली जाईल कळावें तारीख ९-६-०८ इ. दस्तूर विष्णु प्रभुराम अर्जनवीस. आकोला द. खु.

सही

माधवराव अचलितराव देशमुख द. खु.
नं. ग. ३५ रा. पारध ता. मुर्तिजापूर

## नोटीस

बेशमी श्रावणपुरी वल्द नारायणपुरी गोसावी रहाणार वाकद तालुका वाशीम यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची गंधर्वाची बायको असून आज पांच वर्षे झालीं तुम्ही मला वागवीत नाहीं मी आपले आईबापाचे घरीं राहून आज पावेतों खाण्यास ह्मणून कर्ज २८४ रुपये सावकारी काढून मी आपला उदरनिर्वाह केला. तरी माझेकडेस कोणता दोष आहे. व तुम्ही मला कां वागवीत नाहीं. याजबद्दल मला १५ दिवसाचे आंत समर्पक उत्तर देणें. उत्तर न आल्यास तुमची कोणतेच प्रकारची तक्रार न ऐकतां मी गंधर्वानें दुसरा नवरा करीन, व माझ्या नीर्वाहास लागलेला पांच वर्षांचा खर्च २८४ रुपये तुम्हांस भरून द्यावा लागेल. कळावें दस्तुर बाबुसींग खुशालसींग रजपुत राहणार उबर्डाबाजार ता. ४-६-०८

सही

सहीची नीशाणी लक्ष्मी मर्द श्रावणपुरी गोसावी मुक्काम सावरगांव तालुका मंगरूळपीर
नं. ग. ३६ ईचे हातची बांगडी असे

## नोटीस

रा. बाहादु वल्द रूंजाजी देव लाड माळी राहणार पातूरशेकबाबु ता. बाळापूर यांसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं तुम्ही माझी बहीण नामे मुक्ती ईस पाटानें वरले या बद्दल माझे नावें ता. २३- ११- ९९ रोजीं करारनामा लीहून दिल्याप्रमाणें त्यांत तुम्ही लग्नाची पहीली बायको नामे भागी ईस फारकती देऊन देणे आपण रुपये ४२० घेतलें प्रमाणें करारनाम्याच्या शर्ती प्रमाणें रुपये २१० मला तुमचे पासून घेणें असल्यानें तें तुम्हांस मागीतलें असतां देणार नाहींत यासाठीं कळविलें जातें कीं ही नोटीस पावल्यापासून चार दिवसांत सदर्हु रुपये देऊन पावती घ्यावी तसें न केल्यास रीतीप्रमाणें तजवीज होऊन त्याचा खर्च तुम्हांस सोसावा लागेल. कळावें. ता. ७-६-०८

सही

निशाणी चिमणाजी वल्द गंभीरजी माळी रा. पातुरसेखबाबु
नं. ग. ३७ ता. बाळापूर.

## नोटिशीचें उत्तर

मी खालीं सही करणार यांजकडून नोटीस ललुसींग वल्द देवमणसींग रजपुत वस्ती मौजे आंदुर तालुके बाळापूर जिल्हे आकोले यांस नोटीस देण्यांत येते कीं आपली ता. २७-३-१९०८ इसवीची नोटीस वतनदार प्रेसांतून मिळाली. मजकूर समजला. मी गोपाळ व दयाळ वल्द लटपट रजपुत रा. कारंजारमज्यानपुर तालुके बाळापूर याचा अ. पा. नाहीं. त्याचें शेत सर्वे नं. ४९ यांत आपण निमें हिस्सा सांगतां हें ह्मणणें आपले केवळ लेकांचें घर घेण्याचें आहे यांत कांहीं फरक नाहीं कळावें ता. ६ ६ १९०८ इसवी

सही

श्यामसींग वल्द बाबुसींग रजपुत रा. कारंजरमज्यापुर तालुके बाळापूर निशाणी खुद हातची
नं. ग. ३८

## नोटीस

भिमी मर्द गणपत निवणे तेली राहणार देवधावे ता. मलकापूर यासः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी भावसून आहेस आमचा धाकटा भाऊ तुझा नवरा गणपत याला मरण्याला ९ महिने झाले. इतके दिवस तूं आमच्या येथेंच राहत असे. आमचा भाऊ गणपत हा जिवंत होता तेव्हां मुद्दां सर्वजण एकत्रच होतो. फक्त घरांत बायकाबायकांच्या भांडणा मुळें चुलीच तेव्हढ्या निराळ्या झाल्या होत्या. बाकी शेत वगैरे सर्व समाईक इस्टेटींतच होतें. व त्याचा उपयोगही समाईकींतच घेत होतो. आपली वाटणी कांहीं झाली नाहीं. आतां तूं हिस्सा निराळा मागतेस हिस्सा घेऊन विकून टाकून दुसरा गंधर्वाचा नवरा करण्याचा तुझा विचार दिसतो तर या नोटिशीनें तुला असें कळवितों कीं. तुझा आतां इस्टेटीवर हक्क अन्नावस्त्राचा आहे. तो तुला आमच्या घराण्यांत अहेस तोपर्यंत देण्यास मी तयार आहे. व पोरीचें लग्नही करण्यांस मी तयार आहे. या शिवाय तुझा हक्क कांहीं नाहीं असें असतांना जर तूं ती जिनगी गहाण खरेदी बक्षीस अगर पट्यानें देशील तर तें बातल समजलें जाईल. व त्या बद्दल जबाबदार मी अगर माझी इस्टेट होणार नाहीं. त्याबद्दल जबाबदार व्यवहार करणारेच राहतील. कळावें. ता. ९-६-०८

सही

बेनु वल्द किसन तेली रा. मलकापूर साळीपुरा दस्तुर खुद
नं. ग. ३९

## जाहिरात

सर्वत्र शेट सावकार व इतर लोक यांस—

खालीं सही करणार यांजकडून सर्वत्रांस असें कळविण्यांत येतें कीं आमची भावसून भिमी मर्द गणपत ही आमच्या समाईकीची इस्टेट स्थावर व जंगम विकणार आहे ह्मणून सर्वत्रास असें कळवितों कीं हीची फक्त इस्टेटीवर अन्नावस्त्राची मालकी आहे. व ती देण्यास मी तयार आहे व तिच्या मुलीचें लग्न करण्यास तयार आहे. इतकें असून ती इस्टेटींतील निमे हिस्सा विकणार, गहाण, बक्षीस अगर पट्यानें देणार आहे. तर तिजपासून तो कोणी कोणत्याही करारावर आमच्या संमतीशिवाय घेऊं नये घेतल्या त्या बद्दलची जबाबदारी माझ्यावर व माझ्या इस्टेटीवर नाहीं. तर त्याची जबाबदारी व्यवहार करणारावरच राहील. कोणी फसूं नये ह्मणून अगाऊ सुचना दिली आहे. कळावें. ता. ९-६-०८

सही

बेनु वल्द किसन तेली रा. मलकापूर दस्तुर खुद
नं० ग० ४०

## नोटीस

मे. बळवंत रामचंद्र लांडगे ब्राह्मण रा. यवतमाळ ता. व जिल्हे यवतमाळ यांसः—

शेखदाऊद वल्द शेखममूद इजारदार पाटील मौजे विरकुंड प्र. वणी ता. वणी जिल्हा यवतमाळ यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझा वडील बंधू अबदुलकादर वल्द शेखममूद यांनीं राजपेठ प्र. वडनेरा तालुका व जिल्हा उमरावती येथील सर्वे नंबर ७ एकर गुंठे ७४३६ आकार २५॥= यांत असलेला बगीचा तुमचे पासून पाच वर्षाकरितां मक्त्यानें केला होता. त्यास दोन वर्षे झालीं. हल्लीं ते मयत झाल्याकारणानें त्या बगीच्याची वहिवाट आमच्यानें होऊं शकत नाहीं ही नोटीस पावल्यापासून आपआपल्या बगीच्याची हर प्रकारे व्यवस्था करावी पुढें कोणत्याही प्रकारची नुकसानी झाल्यास त्याजबद्दल आह्मी जबाबदार नाहीं करितां ही नोटीस दिली असे ता. २६-६-१९०८ इ.

सही ( इंग्रजींत )

शेखदाऊद इजारदार
नं. ग. ४१

## आर्यवनौषधालय मुर्डी

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांजकडील आनररी असिस्टंट सर्जन मा. अ. स. डॉ. विश्राम रामजी घोले यांनी आमची औषधें बरेच हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत असतात त्याहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट आह्मास दिले आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देउनही त्याचें आरोग्यार्थ आणखी एखादे औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजविनी

धातुवर्धक. अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्य स्तंभक,
रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सूवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

**शरीरांतील मुख्य राजा जी धातू ती शुद्ध असेल तरच शरिर निरोगी राहुन सर्व सौख्य प्राप्त होते. ती दोषी असेल तर शरीरांत नाना प्रकारचे** रोगरुपी शत्रु उत्पन्न होऊन शारिरीक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ट होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी पाहिजे त्या दिवसांत एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेववें याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात उन्हाळे इंद्रियशिथलता, कडकी. गर्मीसंबंधी मुरलेले विकार मुत्रसंकोच; धातुचा पातळपणा, स्त्रियाची धुपणी, छातींतील रोग, हात पाय मुत्रमार्ग. व नेत्र याचा दाह, क्षय, पंडूरोग, मुळाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश पित्तविकार. बाळंतरोग, मधूमेह जुनाट परमा, मुष्टीमैथूनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरें होऊन शरीर निरोगी मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त याची शुद्धी वृद्धि वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न प लागते त्यांस उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत. करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळाली आहेत आणि मिळतात. **पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष मुलें, यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितीही घेणारास टपाल खर्च माफ आहे ४ रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनुपान खर्डा सोबत किंवा व्ही. पीनें खालील पत्यावर मिळतील.**

**दर:-एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु. ११५ गो ३ रु १६५ गो. ४ रु. २७५ गो० ६ रु. ५५० गो० रु.**

**२ अपूर्व नेत्रांजनः-यानें पडळ, साहर, फुल, खुपऱ्या, बिंदु, कांच इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरीत बरें होउन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खरें रामबाण आहे.** १॥ तोळ्याच्या डबीस १ रु.

३ परम्यावर अपूर्व मिश्रण:--कोणताही नवा जुना परमा व उजन्य दहा तिडीक मुत्राची लाली, संकोच पुपस्राव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नसता सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ १। भार बाटलीस रु. २

३ दंतबलवर्धक पूड:–दंतसंबंधी सर्व विकार उत्तम बरे होतात.

५ विंचूचें विष:–औषध लावतांच उततें मुळीं ३ तो. ८ आणे

६ गजकर्ण:–खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ७ दिवसांत जातात रु. ६ आणे

७ सर्व हिमज्वर:–औषध घेताच कशाहि प्रकारचें ज्वर असले तरी तें औषध घेताच जाऊन पुन: उलटत नाहींत. १२ पुड्या १ रु.

८ प्लेगावर रामबाण औषध:–आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरें झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रह तापावर गोळ्या गाठीस मलम, वात चढू नये ह्मणून वातावर मात्रा याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं. २ आणे ख. सो.

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपाय-कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगावर अनेक औषधें ग्रंथोक्त रसायने भस्म पाक. गुटिका, आसव, तेलें, सूगंधी अत्तर, माफक दरानें मिळतात. अनुपान खर्डा सोबत टपाल खर्च वेगळा पडेल रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. **प्रकृतीचें** मन कळविल्यास रोगाची निदान चिकीत्सा कळवूं.

## अत्यंत आगत्यची सुचना.

हल्लिंवर्तमान पत्रांतून औषधाच्या अनेक जाहिराती सुरु असुन प्रत्ये आपला समाज निरुद्योगी व आळशी बनल्यामुळें एकानें जो धंदा सुरू केला त्याचेच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजे त्यानें करावें आमचे जाहिरातीस कोकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजिलें वगैरे गावांतून तो र्णावस्थेंत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरूं होत आहेत. अशा जाहिराती किंवा तें लोक याची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याचा तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हेंच कीं ज्यांचा कारखाना आज सतत १५।२० वर्षें अव्याहत सुरूं असून ज्यांच्या औषधास घोले डाक्टरांनी सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधानें कित्येक ग्राहक रोगमुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचीच औषधें नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करतां अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याणकारक असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेंस आणण्याची खटपट करूं. आज-पर्यंत आमचे खटपटीनें यशहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्य बंधूंस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तीच सर्वांनीं वापरावा, एकवार अनुभवानें खात्री होईल इतर जाहिरातींशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषध मागणें तीं खालील पत्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरी गुणकारक औषधें मिळून हटकूण व त्वरित आरोग्य येईल. नं. १

**कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य**

**पत्ता:—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.**

## ORIENTAL GOVERNMENT LIFE ASSURENCE COMPANY LIMITED

*Established* 1874.

*HEAD OFFICE*—**BOMAY**

Chief Agency for C. P. Berar and Khandesh

*Head—Quarters—Nagpur C. P.*

## FUNDS EXCEED THREE CRORES AND TEN LAKHS

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

**IMMEDIATE SETTELEMENT OF CLAIMS**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. *This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating their clients with the utmost liberality*

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's funds amount ot a givensum, but it is essential to know how such Funds are invested— if in miscellaneous and risky investments or how secured

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured

*Government Officers, Professional men, Tradesmen and others,* by employing a portion of their annual income or profits in effecting life policies t once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he dies early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay There are numerous instances in the records of the "Oriental" where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to—

M. De SOUZA,
CHIEF AEGNT
Nagpur.

N. 2

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

## नोटीस

रा. रा. श्रवण वा चंद्रभान मसके राहणार बारशीटाकळी ता० आकोला वऱ्हाड यांसः—

खालीं सही करणार सजनी मर्द श्रवण मसके राहणार मनाडीं तालुका जळगांव प्रांत वऱ्हाड इजकडून नोटीस देण्यांत येते कीं. मी तुमची लग्नाची बायको असून लग्न होण्यास सुमारे १० वर्षे झालीं. लग्न झाल्यावर तुह्मी मला पहिलें मूल वगैरे कांहींच केलें नाहीं. लग्न झाल्यापासून मी माझे आईबापाचे घरीं आहे. मला घेऊन जाण्याबद्दल माझे आईबापानीं तुह्मास निरोप पाठविले परंतु तुह्मी मला नेण्यास आला नाहीं. सुमारे ३ वर्षे झालीं माझे बापाने मला तुमचे घरीं आणून घातले. त्यावेळीं ६ महीनें मी तुमचे घरीं होतीं. परंतु ते मला चांगल्या रीतीनें वागविले नाहीं. पूढें तुह्मी वाईट चालीमुळें तुरुंगात पडला. त्यावेळी १। महीना तुरुगांत होता. तुह्मी सुटून आल्यानंतर मला मारहाण करून माझी खुशी नसतांही मला जबरदस्तीनें घरांतून काढून दिलें. तेव्हांपासून मी माझे बापाचे घरीं आहे माझे बापानें मला घेऊन जाण्याबद्दल निरोप पाठविले परंतु तुह्मी घेण्यास आला नाहीं व आतां पुढें याल अशी आशा दिसत नाहीं. हल्लीं मी तरुण आहे या मुळें माझा संसार फुकट जात आहे. ह्मणून नोटीस देणें भाग पडले. माझे अन्नवस्त्राबद्दल दरमहा ४ रुपये प्रमाणें ६ वर्षांची खावटी बद्दल २८८ रुपये व या नोटीशीचा खर्च देऊन नोटीस पावल्या पासून १५ दिवसांचे आंत मला घेऊन जावे. व रुपये माझे बापास देऊन त्याची पावती घ्यावी व मुदतींत मला घेऊन जावे. तुह्मी न आल्यास हीच फारकती समजून जातीः रिवाजाप्रमाणें मी मोहतराचा नवरा करीन. मग नवरेपणाचा माझेवर हक्क रहाणार नाहीं. हल्लीं मी २।३ दिवस झाले बोदवड पेठा येदलाबाद तालुका भुसावळ जि० खानदेश येथें रहाते निवाजी सदु याचे घरी आहे. तेथें तुह्मी यावें. कळावें. ता०१०-९-०८ इ.

सही

सजनी मर्द श्रवण रा. मनाडीं हल्लीं मुकाम बोदवड पोष्ट यदलाबाद जि० खानदेश नि० खु. बांगडी.

नं. ग. ४२

## जाहिरात

तमाम शेगांव आणि अंवतर सर्वत्रास जाहिर करण्यांत येतें कीं मौजे मानेगांव ता. खामगांव येथील सर्वे नंबर १९।२०।२१ ह्या शेतासंबंधानें आमचा वादा आहे तरी तसें तें कोणी करूं नये केल्यास रद्द समजली जातील.

सही

जेमाजी राघोजी सांगोकार माळी शेगांव दस्तूर खुद्द

नं. ग. ४३

## नोटीस

पुंनी मर्द तुकाराम मायले रा. असलगांव ता. जळगांव यांसः—

खालीं सही करणार यांजकडून असें कळविण्यांत येतें कीं तूं ता. १-९-०८ च्या अकांतें दिलेली नोटीस पावली. तूं माझी चुलत पुतण सून असून तूं ह्मणते कीं तुमच्या आमच्यांत ४-५ पिढ्याचे अंतर आहे हें खोटें आहे. दुसरे ह्मणतेस कीं तुह्मी शेती विकता गहाण खरेदी वगैरे देतां तर ते ही अगदीं खोटें आहे. आह्मी आजवर कोणास कोणत्याही प्रकारें इस्टेट लिहून दिली नाहीं असें असून तूं आह्मावर खोटी नोटीस दिलीस तर तुला या नोटिशीनें असें कळवितों कीं तूं जवान पोरगी आहेस. आमच्या घरांतील जिनगी विकून गहाण बाक्षिस वगैरे देऊन तूं दुसरा घरठाव करून आपल्या भावाचें घर भरणार आहेस. तुझा नवरा ह्मणजे आमचा पुतण्या तुकाराम मेला तेव्हां त्याला फक्त १५० रुपये खातें असावे ह्मणून कर्ज होतें व तो मेला तेव्हां त्याजजवळ २५ तोळे सोनें, २०० तोळे चांदी १० खंडी जवारी, पांच बैल, तीन गाई, एक वगार व घरांतील सामान २००-२५० रुपयांचे व शेती ४० एकर जमीन व यंदाच्या पिकाचे ६०० रुपये इतकी जिनगी तुझ्या ताब्यांत होती. तूं या सर्व इस्टेटीचा उपभोग आमच्या कुळांत आहेस तोपर्यंत घ्यावा तूं ह्मणशील कीं मी सर्व जिनसा भावास वगैरे देऊन मग गंधर्व करून दुसरा नवरा करीन तर होणार नाहीं. या सर्व जिनगीवर तूं मेल्यानंतर आमची मालकी आहे तुला कर्ज काढण्याचें कांहीं कारण नाहीं. तुला खाण्यापिण्यास देण्यास आह्मी तयार आहो. हें असेल तर दत्तक घे. आह्मांस आतां असें समजलें कीं तूं शेती गोविंदा वल्द मारुती रंगारी याजवळ १२०० रुपयास पोकळ गहाण आह्मास फसविण्या करितां दिलें आहेस. तर ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाच्या आंत तूं खालील गोष्टींचा जबाब द्यावा.

(१) तू आमच्यावर खोटी देण्यास कारण काय.

(२) तूं जवळच्या इस्टेटीची काय व्यवस्था केली. शेत पोकळ गहाण देण्यास कारण काय. व जर पोकळ गहाण दिलें नसेल तर गहाण देण्यास तूला कोणते कारण झालें.

वरील गोष्टीचे आठ दिवसाच्या आंत उत्तर न दिल्यास पुढें आह्मीच शेती लाऊन काढूं. तें पोकळ गहाणखत बातल असें. आमचे मध्यें पेरणीचे वेळीं आड येऊं नये. आल्यास त्याबद्दल योग्य व्यवस्था केली जाईल. व या नोटिशीच्या खर्चासुद्धां सर्व रकम भरून घेऊं. कळावें ता. ६-९-०८ इसवी

सही


१ धनु वल्द चिणकाजी कुणबी रा. असलगांव नि. खुद्द

१ सदु वल्द सोनाजी कुणबी रा. असलगांव नि. खुद्द

नं. ग. ४४

दोन घडयाळें एकदम बोलाविणाऱ्यास पोस्ट खर्च माफ.

गजकर्णाच्या २४ शिशया बोलाविणाऱ्यास रा. सिस्टम घडयाळ बक्षीस सखळी मुद्दां दर शिशीस ।.



रासकोप सिस्टम किं. रु. ३। स्वदेशी पेटेंट वाच किं. रु. ५। सहा हिरे वाली रु. ४। आठ दिवसाच्या कीलीचे खिशातील घडयाळ रु. १४ सेलजर वाच मजबुत रु. ५। स्वदेशी सेकंड वाली रु. ६ पोस्टखर्च ।-

कं. नुरा आणि कं.

नं. ४७ मुंबई पोस्ट न. ९

त्वरा करा ! त्वरा करा?

### बायसिकल टीचर

आमचेकडे सायकल फार थोड्या वेळांत आणि उत्तम रीतिनें शिकाविले जाईल दर माफक असून वक्तशिर काम केलें जाईल आजवर ५०० शे माणसापेक्षां जास्त लोकांस सायकली शिकविल्या आहेत. बाहेर गांवच्या लोकांकडून रेल्वेभाडे व जेवण खर्च घेतला जाईल. सायकली ही दुरुस्त केल्या जातील. नवीन सायकली विकत मिळतील.

जेकब.
सायकल टीचर.

पत्ताः----
अहमद अली कासमजी बोहरा
नं ४८ इ. ७ आकोला ( शहर )

## जोगळेकर आणि मंडळी लिमिटेड.

**सरकारच्या सन १८८२ च्या सहाव्या आक्टाप्रमाणें रजिस्टर केली आहे.**

स्थापना सन १९०७

**भांडवल एक लक्ष रुपये.**
**प्रत्येक भाग २५ रुपयाचा**
**याप्रमाणें एकंदर भाग ४०००.**

भागीदारानें भाग मिळण्या करितां अर्ज करते वेळीं दरएक भागाबद्दल अर्जासोबत रुपये १० व अर्ज मंजूर झाल्यावर रु. ५ व बाकीची रकम प्रत्येक महिन्यांला रु. ५ प्रमाणें पुरी करून दिली पाहिजे.

सदहू कंपनीचें मेमोरँडम् व आर्टिकल्स ऑफ आसोसिएशन आकोला येथें सदर कंपनीचें आफिसांत पाहण्यास मिळेल. प्रास्पेक्टसच्या प्रती सदहू आफिसांत अर्ज केला असतां मिळतील.

बोर्डाच्या हुकूमावरून

**पी. सी. जोगळेकर आणि कंपनी म्या. एजंटस्**

नं. १३

## देशी दवाखाना

**( वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर यांचा**

आह्मी आमचा दवाखाना पुन्हा चालू केला आहे. शास्त्रोक्त रीतीनें औषधें तयार केलेलीं असतात. चिकीत्साहि काळजी पूर्वक होत असते हें सर्व श्रुतच आहे. गरजूं लोकांनीं अनुभव घेऊन पाहावा. भस्म, मात्रा, पाक, गुटिका, वगैरे विक्रिस तयार आहेत. गरमी, उपदंश, प्रदर, धुपणी, बाळंतरोग, पंडु इत्यादि कष्टसाध्य रोग फार लवकर दूर होतात.

पत्ता— वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर आकोला येथें शहरांत मुळीचे शाळे जवळ

चैत्रशुध प्रतिपदा शके१८३० आकोला

नं० ख० १

### आमचें पेटंट यंत्र लोकांना पसंत आहे.



मे. किर्लोस्कर बंधू बेळगांव यांस— सा. न. वि. वि. तुह्मी कृपाकरून पाठविलेलें कडबा कापण्याचें यंत्र सुरक्षित पोंचलें त्यानें कडबा फारच चांगला कापला जातो. सदरहु यंत्र इकडील लोकांना फारच पसंत पडलें आहे, व त्या बद्दल बऱ्यांच मागण्या आपणाकडे येतील. त्य मानाने किंमत ( रु. १०।१० ) ही फारच कमी ठेवलेली आहे. कळावें ही विनंती ता. ४-२-०८

सही

जहागीरदार सीप रीया काल ( ग्वाल्हेर ) } श्रीमंत नानसाहेब फाळके दफ्तरदार

नं. क. ३२

नहि सत्यात् परोधर्मः

# येवल्याचे पितांबर व पैठण्या

आह्मी येवले येथें तयार होणारे पितांबर-पैठण्या व खण वगैरे माल बाहेरगांवीं पाठवित असतो. माल खात्रीबंद माफक दरानें व योग्य अडतीनें पाठऊं. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जाईल. माल स्वस्त, मुबक व वक्तशीर पाठविल्याबद्दल आह्मास शेंकडों पत्रें आलीं आहेत.

पत्ताः—
श्रीनिवास बाळकृष्ण होळे जनरल मर्चंट व कमिशन एजंट.
नं. ७२ येवले.

# वऱ्हाडसमाचार.

BERAR SAMACHAR

वर्ष ४२ ] आकोला:– वऱ्हाडसमाचार, सोमवार तारीख २२ माहे जून सन १९०८ इसवी. [ अंक २३

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हा. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशिचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन आळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

---

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक

ह्या बँकेत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां घेतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागे राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमाच्या प्रती बँकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।१।०१ } G. A Phillips एजंट

नं ७१

---

आमचें पेटंट यंत्र लोकांना पसंत आहे.



मे. किर्लोस्कर बंधू बेळगांव यांस– सा. न. वि. वि. तुम्ही कृपाकरून पाठविलेलें कडबा कापण्याचें यंत्र सुरक्षित पोचलें त्यानें कडबा फार चांगला कापला जातो. सदरहु यंत्र इकडील लोकांना फारच पसंत पडलें आहे, व त्या बद्दल बऱ्याच मागण्या आपणाकडे येतील. त्या मानानें किंमत ( रु. १०४।० ) ही फारच कमी ठेवलेली आहे. कळावें ही विनंती ता. ४- ३- ०८

सही

जहागीरदार सीप रायी ( ग्वालेर ) | श्रीमंत नानासाहेब फाळके दफ्तरदार

न. क. ३२

---

### जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं शहर इलिचपूर येथील म्युनिसिपल कमेटीनें तारीख ९ माहे जून सन १९०८ इसवीचे स्पेशल जनरल कमेटींत वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचें कलम ११६ ( १ ) ( ई ) अन्वयें कोंडवाड्यांतील जनावरें सोडून नेण्या बद्दलचें खालीं लिहिलें प्रमाणें दर कायम केलें आहेत.

| | |
|---|---|
| हत्ती | चार रुपये |
| उंट किंवा ह्लैस | एक रुपया |
| घोडा किंवा घोडी किंवा खसी केलेला घोडा किंवा तट्टू किंवा शिंगा किंवा शिंगी किंवा खेचर किंवा खसी केलेला बैल किंवा खसी न केलेला बैल किंवा गाय किंवा कालवड | आठ आणे |
| गोजागोजी किंवा गाढव किंवा डुकर | चार आणे |
| एडका किंवा मेंढी किंवा मेंढा किंवा कोंकरू बकरें किंवा करडूं | दोन आणे |

तरी सदर्हूबद्दल ज्या कोणाची तक्रार असेल त्यानें ती आज ता० पासून एक महिन्याचे आंत आमचे कडेस लेखी अर्जानें करावी. म्हणजे त्याजबद्दल विचार करण्यांत येईल. वरील मुदतींत जर कोणाची तक्रार येणार नाहीं तर सदरहु वर लिहिलेले दर सर्वांना मंजूर आहेत असें समजलें जाऊन पुढें याबद्दल कोणाची कोणतेच प्रकारची तक्रार ऐकिली जाणार नाहीं. सदरहु नोटीस वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचें कलम १५० ( १ ) प्रमाणें देण्यांत आली आहे कळावें. ता. १५-६-१९०८ इ.

सेक्रेटरी.

नं. ग. ५८ म्यु० क० शहर एलिचपूर

---

### नोटीस

जैराम बापुजी बाजड डोणगांवकर, राजश्री रावजी रामजी टाले अरेगांवकर व रामासा चिमणसा सावजी साहू दुकान मेहकर यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं कसबे डोणगांव येथील शेतें सर्वे नंबर ९८ व १०० या दोन्ही नंबरचें खाते रुंजाजी हायवती पाटील राहणार डोणगांव यांचे नांवें असून त्या दोन्ही नंबरांत तुम्हा तिघाजणांचे प्रत्येकी चारचार आण्याचे हिस्से आहेत. रुंजाजी पाटील यांचा दोन्ही नंबरांतील चार आण्याचा हिस्सा मी ३६० रुपयांस विकत घेतला आहे व त्यास रुपये दिले आहेत. तरी तुम्हास या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं मी घेतलेला हिस्सा तुम्हास घ्यावयाचा असल्यास ही नोटीस पावल्यापासून पंधरा दिवसांचे आंत आमचे ३६० रुपये व या नोटिशीचा खर्च देऊन तुम्हा तिघापैकीं कोणीहि हिस्सा घ्यावा. नोटीस पावल्यापासून पंधरा दिवसाचे मुदतींत तुम्ही रक्कम देऊन हिस्सा न घेतल्यास त्यापुढें अग्रक्रिया अधिकार संबंधानें आमचे हिशावर तुमचा हक्क राहणार नाहीं व मग तुमची कोणतेही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. कळावें. ही विनंती तारीख ४ माहे जून सन १९०८ इ.

सही

पांडुसा बाळकृष्णसा रंगारी राहणार डोणगांव द० खु०

नं. ग. ५९

---

## वर्तमानसार

देवेंद्र कुमारसन नांवाच्या एका तरुणास बारिसाल येथील पोलिसांनी संशय येण्यासारख्या स्थितींत एका वेश्येच्या घरीं पकडलें. या तरुणाजवळ क्लोरो फार्म व हैड्रो सिनिक यांनीं भरलेल्या दोन बाटल्या होत्या. हा तरुण पलंगावर निजला असतां वेश्या एकदम किंकाळ्या मारीत उठली. देवेंद्र कुमाराजवळ असलेले ॲसिड तिच्या अंगावर पडल्यामुळें हा प्रकार घडून आला. तिच्या आरोळ्या एकून पोलीस त्या जागीं गेले व त्यांनीं देवेंद्रास पकडलें. देवेंद्रानें पोलीसपुढें पुढील आशयाची जबानी दिल्याचें बाहेर आलें आहेः– बॉंब गोळे व इतर ज्वालाग्राही पदार्थ तयार करण्याचे कामीं व्यग्र असलेल्या सोनथळ प्रगण्यांतील तीन पाहाडावरील सन्याशयाच्या टोळीपैकीं मी एक मनुष्य आहे. मोहनी मंत्रविद्या साध्य करण्याच्या कामाला स्त्रीची जरूर लागते, सबब मी इतक्या लांबून स्त्री पैदा करण्यासाठीं बारिसालला आलो. कोणी पकडल्यास आत्महत्या करतां यावी म्हणून हीं ॲसिडें मी आपल्या जवळ बाळगिलीं आहेत.

नाशिकचे गणेश दामोदर सावरकर यांजवर चीं. प्रे. मे. मि. ॲस्टन यांनीं इं. पी. कोडाच्या १२१ कलमाखालीं गुन्हा केल्याचा आरोप ठेवून त्यांस एक महिना सक्तमजुरीची शिक्षा दिली.

२३ महिने सक्तमजुरीची सजा झालेले युगांतरचे माजी मुद्रक फणींद्रनाथ मित्र यांजवरील दुसरा खटला फिरून आज रोजीं कोर्टापुढें निघाला. आरोपी कैद्याच्या पोषाखांत पिंजऱ्यांत येऊन हजर झाले. त्यांचेतर्फे काम चालविण्यास कोणी हजर नव्हते.

तिनिवेल्लीचे ॲडिशनल डिस्ट्रिक्ट मॅ. इ. एच. वॉलेस यांनी तिनिवेल्ली येथील दंग्याच्या खटल्यांतल्या तिन्ही तुकड्यांतील एकंदर ६९ आरोपीसंबंधानें निकाल सांगितला. ६९ आरोपींपैकीं १३ आरोपीस मॅजिस्ट्रेटनीं सोडून दिलें, व बाकीच्या ५२ आरोपीवर दंगा करणें, आग लावून नुकसान करणें वगैरे आरोप ठेऊन सेशन कमिट केले.

प्रतिवादी क्लार्क यांनीं केलेली झडती कायदेशीर नव्हती तथापि प्रतिवादी सद्हेतूनें वागले, झडती करण्याचीं कारणें काय हें प्रतिवादीनें नमूद केलेलें नाहीं व झडतीच्या वेळीं योग्य देखरेख ठवलेली नाहीं असा अभिप्राय देऊन जस्टिस फ्लेचर यांनीं प्रतिवादीनें वादीस नुकसानी दाखल ५०० रुपये व कार्टाचा खर्च द्यावा असा निकाल दिला. वादीच्या आईनें मि. क्लार्क यांजवर लावलेल्या दुसऱ्या दाव्याचा निकालही जस्टिस फ्लेचर यांनी याप्रमाणेंच दिला.

ता० १८ जून रोजी तिसऱ्या प्रहरीं मि. थार्नहिल यांजपुढें बॉंम्ब प्रकरणांतील नागेंद्रनाथ सेन गुप्त, धीरेंद्रनाथ गुप्त अशोक चंद्र नंदी, विजयरत्न सेन, छोटीलाल बोस व उल्हासकरदत्त यांजवरील खटला सुनावणी साठीं निघाला. हत्याराच्या कायद्याच्या १० व २० कलमाखालीं बाम्ब, बंदुका, ज्वालाग्राही पदार्थ वगैरे जिन्नस जवळ बाळगल्याचा आरोप वरील मंडळी वर आहे. दोन साक्षीदारांच्या साक्षी झाल्यावर मॅजिस्ट्रेटनें आरोपीस हायकोर्टाकडे सेशन्स कमिट केले.

काल ता० १८ रोजीं सायंकाळीं ८ वाजतां संपणाऱ्या २४ तासांत कलकत्ता येथें बारा इंच पाऊस झाला. जून महिन्यांत कलकत्ता शहरांत इतका पाऊस कधींही पडत नाहीं.

पंजाब, बंगाल व महाराष्ट्र या तीन प्रांतांचा एक जीव करून परस्परांतील ऐक्यभाव वाढविण्यासाठीं बंगाली लोकांनीं नवा उपक्रम सुरू केला आहे. पंजाबांतील व महाराष्ट्रांतील लोकांप्रमाणें पोषाक करण्याची, त्यांचीं नांवें ठेवण्याचीं व त्यांचे सणावर पाळण्याची बंगाली लोकांनीं सुरुवात केली आहे. कित्येक बंगाली लोकांनीं मराठी भाषा बोलण्याची सुरुवात मुद्दां केली आहे.

मुंबई इलाख्यांतील आणखी पंधरा वर्तमानपत्रावर खटलें होणार अशी बातमी मुंबईच्या 'सांज' ला लागली आहे.

दिनाजपूरहून आलेल्या ता० १३ च्या तारेंत पुढील मजकूर आहे—युगांतर पत्र न विकण्याचा हुकूम कित्येक व्यक्तींस दिल्यानंतर आतां युगांतर पत्र कोणी वाटूं नये किंवा वाटणारांस मदत करूं नये अशा आशयाचा सर्वसाधारण जाहिरनामा लागला आहे. या जाहिरनाम्याची एक नक्कल बार असोसिएशनच्या सेक्रेटरीकडे असोसिएशनच्या नोटिस बोर्डावर लावण्यासाठीं पाठविण्यांत आली. बाबू केदारनाथ नांवाच्या डिस्ट्रिक्ट इंजिनियरच्या आफिसांतील हेड क्लार्कास त्याच्या दुकानांत युगांतर पत्राच्या प्रती विक्रीस ठेवण्यांत येतात एवढ्या कारणावरून बडतर्फ करण्यांत आलें.

खुदीराम बोस यांजवरील खटल्याच्या चौकशीसाठीं जज्जाचे मदतीस नेमलेल्या दोघांही असेसरांनीं आरोपी दोषी आहे असा अभिप्राय दिला व जज्जसाहेबांनीं खुदीरामास फाशीची शिक्षा फर्माविली.

पुरेसा पुरावा नसल्यामुळें सरकारानें किशोरी मोहन बानर्जी यांजवरील खटला काढून घेतला.

सेशन्स जज्यांनी दिलेल्या फाशीच्या शिक्षेसंबंधानें हायकोर्टाकडे अपील करण्याची आपली इच्छा आहे असें खुदीराम बोस ह्यांनीं मुझफरपूर जेलच्या सुपरिन्टेन्डेन्टास कळविलें असें ह्मणतात. सेशन्स जज्जांच्या जजमेंटाची नक्कल मुझफरपूर तुरुंगाच्या सुपरिन्टेन्डेन्टांस देण्यांत आली आहे.

गुरुवारीं हुगळीच्या पोलिसांनीं छत्रगांवच्या प्रसिद्ध गौरंगा देवीच्या देवालयाची झडती घेतली. एक ब्राह्मण पोलीस सुपरिन्टेन्डंट जोडा वगैरे काढून देवळांत गेले परंतु त्यांना बॉम्ब किंवा दारुगोळा वगैरे कांहीं जिन्नस सांपडले नाहींत.

'सुमति' छापखान्यांत 'युगांतर' पत्र छापलें जात असें. ह्या छापखान्यांतून पोलिसांनीं पुष्कळ सामास नेलें. ह्या छापखान्याच्या मालकांनीं चीफ प्रेसिडेन्सी माजि० अर्ज केला होता त्याचा निकाल होऊन माजि० साहेबांनीं छापखान्यांतील टाईप तेवढा जप्त करण्याचा हुकूम सोडला आहे. प्रतिवादी तर्फेनें ह्या जप्त झालेल्या टाइपाची किंमत दोन हजार सांगण्यांत आली आहे. सरकारतर्फे कडून ह्या टाईपाची किंमत तीनशे रुपये होत आहे. टाइपा खेरीज इतर सामान परत करण्याचा मा० हुकुम केला.

कुइमतूर जिल्ह्यांतील करुर येथील सबडिविजन ऑफिसरांनीं काढलेल्या वारंटावरून शुक्रवारीं त्रिप्लिकेन येथें कृष्णस्वामी अय्यर नांवाच्या तरुण स्वदेशी उपदेशकास पोलीसांनीं पकडलें. कृष्णस्वामी अय्यर यांना चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटपुढें उभें करण्यांत आलें. मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं त्यांना जामिनावर सोडण्याचें नाकारून करुर येथें चौकशीकरितां पाठवून दिलें. गेल्या मार्च महिन्यात कृष्णस्वामी करुर येथें राजद्रोह कारक भाषणें करीत होते ह्मणून त्यांच्यावर खटला करण्याचा सरकारानें आतां विचार केला आहे.

वऱ्हाडसमाचार

जेष्ट वद्य ९ शके १८३०

## राष्ट्रीय कार्याचीं प्रधान अंगें.

हिंदुस्थानच्या राष्ट्रीय कार्याच्या मार्गांत दिवसेंदिवस नव्या नव्या अडचणी उतन्न होत आहेत. अशा वेळीं धैर्य न खचूं देतां तें कार्य कशा नेटानें तडीस नेण्याचा प्रयत्न करावयास पाहिजे याचें विवेचन मागील अंकांत स्वदेशी चळवळीचें उदाहरण घेऊन केलें. पण एकंदर राष्ट्रीय कार्याचा स्वदेशी चळवळ हा केवळ भाग आहे. आह्माला जें कार्य करावयाचें आहे त्यामुळें देशाची नुसती सांपत्तिक किंवा राजकीय स्थिति सुधारावयाची नाहीं. या दोन किंवा अधिक अंगांनीं आमच्या राष्ट्राची उन्नति झाली ह्मणजे आमचें कार्य संपलें असें कोणी समजूं नये. आज जो प्रश्न आमच्या समजापुढें आहे तो राष्ट्राला सर्वांगांनीं उन्नत अवस्थेप्रत नेण्यासंबंधाचा आहे. राष्ट्राचें स्वरूप अंतर्बाह्य सुधारण्यानेंच आमचें कार्य होणार आहे. हें कार्य समजांतील लोकांच्या नुसत्या विचारांत फरक पाडल्यानें होणारें नाहीं. नुसत्या उदात्त उद्दिष्टाविषयींच्या उहापोहानें किंवा स्वार्थ त्यागाकडे लोकांचीं मनें वळविल्यानें हें कार्य भागण्यासारखें नाहीं. आमच्यापुढें जें कार्य आहे तें समाजाच्या आचारविचारांत राष्ट्रीयत्वास अनुकूल अशा प्रकारची क्रांति घडवून आणण्याचें आहे. ऐहिक वास्तव्याविषयींची समाजाची जी कल्पना असेल, तिला नवें वळण लावून तदनुसार एकंदर समाजाच्या रचनेचें व व्यवहाराचें धोरण सर्वतोपरी राहिसें करण्याची तजवीज झाली पाहिजे. या प्रसंगीं 'पुराणमित्यवनच साधु सर्वम्' ही उक्ति सदैव ध्यानांत वागविली पाहिजे. अर्थात् जुन्यांत जें जें कांहीं सत्, चित् आणि आनंददायक असेल त्याचें अवश्य संरक्षण केलें पाहिजे. राष्ट्राची घडी पुनः बसावावयाची असें ह्मटलें, तरी त्यांतून, ब्रिटिश सत्तेपूर्वीं हिंदुस्थानांत जी स्थिति होती तिची हुबे हुबे पुनः स्थापना करावयाची असा अर्थ निघत नाहीं. हिंदुस्थानांतील समाजाच्या अंगीं जें कांहीं बुद्धिसामर्थ्याचें विशेष तेज आहे तें केव्हांही लोपलें जावयाचें नाहीं; पण ऐतिहासिक उत्क्रांतीचें चक्र पूर्ण झाल्याखेरीज हें बुद्धितेज ओळखून काढणें कठीण जात असतें. कोणत्याहि व कसल्याहि परिस्थितींत भारतीय समाज सांपडला तरी तो स्वाव कायम राखून त्या परिस्थितीशीं जुळेसें करून घेतो, ही गोष्ट या झांकून गेलेल्या बुद्धि वैभवाचेंच प्रमाण आहे असेंही ह्मणतां येईल. गेल्या शेंदीडशें वर्षांचा हिंदुस्थानचा इतिहास मात्र नाकबूल करतां येणार नाहीं, अगर तो कधीं झालाच नव्हता, असेंही धरून चालतां येणार नाहीं. या इतिहासानें अगदीं अस्पष्ट असा कां होईना पण राष्ट्राच्या शीलावर छाप मारलेला आहे. निरनिराळ्या जातींचे नैसर्गिक स्वभाव सुद्धां अजीबात बदलत असतात असें कांहीं समाजशास्त्रवेत्यांचें ह्मणणें आहे, तें खरें असेल तर भारतीय समाजाहून पुष्कळशा बाबतींत अगदीं भिन्न अशा समाजाशीं निकट संबंध जडल्यामुळें हिंदी समाजाच्या बुद्धि सामर्थ्यांतही कांहीं फरक पडला नसेल असें ह्मणवत नाहीं. निदान येवढें खरें आहे कीं जीवितविषयीं पूर्वीच्या काळाच्या आमच्या देशांतील लोकांच्या ज्या कल्पना किंवा जे विचार होते त्याहून सध्यांच्या लोकांचे विचार बरेचसे भिन्न आहेत. आपल्या समाजाच्या सध्यांच्या व्यवहारिक विचारांत संघाविषयींची जी कल्पना दिसून येते, ती निःसंशय नवीन आहे असें कित्येक विचारी लोकांचें मत आहे. गतकालीन स्थितीचा विचार करतांना या संघाविषयाच्या कल्पनेला व तिच्यामुळें होणाऱ्या उत्क्रांतीला योग्य तितकें महत्व दिलें न जाण्याची मोठी भीती आहे. आपल्या देशांत प्राचीन काळीं व्यक्तिपुरतींच पहाण्याची अगदींच आकुंचित दृष्टीची वहिवाट विशेषशी नव्हती हें खरें असलें, तरी संघाविषयींचा आदर सध्यांच्या इतका स्पष्टपणें तेव्हां नव्हता हें खास, आणि तसें होण्याला कारणेंहि तशींच होतीं. पण या पुढें आपल्या देशांत काय किंवा कोणत्याहि देशांत काय, समाजाच्या व्यवहाराचा सर्व आधार या संघाच्या आदराच्या तत्वावर रहाणार हें निश्चित आहे. संघाविषयींचा मनुष्य प्राण्याचा आदर त्याच्या स्वतःच्या उत्पत्ति इतकाच जुना आहे हें सर्व मान्यच आहे; पण आधुनिक शास्त्रें व सुधारणा यांच्या प्रसाराबरोबर या तत्वावर अवलंबून असलेल्या आणि त्यामुळेंच प्रदिप्त होत असणाऱ्या संघटनेच्या कल्पनेला जास्त जास्त महत्व प्राप्त झालेलें आहे. स्वार्थ्यत्यागाच्या साधनानें देशाचा उद्धार व्हावयाचा आहे, तर हें सदैव लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, प्रत्यकानें आपल्याला वाटेल त्या प्रकारचा स्वार्थत्याग केल्यानें मात्र तो होणारा नाहीं. इतर सर्व बाबींप्रमाणेंच स्वार्थत्यागाहि सर्व समाजाकडून सुव्यस्थित रीतीनें झाला पाहिजे. देशाचा उद्धार व्हावयाचा त्याचें मुख्य साधन उच्चार नव्हे तर आचार होय. ही अत्यंत महत्वाची बाब समजली पाहिजे. तोंडी किंवा लेखी उच्चाराचा उपयोग किंवा महत्व आह्मी कमी मानतों असा भाग नव्हे, पण तेंच सर्वांचें कार्य आहे असा समज कधींही होतां उपयोगी नाहीं. उच्चाराशीं आचाराचें प्रमाण फारच मोठें असलें पाहिजे. येवढ्यासाठीं उद्दिष्टाविषयींचा उहापोह किंवा स्वदेशभक्ति व राष्ट्रीयत्व यांवरील व्याख्यानें यांच्या इतकेंच महत्व समजाच्या चरितार्थाची तजवीज व समाजाच्या भिन्न भिन्न भागांमधील प्रेमाची वृद्धि यांना देणें योग्य आहे असें आह्मी समजतों. उदाहरणार्थ भांडवलवाले आणि मजूर यांच्या मधील संबंध सुधारावयाचा असेल तर तो शतशः व्याख्यानें दिल्यानें किंवा दहापांचांनीं वाटेल तसा स्वार्थत्याग केल्यानें कधींही होणार नाहीं. नुसत्या उपदेशानें मोठमोठ्या सामाजिक उत्क्रांति घडून आल्याचीं उदाहरणें इतिहासांत नमूद नाहींत. समाजाच्या सांपत्तिक स्थितीच्या आधारांतील पालट झाला तरच पुढें वर सांगितलेल्या उपायांचा कांहीं परिणाम होत असतो. राजकीय बाबतींत सुद्धां हीच स्थिति दिसून येते. लोकांना स्वराज्योपभागाचें महत्व कळावें अशी इच्छा असेल, त्याला पाहिजे तर राजकीय मुक्ती असें नांव देतां येईल—स्वराज्याचें उद्दिष्ट साध्य व्हावें असें वाटत असेल, तर त्या उद्दिष्टाच्या स्वरूपाचें विवेचन किंवा तत्संबंधीं उदात्त कल्पनांचा उहापोह या शिवाय दुसऱ्या आणखी कित्येक गोष्टी अवश्य घडून आल्या पाहिजेत. आमच्या हातीं असलेल्या साधनांची व्यवस्था नीट केली पाहिजे, नसतील तरी उत्पन्न केलीं पाहिजेत. स्वराज्योपभोगाची माहिति नित्याच्या व्यवहारांत लोकांच्या प्रत्ययास आणून दिली पाहिजे, तरच उद्दिष्टाच्या उहापोहापासून त्यांचा तादृश फायदा होईल. साधारण लोकांना प्रत्यक्षापेक्षां अप्रत्यक्ष रीतीनें कोणतीही गोष्ट लवकर समजते. ज्या कार्याचें स्वरुप त्यांना कळेल व ज्याचेमुळें त्यांना फायदा होईल अशा कार्याचें द्वारें त्यांना समजावून सांगितलेलें नुसत्या तत्वापेक्षां त्यांच्या ध्यानांत जास्त चांगलें येईल.

---

## लार्ड मोर्ले बोलले!

लॉर्ड मोर्ले यांनीं सिव्हिल सर्व्हिस क्लबपुढें केलेलें भाषण त्यांनीं हॉऊस आफ कॉमन्स मधून पाय काढल्या नंतर पहिलेंच आहे. पूर्वीच्या आश्रमांतील मोर्ले साहेबांचा अनुभव ज्यांच्या आठवणींत आहे त्यांना या भाषणाविषयीं विशेष उत्सुकता असण्याला मुळींच कारण नाहीं. हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी झाल्यापासून त्यांचें स्वत्व नाहींसें होऊन ते हिंदुस्थानांत अनियंत्रित सत्ता चालविणाऱ्यांच्या व त्यांची तरफदारी करणाऱ्यांच्या हातांतील केवळ बाहुलें होऊन बसलेले आहेत हें सर्वविश्रुत आहेच. तशांतून जेथें कांहीं थोडासा नेट धरून आणि सदसद्विचाराला स्मरून बसावें, बोलावें लागतें अशा हॉऊस आफ कामन्सच्या दगदगींतून त्यांनीं आपली सुटका करून घेतली आहे. यावरून हिंदुस्थानच्या हितापेक्षां त्यांना दुसरें कोणतें तरी हित जास्त इष्ट आहे हें उघड होत आहे. प्रत्यक्ष जागीं असणाऱ्या मनुष्याच्या हातून चूक होणें शक्य नाहीं. असा आपला सिद्धांत त्यांनीं बंगभंगाला चक्रेलेप करून जाहिर केलेलाच आहे. माजी उदारमताभिमानी मुत्सद्दी व तत्ववेत्ते अशांच्या भाषणाबद्दल कोणालाही अनास्था उत्पन्न व्हावी यांत आश्चर्य कसचें? लॉर्ड मोर्ले यांनी सिव्हिल सिर्व्हिसक्लबपुढें केलेलें भाषण अशाच कसोटींतील आहे, आणि या भाषणामुळें त्यांचेसंबंधानें आतांपर्यंत असलेला हिंदुस्थनांतील लोकांचा मात्र ग्रह जास्त ठाम

होत आहे. या सर्व भाषणांत हिंदुस्थानांतील लोकांना आशा करण्यास जागा होण्यासारखा एक शब्दही नाहीं. इंग्लंड आपल्या कर्तव्याला जागेल आणि आपल्या दुःखाचें परिमार्जन होईल अशी उमेद येण्यास या भाषणानें यत्किंचितहि आधार मिळावयाचा नाहीं. वेदर्मी प्रमाणें निरर्थक अशी गुळंघट चर्पटपंजरी बरीच आहे, पण चर्पटपंजरीनें लोकांमध्यें पसरत जाणाऱ्या असमाधानाला आळा बसल्याचें उदाहरण इतिहासांत नाहीं. निदान एक गोष्ट त्यांना करितां आली असती आणि तिचा कांहीं उपयोगहि झाला असता, पण ती देखील त्यांनीं केलेली नाहीं. हिंदुस्थानांतल्या अस्वस्थतेच्या कारणांचें पृथ्यकरण यावेळेस त्यांनीं केलें असतें तर बऱ्याच गोष्टींचा खुलासा झाला असता. पण ही वेळ तसें करण्याची नव्हे असें सांगून त्यांनीं तो भागच गाळला. अस्वस्थतेच्या कारणांची मीमांसा करण्याची संधी लॉर्ड मोर्ले केव्हां घेणार असतील ते घेवोत, पण परवांच्या भाषणांत या महत्वाच्या भागासंबंधाचा उल्लेख असा उडवाउडवीचा असल्यामुळें एकंदर भाषण नुसतें फोल झालें आहे. कोणत्याही जबाबदार सरकारापुढें उभें राहिलें नसेल अशा प्रकारच्या अवघड प्रमेयाला मी तोंड देऊन उभा असून त्यांतून मी चांचपडत चांचपडत वाट काढीत आहे असें त्यांनीं मोठ्या अनुकंपनीय रीतीनें सांगितलें. लॉर्ड मोर्ले हे मोठे साहित्यशास्त्रज्ञ असून वाङमयावरचा त्यांचा व्यासंग जबर आहे. तेव्हां आपल्यावरील संकटाचें चित्र त्यांनीं कसें उठावदार काढलें असेल याविषयीं कोणास संशय घ्यावयास नको. पण या त्यांच्या शब्दावडंबरांत सत्व किती व फोल किती याचा जर कोणी विचार करील तो लॉर्ड मोर्ले यांच्या धाष्टर्याची कमालीची प्रशंसा केल्याखेरीज रहाणार नाहीं. जें हिंदुस्थानांवर राज्य चालविणारें सरकार जबाबदार आहे असें लॉर्ड मोर्ले ह्मणतात, पण ते कोणाला जबाबदार आहे याचें स्पष्टीकरण, आह्मांला वाटतें प्रत्यक्ष ईश्वराला देखील नीटसें करतां येणार नाहीं. आपल्या खांद्यावरील जड ओझ्याविषयीं रडगाणें गाण्याची ही पहिलीच खेप नाहीं. कामाचा बोजा मोठा येवढ्या वरूनच त्यासाठीं नेमलेल्या व्यक्तीचा दर्जा किंवा महत्व वाढत जातें असें समजणारांपैकीं लार्ड मोर्ले हे असतील, असें आह्मांस ह्मणवत नाहीं. काम यशस्वी रीतीनें तडीस नेणारानें कामाच्या जडपणाबद्दल कुरकूर केली तर कोणीही त्याचें कौतुकच करील. असें कौतुक लिबरल प्रधान मंडळाचें करतां येतें काय? कॉन्सर्व्हेटिव्ह 'पक्षानें सूत्र खालीं ठेवून हिंदुस्थान ज्या स्थीतींत लिबरल पक्षाच्या स्वाधीन केलें तिची तजवीज लिबरलपक्षाचे हातून योग्य रीतीची झाली आहे काय? या प्रश्नांना अस्तिपक्षीं उत्तर देतां येतें नाहीं इतकेंच नाहीं तर उलट लिबरल कारकीर्दींत त्या स्थितींत जास्त घोटाळा उत्पन्न झाला असून एकंदर प्रश्न जास्तच अवघड होऊन बसला आहे. गेल्या दोन अडीच वर्षांत हिंदुस्थानांतील स्थिति जास्तच विकोप्यास गेली असून लोकांच्या मनांत असमाधानानें जास्तच खोलपर्यंत शिरकाव केला आहे. लॉर्ड मोर्ले यांच्या डोळ्यासमोर दत्त ह्मणून असलेल्या प्रकाराचें स्वरूप असें असतां त्यांनीं त्यासंबंधानें जास्त मुद्देसूद आणि स्पष्ट रीतीनें त्याविषयीं विवेचन करावयास हवें होतें. पण त्यांनीं तें केलेलें नाहीं.

लॉर्ड मोर्ले यांच्या भाषणांत एक मुद्दा मात्र बऱ्याच महत्वाचा आहे. ते ह्मणाले, ' जे विषय इष्ट ह्मणून मानण्यास आ आपणच त्यांना शिकविलें आहे, त्यासंबंधानें त्यांच्यामध्यें जागसूद चळवळ आहे ही गोष्ट नाकबूल करून चालावयाचें नाहीं. लोकांच्या महत्वाकांक्षांचा पूर्वता व सुव्यवस्था यांची कसें तरी करून सांगड घातली नाहीं तर तो आपला अपराध होईल, त्यांचा नव्हे. आणि तसें झालें ह्मणजे ब्रिटिश मुत्सद्दीपणाची सद्दी संपली ह्मणून समजावें. इंग्लंडांतील लोकमताची आपल्यावर सारखी नजर असतांना खणखणींत दडपशाईचें धोरण आपणाला चालू करतां येत नाहीं. आणि तसें करावें अशीही कोणाची इच्छा असेल असें मला वाटत नाहीं. ' जी चळवळ लॉर्ड मोर्ले यांना थोडे दिवसांपूर्वी फेसासारखी वाटत होती तीच आतां चैतन्यमय भासूं लागली आहे. इतक्या थोड्या अवधींत हा कशाचा परिणाम आहे हें समजणें खरोखरच कठीण आहे. सहामहिन्यापूर्वी लोक ठिकठिकाणीं आपल्या सुखदुःखाचें गाऱ्हाणें गाण्यासाठीं उघड रीतीनें सभा भरवीत होते, त्यांत कायदेशीर मार्गानें सरकारी अधिकाऱ्यांकडे दाद लावून घेण्याबद्दल ठराव पास होत होते आतांही तसेंच होत आहे आणि सभाप्रतिबंधाचा कायदा सर्व हिंदुस्थानाला लागू होईपर्यंत हा प्रकार असाच चालूं रहाणार. हिंदुस्थानांतील बहुजनसमाज याच कायदेशीर उपायाचें अवलंबन करणारा आहे असें असतां चार सहा महिन्यापूर्वींच्या स्थितींतच व आतांच्या स्थितींत लार्ड मोर्ले यांना इतका फरक कां वाटला हें उमजणें जरासें कठीण आहे. वंगभंगासंबंधानें एक वर्षापूर्वी जेवढ्या मोठाल्या व जितक्या सभा हिंदुस्थानांत झाल्या तितक्या गेल्या वर्ष सहा महिन्यांत मुळींच झालेल्या नाहींत. मग आमच्या चळवळींतील जीवंतपणा लार्ड मोर्ले यांना कसा दिसला ? वगंभंग रद्द व्हावा अशी आपली उत्कट इच्छा हिंदुस्थानांतील सर्व ठिकाणच्या लोकांनीं प्रचंड सभा भरवून शेकडों, हजारों वेळां जाहिर केली; पण ती लोकांची इच्छा मनापासून आहे असें त्यावेळीं लार्ड मोर्ले यांस वाटले नाहीं. किंवा तसें वाटूनहि तिची पूर्णता करण्याची तजवीज त्यांनीं जाणून बुजून केली नाहीं हें त्यांचे त्यांनाच माहित. आतांतरी लोकांना कांहीं आकांक्षा आहे आणि ती पूर्ण झाली पाहिजे असें ते सांगत आहेत. यांत खरेपणाचा भाग किती आहे हा प्रश्नच आहे. देशांत शांतता रहावी आणि ती हर प्रयत्नानें ठेवतां यावी ह्मणून तर हें सोंग नसेल ना? कोणी सांगावें! लोकांच्या आकांक्षा आहेत त्या होतां होतां पूर्ण होतील, कायदे कौन्सिलांच्या रचनेंतील फेरफार त्याकरतांच योजलेले आहेत असें ते सांगत आहेतच. सारांश इतकाच कीं देशांत स्वस्थता राखावयाची येवढेंच तत्व लॉर्ड मोर्ले यांनीं प्रमाण मानलें आहे. अर्थात हिंदुस्थान सरकारानें नुकतेच पास केलेले दोन कायदे आपोआपच रास्त ठरले. हे दोन कायदे आणि यांच्याच सारखे इतर दडपशाहीचे उपाय याखेरीज देशांत शांतता रहावयाची नाहीं आणि त्या उपायांच्या अवलंबनाशीं लोकांच्या आकांक्षाच्या पूर्ततेची सांगड कधींच जुळावयाची नाहीं. येवढें मात्र लॉर्ड मोर्ले सांगावयास विसरलें.

---

## राष्ट्रीय सभेची घटना.

राष्ट्रीय सभेच्या कामाविषयीं मध्यंतरीं दिसून आलेल्या अनावस्थेबद्दल आह्मी गेल्या अकांतच खेद प्रदर्शित केला होता. कन्व्हेन्शन कमिटीचे अध्यक्ष व सेक्रेटरी यांचे कडून अलाहबाद येथील बैठकींत ठरलेले राष्ट्रीय सभेच्या रचनेसंबंधाचे व कामकाज चालविण्यसंबंधाचे नियम गेल्या आठवड्यांत प्रसिद्ध झाले असून, ते त्यांच्या प्रसिद्धीविषयीं जबाबदार असणाऱ्या गृहस्थांची आपली कर्तव्याविषयींची दक्षता ते सिद्ध करीत आहेत. अलाहाबाद येथील बैठकीची जी हकीगत बाहेर आली होती तीवरून तींत ठरलेले नियम, हिंदुस्थानांत रहाणाऱ्या कोणत्याही जातीच्या, धर्माच्या अगर पंथाच्या लोकांस राष्ट्रीय सभेंत जाता येईल असे आहेत हें कळलें होतें. वस्तुतः सध्यांचा वाद निरनिराळ्या समाजांत नसून एकाच समाजाच्या भिन्नभिन्न अंगांत होता. राष्ट्रीय सभेसारख्या लोकमतप्रदर्शक सभांची स्थापना सर्वस्वी त्यांच्या सभासदामधील एकमेकांविषयींच्या आदराच्या व निष्ठेच्या आधारावर व्हावयाची त्यांना नियमबद्ध घटनेचीं बंधनें सशक्त करण्याचे ऐवजीं कमकुवत करतात असा आमचा पूर्वींपासून समज असून तो आह्मी वेळोवेळीं जाहिर करीत आलों आहोंत. राष्ट्रीय सभेला नियमबद्ध घटना असावी असें प्रतिपादन आज कित्येक वर्षांपासून होत होतें. त्याचे पुरस्कर्ते कोण किंवा त्यांचा अलीकडच्या वादांत काय संबंध आहे वगैरे गोष्टींचा उल्लेख करण्याचें येथें कारण नाहीं. तथापि राष्ट्रीय सभेच्या चालकांना तिची नियमबद्ध घटना करण्याला भाग पाडण्यांत आले आहे. हें कोणालाही विसरतां यावयाचें नाहीं. यापूर्वी राष्ट्रीय सभेला कांहीं ठराविक रचना नव्हती किंवा तिचें कामकाज चालण्यासंबंधानें कांहीं नियम नव्हते असें नाहीं. पण आजपर्यंतचा राष्ट्रीयसभेचा कारभार बहुतेक शिष्टसंमत अशा पद्धतीनें चालत असे. या पद्धतीला गेल्या वर्षापर्यंत मान मिळत गेला आणि बावीसवर्षांच्या अनुभवानें राष्ट्रीयसभेला नियमांनी जखडून टाकण्याची जरूर नाहीं असें दिसून आलें होतें. पण सुरतेस दोन भेद झाले. राष्ट्रीय सभेच्या आतांपर्यंतच्या शिष्टसंमत वहिवाटीविरुद्ध बंड करणारा एक पक्ष निर्माण झाला. आणि त्याच्या कारवाईमुळें पूर्वीच्या पद्धतीनें राष्ट्रीय सभेचें काम सुरळींत चालणें अशक्य आहे हें अनुभवास आलें. अशा स्थितींत राष्ट्रीय सभेच्या पूर्वपरंपरेला मान देणाऱ्या सभासदांनीं एकत्र जमून पुढील कार्यक्रमाचा विचार करण्यासाठीं एक कमिटी नेमली. सुरतेची बैठक अपूर्व होण्याचा रंग पूर्वींपासूनच दिसत असल्यामुळें तिला उभयपक्षांकडील शक्य तितके जास्त सभासद हजर होते. त्यांच्यात पूर्व परंपरेला मान देणाऱ्या सभासदांचें मताधिक्य स्पष्टपणें दिसून आलेलें असल्यामुळें त्यांनीं अंगिकारलेल्या मार्गाविषयीं राष्ट्र सभाभक्तांना सहानुभूती वाटत नाहीं असें ह्मणणें निव्वळ दुराग्रह आहे. बहुजनांचे मतानें ठरेल तें मान्य करण्याचा सांप्रदाय येवढ्याच प्रसंगापुरता असंमत मानला जावा, यांत कायाच्या आस्थेपेक्षां दुरभिमानाचाच पगडा जास्त स्पष्ट होत आहे. वर सांगितल्याप्रमाणें पूर्व परंपरेला मान देणाऱ्या सभासदांनीं नेमलेल्या मंडळीनें परस्परांशीं शक्य तितकें विचारविनिमय करून शेवटीं राष्ट्रीय सभेच्या घटनेविषयीं व तिच्या कामकाजाच्या पद्धतीविषयीं जे नियम ठरविले आहेत ते सर्व राष्ट्रसभाभक्तांनीं मान्य करण्यांत कोणालाही यत्किंचित् मुद्दां कमीपणा वाटण्याचें कारण नाहीं

सध्यां प्रसिद्ध झालेल्या योजनेंत एका पक्षाच्या मतांचें विशेष प्राबल्य असून तींतून दुसऱ्या पक्षाला हुसकून लावण्याचा प्रयत्न झलेला आहे असा निरर्थक आक्षेप घेण्यांत येत असतो. मुख्य मुद्दा राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमांतील अंतिम साध्यासंबंधाचा आहे. या मुद्यासंबंधानें जुन्या पक्षांत कोठेंही मतभेद दिसून येत नाहीं. उलट पक्षीं नवीन ह्मणविणाऱ्या पक्षांत या संबंधांत अणुरेणूइतकीही एकवाक्यता नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. राजकीय उन्नतीसाठीं स्थापलेल्या या सभेचें अंतिम पूर्वींपासून अगदीं स्पष्ट झालेलें नसलें तरी कालांतरानें तद्विषयक विचारांना राष्ट्रीयसभेच्या पुरस्कर्त्यांनीं परिपक्वता आणलेली आहे. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्योपभोग घेणाऱ्या देशांत सुरू असलेली राज्यपद्धति आपणांस पाहिजे आहे, तें आपलें उद्दिष्ट आहे असें कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेंत परमपूज्य दादाभाई नौरोजी यांचे मुखानें सर्व राष्ट्रानें वदविलें. तेंच उद्दिष्ट आतांच्या घटनेंत कायम करण्यांत आलें आहे. या उद्दिष्टसंबंधानें वाद घालणाऱ्यांच्या सुरतेच्या खाजगी परिषदेनेंही हेंच आपलेंही उद्दिष्ट आहे असें जाहिर केलें होतें, ही गोष्ट लपवून ठेवण्याचा प्रयत्न कोणी करो, पण तो सिद्धीस जाऊं शकत नाहीं. पहिल्याच महत्वाच्या मुद्यासंबंधानें उभयपक्षांत एकवाक्यता स्पष्ट असतां वाद कोणत्या आधारावर घालण्यांत येत आहे हें समजणें कठीण आहे. नुसत्या शाब्दिक भेदाला दुराग्रहानें चिकटून राहण्याचा जुन्या पुढाऱ्यांचा हेतु नाहीं हें अलाहाबादेच्या कमिटीनें जाहिर केलेलें आहे. मग त्या कमिटीनें ठरविलेलें उद्दिष्ट मान्य केल्यास आपली राष्ट्रीयसभेंतून हकालपट्टी होते असें ह्मणणारांस तसें कोणत्या आधारावर ह्मणतां येतें त्याचा निदान आह्मास तरी उलगडा होत नाहीं. या घोटाळ्याची उत्पती लवण्याचा एक मार्ग आहे पण तो सर्वांना रुचणारा नाहीं. वसाहतीचें स्वराज्य आपलें उद्दिष्ट

मानणाऱ्यांमध्यें किंवा तसें एका वेळीं बोलणारांमध्यें असंख्य भिन्न भिन्न मतें आहेत. त्यांची परंपरा त्याचेपुढें निर्भेळ स्वराज्य किंवा त्याच्याहि पलीकडील एखादी काल्पनिक राजकीय स्थिति येथपर्यंत पोचलेली आहे. असें असतां त्या सर्व भिन्न भिन्न उद्दिष्टांचे भक्त एकाच माळेंत येऊं शकतात आणि अल्हाबादेच्या कमिटीच्या उद्दिष्टांशीं त्यांतील कोणाचेंच जुळत नाहीं यांतील इंगित स्पष्ट करण्याची आमची इच्छा नाहीं. यांत सर्व घरसोडीचा प्रकार आहे येवढें अनुमान कोणीही समंजस मनुष्य काढूं शकेल येवढें मात्र खास.

उद्दिष्टानंतर तें साध्य करुन घेण्याच्या मार्गाविषयींचा वाद अशाच घरसोडीचा आहे. ' प्रचलित शासन पद्धतींत क्रमाक्रमानें सुधारणा घडवून आणणें, सार्वजनिक हिताविषयीं लोकांची आस्था वाढविणें, राष्ट्रीय ऐक्याचें संवर्धन करणें, देशांतील बुद्धिविषयक, नैतिक सांपत्तिक व औद्योगिक साधन समुच्चयाला संघटीत स्वरूप देऊन पूर्णावस्थेस आणणें या उपयांचा आश्रय करून कॉन्स्टिटयूशनल (कायदेशीर) मार्गानीं इष्ट हेतूंची सिद्धी करून घ्यावयाची ' असा कार्यक्रम अलाहाबादेस कमिटीनें आंखला आहे. या कार्यक्रमाशीं नवीन पक्षाचा विरोध कसा होता हें आह्मांस तरी उमजत नाहीं. या कार्यक्रमास आपल्या प्रतिपादनाला अनुकूल व दुसऱ्याची टर उडविण्याला सोईचें असें भिक्षांदेहीची पद्धति असें खोटें नांव देऊन सर्व वाद होत आहे हें सुप्रसिद्ध आहे. राष्ट्रीय सभेचें उद्दीष्ट व त्याचीं साधनें या संबंधाचा कमिटीनें ठरविलेल्या नियमांचा भाग दोन महिन्यापूर्वी प्रसिद्ध झाला असून आणि त्यांत नवीन ह्मणविणाऱ्या पक्षच्या शीलाला आणि कार्यक्रमाला बाध येण्यायोगें कांहीं नसून नवीन पक्षाच्या एका पंथानें राष्ट्रीय सभेशीं फारखत करण्याची धमकी त्याच वेळीं दिलेली होती. दुसऱ्या एका, पण त्यापेक्षां जास्त धूर्तपंथानें, या बाबतींत आपल्या नेहमींच्या संवयीस अनुसरून कांहीं खोटीं विधानें व पोरकट चेष्टा करून महत्वाच्या मुद्यासंबंधानें मौन धरलें आहे. फारखतीच्या धमकीचा पुरस्कार अस्फुट रीतीनें करण्याची इच्छा यांनाही झाली होती. पण ती तितकीच दाबण्यांत आली. आमच्या मतें या वादांत नवीन ह्मणविणाऱ्या पक्षाला शेवटीं हार खावी लागणार आहे. त्यांचा नवीन पक्ष राष्ट्रीयत्वाच्या उदात्त कल्पनांच्या आधारावर उभारलेला आहे, त्यांच्यांत कित्येक अत्यंत वंदनीय अशा विभूति आहेत, देशकार्याविषयींची त्यांची आस्था अत्यंत प्रशंसनीय व अनुकरणीय आहे. हे सवे आह्माला व सर्व राष्ट्राला कबूल आहे. वादग्रस्त नव्हेत अशा विषयांत आणि विचारांत त्यांचें अग्रेसरत्व सर्व राष्ट्र मान्य करीत आहे. पण त्यांच्यापैकीं कित्येकांच्या अंगीं असलेल्या हटवादामुळें हा सर्व घोटाळा उत्पन्न होतो असा आमचा पक्का समज आहे. त्यांनीं मनांत आणलें तर ते कोणत्याहि मताच्या समाजांस किंवा व्यक्तींस अनुकूल करून घेऊन इष्टकार्यांत हातभर लावण्यास त्यांना उद्युक्त करतात आहे. राष्ट्रनायकत्वाला आवश्यक असे अनेक सद्गुण त्यांचे ठायीं आहेत. आह्मी हें कोणत्या परमपूज्य व्यक्तीला उद्देशून लिहित आहों हें स्पष्ट सांगण्याची जरूरच नाहीं. तथापि त्या व्यक्तीच्या कांहीं नैसर्गिक दोषामुळें जो घोंटाळा उत्पन्न होतो तो दाखवून दिल्याखेरीज मात्र आमच्यानें रहावत नाहीं. रा. टिळक यांनीं ज्या पक्षाचें अध्वर्युत्व स्वीकारलें आहे त्यांत त्यांची उत्तम गुणांत त्यांची परंपरा चालविणारे गृहस्थ एखाद दुसरे तरी निघतील किंवा नाहीं याची वानवाच आहे. सध्यांचा राष्ट्रीय सभेचा वाद एका व्यक्तीसाठीं उपस्थित झालेला आहे ही गोष्ट निदान एका पक्षाला तरी नाकबूल करतां यावयाची नाहीं. सर्व हिंदुस्थान या वादामुळें हाललें आहे, हें खरें आहे. पण त्यांत त्या व्यक्तीकडे किती दोष येतो आणि तिच्या उपासकांकडे त्या दोषाचा वांटा केवढा जातो हें घ्यांनांत घेतलें पाहिजे. राष्ट्रीय सभेच्या परंपरागतमार्गाविषयीं एकाकाळीं अश्रद्धा किंवा अतृप्ती उत्पन्न होऊन कांहीं कर्त्या पुढाऱ्यांनीं जे कांहीं त्राग्याचे उद्गार काढले त्यांतील मर्म घ्यानांत न आल्यामुळें कित्येक अर्ध्या हाळकुंडानें पिंवळ्या होणाऱ्या वात्रटांनीं त्या उद्गारांना हवा तो अर्थ करून सर्व समाजांत भ्रष्टबुद्धी करून ठेवलें. दुसऱ्याची निंदा सहजच साधारण जनांना रुचते. त्यांत त्यांचा हेतु विशेषसा वाईट असत नाहीं तथापि त्या निंदेला विपरीत स्वरूप मात्र कालांतरानें आल्यावांचून रहात नाहीं. अशीच स्थिति राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमासंबंधानें झालेली आहे. इंग्लंडांत लोकमत जागृत करण्यासाठीं एक डेप्युटेशन पाठविण्याविषयींचा विचार मुंबईच्या राष्ट्रीय सभेच्या बैठकीच्या थोडासा अगोदर निघाला असतां त्या विचारावर निकरानें तुटून पडणाऱ्या केसरी पत्राच्या संपादकांनीच शेवटीं राष्ट्रीय सभेच्या बैठकींत डेप्युटेशनाचा ठराव सभेपुढें मांडला व त्याला मंजुरी मिळविली. पण केशरीच्या लेखांचा परिणाम मात्र अत्यंत गर्ह्य झाला व तो आतां पर्यंत कायम आहे. सरकारास अर्ज वगैरे करण्या संबंधाच्या प्रकाराची अगदीं अशीच स्थिति आहे. या प्रकाराला भिक्षांदेही हें नांव प्रथम केसरी पत्रानें दिलें. पण नव्या पक्षाच्या विद्यमानें भरलेल्या अनेक सभांतून या मार्गाबद्दल समर्थन झालेलें असतां लोकांमध्यें या मार्गाविषयीं आतां आस्था उरली नाहीं. याला कारण लोकरंजनाच्या क्षणैक अल्पविचारापेक्षां दुसरें कांहीं असेल असें वाटत नाहीं. पण त्याचा परिणाम मात्र फारच भयंकर झालेला आहे. जुन्या मार्गाची चेष्टा झाल्यानें नव्या मार्गाचा उगम सरसहा झाला असें मात्र मुळींच नाहीं. त्याचप्रमाणें नव्या पक्षांतील जबाबदार पुढारीही जुन्या मार्गाची किंमत अगदींच विसरले नाहींत, नव्या मार्गाच्या स्थापनेविषयीं त्यांना कोण अट्टाहास करावा लागत आहे हेंही सुप्रसिद्धच आहे. त्याला त्यांच्या आंगचा थोडासा दोष कारण आहेच, पण त्या पेक्षांही त्यांच्या नामधारी अनुचरांची नालायकी

कॉन्व्हेशन कमिटीनें राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमाविषयींचे जे नियम ठरविले आहेत ते मान्य होत नसल्या बद्दलचा कांगावा या पुढें तरी कोणीही समंजस मनुष्य करणार नाहीं अशी आह्मांस उमेद आहे. राष्ट्रीय सभेचे उद्देश, तिचा कार्यक्रम या संबंधानें एकवाक्यता झाल्यावर तिच्या पोटशाखांच्या व तिच्या घटनेसंबंधाचे व कामकाज चालविण्या संबंधाचें नियम जर कोठे अडचणीचे आहेत असें अनुभवास येईल तर ते बदलून घेण्याची तजवीज केव्हांही करतां येणार आहे. नव्या योजनेंत राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांस त्यांच्या पदाला साजतील व लोकनियुक्त सभेच्या इभ्रतीस पोषक होतील अशा बेताचे पूर्ण अधिकार दिलेले आहेत, त्याचे संबंधानें क्वचित् ठिकाणीं वाद उपस्थित होण्याचा संभव आहे, पण एकंदरींत हे नियम ग्राह्य होण्याला आह्मांस हरकत दिसत नाहीं.

---

## अभिनंदन

(उत्कृष्ट चाकरीचें पारितोषक)

रा० रा० विनायक गणेश डेप्युटी सुपरिन्टेंडेंट आफ पोलीस अकोला यांस चालूं महिन्यापासून ९०० रुपये पगार झाला हें कळविण्यास अह्मास अत्यंत आनंद वाटतों. पुष्कळ वर्षांच्या चाकरीच्या चतुर्थ चरणांत अशा प्रकारचा सत्कारांतून बहुमान त्यांचा होत आहे हें पाहून सर्व जण राजश्री बावासाहेब देशपांडे यांचें अभिनंदन करतीलच. आणि त्या बरोबर आह्मी स्थानिक सरकारच्या गुणग्राहकतेची विशेष तारीफ करितों. पोलीस खात्यामध्यें यांची चाकरी पुष्कळ वर्षेंपर्यंत खालच्याच दर्जामध्यें होत गेली किंबहुना त्यांच्या मित्र मंडळीस व वरिष्ठ अधिकाऱ्यास ही असें वाटें कीं त्यांच्या सारख्या सद्गृहस्थाची पुढील उडी निष्कारण खुंटली गेली आहे कीं काय? हे आफिसमध्यें असतांना ह्यांच्या हातांखालीं पुष्कळ पोलीस आफिसर काम शिकून भराभर पुढें जात पण हे मात्र आपल्या पूर्व पदीं स्थितच होते. यांचा प्रामाणिकपणा, कार्यदक्षता, कर्तबगारी इत्यादि सद्गुणाबद्दल हे लोकांच्या व सरकारच्या दृष्टीपुढें अगदीं अग्रभागीं असत. पण यांचा बढतीचा मार्ग अगदीं खुंटल्या सारखाच झाला होता पण अलिकडे थोडीं वर्षें इनस्पेक्टरच्या दर्ज्यामध्यें यांची नेमणूक झाल्यापासून यांच्या अनुभवाचीं व कौशल्याचीं गोडफळें निदर्शनास येऊं लागलीं आणि तेव्हांपासून स्थानिक सरकारानें त्यांचा चांगला मानमरातब ठेऊन जल्दी जल्दी बढती दिली. आणि ही ९०० रुपये पगाराची बढती त्यांस चालूं महिन्यापासून देण्यांत आली हें त्यांच्या बहुविध गुणांचें चांगलें चिज झालें. आकोल्यांतील लोकांस यांचा बहुत प्रकारें लाभ झालेला आहे. येथील सार्वजनिक चळवळींमध्यें जी एक बजनदारी आहे आणि बहुधा अतिरेक दृष्टीस पडत नाहीं त्याला कारण पुष्कळ अंशीं राजश्री विनायकराव बावा हे होत. हे लोकांची नीट समजूत घालून वरिष्ठ अधिकाऱ्यांचीं मनें दुषित न होऊं देण्याविषयीं नेहमीं प्रांजलपणाचें वर्तन ठेवित असतात. हे जितके जगन्मित्र आहेत तितकेच ते आपल्या उत्कृष्ट कारभारामध्यें पोलिस खात्यांतील मंडळीवर आपलें वजन व प्रेम सारखाच बाणीदारीनें ठेवित असतात. प्रस्तुत चालून अलिल्या त्यांच्या अभ्युदया बद्दल त्यांचें अभिनंदन करितांना आह्मी पोलिस खात्यांतील मंडळीपुढें त्यांच्या चारित्राचा चित्रपट प्रौढीनें मांडला आहे.

---

## वऱ्हाडवृत्त.

---

हवामानः— सर्व चिन्हें पर्जन्यकाळाला अनकूलशीं होत चालली आहेत. त्यांची फलश्रृती लवकर अनुभवाला येईल. मुंबई कडील पर्जन्याचा वारा या प्रांताकडे वाहूं लागला आहे आणि पुष्कळशा ठिकाणीं पर्जन्य चांगला सुरू झाल्याचें कळतें. हल्लीं हवेंत उष्मा विशेष होतो ऋतूचा पालट होत असल्यामुळें ताप हगवण वगैरे रोग सहजीच बळावले आहेत.

आह्मास कळविण्यास दुःख वाटतें कीं, रावसाहेब गणपत बाबाजी सहस्त्रबुद्धे बी. ए. एक्स्ट्रा असि. क. यांस नागपूर मुक्कामीं गेल्या सोमवारीं देवाज्ञा झाली. मरण समयीं यांचें वय ५१ वर्षांचें होतें. यांची बहुतेक नौकरी हैद्राबाद रेसिडेन्सीमध्यें झाली. मध्यप्रांताला वऱ्हाड जोडला तेव्हां ह्यांची नेमणूक आकोल्यास झाली होती आणि शेवटली दोन वर्षें ते नागपूर येथील मुदत अबकारी खात्यामध्यें स्पेशल ड्युटीवर होते. हे तरतरीत व बुद्धिवान असल्यामुळें आपल्या चाकरींत चांगल्या दर्ज्याला चढलें होतें. थोड्या दिवसाच्या तापांत त्यांचा लवकर अंतकाल झाला हें पाहून त्यांच्या आप्तमित्रास फार वाईट वाटलें.

व्याख्यानः— रा. रा. मोरो बाळकृष्ण परांजपे बी. ए. एल एल. बी. आकोला यांनीं प्रस्तुतच्या चळवळीसंबंधानें आपलें नेमस्त पणाचे सुविचार जहाल या उपनांवाखालीं प्रदर्शित केले. सिग्नलसिग स्टेशनाच्या उंचीपासून जशी गाडीला युक्तीनें उलट गती देतात तद्वत प्रस्तुतच्या चळवळींना योग्य दिशा देण्याचें मुख्य धोरण आहे.

वकिलीची परिक्षा— वऱ्हाडची वकिलीची परिक्षा गेल्या सालींच शेवटची झाली असा सर्वांचा ग्रह झाला होता पण आतां असें प्रसिद्ध झालें आहे कीं उमरावती येथें ता. १ डिसेंबर पासून वऱ्हाडच्या परिक्षेला सुरुवात होईल, तेव्हां त्या परिक्षेस बसणाऱ्या उमेदवारांनीं आपापले अर्ज ता. ८ आगष्टाच्या पूर्वी जरूरीयात दाखल्यासह ज्युडीशियल कमिशनरचे रजिस्ट्रार साहेबाकडे पाठऊन द्यावा.

महोत्सव— येत्या शुक्रवारीं चक्रवर्ती एडवर्ड बादशहाच्या वाढ दिवसानिमीत्त आमच्या येथें पोलीस खात्या कडून कवाईत इतर खेळ व पुष्कळशा करमणुकीच्या गोष्टी होणार आहेत.

## जाहिर नोटीस

तारीख १९-५-१९०८ इसवी रोजीं भरलेल्या मलकापूर म्युनिसिपाल कमिटीचे तहकुब राहिलेले स्पेशल सभेंतील ठराव नंबर २ अन्वयें सर्व लोकांचे माहितीकरितां प्रसिद्ध केलें जात आहे कीं सन १८८६ च्या वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचें कलम ४१ पोट कलम (१) (अ) (क) अन्वयें म्युनिसिपालिटीचे हद्दींत राखलेल्या सर्व तऱ्हेच्या गाड्यांवर, त्याचप्रमाणें बसावयाच्या किंवा ओझीं वाहण्याचें गाड्यास जोडण्याकरितां किंवा ओझीं वाहून नेण्याकरितां ज्या जनावरांचा उपयोग करितात त्या जनावरांवर आणि कुत्र्यावर खालील कर बसविण्याविषयीं मलकापूर म्युनिसिपल कमेटीचा इरादा आहे.

१ सदर्हू कर खालील दिलेल्या वार्षिक दराप्रमाणें बसविला जाईल.

वार्षिक दर.
रु. आ. पै.

(१) प्रत्येक चार चाकी गाडीवर—२--०--०
(२) प्रत्येक दोन चाकी गाडीवर--१--०--०
(३) प्रत्येक हत्ती किंवा उंठ यांवर--१--०--०
(४) प्रत्येक घोडा, तट्टू,
बैल अगर हेला यांवर.... ....—०-८-०
(५) प्रत्येक गाढवावर.... ....—०-४--०
(६) प्रत्येक कुत्र्यावर.... ....—०--८--०

गाडी या व्याख्येंत बायसिकल व मोटार गाड्यांचाही समावेश होतो.

तारीख १ एप्रिल रोजीं ज्याचें वय सहा महिन्यांचे आंत असेल अशा पिलांवर कर बसविला जाणार नाहीं.

२ हा कर गाडीच्या किंवा जनावराच्या मालका पासून किंवा त्याचे गैर हजरींत ती गाडी अगर जनावर ज्याचे ताब्यांत असेल त्याचेपासून मालकाकरितां म्हणून घेतला जाईल.

३ ज्या इसमाजवळ तारीख १ एप्रिल रोजीं अगर नंतर जो इसम गाडी अगर जनावर यांचा मालक आहे किंवा होईल त्याला तारीख ३१ मार्च रोजीं संपणारे संबंद वर्षाबद्दल कर द्यावा लागेल, आणि प्रत्येक इसम तारीख १ एप्रिल नंतर गाडी किंवा जनावर ज्याचेबद्दल त्यानें कर भरलेला आहे त्याजवरची त्याची मालकी जरी बंद जाली व पुनः त्याच वर्षांत मालकीची गाडी किंवा जनावर त्यानें ठेविल्यास त्याबद्दल त्यास पुन्हा कर द्यावा लागणार नाहीं, मात्र त्यानें ज्या गाडी किंवा जनावराबद्दल कर दिलेला आहे त्याच्यापेक्षां जास्त गाड्या किंवा जनावरें नसावीत. जर एखादा इसम ज्याचें म्युनिसिपालिटीचे हद्दींत घर नसून तो त्याच वर्षांत तीन महिन्यापेक्षां कमी दिवस राहणारा आहे त्याजवर त्या वर्षाकरितां कर बसविला जाणार नाहीं.

३ (१) म्युनिसीपालिटीचे सेक्रेटरी किंवा कमेटीनें त्या कामाकरितां अधिकार दिला आहे असा इसमानें म्युनिसीपालिटीचे हद्दींत राहणार प्रत्येक इसमास त्याचे जवळ असणाऱ्या गाड्या आणि जनावरें ज्याच्याबद्दल कर द्यावा लागतो अशा गाड्यांच्या व जनावरांच्या संख्येची खरी माहिती व तपशील विचारल्यास दिला पाहिजे.

(२) या नियमाचें उल्लंघन करणारा इसम ५० रुपये पावेतों दंड केला जा[ण्यास] पात्र होईल.

४. हा कर दरसाल तारीख १५ ए[प्रिल] आंत अगर त्या दिवशीं अगाऊ देण्याचा आहे.

५. ज्यावर कर बसविण्याचा आहे [त्या] इसमांची नांवें व त्याज जवळ असलेल्या [गाड्या] आणि जनावरें यांची संख्या व ता[...] आणि त्यांचेवर बसविण्याच्या करानें र[...] पत्रक असा तपशील ज्यांत आहे [...] प्रकारचें करांचें रजिष्टर दरसाल [...] महिन्यांत म्युनिसीपल कमेटीचे सेक्रेटरी [...] कमेटीनें ज्यांस या बाबतींत अधिकार आहे असे इसम तयार करतील व [...] पत्रक कमेटीपुढें मंजुरातीकरितां ठेविलें [...] मंजूर झालेलें करांचें पत्रक तारीख [...] पासून अमलांत आणलें जाईल.

६. सदर्हू रजिष्टर तयार झा[...] म्युनिसीपल कमेटीचें आफिसांत अ[...] वेळांत लोकाचे पाहण्याकरितां ठेविलें [...] आणि पट्टी विरुद्ध हरकती अर्ज [...] कोणतेही वेळेस दाखल केले जावे[त] बद्दल कमेटी जाहीर नोटिशीनें [...] आलेल्या हरकती अर्जांचा निकाल [...] अगर या कामाकरितां नेमलेली [...] त्यांचा निकाल करील.

७. एखादे इसमाचें नांव [...] घालणें राहिले असल्यास किंवा [...] तयार झाल्यानंतर ज्यावर कर [...] जातो अशा गाड्या आणि जना[वरें] ज्याचे ताब्यांत असल्यास त्यां[...] कोणतेही वेळीं रजिष्टरांत केली [...]

वर केलेले नियमा विरुद्ध राहिवाशापैकीं कोणाची तक्रार [...] त्यानें या नोटिशीचे प्रसिद्धीचे [...] ३० दिवसाचें आंत आपली ह[रकत नो]टीस लेखी कळवावी. दिलेल्या मसुदा केलेल्या नियमांचा विचार के[...]

मलकापूर ता. ९ | पी. इट[...]
जून सन १९०८ | [...]
नं. ग. ५६

## NOTICE

Vide Resolution No 2 [...] journed Special meeting of [...] pur Municipal Committee o[...] May 1908 it is hereby [...] for the general informatio[n] public that the Municipal [Commi]ttee at Mulkapur propos[e] the following rules for th[e] tax under section 41 sub [...] [A] [c] of the Berar Mu[nicipal Law] of 1886 on all vehicles a[...] used for riding draught [...] and dogs kept within th[e] the Mulkapur Municipality [...] the following rules.

1. The tax shall be le[vied] following yearly rates:—

| | Rate Rs |
|---|---|
| [1] on every four wheeled vehicle | 2 |
| [2] on every two wheeled vehicle | 1 |
| [3] on every elephant or camel | 1 |
| [4] on every Horse, pony, bullock or buffalo | 0 |
| [5] on every donkey | 0 |
| [6] on every dog | 0 |

The term "vehicle" includes a bicyle and a motor--car

Pups which on the 1st April are under six months old shall be exempt from the tax.

2. The tax shall be paid by the owner of the vehicle or animal, or in his absence by the person in charge or possession thereof on his behalf.

3. Every person who after the 1st April is or becomes the owner of vehicle or animal shall be liable to pay the full tax for the year ending on the following 31st March, and every person who after the 1st April ceases to own any vehicle or animal, for which he has paid t[illegible] shall not be liable in the s[illegible] to any further tax for any [illegible] r animal of which he may [illegible]tly become the owner, Providid [illegible] number for which he has p[illegible] tax is not exceeded. No tax [illegible] be charged for the year if a person who is not a householder is a resident in the Municipality for more than three months in that year.

3. (1) Every person living within the limits of the Municipality and owning or possessing a vehicle or animal liable to the tax shall be bound to give true information regarding the number and description of such vehicles and animals kept by him when called upon to do so by the Secretary to the Committee or by any person a[illegible] in this behalf by the Committee.

3 (2) Any person committing a breach of this bye--law shall be punishable with a fine which may extend to rupees fifty.

4. The tax shall be payable in advance on or before the 15th April in each year.

5. The Secretary to the Municipal C[illegible] or any other peron [illegible] in this behalf by the Committee, shall prepare, in the month of April every year, an assessment register containing the names of persons liable to the tax, particulars of the number and description of vehicles and animals, and a statement of the amount for which they are liable. The assessment register shall be placed before the Committee for sanction, and the sanctioned assessment shall come into force with effect from the 1st April each year.

6. On the completion of the Assessment Register the Committee shall give public notice that the Register is open to inspection during office hours at the Municipal office and that objections against the assessment may be filed at any time throughout the year. The objections shall be disposed of by the Committee or by sub--Committee authorised in this behalf by the Committee.

7. The name of any person omitted from the Register, or of any person coming into possession of a taxable vehicle or animal subsequent to its preparation, may at any time be included in it.

Any inhabitant of the town of Malkapur objecting to the proposed rules should submit his objections to the Committee in writing within 30 days form the date of the publication of this notice after which date the proposed rules will be taken into consideration.

Dated Mulkapur the 9 june 1908 — P. W. Bhagat Chairman Municipal Committee Mulkapur.

N. G. 57


दोन घडयाळें एकदम घोलविणाऱ्यास पोस्ट खर्च माफ.

गजकर्णाच्या २४ तिडया घोलविणाऱ्यास रा. सिस्टम घडयाळ बक्षीस साखळी सुद्धां शिशीस ।.



रासकोप सिस्टम कि. रु. ३। स्वदेशी पेटेंट वाच किं. रु. ५। सहा हिरे वाली रु. ४। आठ दिवसाच्या कीलीचे विलायतील घडयाळ रु. १४ सोलजर वाच मजबुत रु. ५। स्वदेशी सेकंड वाली रु. ६ पोस्टखर्च ।-

क. नुरा. आणि कं.

नं. ४७ मुंबई पोस्ट नं. ९

त्वरा करा ! त्वरा करा?

## बायसिकल टीचर

आमचेकडे सायकल फार थोड्यां वेळांत आणि उत्तम रीतिनें शिकविले जाईल दर माफक असून वक्तशिर काम केलें जाईल आजवर ५०० शे मागसापेक्षां जास्त लोकांस सायकली शिकविल्या आहेत. बाहेर गांवच्या लोकांकडून रेल्वेभाडे व जे वर खर्च घेतला जाईल. सायकली ही दुरस्त केल्या जातील. नवीन सायकली विकत मिळतील.

जेकब.

सायकल टीचर.

पत्ता:----

अहमद अली कासमजी बोहरा

नं ४८ इ. ७ आकोला (शहर)

## जोगळेकर आणि मंडळी लिमिटेड.

सरकारच्या सन १८८२ च्या सहाव्या आक्ट्याप्रमाणें रजिस्टर केली आहे.

स्थापना सन १९०७

भांडवल एक लक्ष रुपये.

प्रत्येक भाग २५ रुपयाचा याप्रमाणें एकंदर भाग ४०००.

भागीदारानें भाग मिळण्या करितां अर्ज करते वेळीं दरएक भागाबद्दल अर्जासोबत रुपये १० व अर्ज मंजूर झाल्यावर रु. ५ व बाकीची रक्कम प्रत्येक महिन्यांस रु. ५ प्रमाणें पुरी करुन दिली पाहिजे.

सदहू कंपनीचें मेमोरेंडम व आर्टिकल्स ऑफ आसोसिएशन आकोला येथें सदर कंपनीचें आफिसांत पाहण्यास मिळेल. प्रास्पेक्टसच्या प्रती सदहू आफिसांत अर्ज केला असतां मिळतील.

बोर्डाच्या हुकूमावरुन

पी. सी. जोगळेकर आणि कंपनी

म्या. एजंटस्

नं. १३

## नोटीस

नोटीस- वेशमी नथु बा रामु बारी काटोले रा. जामोद ता० जळगांव

यांसः—

खालीं सही करणार इनकडून नोटीस देण्यांत येतें कीं मी तुमची लग्नाची बायको असून लग्न झाल्यास १२-१३ वर्षें झालीं. तुम्ही मला ३-४ वर्षें झालीं वागवित नाहीं. मध्यें तुमचे येथें आली होती व आठदहा दिवस राहिली परंतु तुम्ही मारठोक करून व माझे आंगावरचे डागीने काढून मला हाणून दीले असें असतांही गावांतील चार पंचांनी पुन्हा मला तुमचे येथें आणून घातले. ते वेळीं सर्व पंचा समक्ष तुमचा चुलता तुकाराम बारी काटोले यांनीं तुमचे चांगले वागणुकीबद्दल हवाला घेतला होता. परंतु तुम्ही त्याचेहि न ऐकतां मारठोक करीत होतां. ते वेळीं पंचानीं तुकाराम बारी काटोले यांस ह्मणावें तर वरील तुकाराम बारी यानें मी काय करूं असें ह्मणावें. व तुम्ही आठपंधरा दिवस ठेवून केंव्हां मारठोक करून हाणून दिलें. असें चारपांच वेळां तुम्ही मला मारठोक करून हाणून दिले व मी नांदवीत नाहीं असें ह्मणतां तर तुमचे मनांत वागविणें नाहीं व अन्नवस्त्रहि देत नाहीं मी आजपावेतों माझे बापाचे घरीं कर्ज काढून मला तुमचे येथें मुलगी झाली ती मुद्दां पोटभरीत आहे. परंतु आता मला कर्जही मीळूं शकत नाहीं ह्मणून तुह्मास गावांतील चार पंचानीं वागविण्याबद्दल व फारकतीबद्दल ह्मटले. पंचांना तुम्ही असें सांगितलें कीं मी नांदवीत नाहीं फारकती देतो. असें ह्मटले परंतु फारकती दिली नाही. या प्रमाणें फारकतीबद्दल छकविता त्यामुळें मला दुसरा घरठाव करतां येत नाहीं. व दिवस फार माहागाईचे असून मुलगी व मी यांचे पोट भरण्यास अडचण पडते. करितां मुद्दाम जाहीर नोटिशीनें कळवितें कीं, ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत मी सावकारी कर्ज रुपये १५० काढलें तें व्याजासुद्धां देऊन त्याची पावती व्यात्री व माझी फारकती द्यावी सदहू मुदतींत तसें न केल्यास ही नोटीस फारकती समजून मी दुसरा घरठाव करीन व तुमचा नवरेपणाचा हक्क माझेवर राहणार नाहीं. व मी दुसरा घरठाव करून नंतर तुमचेवर कर्जाबद्दल फीर्याद करून कोर्ट खर्च व नोटिशीचा खर्चही तुह्मापासून घेतला जाईल. कळावें तारीख ११ माहे जून १९०८ दस्तुर गणपत गंगाराम

सही

कंवळजी मर्द नथु बारी काटोले
राहणार जामोद ता० जळगांव नीशाणी खुद्द हातची बांगडी

नं. ग. ८९

---

## नोटीस

रा. रा. तुकाराम व गोविंदसींग वल्लद जनवसींग जमादार दुकान मौजे पिंपरी गवळी ता० खामगांव पो० बाळापूर

यांसः—

नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं बापु जी वल्लद सोनाजी उगले राहणार कारिगांव याची जागा मी विकत घेतली आहे. ती जागा तुमचे जवळ गहाण असल्यामुळें तुमचे गहाणाचे रुपये हिशेब करून दिवाले रुपये ३५ त्यांपैकीं ता० १३-३-०८ इ० मौजे कारेगांव येथें कृष्णाजी खंडेराव यांचे घरीं त्यांचे समक्ष दिलें. व २८ रुपये ता० १४-२-०८ इ० रोजीं शिवाजी वल्लद माहीजी जुमडे व मी तुमचे दुकानावर येऊन दिलें व दस्तैवज मागितला असतां तुम्ही सांगितलें कीं माझा मुलगा हरी शेगावांस गेला आहे. तो आल्यावर पाठवून देईन तर तो दस्तैवज आज पावेतों दिला नाहीं व मी दोन तीन वेळा मागितला असतांही दिला नाहीं. तो दस्तैवज रद्द असे. त्याची फिर्याद केल्यास मी जबाबदार नाहीं. या नोटिशीचा खर्च तुह्मापासून भरून घेतला जाईल. कळावें. तारीख १२-६-१९०८ इ०

सही

उकर्डा वल्लद रामाजी उगले
रहाणार कारेगांव

नं. ग. ९० दस्तुर खु.

---

## नोटीस

धोंडूबाई जवजे महादेव जोशी रहाणार पातुर्डे हल्लीं मुक्काम तामगांव ता० जळगांव

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं अज्ञान पाडुरंग महादेव हा दत्तक घेतला असून तुझे जवळ जे वरील कर्जीत जिनगी स्थावर जंगम आहे या जिनगीची तूं अफरातफर करीत आहेस तर या नोटिशीनें कळवितें कीं तुम्ही सदर्हू जिनगीची अफातफर व कोणास गहाण खरेदी व कर्ज वगैरे ह्या इस्टेटीवर काढल्यास मी कर्जाचा जबाबदार नाहीं व सदर्हू कर्जाचा वरील जिनगीवर बोजा वगैरे रहाणार नाहीं. ही नोटीस ता० १६ जून सन १९०८ इ०

सही

पांडुरंग अज्ञान पालन करणार
गयाबाई जवजे महादेव जोशी

नं. ग. ९१ निशाणी बांगडी.

---

## जाहिरात

सर्व शेट सावकार इतर लोक यांसः—

खालीं सही करणार यांजकडून जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं खालीं सही करणार हा मयत महादेव मारुती जोशी याचा दत्तक मुलगा असून त्याची वडील आई धोंडीबाई जवजे महादेव जोशी ही मयताचे स्थावर जंगम इस्टेटीची अफरातफर करीत आहे तरी तिजपासून कोणी गहाण खरेदी, बक्षीस वगैरे तिजला कर्ज वगैरे सदर्हू जिनगीवर दिल्यास त्या कर्जाचा बोजा सदर्हू माझे इस्टेटीवर रहाणार नाहीं कळावें. ता० १६-६-०८ इ०

सही

अज्ञान पाडुरंग याची आई गयाबाई
जवजे महादेव जोशी
रहाणार पातुर्डे बु० ता० जळगांव.

नं. ग. ९२

---

## जाहिरात

सर्वत्र लोकांस या जाहिरातीनें कळविण्यांत येतें कीं रुखमी मर्द येडु चांभार राहणार निंबी ता० खामगांव ही आमची सावत्र आई असून आमचा बाप मयत झाल्यामुळें व तिला कोणी मुलबाळ नसल्यामुळें इस्टेटीचे आह्मी वारस आहोत. फक्त तीची अन्नवस्त्राची मालकी आहे. व ती जिवंत आहे तोपर्यंत आह्मी देण्यास तयार आहो. इतकें असून ती इस्टेटीची अफरातफर करून ती आपल्या पाहिल्या नवऱ्याच्या पोटच्या मुलास देण्यास इच्छित आहे सबब कोणी ही इस्टेट गहाण खरेदी व बक्षीस वगैरे अन्यतऱ्हेनें घेऊं नये व त्यास कोणी कर्जही देऊं नये दिल्याबद्दलची जोखम आमच्यावर अगर इस्टेटीवर नाहीं. तर त्याची जोखम व्यवहार करणारावरच राहील कोणी फसूं नये ह्मणून आगाऊ सुचना दिली आहे. कळावें ता० १४-६-०८ इ.

सही

बजी मर्द महादु चांभार राहणार
बाळापूर नी. खु. हातची बांगडी
आज्यानी मर्द रावजी चांभार राहणार निमकव्हळ ता० मलकापूर
नि. खु. हातची बांगडी

नं. ग. ९३

---

## नोटीस

रुखमी मर्द येडू चांभार राहणार निंबी ता० खामगांव पो. जळंब

इसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तूं आमची बापाची पाटाची बायको ह्मणजे सावत्र आई आहेस. तुला मुलबाळ कांहीं नाहीं. आमचा बाप मयत होण्यास ७-८ वर्षे झालीं. त्याचे मरणाचे वेळीं त्याजपाशीं नगदी रुपये १५०० जवारीचीं पेवें २ खामगांव मापी ७ खंडी जवारीचीं, सोनें तोळे १० दागिने व चांदीचे दागिने १५० तोळे. शिवाय निंबी येथील शेतें ३ तीन तीफणिचे होतें. याचे आह्मी वारस आहो. तूं फक्त जिवंत आहेस तोपर्यंत उपभोग घ्यावयास. तुला विकण्याचा गहाण बाक्षिस वगैरे देण्याचा अधिकार नाहीं. असें असून तूं आपला पुर्वीचे नवऱ्याचे पोटचा मुलगा जवळ आणून त्यास आमचे वरील इस्टेटिची अफरातफर करून त्यास निराळी इस्टेट करून देत आहेस करितां या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं सदर्हु कृत्य तूं बंद करावेस. चालूं ठेवल्यास आह्मी कोर्ट मार्फत रीतीप्रमाणें सदर्हु इस्टेट ताब्यांत घेण्याची व्यवस्था करूं या संबंधाची आह्मी २९ मे रोजीं पोष्ट मार्फत नोटीस दिलेलीच आहे. कळावें. ता. १४-६-०८

सही

बजी मर्द महादु चांभार
राहणार बाळापूर नि.
खु. बांगडी
आज्यानी मर्द रावजी चांभार
राहणार निमकव्हळ ता.
मलकापूर नि. खु.
बांगडी

नं. ग. ९४

---

## नोटीस

बीजराज कुंजीलाल मालक सीवनंदन बीजराज साहु दुकान दहिहांडा तालुके आकोट जिल्हा आकोला

यांसः—

नोटीस देणार अत्माराम रानोजी व तुकाराम रानोजी देशमूख कवार तालुके आकोला जिल्हा आकोला यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं आह्मी तुह्मांस तारीख २।५।०८ ची नोटीस वऱ्हाडसमाचारांतून दिली त्याचें उत्तर तुम्ही आकोला सन्मार्ग यांतुन तारीख १४-५-०८ रोजीं दिलीं तीं पावलीं त्यांत तुम्ही लिहिलें कीं गहाणखतचा भरणा तुह्मास पावला आहे व लीहिलेला मजकुर खोटा आहे असें आपण ह्मणता परंतु आह्मी आपणास दीलेले नोटीसांतील मजकुर खरा आहे तुम्ही आह्मास विश्वास देऊन फसविलें तथापी तुम्ही खरोखर जितके रुपये इमानानें आह्मास दिले तितके रुपयाबद्दल आह्मास हिशेब दाखऊन व केदारी गज्याधर यांचे रुपये आपण देउन पावती देत असल्यास बाकाची रकम आह्मी देण्यास तयार आहो घेत नसल्यास गहाणखत पोकळ आहे असें आपणास कबुल केलेंच पाहिजे. सदर्हुचा आपण दावा केल्यास कोर्ट खर्चासंबंधानें व व्याजासंबंधाने आह्मी किंवा आमची स्थावर जंगम इस्टेट जबाबदार नाहीं व फेडीस पात्र होणार नाहीं.

तसेंच आपण २०।१।० श्री नीराळे पुर्नावरून दावा दाखल केला त्याचे रीतीप्रमाणें जबाब दिले जातील. त्याची मागणी न करतो फीर्याद दाखल केली करतां कोर्ट खर्चाबद्दल आह्मी जबाबदार नाहीं आणि ३३० रुपये शेतीचे कामाकरतां घेतले आणि त्याचें गहाणखत रुपये १२७० चा भरणा घेऊन १६०० चें गहाणखत करून देतो पावेतो ही रकम उधारत खाते राहु याची असें आपण नोटिसींत लिहितां तो मजकुर सर्वस्वी खोटा आहे. रुपये ३३० मी मुळींच घेतले नाहींत व सांगितलें नाही एकंदरीत आमचें शेतीवगैरेचें उत्पन्न पाहुन आपली वासना बदलून आपले घरांत होईल त्या रीतीनें आमची स्थावर इस्टेट घेऊं इच्छीता व आह्मास सफा बुडऊन टाकण्याचा इरादा करतां असें उघड दिसत आहे कळावें ता० १२-६-०८ इ.

सही

अत्माराम रानुजी देशमुख कवार
दस्तुर खुद
तुकाराम रानुजी देशमुख कवार
दस्तुर खुद

नं. ग. ९५

## आर्यवनौषधालय मुर्डी

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांजकडील आनररी असिस्टंट सर्जन राजश्री अ. स. डॉ. विश्राम रामजी घोले यांनी आमची औषधें वरक हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या मुख्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत. त्याहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकिट आह्मास दिले आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देउनही त्याचें आरोग्यार्थ आणखी एखादें औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देउं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजविनी

धातुवर्धक. अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टिक, वीर्य स्तंभक,
रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शारीरिक मुख्य राजा जी धातू ती शुद्ध असेल तरच शरिर निरोगी राहुन सर्व सौख्य प्राप्त होते. ती दोषी असेल तर शरीरांत नाना कारचे रोगरुपी शत्रु उत्पन्न होऊन शारिरीक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ट होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी पाहिजे त्या दिवसांत एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेववें याच्या सेवनानें नपुसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात उन्हाळे इंद्रियशिथलता, कडकी. गर्मीसंबंधी मुरलेले विकार मुत्रसंकोच; धातुचा पातळपणा, स्त्रियाची धुपणी, छातींतील रोग, हात पाय मुत्रमार्ग, व नेत्र याचा दाह, क्षय, पंडुरोग, मुळाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश पित्तविकार. बाळंतरोग, मधुमेह जुनाट परमा, मुष्ठीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरें होऊन शरीर निरोगी मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातु रक्त यांची शुद्धी वृद्धि वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न प लागते त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत. करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळाली आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष मुलें, यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितीही घेणारास टपाल खर्च माफ आहे ४ रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ९ आणे पडेल अनुपान खर्डा सोबत किंवा व्ही. पीनें खालील पत्यावर मिळतील.

दर:-एकदम ३९ गो० १ रु० ७९ गो० २ रु. ११९ गो ३ रु १६९ गो. ४ रु. २७९ गो० ६ रु. ५९० गो० रु.

२ अपूर्व नेत्रांजन:-यानें पडळ, साहर, फुल, खुपऱ्या, बिंदु, कांच इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरीत बरें होउन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खरं रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु.

३ परम्यावर अपूर्व मिश्रण:--कोणताही नवा जुना परमा व उजन्य दहा तिडीक मुताची लाली, संकोच पुपस्राव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ १। भार बाटलीस रु. २

४ दंतबलवर्धक पूड:-दंतसंबंधी सर्व विकार उत्तम बरे होतात.

५ विंचूर्चे विष:-औषध लावतांच उतरतें मुळी ३ तो. ८ आणे

६ गजकर्ण:-खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात रु. ६ आणे

७ सर्व हिमज्वर:-औषध घेताच कशाही प्रकारचें ज्वर असले तरी तें औषध घेताच जाऊन पुनः उलटत नाहीत. १२ पुड्या १ रु.

८ प्लेगावर रामबाण औषध:-आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरें झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रह तापावर गोळ्या गाठीस लाव, पात पडू नये ह्मणून बातावर मात्रा याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं. २ आणे ख. सो.

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगावर अनेक औषधें ग्रंथोक्त रसायने भस्म पाक. गुटिका, आसव, तेलें, सूगंधी अत्तर, माफक दरानें मिळतात. अनुपान खर्डा सोबत टपाल खर्च वेगळा पडेल रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतीचें मान कळविल्यास रोगाची निदान चिकीत्सा कळवूं.

## अत्यंत आगत्यची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधाच्या अनेक जाहिराती पुढं असुन प्रत्येक आपला समाज निरुद्योगी व आळशी बनल्यामळें एका जो धंदा सुरू झाला त्याचेंच अनुकरण हुबेहुब नकल करुन पाहिजें त्यानें करावें आमचे जाहिरातीस कोकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजिलें वगैरे गावांतून तो पौ.वरचेंत घेऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहत. अशा जाहिराती किंवा तें लोक यांची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याचा तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हेंच कीं ज्यांच्या कारखाना आज सतत १९।२० वर्षें अव्याहत सुरूं असून ज्यांच्या औषधास १ले डाक्टरांनी सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधांनें कित्येक वर्षी ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचीच औषध नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करतां अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याण करीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेंस आणण्याची खटपट करूं. आजपर्यंत आमचे खटपटीनें यशहि बरेंच आलें आहे, करितां सकळ आर्य बंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तीच सर्वांनीं वापरवा, एकवार अनुभवानचें खात्री होईल इतर जाहिरातीशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषध मागणें तीं खालील पत्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरी गुणकारक औषधें मिळून हटकूण व त्वरित आरोग्य येईल. नं. १

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य

पत्ता:—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.



## OR!ENTAL GOVERNMENT LIFE ASSURENCE COMPANY LIMITED

*Established* 1874.

*HEAD OFFICE*—**BOMAY**

Chief Agency for C. P. Berar and Khandesh

*Head—Quarters—Nagpur C. P.*

## FUNDS EXCEED THREE CRORES AND TEN LAKHS

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

**IMMEDIATE SETTELEMENT OF CLAIMS**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. *This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating heir clients with the utmost liberality*

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's funds amount of a given sum, but it is essential to know how such Funds are invested— if in miscellaneous and risky investments or how secured

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay n terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured

*Government Officers, Professional men, Tradesmen and others,* by tmploying a portion of their annual income or profits in effecting life policies t once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he di eseerly, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay There are numerous instances in the records of the "Oriental" where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

s Influential and energetic Agents wanted. For terms please pply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to—

M. De SOUZA,
CHIEF AEGNT
Nagpur.

. 2


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनी सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

# वऱ्हाडसमाचार.

BREMR AVSACHAR

वर्ष ४२] आकोलाः—वऱ्हाडसमाचार, सोमवार तारीख २९ माहे जून सन १९०८ इसवी [अंक २४


## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हा. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशिचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन आळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.


### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक

ह्या बँकेत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागे राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमाच्या प्रती बँकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक
आकोला ९।९।०९ } G. A Phillips एजंट
नं ७३

### ✻ इकडे लक्ष द्या ! ✻

त्वरा करा ! त्वरा करा !

आह्मी येथें विक्रीकरितां नरसे, जिवत्या, पिठोरी, पाठोडा, गायगोऱ्ह्याच्या कागदांत कृष्ण, गोपी, गाई, यांचीं चित्रें, तुळशीचें लग्न व वटसावित्री वगैरे चित्राचे कागद फारच सुरेख छापले आहेत. चित्रें दर शेंकडा १ रुपया, व पिठोरी पांचशें घेतल्यास ०१२ आणे पडतील, [illegible]वाय टपाल खर्च निराळा पडेल.

पत्ताः—

बाळकृष्ण अनोबा दलाल,
कंपॉझीटर वऱ्हाडसमाचार
अकोला.

आमचें पेटंट यंत्र लोकांना पसंत आहे.



मे. किर्लोस्कर बंधू बेळगांव यांस— सा. न. वि. वि. तुह्मी कृपाकरून पाठविलेलें कडबा कापण्याचें यंत्र सुरक्षित पोंचलें त्यानें कडबा फार चांगला कापला जातो. सदरहु यंत्र इकडील लोकांना फारच पंसत पडलें आहे, व त्या बद्दल बऱ्याच मागण्या आपणाकडे येतील. त्या मानानें किंमत ( रु. १०८१० ) ही फारच कमी ठेवलेली आहे. कळावें ही विनंती ता. ४- २- ०८

सही

जहागीरदार सीप रायी ( ग्वालेर ) } श्रीमंत नानासाहेब फाळके दफ्तरदार.


### नोटीस

शेख मुनीर वल्दद मुसलमान राहणार शिरसोली तालुका आकोट यांसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं तुह्मी माझ्याकडून भूलथापीनें व लबाडीनें कूलमुखत्यारपत्र करून घेतलें आहे. ते कायद्यानें माझ्या अज्ञानपणांतलें असल्यामुळें व तुह्मी मला बुडविण्याच्या गोष्टी केल्यामुळें तुमचे मुखत्यारपत्र रद्द व बातल आहे. तुह्मी अस्सल मुखत्यारीचा कागद परत आणून द्यावा आणि आजपर्यंत कामगिरीचा हिशोब पंचा पुढें दाखल करावा असें करण्यास चुकाल तर मला फसविल्याबद्दल तुह्मावर फौजदारींत फिर्याद करण्यांत येईल आणि सर्व नुकसानी तुमच्यावर पडेल. तसेंच तुह्मी माझे कडून पोकळ व बिनमोबदल्याचें खरेदीखत करून घेतलें आहे तें रद्द असल्यामुळें तुह्मी तें मुकाट्यानें परत करावें. तुह्मी दांडगाईनें पेव काढून त्यांतील जवारी ४ खंडी चोरून नेली आहे. तिच्याबदलाची नुकसानी तुह्मास भरून दिली पाहिजे. कळावें ता. २०।६।१९०८

सही

शिवराम शांती तालेट सइतवाड राहणार वरूड तालुका आकोट. द. खु.

नं. ग. ६७

### नोटीस

मे. फीदाअली तयबअली बोहरी राहणार कसबे तेल्हारे यांसः—

नोटीस देणार रामराव आनंराव पाटील राहणार नेहुरी बु० तालुके आकोट याजकडून नोटिशीनीं कळविण्यांत येते कीं कसबे आकोट तेथील मारुती परदेशी तेली याची जागा आकोट येथील तुह्मीआह्मी दोघा मिळून रुपये ५०८ पांचशे आंठास विकत घेतली आहे. त्यांत तुमचा निमे हिस्सा आहे. सर्व रक्कम तुह्मी सांगितल्यावरून मी भरली आहे. त्यापैकीं तुमचे हिशाचे रुपये २५४ तुह्मी अद्याप दिलें नाहींत. करितां नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं सदरील जागा माझे हिशाची मला विकणें आहे त्यांत तुमचे हिशाची निमे जागा विकण्याची परवानगी असल्यास नोटीस पावल्यापासून ८ दिवसांत जबाब द्यावा. विकणें नसल्यास ८ आठ दिवसांत जागेची रक्कम २५४ रुपये व शिवाय व्याज असें आणून द्यावें न दिल्यास तुह्मीं पत्र लिहून दिलें प्रमाणें तुमचेवर फीर्याद करून कोर्ट खर्चासुद्धां रक्कम तुह्मापासून घेतली जाईल. आठ दिवसांचे आंत तुह्मी जबाब न दिल्यास आह्मी जागा विकून टाकूं पुढें तुमची तक्रार ऐकिली जाणार नाहीं. जागेंत नुकसान आल्यास तुमचे पासून हिशाप्रमाणें भरून घेतली जाईल. नफा आल्यास तुह्मास दिला जाईल. करितां ८ दिवसांत नोटिशीचा जबाब जरूर द्यावा. कळावें. ता. २२ माहे जून सन १९०८ इ.

सही

रामराव आनंदराव पाटील द. खु.

नं. ग. ६८

### नोटीस

सर्वत्र सावकार इतर लोक यांसः—

खालीं सही करणार यांजकडून असें कळविलें जातें कीं अमीनबी मर्द भुरेखां मुसलमान राहणार हाता तालुका बाळापूर ही माझी साक्षांत आई नसून माझी चुलती ह्मणजे ताई आहे. मौजे हाता तालुके बाळापूर येथील शेत सर्वे नंबर ७७ एकर १८ गुंठे ३ आकार रुपये ३७ व घावें तुमच्या नांवानीं लागलें आहे. परंतु सदरील शेत विकणार व गाहाण किंवा पट्यानें अगर बक्षीस देणार असल्याचें समजतें. ह्मणून या जाहिरातीनें सर्वास असें कळविलें जातें कीं हे माझे बिल्कुल वारस नाहींत. तिचेपासून सदरील इस्टेट गहाण खरीदी व बक्षीस अगर पट्यानें देणार असल्याचें समजते तर ते कोणी घेऊं नये. व ही नोटीस पावलेवर असें करूं नये. जर केलें तर घेणार बुडेल ह्याबद्दल जाहिरात नोटीस केली आहे. कळावें तारीख २५-६-०८ इ.

सही

खैरातीखा वा महेताबखा नि. खु.

नं. ग. ६९

## वर्तमानसार

सुमती छापखान्यची तिसरी झडती ६७ माणिकतोला स्ट्रीटमध्यें झाली. युगांतर पत्राचें जुनें आफिस त्या जागीं होतें, तेथें सुमति छापखान्याचे मालक निखिलेश्वर रॉय यांस पकडण्यांत आलें. युगांतर पत्र त्यांच्याच सुमति छापखान्यांत छापले जात आहे. वरील ठिकाणीं घेण्यांत आलेल्या झडतींत पोलिसला कित्येक बंदुका व पिस्तुलें सांपडलीं असून बराच पत्रव्यवहारही पोलिसच्या हातीं लागला आहे.

युगांतरचे माजी मुद्रक फणींद्रनाथ मित्र यांजवरील राजद्रोहाचा खटला ची. प्रे. मॅजिस्ट्रेटनीं आज ता. २३ रोजीं सेशन्स कामिट केला.

संजीविनी पत्राचे आफीस व त्या पत्राचें संपादक बाबू कृष्णकुमार मित्र यांचें घराची पोलिसकडून झडती घेण्यांत आली. घराची झडती सुमारें पांच तासपर्यंत चालू होती. घराचा कानाकोपरा बारकाईनें शोधण्यांत आला. झडतींत बाबूंचा बराच पत्रव्यवहार जप्त करण्यांत आला. कृष्णकुमार मित्र हे बरींद्र घोष व अरविन्द घोष यांचे नातलग असल्यामुळें हे दोघेजण त्यांच्या घरीं कांहीं दिवस रहात होते. या कारणामुळेंच त्यांच्या घराची झडती घेण्यांत आली असावी असा लोकांचा तर्क आहे.

ता २३ रोजीं सकाळीं नारायणगंज येथील पहिला वर्ग मुनसफ आनंदचरण चकवर्ती यांच्य घराची सुमारें दोन तासपर्यंत कसून झडती घेण्यांत आली मुद्देमाल कांहीं सांपडला नाहीं, अलीपुर येथील आरोपीपैकीं कृष्णजीवन सन्याल याच्याशीं मुनसफांचें नातें आहे, या कारणावरूनच त्यांच्या घराचा झाडा घेतला. भूपेंद्रनाथ दत्त यांचा फोटो, कृष्णजीवन सन्याल यांचें सील, फ्रेंच राज्यक्रांतीचा इतिहास व खासगी पत्रव्यवहाराचा ढीग एवढ्याच वस्तु झडतींत सांपडल्या. मुनसफांची बहीण पबना येथें रहात असते. तेथें कृष्णजविन सन्याल हा कधीं कधीं रहावयास जात असें. हा फोटो मुनसफांच्या बहिणीच्या पेटींतच सांपडला.

नरेंद्रनाथ गोस्वामी यानी आपल्या जबानींत वर्णिलेले गुप्त मंडळीचे पुढारी ज्योतिंद्रनाथ बानर्जी यांस ता. २६ रोजीं कोर्टांत आणलें. त्यांच्या समागमें बरद्वानचे डि. पो. सु. सेनगुप्त हे होते. ज्योतिंद्र बानर्जी यांनीं सन्याशाचा वेष घेतला होता. ज्योतिंद्र बानर्जी यांस बरद्वान शहरापासून १२ मैलावरील एका खेड्यांत पकडलें असें समजतें.

खुदीराम बोस यांस देहांत शासन फर्माविण्यांत येतें न येतें तोंच आणखी एक बाँब फेकण्याचा धाडशी प्रयत्न झाला. सुदैवानें या प्रसंगीं मिसेस व मिस केनेडी यांच्याप्रमाणें कोणी प्राणास मुकला नाहीं. रवीवारीं मध्यरात्रीं कांकिनारा स्टेशनजवळच्या सिग्नलच्या खाबापाशीं गाडी थांबली असतां एका सेकंडक्लासच्या डब्यांत बाँब फेंकण्यांत आला अशी खबर ईस्टर्न बेंगाल स्टेट रेल्वेच्या ट्रॅफिक सुपरिन्टेन्डेंटास मिळाली आहे. डब्यांतील दोन युरोपियन फार घायाळ झाले असून डब्याची पुष्कळ खराबी झाली आहे. घायाळ झालेल्यांच्या शुश्रूषेसाठीं एक हॉस्पिटल असिस्टंट देऊन हा डबा स्पेशल इंजिन लावून सिलास रवाना करण्यांत आला बॉम्बच्या स्पोटामुळें उडालेल्या धांदलींत बाँब फेकणारा पळून गेला. अद्याप त्यास पकडण्यांत आलेले नाहीं. जखमी झालेले युरोपियन भाटपारा येथील तागाच्या गिरणींतील असिस्टंटस सी. ब्राऊन आणि कॅपसी अशी आहेत. मि. ब्राऊन यांस जबर दुखापत झाली आहे.

मुंबईच्या 'विहारी' पत्राचे मुद्रक व प्रकाशक रा. रामचंद्र नारायण मंडलीक ह्यांच्यावरील राजद्रोहाच्या खटल्याचा निकाल चीफ प्रेसिडेन्सी मॅजि० मि० ॲस्टन ह्यांनीं आज ता० २२ रोजीं तिसरे प्रहरीं दिला. आरोपी मंडलीक ह्यांस मॅजि० साहेबांनीं दोन वर्षांची सक्त मजुरीची कैद व एक हजार रुपये दंड आणि दंड न दिल्मास आणखी सहा महिन्यांची सक्त मजुरीची कैद अशी शिक्षा दिली.

चंद्रनगर येथील डुप्ली कॉलेजचे व्हाइस-चेअरमन व इंग्रजीचे प्रोफेसर बाबू चारुचंद्र राय यांना सोमवारीं एका पोलिस सार्जंटनें पकडलें व कलकत्त्यास आणलें. बाबू चारुचंद्र हे अलाहाबाद युनिव्हर्सिटींत चांगले नाणावलेले असून त्यांना कित्येक सुवर्णपदकेंही बक्षिस मिळालीं आहेत. बाबू चारुचंद्र यांस पकडण्याच्या उद्देशानें आपण आलों आहों, असें सार्जंटनें चंद्रनगर येथील कमिशनरांस कळविलें. त्याबरोबर चंद्रनगरचे कित्येक पोलिस घेऊन स्वतः कमिशनर सार्जंटबरोबर बाबूंच्या घरीं गेले व तेथें त्यांनीं त्यांस वारंट दाखविलें. बाबूंनीं वारंटावर सही केल्यानंतर त्यांच्या घराची झडती सुरूं झाली. त्यावेळेस बाबूंचे बंधु आपली बंदुक साफ करीत बसले होते. पोलिसांनीं त्यांच्या हातची बंदुक एकदम हिसकावून घेतली. चंद्रनगर येथें हत्यारें बाळगण्यास परवाना लागत नाहीं; तरी चारुबाबूंनीं हुगळी येथील मॅजिस्ट्रेटकडून हत्यार बाळगण्याबद्दल परवाना मिळविला होताच. तो त्यांनीं ताबडतोब पोलिसला दाखविला. झडती चालूं असतां एका पोलिसनें बाबू चारुचंद्र यांना एक चिठ्ठी दाखवून या चिठ्ठींत काय आहे ह्मणून विचारलें. मला कांहीं माहीत नाहीं असें बाबूंनीं उत्तर दिलें. त्यावर पोलिसनें त्यांना सहा महिने कैदेची धमकी दिली. हें एकून बाबू थोडेसें हंसले मात्र; परंतु त्यांनीं उत्तर वगैरे कांहीं दिलें नाहीं. झडती सकाळचे दहा वाजेपर्यंत झाल्यानंतर बाबूस गाडींत घालून नेण्यांत आलें.

'युगांतर' पत्र पुनः प्रसिद्ध झालें आहे. ह्या वेळीं त्यांतील लखे इंग्रजी भाषेंत लिहिलेले आहेत. पूर्वीपेक्षां यावेळची भाषा कडक आहे. या पत्राच्या एका रकान्यांत असें ह्मटलें आहे कीं युगांतर' हें एक वर्तमानपत्र नाहीं. तर क्रांति करणारी ती एक संस्था आहे. या पत्राचा वाटेल तितका पिच्छा पुरविण्यांत येवो, व त्याच्यावर कितिही खटले होवोत, तरी सदर पत्र कधींही बंद पडणार नाहीं. तें प्रासिद्ध होईलच होईल." या पत्राच्या दुसऱ्या एका रकान्यांत पिक्रिक ॲसिड वगैरे पदार्थ कसे तयार करावे यासंबधाची माहिती देण्यांत आली आहे.

गेल्या शनिवारी (ता. १९ रोजीं) सकाळीं, सोलापूरचे डि. पोलिस सुपरिन्टेन्डंट आपल्या हाताखालच्या कांहीं लोकासह तेथील स्वराज्य पत्राच्या आफीसांत गेले व स्वराज्य पत्राचे संपादक रा. बळवंत शंकर लिमये ह्यांस डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटच्या सहीचें वारंट दाखवून त्यांनीं रा. लिमये ह्यास कैद केले. नंतर स्वराज्य पत्राच्या ऑफिसची झडती घेण्यांत आली. ऑफिसांतलें कांहीं सामान वर्गणीदारांची यादी, वह्या, प्रुफें वगैरे पोलिसांनीं नेले रा. लिमये ह्यांस त्यांच्या घरीं नेऊन त्यांच्या घराची झडती घेतली, परंतु त्या ठिकाणाहून पोलिसांनीं कागदपत्र वगैरे कांहीं नेले नाहींत.

## दे. टिळक यांजवरील खटला

'केसरी' पत्रांत राजद्रोही लेख प्रसिद्ध केल्याच्या आरोपावरून रा. बाळ गंगाधर टिळक यांस ता. २४ रोजीं संध्याकाळीं साडे सहा वाजतां येथील पोलीसांनीं पकडलें. रा. टिळक हे कांहीं कामानिमित्त गेल्या मंगळवारीं येथें आलें होतें व क्राफर्ड मार्केट नजीक सरदारगृहांत उतरलें होते. त्यांस पकडण्याबद्दल १२४ (अ) व १५३ (अ) कलमाप्रमाणें चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट मि. आस्टन यांनीं काल संध्याकाळीं वारंट काढलें होतें व तें बजविण्यासाठीं काल संध्याकाळीं साडे सहा वाजतां डिटेक्टिव पोलिस सुपरिंटेंडट मि. स्लोन, इन्स्पेक्टर पेटीगिरा व इतर पोलिसचे अधिकारी सरदारगृहांत गेले होते. रा. टिळक हे यावेळीं एका आरामखुर्चीवर पडलेले होते. मि. स्लोन यांनीं त्यांस वारंट दाखवितांच ते शांतपणें पोलिसच्या स्वाधीन झाले. यावेळीं त्यांच्याजवळ 'काळ' पत्रकर्ते रा. परांजपे व इतर दोन चार मंडळी बसलेली होती. रा. टिळक यांस एका गाडींत बसवून एस्प्लनेड पोलिस कोर्टाच्या चौकींत नेण्यांत आलें. तेथें डेप्युटी पोलिस कमिशनर मि. फिलिप्स हे हजर होते.

काल रात्रीं दहा वाजतां पुणें येथील गायकवाडच्या वाड्यास पोलिसनें कुलुप लावलें. या वाड्यांत केसरी ऑफिस असून तेथेंच रा. टिळक राहत होते. कुलुपें घातल्यानंतर मोहरा करण्यांत आल्या. रा. टिळक यांच्या घरच्या मंडळीस रात्रीच्यावेळीं वाड्याच्या पुढील भागांतील एका खोलींत रहावें लागलें.

'केसरी वरील खटल्यास' ता. २६ रोजीं दुपारी चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट मि. ॲस्टन ह्यांच्यापुढें सुरुवात झाली, सरकारतर्फे मि. बोवेन हे काम चालवित होते व रा. टिळक ह्यांच्यातर्फे बेरिस्टर दावर व बॅप्टिस्टा आणि मेसर्स बोडस व दीक्षित वकील हे काम चालवित होते. कोर्टांत प्रेक्षकांची अतिशय गर्दी झाली होती. रा. टिळक ह्यांच्या भोंवती पोलिस ऑफिसरांचा गराडा होता व त्यांची स्नेहीमंडळी त्यांच्या जवळ बसली होती. खटल्याचें काम चालूं असतां, त्याकडे रा. टिळक ह्यांचें विशेष लक्ष होतें असें दिसलें. रा. टिळक ह्यांचे वकील बोलत असतां एक दोन प्रसंगीं रा. टिळक ह्यांस हसूंही आलें.

जामिनाचा अर्ज मॅजिस्ट्रेटपुढे जेव्हां सुनावणीस निघाला तेव्हां रा. टिळक ह्यांचें लक्ष कामाकडे विशेषच वेधलेलें दिसलें. जामीन अर्जास हरकत घेतांना मि. बोवेन ह्मणालेंः-तारीख १२ मेचा केसरीचा अंक पहातां कोर्टास असें दिसून येईल कीं, आरोपी यांस जामिनावर सोडणें योग्य नाहीं. ह्या ठिकाणीं मि. बोवेन ह्यांनीं केसरींत 'देशाचें दुर्दैव' ह्या मथळ्याखालीं आलेल्या ता. १२ मेच्या अग्रलेखांतील कांहीं वाक्यें वाचून दाखविलीं.

तीं वाक्यें हीं:-

(१) पण हिंदुस्थानांतील राजकीय प्रकरण इतक्यांतच अशा थरावर येऊन ठेपेल-निदान आमच्या येथील गोऱ्या अधिकारीवर्गाचा हट्ट व दुराग्रह स्वदेशोत्कर्षाबद्दल आस्था बाळगणाऱ्या तरुण पिढीस पूर्ण नाउमेद करून बंडेखोर मार्गास इतक्या लौकर प्रवृत्त करील—असें आह्मांस वाटत नव्हतं.

(२) राज्यकर्त्यांचा स्वार्थ कितीही उदात्त असला, तरी हिंदुस्थान देशाचें त्यामुळें नुकसानच आहे, आणि हें नुकसान बंद करण्यास गोऱ्या अधिकारी वर्गाच्या हातांतील सत्ता हळूं हळूं आमच्या हातांत आली पाहिजे, एरव्ही गत्यंतर नाहीं. असा हिंदुस्थानांतील पुष्कळ लोकांचा आतां समज झाला आहे.

(३) शोकानें अंतःकरण अतिशय संतप्त झालें असतां, मनुष्याच्या डोळ्यावाटे एखादा दुसरा तरी अश्रू बाहेर पडूं नये असा निर्बंध घालणें ज्याप्रमाणें दुर्घट होय, त्या प्रमाणें हिंदुस्थानांवर अरेरावीपणानें आणि शिरजोरपणानें राज्य करणारी अनियंत्रित राज्यपद्धतींत लोकांस इतकीच असह्य व्हावी कीं, त्यामुळें कोणीही फाजील संतापून अत्याचारास प्रवृत्त होऊं नये अशी आशा बाळगणें व्यर्थ होय.

मॅजिस्ट्रेट साहेबांनीं जामिन अर्ज नामंजूर केला. रा. टिळक ह्यांच्या वकिलाच्या अर्जावरून रा. टिळक यांस कोर्टाच्या कोठडींतच संध्याकाळपर्यंत ठेवण्याचा व रा. टिळक ह्यांचे स्नेही व वकील ह्यांस त्यांस भेटूं देण्याचा मॅजिस्ट्रेट साहेबांनीं हुकूम केला ना. पारखे व मी. जॅान बॅप्टिस्ट हे कोर्टाच्या परवानगीनें रा. टिळक ह्यांस तेथें भेटले.

केसरी खटल्यांतील जामिनाचा अर्ज हायकोर्टाकडे आज करण्यांत येणार आहे.

वऱ्हाडसमाचार

आषाढ शुद्ध १ शके १८३०

## गुन्ह्याचें निर्मूलन

Prevention is better than cure अशी इंग्रेजी भाषेंत ह्मण आहे, तिचा व्यवहारांत उपयोग करून घेण्याचे प्रसंग हवे तेवढे येतात; पण 'योजकस्तत्र दुर्लभः' या आमच्या देशी ह्मणीची सत्यताच पदोपदीं दिसून येते. ईश्वरदत्त बुद्धिसामर्थ्याचें व त्याजबरोबरच सदसद्विवेकाचें ओझें वागविणारा मनुष्य प्राणी इश्वरी—आणि त्यावरच उभारलेल्या—मानवी कायद्यांचें उल्लंघन करण्यास कां प्रवृत्त होतो हा एक मोठा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. मनुष्यानें अनीतीचें, किंवा बेकायदेशीर वर्तन केलें ह्मणजे त्याला शासन करण्याची वहिवाट पूर्वापार चालत आलेली आहे. अर्थात या शासनांतील हेतू भितीनें त्या कर्मास कोणी प्रवृत्त होऊं नये असा असला पाहिजे. पण शासनामुळें गुन्हे बंद पाडण्याची तजवीज या प्रश्नाच्या एका अंगाचा विचार केल्यामुळें झालेली आहे. गुन्हा केल्यानंतर तो करणारास शासन करून त्या योगानें त्याला जी दहशत बसेल किंवा जी मानहानि झाल्यासारखी वाटेल तिच्या मुर्वतीस्तव तो पुन्हा गुन्ह्याला उद्युक्त होऊं नये ही कल्पना गुन्ह्याचें निर्मूलन करीत नसून त्याची पुनरावृत्ति होऊं नये एवढाच तींतील हेतु दिसतो. पण गुन्हा घडूंच नये, तो करण्याची कल्पना उत्पन्न होऊं नये असें करण्याकडे पूर्वींच्या काळीं शास्त्यांची प्रवृत्ति नव्हती व अलिकडच्या सुधारणेच्या काळांतही ती विशेषशी दिसून येत नाहीं. अनीतीनें वागूं नये हें मनुष्य प्राण्यास समजते. असें असतां तो तसें करतो तेव्हां तो ईश्वरी नीतीला जुमानित नाहीं हें सिद्धच झालें. मानवी समाजांतील मोठा भाग मनुष्य निर्मित कायद्यापेक्षां इश्वरी न्यायाला जास्त भीत असतां हा सिद्धांत सकृद्दर्शनी भ्रामक वाटला, तरी सूक्ष्म अवलोकनानें व विचारानें तो खरा आहे असें दिसून येतें. इश्वरी नीतीला भीक न घालणारा मनुष्य अनीती आचरतो तेव्हां मनुष्यानिर्मित कायद्याला भितो किंवा कसें हा प्रश्न या विषयांत फार महत्वाचा आहे. शासनवादी लोक शासनाच्या जरबेच्या जोरावर मनुष्यास अनीतिपासून परावृत्त करूं पहात असतात. ह्मणजे मनुष्यनिर्मित कायद्यांत सांगितलेल्या शासनास तो भितो असें यांना वाटत असतें. पण ती चूक आहे. बेकायदेशीर वर्तन करण्यान्यांत दोन प्रकार असतात. बेकायदेशीर वागणें हा एका भागाचा नित्याचा व्यवसाय असतो व दुसऱ्या प्रकारांत क्षणैक मोहामुळें किंवा चुकीनें, अथवा मनावर ताबा न राहिल्यामुळें ज्यांचे हातून बेकायदेशीर वर्तन घडतें असे कोण

असतात. दोन्ही प्रकारचे लोक कायद्यांत सांगितलेलें शासन डोळ्यापुढें असतांना बेकायदेशीर वर्तन करण्यास प्रवृत्त होतात तेव्हां ते त्या शासनास मुळींच जुमानीत नाहींत हें खास. सदसद्विवेकाबरोबर मनुष्याला बुद्धि देऊन इश्वरानें मनुष्याचें सामर्थ्य वाढविलेलें आहे. या बुद्धिच्या जोरावर ते शासन प्राप्त न होईल असें करण्याची धमक कित्येकांच्या अंगीं असते. कित्येक शासनाची क्षिती बाळगीत नाहींत. अगदीं निकरावर आलेले लोक कशाचीही पर्वा करीत नाहींत. ते लोक खरे गुन्हेगार नव्हेतच हें कायदाही प्रत्यक्षपणें नव्हे तरी अप्रत्यक्षपणें कबूल करितो. जाणूनबुजून बेकायदेशीर वर्तन करणाऱ्यांत वर सांगितल्याप्रमाणें शासनाला जुमानणारे लोक फारच थोडे सांपडतात हें वर दाखविलेंच आहे. शासनाला भिणारे पण ते टाळण्याची हिंमत धरणारे लोक गुन्हा करतांना शासनाला जुमानीत नाहींत असेंच ह्मटलें पाहिजे. गुन्हेगारांची गुन्ह्याकडे प्रवृत्ति होतांना शासनाची भीति त्यांना वाटत नाहीं. असा सर्व साधारण नियम प्रत्यक्ष अनुभवाच्या कसोटीलाही उतरेल. तर मग शासनाचा उपयोग काय? असा प्रश्न उदभवतो. अपराध्यावर सूड उगवणें हा कधींही हेतु नाहीं तर मग ज्याचा कांहीं उपयोग नाहीं अशा प्रकारचें पीडन मनुष्य प्राण्याला सहन करावयास लावण्यांत काय हंशील आहे? वर जो गुन्हेगारांचा दुसरा प्रकार सांगितलेला आहे त्यांना शासनाची जरुरी नाहीं असें सिद्ध करतां येईल. मानहानि, गैरअब्रू येवढा दंड त्यांना पुनः गैरकायदा वर्तन करण्यापासून परावृत्त करण्यास सर्वस्वी पुरेसा झाला पाहिजे. त्यांना कष्ट देण्यानें किंवा निष्टुरपणानें वागविल्यानें समाजाचें झालेलें नुकसान भरून येत नाहीं किंवा त्यांच्या मनोवृत्तींतहि फरक पडत नाहीं. उलट पक्षीं, ज्यांना शासनाची क्षिती वाटत नाहीं, अशा प्रकारच्या व्यवसायी गुन्हेगारांच्या साहचर्यांत आयुष्य कंठण्याचा प्रसंग या प्रकारच्या गुन्हेगारांना जास्त निकृष्टावस्थेकडे नेण्याचा मात्र संभव असतो. पाहिला व्यवसायी गुन्हेगारांचा प्रकार सांगितला त्याचेवर शासनाचा कांहीं परिणाम होत नाहीं हें प्रसिद्धच आहे. अशा प्रकारच्या गुन्हेगारांच्या व न्यायाधीशांच्या पुनःपुनः गांठी पडतात यावरून शासन त्यांना बेकायशीरपणा पासून परावृत्त करीत नाहींत इतकेंच नव्हे तर त्यामुळें समाजांत त्यांची जी वारंवार मानहानि होते तीमुळें बेकायदेशीर वर्तना खेरीज त्याला चरितार्थास कांहीं साधनच उरत नाहीं असें दिसून येतें. त्यांना दुरुस्त करणें आणि त्यांची परंपरा बंद पाडण्याला सर्व हे उपाय सर्वस्वी निरुपयोगी आहेत, हें वरील विवेचनावरून लक्षांत आलें असेलच.

हा प्रश्न अनेक सुधारलेल्या राष्ट्रांतील विचारी पुरुषांना घोटाळ्यांत घालून बसला आहे. अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानांतील सर्वच अपूर्व प्रकाराप्रमाणें त्यांची न्याय पद्धति किंवा गुन्हेगारांस वागविण्याची पद्धति अपूर्व आहे यांत शंकाच नाहीं, पण तींत अपूर्वतेंखेरीज दुसऱ्या तत्वाचें प्राधान्य दिसून येत नाहीं. युरोपांतील राशियासारख्या देशांत चांगल्या संभावित लोकांस देखील केवळ राजद्रोहाच्या संशयावरून पूर्व सैबेरियाच्या निर्जन अरण्यांत एकांत वासांत दिवस कंठूं द्यावण्याची पद्धत अद्याप आहे. तेथील शांततेमुळें तेथें नेऊन ठेवलेल्या लोकांस शेवटीं बुद्धिभ्रंश होउन वेड लागल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. खुद्द इंग्लंडमध्यें देखील या प्रश्नाचा निकाल जास्त सशास्त्र पद्धतिनें लावण्यास नुकतीच सुरवात झाली आहे. गुन्हे घडण्याला प्रतीबंध करण्याचे हेतूनें इंग्लंडच्या पार्लमेंटापुढें नुकतेंच एक बिल सादर झालें आहे. या बिलामुळें अपराध्यांची वागवणूक व तत्संबंधी इतर प्रश्न यांचे बाबतींत पूर्वीच्या प्रचारांत मोठीच क्रांति घडून येणार असल्यामुळें हें बिल विशेष महत्वाचें आहे. या बिलाच्या पहिल्या भागांत तरुण गुन्हेगारांना कशा रीतीनें वागवावे या संबंधाचे नियम आहेत. हिंदुस्थानांत अलीकडे तरुण गुन्हेगारांस कडक शिक्षा देण्याचा प्रवृत्ति वाढत असल्यामुळें या बिलांतील हे नियम विशेष लक्षांत घेण्याजोगें आहेत. या बिलांतील नियमाप्रमाणें तरुण गुन्हेगारांकरीतां कायमचे सरकारी सुधराईखाने स्थापण्यांत येणार आहेत. ज्यांना कैदेची शिक्षा असेल असे गुन्हे करणाऱ्या १६ ते २१ या वयाच्या दरम्यानच्या मुलांस १ वर्षापासून ३ वर्षा पर्यंत या सुधाराईखान्यांत ठेवण्यांत येईल या मुलाच्या शीलाला घातक अशा परिस्थितीपासून त्यांना अलित ठेवण्यांत यावे व योग्य दिसल्यास सुधराईखान्यांत कांहीं काळ घालविलेल्या गुन्हेगारांस देखरेखी खालीं पण बाहेर मोकळे राहूं देण्याची तजवीज नियमानें केली आहे. कैदी सहा महिने तुरुंगांत राहिल्यानंतर तो या पुढें कायदेशीर रीतीनें वागेल असें तुरुंगावरील अधिकाऱ्यांस वाटले तर त्यांनीं आरोपीस परवान्यावर आणि अधिकाऱ्यांच्या देखरेखी खालीं मोकळे सोडण्यांत यावे असा एक अत्यंत महत्वाचा नियम या बिलांत दाखल केलेला आहे क्षणैक मोहानें बेकायदेशिर वर्तनाला उद्युक्त झालेल्या तरुणांना सुधारण्यास हा नियम उपयोगी होणार नाहीं असें कोण ह्मणले? या मुळें निर्ढावलेल्या गुन्हेगाराशीं होणारें संघट्टण सुटून नीतीनें वागून चरितार्थ चालविण्याचे मार्ग तरुण गुन्हेगारांस मोकळे होतात. हा नियम इंग्लंडमध्यें पसंत होईलच पण इतर देशांतही तो पसंत व्हावा अशी इच्छा या बिलाचे पुरस्कर्ते मि. ग्लाडस्टन यांनीं प्रदर्शित केली, ती आमचे सरकारचे मनास येईल काय? या बिलांतील दुसरा भाग बराच वादग्रस्त आहे. सराईत गुन्हेगारांस तीन वेळां शिक्षा झाल्यावर कांहीं एक मुदतीपर्यंत त्याची गुन्ह्याकडे प्रवृत्ति होऊं नये ह्मणून अटक करण्याची तजविज यांत केली आहे. अथात् या नियमामुळें कोणीही गुन्हेगाराला आयोग्य रीतीनें त्रास होऊं नये अशी खबरदारी घेण्यांत आली आहे. शिक्षेची मुदत संपल्यावर अटकेच्या ठिकाणीं त्याला ठेवण्यांत येईल. तेथें सक्ती कमी असून चांगल्या वर्तनानें उत्तरोत्तर जास्त सवलती मिळवितां याव्या अशी तजवीज केलेली आहे. ही तजवीज अर्थातच सराईत किंवा धंदेवाल्या गुन्हेगाराकरितां आहे. तुरुगांत यांचें वर्तन फारच उत्तम असते. पण त्यांतून सुटल्यावर पुनः लवकरच ते तेथें परत येतात. या वर्गांतील लोक तुरुंगांतील शासनाला जुमानीत नाहींत हें वर सांगतलेंच आहे. मि. ग्लाडस्टन यांचें बिल याच तत्वावर रचलेलें दिसत आहे. हिंदुस्थान सरकार मि. ग्लाडस्टन यांच्या बिलांतील तत्वांचा विचार करून आपले कायदे दुरुस्त करण्याची तजवीज करील काय!

---

## सरकार आणि रेल्वे.

हिंदुस्थानांतील रेल्वेचा कारभार व त्यांचा जमाखर्च या संबंधानें चौकशी करण्यासाठीं नेमलेल्या कमिटीचा रिपोर्ट हिंदुस्थान सरकाराकडे सादर झाला आहे. अद्याप कमिटीचा संबंध रिपोर्ट किंवा कमिटीपुढें झालेल्या साक्षी प्रसिद्ध झाल्या नाहींत. पण रयतेला त्यांतून कांहीं जास्त माहिती कळेल असें नाहीं. 'हिंदुस्थानांत रेल्वेचा त्वरित प्रसार करणें हें सरकारचें आद्य कर्तव्य आहे' असें कमिटीनें आपलें मत दिलें असून या त्वरित प्रसाराचे मार्गांतील अडचणी दाखवून दिल्या आहेत. इतर कर्तव्यांची योग्य पाळणूक झाल्या नंतर रेल्वेच्या विस्ताराचें कर्तव्य पार पाडण्यास कोणी हरकत करणार नाहीं. पण कमिटीनें जें आद्य कर्तव्य सांगितलें आहे त्याचें मूर्तस्वरूप असें आहे; 'रेल्वे पाशीं जीं साधनें असावयाचीं तीं गेल्या दोन वर्षांत वाढत्या व्यवहाराला; पुरेनाशीं होतीं; ह्मणून कमिटीची अशी सूचना आहे. कीं अलिकडे रेल्वेची बांधणी व तिचा सरंजाम यांवर खर्च होण्यासाठीं जेवढी रक्कम मंजूर करण्यांत येते तिच्यापेक्षां या पुढें ती जास्त केली पाहिजे. कसेंही करून या कामासाठीं सुमारें एकवीस कोटि रुपये मंजूर झाले पाहिजेत. यापैकीं निदान पंधरा कोटि इंग्लिश भांडवलवाल्याकडून घ्यावेत आणि बाकीचे हिंदुस्थानांतच कर्ज रोख्यावरून किंवा सरकारी चालूं उत्पन्नांतून घ्यावेत. यावरून हें स्पष्ट दिसून येईल कीं या प्रश्नाचा निकाल आमच्या देशाचे हिताचे दृष्टीनें झाला नसून तो परकी भांडवलवाल्यांच्या हिताचे दृष्टीनें झालेला आहे. अशा रीतीनें हिंदुस्थानाच्या डोक्यावर जें ओझें बसणार आहे तें हलकें करण्यासाठींच कीं काय, कमिटीनें असें सुचविलें आहे कीं 'रेल्वेमध्यें अडकविलेल्या पैशावर होणारा नफा रेल्वेचा विस्तार झाल्यामुळें एकंदर देशाचा होणारा तात्कालिक फायदा, आणि बाहेर देशच्या कर्जाची वाढ खुंटविण्याचें महत्व हीं सर्व अंगें लक्षांत घेऊन सरकार सध्यांपेक्षां दरवर्षी जास्त शिल्लक टाकीत जाईल आणि रेल्वेच्यापायीं होणाऱ्या खर्चाचे कामीं तिचा उपयोग करीत जाईल तर फायद्याचें होईल.' शिल्लक उरूं लागल्यास तिचा उपयोग रयतेवरील करांचें ओझें कमी करण्याकडे न करतां ती रेल्वेवर खर्चण्याची पद्धति किती चुकीची आहे हें ना. गोखले यांनीं वेळोंवेळीं हिंदुस्थान सरकारच्या नजरेस आणलें आहे. कमिटीनें आणखीही एक युक्ती सुचविली आहे, ती कीं, गोल्ड स्टँडर्ड रिझर्व फंडाच्या जास्त वाढीची जरूर दिसेनाशीं झाली ह्मणजे टांकसाळीमुळें होणाऱ्या नफ्याचा विनियोग रेल्वेकडे करावा. रेल्वेसंबंधानें सरकारचें जें धोरण असावें ह्मणून सुचविण्यांत आलें आहे त्याचे पुढें तर या सूचना कांहींच नव्हेत असें दिसून येईल. दक्षिण हिंदुस्थानांतील रेल्वेसंबंधानें स्टेट सेक्रेटरी यांनीं नुकतेंच जें धोरण स्विकारलें आहे त्यावरून या धोरणाची थोडशी कल्पना पूर्वींच बसलेली होती. रेल्वेसाठीं दरसाल २१ कोटि रुपयांचा खर्च करावयाचा त्याची मजल त्या पलिकडे नेतां यावी ह्मणून खाजगी रेल्वे कंपन्या व सरकार यामध्यें अशा रीतीची भागीदारी सुचविण्यांत आली आहे कीं त्या योगानें खाजगी कंपन्यांना ५० वर्ष मुदतीपर्यंत मालकी हक्क मिळेल. या संबंधांत कमिटीनें सुचविलेली योजना येणेप्रमाणें आहे.

कांहीं एका ठरविक मुदतींत एखाद्या रेल्वेचें ऐन उत्पन्न होईल तें त्या कामांत सरकारचें भांडवल असें धरून नंतर ती रेल्वे चालविण्यासाठीं एक कंपनी स्थापण्यांत येईल. या कंपनीनें सरकारच्या तारणाखेरीज अन्य रीतीनें भांडवल वाढवावें. रेल्वेवर जें ऐन उत्पन्न होईल त्याची कंपनी व सरकार यांच्यामध्यें भांडवलाच्या प्रमाणाप्रमाणें हिस्सरेशी करावी. या प्रमाणें स्थापन झालेल्या कंपन्यांच्या हातीं सरकारकडून वहिवाटल्या जाणाऱ्या एक दोन रेल्वे देण्यांत याव्या. ठरविक वेळीं त्या सरकारला परत आपल्या हातीं घेतां याव्यात. पण कराराच्या मुदती बऱ्याच लांब, पन्नास वर्षेपर्यंत सुद्धां असाव्यात.

गेल्या तीस वर्षांतील अनुभवावरून या योजना तयार करण्यांत आल्या असाव्यात असें दिसतें. सध्यांच्या योजना केवळ भांडवलवाल्यांच्या व कंपन्यावाल्यांच्या गरजा भागविण्याच्याच दृष्टीनें केलेल्या दिसतात हें अगदीं उघड आहे. सध्यां ज्या कंपन्यांच्या हातीं रेल्वे असून ज्यांची मुदत संपत आली आहे अशा खाजगी भांडवलवाल्या कंपन्यांच्या हिताचीही जपणूक आहे हें स्पष्ट आहे. वास्तविक कमिटीची स्थापना हिंदुस्थानांतील रेल्वे करितां भांडवल कसें उभारतां येईल या प्रश्नाचा विचार करण्यापुरतीच असल्यामुळें अशा प्रकारच्या सूचना करणें कमिटीच्या अधिकाराबाहेरचें आहे. कमिटीच्या सूचना अमलांत आल्या तर तें सरकारी रेल्वेंना घातक होईल. कारण तसें झाल्यास सर्व रेल्वे खाजगी कंपन्यांच्या ताब्यांत जाऊन सरकार फक्त त्यांत एक भागीदार ह्मणून राहील. हिंदुस्थानांतील रेल्वे सरकारच्या हातीं असाव्यात या तत्वाचें समर्थन कमिटीच्या रिपोर्टाचे आरंभीं केलेलें असतां अशा प्रकारच्या सूचना कमिटीनें कराव्या हें तर फारच चमत्कारिक आहे. सवलती मिळविणाऱ्यांच्या फायद्यासाठीं देशांतून पैसा

उकळला जावा ह्मणून सध्यां अस्तित्वांत असलेल्या रेल्वेशीं अयोग्य तऱ्हेनें स्पर्धा होईल अशा खटपटीनें उत्तेजन देणें किंवा रयतेला गैरफायदा होईल अशा प्रयत्नांस प्रोत्साहनें देणें या गोष्टीचा सरकारानें आजपर्यंत निषेधच केलेला आहे. आणि तें त्यांचें करणें अगदीं न्याय होतें असें कमिटीच्या रिपोर्टांत आरंभींच ह्मटलेलें आहे कमिटीच्या ह्मणण्याप्रमाणें सरकारचें आजपर्यंतच धोरण वर सांगितल्याप्रमाणें असो किंवा नसो, पण केवळ परदेशी व्यापाऱ्यांना येथेच्छ चरण्याला मोकळीक व्हावी ह्मणून रचलेल्या या व्यूहास हिंदुस्थान सरकार थारा देणार नाहीं, तर मात्र त्यांनीं रेल्वेसंबंधानें केलेल्या एकंदर अन्यायांत कांहीं थोडासा तरी न्याय केला असें ह्मणतां येईल.

## मुंबई इलाखा पेटला !!

गेल्या दोन तीन वर्षांत हिंदुस्थानांतील बहुतेक भागांत कमजास्त मानानें गडबड चालू असतां मुंबई इलाख्यांत बरीचशीं स्वस्थता दिसून येत होती. या स्वस्थतेला मुंबई सरकारचें तेव्हांचें धोरण बऱ्याच अंशानें कारण होतें असें आतां खात्रीनें वाटतें. गेल्या महिन्या पंधरा दिवसांत महाराष्ट्रांतील लोकांमध्यें विशेषसा फरक पडल्याचें ऐकिवांत नसतांना मराठी वर्तमान पत्रकर्त्यांवर राजद्रोहाचे किंवा भिन्नभिन्न जातींत द्वेष माजविण्याचे आरोप येण्याचा जो सपाटा चालू आहे, त्यावरून हें अनुमान अगदीं बरोबर ठरतें. विहारी, अरुणोदय, काळ, स्वराज्य आणि शेवटीं खुद्द केसरी या वर्तमान पत्रांवर खटले केल्यानें, सरकारी हुकमानें लोकांच्या वृत्तींत चलबिचल उत्पन्न केल्याचें श्रेय आलें आहे असें आह्माला समजतें. वर सांगितलेल्या नांवांतील एखादें दुसरें पत्र विशेष लक्षांत घेण्यासारखें नसलें तरी बाकीचीं महाराष्ट्रांतील वजनदार पत्रें असून दोन पत्रें तर जेथें जेथें ह्मणून मराठी भाषा समजते अशा सर्व ठिकाणीं राजकीय बाबतींत अत्यंत आदरणीय होऊन बसलेलीं आहेत. या पत्रांत प्रसिद्ध झालेले लेख पीनल कोडांत दिलेल्या व्याख्याप्रमाणें दोषार्ह असतील किंवा नसतील. तो वाद करावयाची तूर्त वेळ नसली तरी वर्तमान पत्रांवर खटले करावयास मंजुरी मिळाली आहे, ही बाब मात्र टीकेच्या कक्षेतून सुटूं शकत नाहीं. आमच्या समजुतीप्रमाणें मुंबई सरकारचें सध्यांचें वर्तन हिंदुस्थान सरकारच्या एका माजी कौन्सिलरांनीं दिलेल्या आश्वासनाच्या अगदीं विरुद्ध आहे. राजद्रोहाच्या कलमाची पुनर्घटना झाली त्या वेळीं नव्या कलमांतील व्यापक शब्द योजनेमुळें ज्या सभासदांनीं त्याला हरकत घेतली, त्यांना सरकारतर्फे असें आश्वासन देण्यांत आलें होतें कीं जरी या कलमाचें स्वरूप इतकें उग्र दिसत आहे तरी या कलमाखालीं येणाऱ्या लेखामुळें किंवा भाषणामुळें जेथें प्रत्यक्ष बेकायदेशीर वर्तन कोणाकडून घडलें नसेल अशा ठिकाणीं या कलमाचा सत्तानें अंमल केला जाणार नाहीं. या आश्वासनाचा कायद्याचे कलमांत समावेश नसल्यामुळें तें गैरसोईच्या प्रसंगीं ध्यानांत राहूं नये हें राजनीतीस अनुसरूनच आहे !

रा. परांजपे व त्यांच्याही पेक्षां रा. टिळक यांना सामान्य गुन्हेगाराप्रमाणें मॅजिस्ट्रेट समोर उभे रहाण्याची वेळ यावी हा प्रसंगच त्यांच्या देशबांधवाच्या अंतःकरणांना विलक्षण रीतीनें व्यथित करणारा आहे. सर्व हिंदुस्थानांत रा. टिळक यांच्या बरोबरीनें विद्वान, राजकरणपटु आणि देशभक्त असे पुढारी कितीकसे सांपडतील याचा लोक आपल्याशीं जेव्हां विचार करतील तेव्हां रा. टिळक यांचेवर अशा वृद्धपणीं आलेला प्रसंग त्यांना देशाच्या भावी स्थिति विषयीं किती साशंक करील याची कल्पनाच करावी ! ज्या लेखांवरून त्यांचेवर खटला झाला आहे ते मॅजिस्ट्रेटच्या किंवा दुसऱ्या एखाद्या कोर्टांत कदाचित् राजद्रोही ठरले तरी त्यांचे देशबांधव, फार तर काय खुद्द महाराष्ट्रांतील सच्च्या दिलाचे अधिकारी देखील असेच ह्मणतील कीं, गेल्या तीन वर्षांत महाराष्ट्रांत रा. टिळक होते ह्मणून आज आहे ही स्थिती महाराष्ट्रांत कयम राहिली. अशा अद्वितीय वजनाच्या पुढाऱ्याच्या मदतीनेंच राज्यकारभार रयतेला जास्त सुखावह करण्याची खटपट योग्य दिशेनें करण्याचे सोडून, त्याची बदनामी करूं पहाण्याचा मुंबई सरकारचा उपक्रम सर्वस्वी घातुक आहे, असेंच कोणीही विचारी मनुष्य ह्मणेल. राजद्रोहाच्या आरोपाला तोंड देण्याची रा. टिळक यांची सध्यांची ही दुसरी खेप आहे. तदनुषंगिक भीति किंवा चिंता यांचा लवलेशही त्या पुरुषाचे मनास स्पर्श करूं शकत नाहीं हा अनुभव पूर्वीं त्याच प्रमाणें आतांही आला आहे. सतीचें वाण घेऊन, एक पाय आपल्या ऑफिसांत व अधिकाऱ्यांची वक्र दृष्टी असल्यामुळें, दुसरा पाय तुरुंगांत ठेवून, आपल्या शिरीं असलेली ईश्वरदत्त जबाबदारी स्वसामर्थ्यानुसार पार पाडण्यांत अणुरेणु इतका आळस किंवा स्वार्थबुद्धि न धरणारा पुण्यपुरुष एखाद्या स्टूॅचीनें किंवा अस्टेननें खुनी दरोडखोरांमध्यें राहून काम करावयास लायक ठरविला ह्मणून तो तसा झालाच असें नाहीं. थोरांच्या घरचें श्वान ही सन्मानास पात्र होतें मग रा. टिळक यांनीं ज्या राष्ट्रीयपंथाची स्थापना केली त्यांत मागून येऊन मिळालेल्या सर्व देशभक्तांविषयीं योग्य तितका आदर समाजाच्या अंतःकरणांत खात्रीनें असून त्यांनीं आरंभलेल्या देशकार्यांत अंतर पडण्याची वेळ आली तर त्यांनीं आतांपर्यंत केलेल्या देशसेवेबद्दल अतःकरणपूर्वक कृतज्ञता व्यक्त झाल्यावाचून रहावयाची नाहीं. मुंबई सरकार मात्र या कामांत पुरते चवाठ्यावर आलें आहे. आजपर्यंत झांकून असलेली मूठ उघडल्यामुळें आंत फुटकी कवडीही नाहीं हें सर्व जगास जाहिर झाल्यानें, 'येथून तेथून सर्व एकाच माळेचे मणी' हेंच खरें ठरलें. एकीकडे पांच पत्रकर्त्यांवर खटलें करण्याची मंजुरी देऊन दुसरीकडे आमच्या प्रांतांत सर्व जाती एकमेकांशीं सलोख्यानें वागतात ह्मणून प्रौढी मिरविणें मुंबईच्या गव्हर्नर साहेबांस बिलकुल शोभलें नाहीं. पांच तोफखान्यांचा भडिमार या सलोख्यावर आहे असें सक्तदर्शनीं दिसल्यावर कोणीही शाबूत डोक्याचा मनुष्य अशी शेखी मिरविण्यास तयार झाला नसता. पण माथेफिरूपणा खेरीज जगांत कोठें हास्यास्पद कृत्यें घडतच नाहींत.

## ट्रान्सव्हाल प्रकरणाची पुनरावृत्ति

ट्रान्सव्हालांतील आशियाटिक ब्रिटिश प्रजे संबंधाच्या प्रकरणानें पुन्हा उलट खाल्ली आहे. गेल्या जानेवारी महिन्यांत या प्रकरणाचा अगदीं निकरावर आल्यानंतर जो तडजोडीनें निकाल लावण्यांत आला तो कायम करण्याची ट्रान्सव्हाल सरकारची इच्छा दिसन न आल्यावरून ट्रान्सव्हालांतील सर्व आशियाटिक ब्रिटिश प्रजा आपल्या अब्रूच्या बचावासंबंधानें फिकीरींत पडली आहे. पूर्वींचें प्रकरण खटले व हद्द पारी येथवर जाऊन सुद्धां दाबदडपीच्या धोरणानें मिटत नाहीं असें पाहून सामाच्या साह्यानें आशियाटिक प्रजेचीं मनें स्वस्त करण्याचा कावा ट्रान्सव्हालचे प्रधान मि. स्मटस यांनीं दाखविला, पण त्या काव्याला बळीपडून आशियाटिक लोक फसेल असें आतां कळून आले आहे. वास्तविक मार्गे झालेली तडजोड तत्वाचे दृष्टीनें योग्य अशी झालेली नव्हती. संभावित, अब्रूदार व श्रीमान वर्गाला कमीपणा वाटणारे एक दोन प्रकार कमी करण्यापलीकडे रा. गांधी यांनीं कांहीं जास्त ठरवून घेतलें नव्हतें आणि त्याबद्दल त्यांच्या अनुयायांचा त्यांचेवर रोषही झालेला होता. पण रा. गांधी यांच्याशीं मि. स्मटस यांनीं जो तोंडी करार केला आणि ज्याच्या आधारावर मि. गांधी व इतर ट्रान्सवालमधील संभावित आशियाटिक लोकांनीं आपल्या दृष्टीनें कमीपणा आणणारे प्रकार नाकारून नोंदणी करून घेतली, तोही करार कायद्याच्या रूपानें कायम करण्यास ट्रान्सव्हाल सरकार तयार नाहींत असें कळतें. गेल्या वर्षाच्या अखेरीस निकरावर गेलेलें प्रकरण कसेंबसें थोपवून धरण्यापलीकडे ट्रान्सव्हाल सरकारनें कांहीं जास्त केलें नव्हतें, आशियाटिक ब्रिटिश प्रजेला कायमचा न्याय दिलेला नव्हता असें दिसतें. विकोप्यास गेलेलें प्रकरण कोणत्यातरी युक्तीनें मिटविल्यासारखें करून लोकांमधील तीव्रता शमल्याचें दिसून आल्यावर पुनः येरे माझ्या मागल्या असें करण्याची ही बोअर सरकारची राजनीति तेव्हां उत्तम रीतीनें यशस्वी झाली यांत शंकाच नाहीं. पण आतां मात्र आशियाटिक प्रजा पूर्वीं प्रमाणेंच फसेल असें वाटत नाहीं. मि गांधी यांनीं मि. स्मटस यांचेकडे जाऊन अखेरचें बोलणें केलें त्यांत त्यांना किंवा त्यांच्या बांधवांना अनुकूल अशी निष्पत्ति झाली नाहीं. तेव्हां सर्व आशियाटिकांची जाहिरसभा भरून ट्रान्सव्हाल सरकारच्या या अपमानकारक आणि जुल्मी कायद्याचीं अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या मार्गानें विल्हेवाट लावावयाची असा सर्वांनीं निश्चय केला आहे. या प्रकरणांत ट्रान्सव्हाल सरकारकडे ब्रिटिशप्रजेविषयीं अक्षय अनुदारता दाखविल्याचा दोष तर येतोच पण त्याबरोबरच आशियाटिक समाजाला फसविण्याची अत्यंत निंद्य अशी कृति करून प्रतिपक्षीयांच्या हातच्या शस्त्रांत आपल्या हातानें भर पडली आहे. सारांश पूर्वींचें प्रकरण पूर्णपणें जुन्याचें स्वरूपांत पुनः उपस्थित होऊन ब्रिटिश साम्राज्यांत आशियाटिक ब्रिटिश प्रजेची कदर कशी काय संभाळली जाते हें जगजाहीर होण्याचा प्रसंग जवळ येऊन ठेपला आहे.

## रावबहादूर

रावसाहेब देवराव विनायक दिगंबर हे वऱ्हाडचेच काय पण सर्व हिंदुस्थानचे सुप्रसिद्ध देशभक्त आहेत. सार्वजानिक कार्यासंबंधानें यांचा आमच्या प्रांतांत पाहिला नंबर आहे. आमच्या इकडे देशकार्यामध्यें जी मंडळी अलिकडे प्रमुखत्वेंकरून चमकूं लागली आहेत त्या सर्वांची शाळा चालूं पिढीच्या आरंभीं आकोल्यास स्थापन झाली आणि त्या शाळेंतील प्रसिद्ध गुरुजनांपैकीं राव साहेब देवराव विनायक हे आहेत. हे गृहस्थ बाणीदार लोकाग्रणी आहेत आणि यांची हातोटी सरकार व प्रजा यांस अधिकाधिक प्रेमभावांत गोंवण्याकडे विशेष आहे हे वकीलीच्या धंद्यांत जसे नांवाजलेले आहेत त्यापेक्षांही राजकीय, धार्मिक व औद्योगिक उन्नतीच्या कार्यमालेमध्यें हे अधिक स्तुतीला पात्र आहेत. हे कर्ते पुरुष आहेत आणि कदाचित् अलिकडील जहालांना हे मवाळ दिसतील पण करणीनें ते जहालापेक्षां जहाल आहेत. अशा सद्गृहस्थाची महती स्थानिक सरकारानें ओळखून त्यास रावबहादूर हा किताब दिला या संबंधानें त्यांचें अभिनंदन करण्यापेक्षां सरकारच्या या निस्तेज रावबहादूरीला शोभा आली आहे असें आह्मी ह्मणतो.

# वऱ्हाडवृत्त.


हवामान— पावसानें फार बहार केली असून सध्यांची आकाशांतील घटना पुष्कळ पाऊस येईल अशी आशा दाखवत आहे. या अमृत वृष्टीमुळें लोकांना धीर आला असून भावीं पिकें लोकांना डुलवीत आहेत. रोगराई कांहीं विशेष नाहीं.

महोत्सव:— चक्रवर्ती एडवर्ड बादशहाच्या वाढदिवसाचा महोत्सव पावसामुळें गेल्या शुक्रवारीं झाला हा महोत्सव येथील लोकप्रिय व आनंदवृत्ति सुपरिन्टेंडन्ट राजश्री कॉव्हेन्ट्री यांच्या आश्रयाखालीं करण्यांत आला. नानाविध खेळ, दारूकाम, नाच इत्यादि करमणूकीच्या गोष्टी पुष्कळ झाल्या. अशा उत्सवांच्या प्रसंगीं आमची अशी सुचना आहे कीं निव्वळ शिपाई [illegible]च्या वागडण्यानें मनोरंजन करून न घेतां अधिकारी मंडळी व इतर प्रतिष्टित मंडळी यांनीं नानाविध खेळ खेळावेत ह्मणजे अशा प्रदर्शनानें एक निराळेंच आनंदकारक तादात्म्य उत्पन्न होईल.

रा. रा. माणिकशा रतनजी दस्तुर डिस्ट्रिक्ट जज्ज भंडारा यांची स्वारी कांहीं कामानिमित्त दोन दिवस येथें होती.

दोन घड्याळें एकदम बोलाविणाऱ्यास पोस्ट खर्च माफ.

गजऱ्गोंच्या २४ शिशया बोलाविणाऱ्यास रा. सिस्टम घड्याळ बक्षीस सखळी सुधां शिशीस ।.



रासेकोप सिस्टम किं. रु. ३। स्वदेशी पेटंट वाच किं. रु. ५। सहा हिरे वाली रु. ४। आठ दिवसाच्या किल्लीचे खिशातील घड्याळ रु. १४ सोलजर वाच मजबुत रु. ५। स्वदेशी सेकंड वाली रु. ६ पोस्टखर्च ।-

के. नुरा. आणि कं.

नं. ४७ मुंबई पोस्ट न. ९

त्वरा करा! त्वरा करा?

## बायसिकल टीचर

आमचेकडे सायकल फार थोड्यां वेळांत आणि उत्तम रीतिनें शिकविले जाईल दर माफक असून वकशिर काम केलें जाईल आजवर ९०० शे माणसापेक्षां जास्त लोकांस सायकली शिकविल्या आहेत. बाहेर गांवच्या लोकांकडून रेल्वेभाडें व जेवण खर्च घेतला जाईल. सायकली ही दुरस्त केल्या जातील. नवीन सायकली विकत मिळतील.

जेकब.

सायकल टीचर.

पत्ता:----

अहमद अली कासमजी बोहरा

नं ४८ इं. ७ आकोला (शहर)

## जोगळेकर आणि मंडळी लिमिटेड.

**सरकारच्या सन १८८२ च्या सहाव्या आक्टाप्रमाणें रजिस्टर केली आहे.**

स्थापना सन १९०७

**भांडवल एक लक्ष रुपये.**

**प्रत्येक भाग २५ रुपयाचा**

**याप्रमाणें एकंदर भाग ४०००.**

भागीदारानें भाग मिळण्या करितां अर्ज करते वेळीं दरएक भागाबद्दल अर्जासोबत रुपये १० व अर्ज मंजूर झाल्यावर रु. ५ व बाकीची रक्कम प्रत्येक महिन्यांला रु. ५ प्रमाणें पुरी करून दिली पाहिजे.

सदई कंपनीचें मेमोरँडम् व आर्टिकल्स ऑफ आसोशिएशन आकोला येथें सदर कंपनीचें आफिसांत पाहण्यास मिळेल. प्रास्पेक्टसच्या प्रती सदहू आफिसांत अर्ज केला असतां मिळतील.

बोर्डाच्या हुकूमावरून

**पी. सी. जोगळेकर**

**आणि कंपनी**

**म्या. एजंटस्**

नं. १३

## नोटीस

नोटीस बेशमी तानकु काटे मारोती रायभान बोंडे रा. वरण तालुके चिखली यांस:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी ता. २७-४-०८ इ. रोजीं तुह्मास कुलमुखत्यार पत्र दिलें आहे. हल्लीं तुमचे व माझे मुळींच जुळत नाहीं व ज्या कामाकरितां तुह्मास मुखत्यार नेमले होते तीं कामें तुह्मी मुळीच केलीं नाहींत करितां आतां या नोटिशीवरून तें तुह्मास दिलेलें कुलमुखत्यारपत्र आज तारखेपासून रद्द केलें आहे. तुह्मी आतां त्या मुखत्यारपत्रांचे आधारे माझें कोणतेंही काम करूं नये केल्यास त्या कामोचे जबाबदार तुह्मास धरलें जाईल. कळावें. ता. २०-६-०८ इ.

सही

भीमाबाई मर्द गणु कुणबी पाथरकार

नं. ग. ६० रा. शेगांव नि. बांगडी

## नोटीस

नोटीस बेशमी भोनाजी वा नागोजी धनगर टेंभूरणें ता खामगांव यांस:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून मला वयांत येऊन पांच वर्षे झालीं तेव्हांपासून तूं मजला चांगलें वागवीत नाहींस असें असतांही मी कांहीं दिवस तुझे घरीं राहिलें. नंतर तूं मला स्वत: मारठोक करून नागद येथें आणून माझे सावत्र बापाचे घरीं पोंचते केले व मला धमकी दिली कीं जर तूं आलीस तर दुसऱ्याकडून तुझी इजत घेववीन या भीतीमुळें मी लोकांचें कर्ज दरमहा रुपये पांच प्रमाणें काढून खात आहे. त्याजला सात महिने झालें तितके रुपये नोटीस पावेल तारखेपासून पंधरा दिवसांचे आंत आणून देऊन मला पंच मार्फत घेऊन जावें. असें न केल्यास मी दुसरा घरठाव करीन मग मजवर तुझा नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. करितां आगाउ नोटिशीनें कळविलें आहे. कळावें. ता. २३-६-०८ इ. दस्तूर लक्ष्मण भिकाजी पी. रा. आकोला

सही

तानी मर्द भोनाजी धनगर राहणार हल्लीं नागद ता. बाळापूर

नं. ग. ६१ नि० बांगडी

## नोटीस

खाविंद अबदुल रहिमान वा। दुलेखां चपरासी तहशिल खामगांव तालुके मजकूर यांस:—

नोटीस देणार न्यामतबी मर्द अबदुल रहिमान रा. खामगांव नोटीशीनें कळवितें कीं तुह्मी माझ्याशीं लग्न केलें त्यांस अकरा ११ वर्षे झालीं. तुह्मी मजला चांगलें रीतीनें वागवीत नाहीं व तुह्मी आपलेपासून मजला आजपर्यंत कोणतेंच प्रकारचें सुख दिलें नाहीं. त्यामुळें मी फार त्रस्त झाले. मजला जवळ वागविण्यास टाळाटाळी करितां ह्यामुळें मी लोकांचें कर्ज काढून माझे बापाचें घरीं राहून उदरनिर्वाह करीत असते. ह्यामुळें मजला एकंदर ४ वर्षे पर्यंत खाण्यापिण्याबद्दल व कपड्यालत्याबदल रुपये ३०० तीनशें कर्ज झालें. ते रुपये व मेहेरबदल रुपये ५०० पांच अशरफीची किंमत रुपये ७५ पांच दिनार मेहेर बद्दलची किंमत रुपये १०० असे एकंदर रुपये ९७५ अक्षरीं नउशे पंचाहात्तर झाले ह्या पैकीं रुपये ३०० खावटीचे व मेहेरबद्दलचे रक्कम रुपये ५०० असे रुपये ८०० चार पंचा समक्ष पंधरादिवसांचें आंत मजला द्याल तर मजवर तुमचा लग्नाचा हक्क राहील जर पंधरादिवसांचे आंत वरील रक्कम तुह्मी दिली नाहीं तर अगर ह्या गोष्टीचा उलगडा केला नाही तर मजवर तुमचा कोणतेंही प्रकारचा लग्नाचा हक्क न राहतां ही नोटीस फारकती संबंधी समजून मी दुसरा घरठाव करीन. करितां मुद्दाम नोटीशीनें कळविलें आहे. कळावें. ता. २२-६-०८ दस्तुर गंभीर जयराम पी. रा. खामगांव

सही

न्यामतबी मर्द अबदुल रहिमान

रा. खामगांव नि. खुद बांगडी

नं. ग. ६२

## नोटीस

नोटीस बेशमी भागिरथी मर्द त्र्यंबकराव देशमुख रा. तामशी तालुके बाळापूर इस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुझा नवरा त्रिंबकराव हा माझा धाकटा बंधु होता तो मयत झाला. सर्व जिनगी एकेठिकाणीं आहे व ती वडिलार्जित असून तिची वहिवाट उभयतां समाईक करीत आलों आहों. हिस्से वाटे झालेले नाहींत. तुझी जींनगीवर कांहीं मालकी नाहीं. फक्त अन्नवस्त्राचा तुझा हक्क आहे. तुह्मी जिनगी कोणास गहाण खरेदी वगैरे देऊं नये. गहाण खरेदी करून दिल्यास तें बातल असें कळावें. ता. १७-६-०८ इ.

सही

केशव सोनाजी देशमुख दस्तुर खुद

नं. ग. ६३

## नोटीस

नोटीस बेशमी शेखइमाम वा शेखभीकन मुसलमान राहणार नांदुरा बु. ता. मलकापुर जि. बुलडाणें यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची मुलगी नामे रोशनबी मर्द शेखमहबूब इच्याशीं माझें लग्न होऊन अदमासे पांच वर्षे झाली व त्यानंतर दोन वर्षे तुह्मी तिला माझ्या घरीं नांदविण्यास पाठविले परंतु थोड्यादिवसांनीं नेण्यास आलां व कांहीं तरी लग्नाची सबब सांगून व थाप देऊन तिला घेऊन गेला त्यास सुमारे दोन वर्षे होण्यास आलीं. तरी आपण पाठविलें नाहीं. व आह्मी खुद्द तिला नेण्यास आलो असतां आपण पाठविली नाहीं. असे दोन चार वेळां कांहीं संभावित लोक घेऊन आह्मी नेण्यास आलों असतां पाठविलें नाहीं. व कांहीं तरी आह्मांस थापा देतां तर हें बरोबर नाहीं. करितां या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं १५ दिवसांचे आंत माझे बायकोस तिच्या अंगावरील दागीन्यासह आणून घालावे. तिच्या अंगावर चांदीचे व सोन्याचे दागिने ५०० रुपयाचे आहे. तर वर दिलेल्या मुदतींत आणून न घातल्यास रितीप्रमाणें व्यवस्था करण्यांत येईल. मग आपण खावटीचा वगैरे खर्च मागितल्यास मिळणार नाहीं व या नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावें. ता. २३-६-१९०८

सही (उर्दुत)

शेखमहबुप वल्लद नुरमहमद जमा दार

मु. मोताळे ता. मलकापूर

नं. ग. ६४ पो. माताळें द. खु.

## नोटीस

रा. रा. सांगवीदास कृपादास मारवाडी राहणार मुडगांव यांस:—

खालीं सही करणार यांचेकडून नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, मौजे बेलखेड ता. आकोट येथील शेत सर्व्हे नंबर ४८ एकर गुंठे ११०१८ आकार रुपये २९ याचें खातें दौलत उकर्डी याचे नांवें असोन यांतील एक द्वितीयांश हिस्सा पुर्वेकडील तुमचा आहे. सदहू हिस्सा तुह्मी बळीराम सखाराम व पुंडलीक गंगाराम यांस विकण्याचा ५५० रुपयास झाडासमेत व विहिरीसमेत विकण्याचा १५ दिवसापूर्वी तुह्मी ठराव केला आहे असें समजतें. सदहू खरेदीखत अद्याप झालें नाहीं. तोच हिस्सा आमचेकडेस पाथ्यानें वाहण्याकरितां आहे. सदहू शेत तुह्मी त्या किंमतीस वरील इसमास खरेदी देणार आहां ती किंमत आमचे जवळून घेऊन आह्मास खरेदी द्यावें, नाहींतर आह्मी अग्रक्रियेचा दावा करून कोर्ट मार्फत शेत मिळवून घेऊं. या फिर्यादीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे शेत खरेदी द्यावें. नाहीं तर रीतीप्रमाणें तजवीज केली जाईल कळावें. ही नोटीस दिली ता. २२-६-१९०८ इसवी

सही

दौलत वल्लद उकर्डा अ. पा.

मुकदा वल्लद मुकदेव याचे

नं. ग. ६५ हातची निशाणी खुद असे

## नोटीस

नोटीस बेशमी पांडुरंग आकाजी गावंडे राहणार मौजे तांदुळवाडी ता० आकोट यांस:—

खालीं सही करणाराकडून नोटीस देते असाकीं आह्मी दोघी मीळून तुह्मास मुखत्यारपत्र लिहून देवून नोंदुन दिलें आहे. आतां सदहू दीलेलें मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. मुखत्यारपत्रापरून आमचे कोणतेही खानगी कींवा कोटींचें काम करूं नये केल्यास जबाबदार व्हाल. नोटीस पावल्या बरोबर मुखत्यारपत्र आणून देणें व आमचे जवळुन रुपये आजपावेतों नेले त्याचा हीशेब देणें. हिशेब न दिल्यास खर्च होऊन बचेत असलेला पैसा तो आणून देणें. यांत बीलकुल चुकू नये कळावें तारीख २३ माहे जून सन १९०८ ई. दस्तुर माधवराव रामचंद्र रा. आकोट

सही

तुळसी मर्द सोनाजी नी. खुद बां.

तानी मर्द कीसन नी. खुद बां.

नं. ग. ६६ रा. तांदुळवाडी

## आर्यवनौषधालय मुर्डी

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांजकडील आनररी असिस्टंट सर्जन मी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोले यांनी आमची ओषधें बारकाईनें ... हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत. यांहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकिट आह्मास दिलें आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देउनही त्याचें आरोग्यार्थ आणखी एखादें औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजविनी

धातुवर्धक. अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्य स्तंभक,<br>
रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सूवर्ण माक्षीक<br>
मौक्तिक कस्तुरि व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शरिरांतील मुख्य राजा जो धातू तो शुद्ध असेल तरच शरिर निरोगी राहुन सर्व सौख्य प्राप्त होते. तो दोषी असेल तर शरिरांत नानाप्रकारचे रोगरुपी शत्रु उत्पन्न होऊन शारिरीक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ट होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी पाहिजे त्या दिवसांत एकदां तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात उन्हाळे इंद्रियशिथलता, कडकी, गर्मीसंबंधी मुरलेले विकार मुत्रसंकोच; धातुचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, सठ पाय मुत्रमार्ग, व नेत्र याचा दाह, क्षय, पंडूरोग, मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश पित्तविकार. बाळंतरोग, मधुमेह जुनाट परमा, मुष्टीमैथूनाने आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त यांची शुद्धी वृद्धि वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न प लागते त्यांना उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत. करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळाली आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष मुलें, यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितीही घेणारास टपाल खर्च माफ आहे ४ रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनुपान खर्डी सोबत किंवा व्ही. पीनें खालील पत्यावर मिळतील.

दरः—एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु. ११५ गो ३ रु १६५ गो. ४ रु. २७५ गो० ६ रु. ५५० गो० रु.

२ अपूर्व नेत्रांजनः—यानें पडळ, साहर, फुल, खुपऱ्या, बिंदु, च इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरीत बरे होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खरं रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु.

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः—कोणताही नवा जुना परमा व उजन्य दाह तिडीक मुतांची ओली, संकोच पुपस्राव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नसत ... दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठेंच ... त नाहीं. बा० किं० १ ।। भार बाटलीस रु. २

४ दंतबलवर्धक चूर्णः—दंतसंबंधी सर्व ... उत्तम बरे .

५ विंचूचें विषः—औषध लावतांच उतरतें मुळी २ तो. ८ आणे

६ गजकर्णः—खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ... दिवसांत जातात रु. ६ आणे

७ सर्व हिमज्वरः—औषध घेताच कशाहि प्रकारचें ज्वर असले तरी तें औषध घेताच जाऊन पुनः उ... नाहीत. १२ पुड्या १ रु.

८ प्लेगावर रामबाण औषधः—आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरू होतांच सर्वांनीं संग्रह तापावर गोळ्या गा... मलम, वात चढू नये ह्मणून वातावर मात्रा याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं. २ आणे ख. सो.

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपाय-कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगावर अनेक औषधें ग्रंथोक्त रसायनें भस्में धातु. गुटिका, आसव, तेलें, सुगंधी अत्तर, माफक दरानें मिळतात. अनुपान खर्डी सोबत टपाल खर्च वेगळा पडेल पेटीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतीचें मान कळविल्यास रोगाची निदान चिकीत्सा कळवूं.

## अत्यंत आगत्यची सुचना,

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधाच्या अनेक जाहिराती सुरु असुन प्रत्येक आपला समाज निरुद्योगी व आळशी बनल्यामळें एका नें धंदा सुरू केला त्याचेंच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजे त्यानें करावें आमचे जाहिरातीस कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजिर्ले वगैरे गावांतून तो शीवस्थेत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरूं होत आहेत. अशा जाहिराती किंवा तें लोक याची आह्मास निंद्रा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याचा तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हेंच कीं ज्यांच्य कारखाना आज सतत १५।२० वर्षे अव्याहत सुरू असून ज्यांच्या औषधास ... ले डाक्टरांनी सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधींनें कित्यावधी ग्राहक रोगमुक्त झाले व निरोग होत आहेत त्यांचीच औषध नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करतां अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याण करीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेंस आणण्याची खटपट करूं. आज-पर्यंत आमचे खटपटीस यशहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्य बंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यासआमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तीच सर्वांनीं वापरावा, एकवार अनुभवानें खात्री होईल इतर जाहिरातीशीं आमचा तिळमात्र संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषध मागणें तीं खालील पत्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरी गुणकारक औषधें मिळून हटकूण व त्वरित आरोग्य येईल. नं. १

कृष्णशास्त्री पेंडसे वद्य

पत्ताः—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.

---

## ORIENTAL GOVERNMENT LIFE ASSURENCE COMPANY LIMITED

*Established 1874.*

*HEAD OFFICE*—**BOMAY**

Chief Agency for C. P. Berar and Khandesh

*Head—Quarters Nagpur C. P.*

## FUNDS EXCEED THREE CRORES AND TEN LAKHS

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

**IMMEDIATE SETTELEMENT OF CLAIMS**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. *This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating heir clients with the utmost liberality*

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's funds amount ot a givensum, but it is essential to know how such Funds are invested— if in miscellaueous and risky investments or how secured

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay n terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured

*Government Officers, ofessional men, Tradesmen and others,* by tmploying a portion of their annual in come or profits in effecting life polec t once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure bow long he will live, and although he may save money yet if he di secarly, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is notover Life being so uncertain, the sooner a man makes hup his mind to assure his life, the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay There are numerous instances in the records of the "Oriental" where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential an energetic Agents wanted For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to—

M. De SOUZA,<br>
CHIEF AEGNT<br>
Nagpur.

9

---

हे पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशीवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.